# एम. कॉम. भाग - २

# व्यवसाय व्यवस्थापन पेपर क्र. ५

# उद्योजकता व्यवस्थापन

# १

# उद्योजकता व्याख्या आणि महत्त्व

## Entreprenership : Definition and Importance

**घटक रचना :**

१.१ प्रास्ताविक
१.२ उद्योजकतेची व्याख्या
१.३ उद्योकतेचे स्वरूप
१.४ उद्योजकता महत्त्व
१.५ उद्योजकता विकास आणि भारत
१.६ सारांश
१.७ स्वयं अध्यापनासाठी प्रश्न

## १.१ प्रास्ताविक (Introduction) :

उद्योजकता ही एक अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. ह्या संकल्पनेची उत्पत्ती सोळाव्या शतकामध्ये प्रान्समध्ये झाली असे मानले जाते. मागील चारशे वर्षाच्या प्रदिर्घ कालखंडामध्ये विविध प्रकारचे अनेक बदल घडून आले. परिणामतः उद्योजकता ही संकल्पना काळानुसार, परिस्थितीनुसार आणि बदलत्या संदर्भानुसार बदलत आणि प्रगत व व्यापक झाली. उद्योजकता हा शब्द फ्रेच भाषेतील ज्यामुळे शब्दापासून विकसित झाला आहे. त्याचा अर्थ अंगीकृत करणे, स्वीकारणे, शोधणे, बदलणे असा होतो. उद्योजकतेची व्याख्या करण्याचा प्रयत्न काही विद्वानांनी केला आहे. व्याख्याकारांनी उद्योजकतेच्या विविध पैलूंवर भर दिला आहे. पूढे उद्योजकतेच्या काही व्याख्या व त्यांचे स्पष्टीकरण दिले आहे.

द्दिगिग्स यांनी उद्योजकांची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, ''उद्योजकता हे गुंतवणुक आणि उत्पादनाची संधी शोधण्याचे, उत्पादनाचे नवीन प्रक्रिया सुरू करण्याच्या दृष्टीने उपक्रमाला संघटीत करण्याचे, भांडवल उभारणी करण्याचे, कामगारांना कामावर लावण्याचे, कच्चा मालाचा पुरवठा करण्याची व्यवस्था करण्याचे, उपक्रमाकरिता जागा शोधण्याचे, नवीन तंत्र व वस्तूंची ओळख करून देण्याचे, कच्च्या मालाचे नविन स्त्रोत शोधण्याचे आणि उपक्रमाचे दैनंदिन व्यवहार चालावेत ह्याकरिता वरिष्ठ व्यवस्थापकांची निवड करण्याचे कार्य आहे.'' द्दिगिन्स यांच्या मते उद्योजकता हे उद्योजकाने करावयाचे एक कार्य आहे. ह्या कार्याची व्याप्ती गुंतवणूक व उत्पादनाची संधी शोधण्यापासून व भांडवल उभारणी करण्यापासून तो व्यवस्थापकांची नेमणूक करण्यापर्यंत आहे. द्दिगिन्स यांनीच उद्योजकता ह्या कार्यामध्ये दहा विभिन्न क्रियांचा अंतर्भाव होतो असे मत व्यक्त केलेले आहे. द्दिगिन्स यांनी उद्योजकतेमध्ये ज्या

क्रियांचा समावेश केला, ती सर्व व्यवस्थापनाची कार्य आहेत. ह्या दृष्टीकोनातून विचार केल्यास, उद्योजकतेची संकल्पना ही व्यवस्थापनाच्या संकल्पनेशी मिळतीजुळती आहे, असा निष्कर्ष निघतो. विलियम डायमन्ड यांनी उद्योजकतेची ती व्याख्या केली त्यात ठराविक पैलूवर भर देण्याच्या दृष्टीने त्यांनी उद्योजकता या संकल्पनेची व्याप्ती मर्यादित केली. डायमन्ड यांच्या मते, ''उद्योजकता म्हणजे नविन आर्थिक क्रिया सुरू करण्यामध्ये अनुस्यूत असलेली जोखीम स्विकारण्याची तयारी. यामुळे अपरिहार्यपणे नसले तरी नवनिर्मिती घडून येते. जोखीम स्वीकारणे व निर्णय घेणे. क्रिया विशेष महत्त्वाच्या नसल्या तरी उद्योजकतेमध्ये नेहमी जोखीम स्वीकारणे व निर्णय घेणे या क्रियांचा समावेश होतो.''

उद्योजकता या संकल्पनेचा आशय स्पष्ट होण्याच्या दृष्टीने ए. एच. कोल यांनी केलेली उद्योजकतेची पुढील व्याख्या उपयुक्त ठरते. नफा मिळवणे, नफ्यांचे प्रमाण टिकवून ठेवणे किंवा नफ्यामध्ये वाढ करण्याच्या हेतूने आर्थिक वस्तू व सेवाहचे उत्पादन किंवा विवरण करण्याकरीता एखादी व्यक्ती किंवा परस्परांशी संबंधीत असलेल्या व्यक्तिच्या एखाद्या समुहाने केलेले सहेतूक कार्य म्हणजे उद्योजक होय. नफा मिळविणे हे उद्योजकतेचे उद्दिष्ट असते ही बाबवर दिलेल्या व्याख्येवरून स्पष्ट करण्यात आली आहे. दुसरे असे की उद्योजकतेचा संबंध मानवी व्यवहाराशी असतो. मग हे व्यवहार किंवा कार्य एखाद्या व्यक्तिचे असो किंवा व्यक्तींच्या एखाद्या समुहाचे असो. हे व्यवहार आर्थिक वस्तू व सेवांच्या उत्पादनाशी संबंधित असू शकतात किंवा ते वस्तू व सेवांच्या वितरणाशी निगडित असू शकतात.

## १.२ उद्योजकतेची व्याख्या (Definition of Entreprenership):

उद्योजकता या संकल्पनेचा अर्थ वरील विश्लेषणात विशद करण्यात आलेला आहे. काही महत्त्वाच्या तज्ञांच्या उद्योजकांच्या व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केलेल्या आहेत.

अ) जेफरी टिमन्स यांच्या मते, ''उद्योजकता म्हणजे प्रत्यक्षात कोणतीही अनुकुलता नसतांना काहीतरी नव्याने उत्पन्न करण्याची व निर्माण करण्याची क्षमता होय.'' क. पिटर एक ड्रकर (१९६४) यांच्या मते, ''जी व्यक्ती सदैव बदलांचा शोध होते. त्याला अपेक्षित प्रतिसाद देते आणि त्याचा संधी म्हणून लाभ उठविते ती व्यक्ती म्हणजे उद्योजक.''

उद्योजकता ह्या संकल्पनेचा विचार करीत असतांना जोसेफ शुम्पीटर यांनी व्यक्त केलेल्या मतांचा विचार करणे आवश्यक आहे. श्री. जोसेफ शुम्पीटर यांच्या ग्रंथ सर्वप्रथम १९११ साली जर्मन भाषेत आणि नंतर १९३४ साली जर्मन भाषेत आणि नंतर १९३४ साली इंग्रजी भाषेत प्रकाशित झाला. जोसेफ शुम्पीटर यांच्या मते उद्योजकता ही सृजनात्मक क्रिया आहे. कोणत्याही व्यवसायाचे संचालन करताना, सामान्यपणे ज्या गोष्टी केल्या जात नाहीत. अशा गोष्टी वेगळ्या पद्धतीने करण्याच्या क्रिया उद्योजकतेमध्ये समाविष्ट होतात.

उद्योजकता म्हणजे नवनिर्मिती उद्योजकांनी केलेल्या नवनिर्मितीमुळे मुलभूत बदल घडून येतात. ह्या बदलांमुळे अर्थकारणातील स्थितीशील संपुष्टात येऊन चैतन्य निर्माण होते. उत्पादनाची साधने उत्पादन कार्यामध्ये गुंतविली जातात व परिणामतः आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळते.

## १.३ उद्योजकतेचे स्वरूप (Nature of Entreprenership) :

उद्योजकता या संकल्पनेचा अर्थ नीटपणे समजून घेण्याकरिता उद्योजकतेचे स्वरूप लक्षात घेणे योग्य होईल. समाजाच्या आर्थिक विकास व उत्कर्षाच्या प्रक्रियेमध्ये उद्योजकतेचे महत्त्व लक्षात आल्यामुळे, मागील चारशे वर्षाच्या कालखंडामध्ये अनेक बुद्धिमंतांनी, उद्योजकांची भूमिका इ. बाबीवर चिंतन केले व आपले हे चिंतन प्रकाशित केले. या चिंतन व संशोधनामधील सर्वसाधारणपणे मान्यता पावलेल्या काही मोजक्या मुद्यांचा पुढे थोडक्यात उल्लेख केला आहे.

१) नवनिर्मीती (Innovation)
२) प्रेरणा व सिद्धी प्रेरणा (Need for Achievement)
३) संघटनेची उभारणी
४) व्यवस्थापकीय कौशल्य व नेतृत्व
५) उणीवांचे निराकरण
६) उद्योजकता शास्त्र की कला ?

### १) नवनिर्मीती (Innovation):

नवनिर्मिती हे उद्योजकतेचे एक व्यवच्छेदक लक्षण मानायला हवे. उद्योजकता ही एक सृजनात्मक स्वरूपाची प्रक्रिया असते आणि प्रामुख्याने नवप्रवर्तनाच्या माध्यमातून ही प्रक्रिया पुढे सरकत असते. जोसेफ सुम्पीटर याच्या मते उद्योजक हा नवनिर्मिती करणारा असतो. तो विविध मार्गानी नवनिर्मिती करतो; त्यामुळे विविध बदल घडून येतात व परिणामतः आर्थिक विकासाला चालना मिळते. त्यामुळे विविध बदल घडून येतात व परिणामतः आर्थिक विकासाला चालना मिळते. अशा रीतीने उद्योजक हा बदल घडवून आणणारा मध्यस्थ असतो.

### २) यश मिळण्याची प्रेरणा व सिद्धी प्रेरणा (Need for Achievement) :

उद्योजक विविध मार्गानी नवनिर्मिती घडवून आणतो, पण शिवाय त्याला निर्णय घ्यावे लागतात, उत्पादनाचे घटक एकत्रित आणावे लागतात, उपक्रमाकरीता संघटनेची उभारणी करावी लागते व जोखीमेची जबाबदारी स्वीकारावी लागते. उद्योजकामध्ये यश मिळविण्याची प्रबळ प्रेरणा किंवा सिद्धी प्रेरणा असल्याशिवाय तो परिश्रम करण्यासाठी, सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी व जोखीमेची जबाबदारी स्वीकारणेसाठी पुढे येत नाही. त्यामुळेच उद्योजकाच्या व्यक्तिमत्त्वामधील यश मिळविण्याची प्रेरणा जितकी जागृत किंवा तीव्र राहील तेवढीच त्याला यश मिळण्याची शक्यता जास्त असते. ही प्रेरणा म्हणजे एक प्रकारची मानसिक लस असते. अशा प्रकारे अभिप्रेरित झालेली व्यक्ति प्रत्येक कार्यश्रेष्ठ ठरेल अशारितीने, कमाल कार्यक्षमतेने करते, कठोर परिश्रम करते व त्याग करण्याचीपण तयारी करते जास्तीत जास्त पैसा मिळविणे प्रतिष्ठा किंवा समाजाकडून मान्यता मिळविणे ह्या हेतूने नव्हे, तर व्यक्तिगत यश मिळविण्याच्या अंतर्गत प्रेरणेने भारित झाल्यामुळे ही व्यक्ती न रूळलेल्या पाय वाटेने चालण्याकरीता तयार होतो. अशा रीतीने यश मिळण्याची प्रबळ प्रेरणा व त्याचा व्यक्तिच्या व्यवहारांवर घडून येणारा धनात्मक स्वरूपाचा परिणाम हे उद्योजकतेचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट होय.

### ३) संघटनेची उभारणी :

उपक्रम कोणत्याही प्रकारचा असो, त्या उपक्रमाला एक कार्यक्षम संघटना आवश्यक असते. त्या संघटनेच्या माध्यमातून उद्योजकता त्याची विविध कार्ये करावयाची असतात. त्यामुळेच संघटनेची उभारणी करण्याची क्रिया उद्योजकतेमध्ये अनुस्यूत आहे असे मानले जाते.

यशस्वी होण्यासाठी उद्योजकांमध्ये विविध प्रकारची क्षमता व कौशल्ये असावी लागतात. फ्रेडरिक्त हारबिसन ह्या विचारवंतांने संघटना उभारणीच्या कौशल्याला विशेष महत्त्व दिले आहे. ह्या कौशल्यामुळे उद्योजकाला सुयोग्य व आवश्यक गुणवत्ता असलेल्या कर्मचाऱ्यांची निवड व नेमणूक करता येते. त्यांना वेगवेगळी कामे सोपविता येतात.

**४) व्यवस्थापकीय कौशल्य व नेतृत्व :**

यशस्वी होण्यासाठी उद्योजकामध्ये विविध प्रकारची कौशल्ये असायला हवीत. उद्योजकाला उपक्रमाच्या व्यवस्थापनाचीही जबाबदारी सांभाळवी लागत असल्यामुळे, नियोजित कार्यात यश मिळण्यासाठी उद्योजकाजवळ व्यवस्थापीय कौशल्ये व नेतृत्व करण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. प्रत्येक उपक्रमाला संचालनासाठी व विस्तारासाठी भरपूर भांडवल आवश्यक असते. हे भांडवल योग्य वेळेवर व अत्यल्प खर्चात मिळविण्याची जबाबदारी उद्योजकावर असते. हे भांडवल उभारण्यासाठी उद्योजकामध्ये वेगळ्या प्रकारची क्षमता व कौशल्ये असणे आवश्यक आहे हे खरे. होझेलिटज यांच्या मते उद्योजकांच्या दृष्टीने भांडवल उभारणीच्या कौशल्यापेक्षा व्यवस्थापकीय कौशल्ये व नेतृत्व ह्याला विशेष महत्त्व आहे. उद्योजकामध्ये व्यवस्थापण कौशल्ये व क्षमता तर आवश्यक आहेच पण शिवाय त्याला सर्वच प्रसंगी उपक्रमाचे नेतृत्व अत्यंत समर्थपणे करता आले पाहिजे. जेथे सामाजिक प्रक्रिया साचेबंद नसतात आणि तेथेच उद्योजकतेचा विकास होण्यासाठी चांगला वाव असतो.

**५) उणीवांचे निराकरण :**

ळोबेन्स्टीन हा संशोधकांच्या मते समाजामधील उद्योजकता ही नैमित्तिक उद्योजकता आणि नाविन्याचा अन्यास असलेली व नवनिर्मितीवर भर देणारी उद्योजकता अशी दोन प्रकारची उद्योजकाने व्यवस्थापकांची नेहमीची कार्ये करण्यावर भर असतो तर दुसऱ्या प्रकारच्या उद्योजकतेमध्ये नवीन बदल घडवून आणण्यावर भर असतो. उक्रमामध्ये उत्पादनाचे जे कार्य चालते. त्याबद्दल संबंधितांना पूरेसे ज्ञान नसते. उत्पादनाच्या कार्यामध्ये आवश्यक असणारे सर्व घटक बाजारात नेहमी हमखासपणे मिळतातच असे नाही. उपक्रमाच्या कारभारात अनेक प्रकारच्या उणीवा असतात. विभिन्न कारणांमुळे गुंतागुंत निर्माण होते. व समस्यांचा उद्भव घडून येतो. ह्या सर्व प्रकारच्या उणीवा दूर करणे व प्रश्नाची साठवणूक करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, हे उद्योजकाचे कार्य होय.

## १.४ उद्योजकतेचे महत्त्व (Importantance) :

उद्योजकतेचे महत्त्व खालीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहेत.

अ) उत्पादन निर्मीती
ब) नवनिर्मीतीचे कार्य
क) भांडवल निर्मिती
ड) कार्यक्षम विपणन व्यवस्था
इ) रोजगार निर्मीती
ई) संतुलीत प्रादेशिक विकास
उ) आर्थिक विकास
ऊ) जीवनमान सुधारणे

**अ) उत्पादन निर्मिती :**

एखाद्या देशाचा आर्थिक विकास घडून येण्याकरीता त्या देशात विभिन संसाधनांची उपलब्धता आणि ज्या संसाधनांचा योग्य उपयोग घडून येणे आवश्यक असते. ही संसाधने नैसर्गिक संसाधन, वित्तीय संसाधने नैसर्गिक संसाधने, वित्तीय संसाधने व मानवी संसाधने अशी तीन प्रकारची असतात. ह्या संसाधनांमधून वस्तू व सेवांच्या निर्मितीसाठी भूमी, भांडवल व श्रम हे उत्पादन घटक प्राप्त होत असतात. प्रत्येकच देशात ही तीनही प्रकारची संसाधने कमी किंवा जास्त प्रमाणात उपलब्ध असतात. काही देशांमध्ये ही संसाधने अतिशय थोड्या प्रमाणावर उपलब्ध असतात.

प्रत्येक उद्योजक अनेक निर्णय होतो. कोणत्या उद्योगाची स्थापना करावयाची आहे किंवा कोणत्या वस्तूचे उत्पादन करावयाचे आहे किंवा कोणत्या वस्तूच्या खरेदी विक्रीचा व्यवसाय करावयाचा आहे, ह्यासंबंधी उद्योजकाला सर्वप्रथम निर्णय घ्यावा लागतो, हा निर्णय घेतल्यानंतर मग त्या विशिष्ट उद्योगासाठी कोणते उत्पादन घटक लागतील व ते कुठून मिळवावे लागतील याबद्दल योजना आखून नंतर उद्योजक तशी व्यवस्था करतो.

उत्पादनाचे विभिन्न घटक विशिष्ट ठिकाणी आणून व त्यांचा याग्य प्रमाणात उपयोग करून घेऊन उत्पादनाचे कार्य प्रत्यक्षात सुरू करण्यासाठी उद्योजकांचेच प्रयत्न कारणीभूत ठरतात. उत्पादनाला आवश्यक असलेल्या काही गोष्टी जवळपास उपस्थित नसल्यास, ह्या गोष्टी दूरच्या प्रदेशांमधून किंवा परिस्थितीनुसार व गरजेनुसार परदेशातून पण आणता येतात. हे सर्व कार्य उद्योजकालाच करावे लागते. याचाच अर्थ असा की, एखाद्या समाजात उद्योजक नसेल किंवा उद्योजकांनी त्याचे कार्य केले नाही, तर त्या समाजात उत्पादनाची क्रिया सुरूच होऊ शकत नाही. विभिन्न प्रकारची संसाधने किंवा वेगवेगळे उत्पादन घटक उपलब्ध आहेत म्हणून उत्पादनाची क्रिया कधीच सुरू होत नाही. उत्पादनाची क्रिया ही स्वाभाविकपणे किंवा निसर्गक्रमानुसार सुरू होणारी क्रिया असते. कोणीतरी पुढाकार घेऊन, परिश्रम करून, योजना आखून प्रयत्न केले तरच उत्पादनाची क्रिया सुरू होते.

**ब) नवनिर्मितीचे कार्य :**

उद्योजकतेची उत्पत्ती, उद्योजकतेचा विकास, उद्योजकांची कार्य व इतर आनुषंगिक गोष्टींबाबत अनेक व्यासंगी बुद्धीमतांनी केलेले चिंतन सिद्धांताच्या स्वरूपात मांडण्यात आले आहेत. ह्या बुद्धीवंतामध्ये जोसेफ शुम्पीटर यांचे नाव व त्यांचे चिंतन विशेष महत्त्वाचे आहे. शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनामुळे शोध लागतात. ह्या शोधाच्या निष्पत्तीचा व्यावहारिक पातळीवर व्यावसायिक स्वरूपात करून घेण्यात आलेल्या उपयोगाला नवनिर्मिती असे म्हणतात. शास्त्रज्ञ व संशोधकांची प्रयत्नांमुळे शोध लागतात. तर उद्योजकांनी केलेल्या प्रयत्नामुळे नवनिर्मिती घडून येते. शोध आणि नवनिर्मिती यामध्ये असा हा जवळचा सहसंबंध आहे. शुम्पीटर यांच्या मते उद्योजक पुढीलपैकी कोणत्याही एक किंवा जास्त पद्धतीच्या माध्यमातून नवनिर्मीती घडवून आणतात.

१) नवीन पद्धतीने संघटनेची उभारणी करून
२) कच्चा माल किंवा अर्धनिर्मात वस्तूची नवीन स्त्रोत उपयोगात आणून
३) नवीन बाजारपेठांचा शोध करून
४) उत्पादनाच्या सर्वस्वी नवीन पद्धतीचा अंगिकार करून
५) संपूर्णपणे नवीन वस्तूचे किंवा जुन्याच वस्तूचे पण सुधारित व श्रेष्ठ स्वरूपात उत्पादन करून

उद्योजकांनी केलेल्या पद्धतशीर प्रयत्नांमुळे वर निर्दिष्ट केलेल्या एक किंवा जास्त पद्धतीने नवनिर्मिती घडून येते. ह्या नवनिर्मितीमुळे विभिन्न प्रकारचे बदल घडून येतात व नंतर ह्याच बदलांमुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळते. अश रीतीने शुम्पीटर यांच्या प्रतिपादनानुसार उद्योजकांनी केलेल्या नवनिर्मितीमुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा प्रारंभ होतो व नंतर उत्तरोत्तर आर्थिक विकासाचा वेग वाढत जातो.

## क) भांडवल निर्मिती :

कोणत्याही उद्योगाची स्थापना करण्यासाठी उद्योजकाला स्वतःचे पैसे तसेच नातलग व मित्रांकडून गोळा केलेले पैसे गुंतवावे लागतात. आधुनिक काळात उद्योजक केवळ स्वतःच्या पैश्याच्या बळावर उद्योग उभा करू शकत नाहीत. त्यामुळे संयुक्त भांडवली संस्थेची स्थापना करून व ह्या संयुक्त भांडवली संस्थेचे भाग व गरजेनुसार कर्जरोखे विकणे, हा एकच पर्याय उद्योजकांनी शिल्लक राहतो. उद्योजकांनी भाग किंवा कर्जरोखे विकल्यामुळे समाजात ठिकठिकाणी विखुरलेली सुप्त बचत व्यवस्थितपणे वळविली जाते व ती भांडवलामध्ये परिवर्तीत होऊन उत्पादक कार्या व गुंतविली जाते. त्यामुळे समाजामधील भांडवल निर्मितीचा दर पाहतो, उद्योजक समाजामधील बजतींना आकृष्ट करतात. भांडवलनिर्मीती घडवून आणतात आणि नंतर हे भांडवल उत्पादक कार्यासाठी उपयोगात आणतात. उद्योग उद्योजकांच्या ह्या कार्यामुळे समाजाच्या आर्थिक विकासाचे चक्र अविरत सुरू राहते.

## ड) रोजगार निर्मिती :

भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या चौकटीत अर्थव्यवहार करणाऱ्या प्रत्येक देशामध्ये बेकारीची तीव्र समस्या अभिप्रेत असते. हे विसरता येणार नाही. बेकारीमुळे लक्षावधी कुटुंबांना आत्यतिक दारिद्र्याचे, अपमानाचे व विवषतेचे असह्य जीवन जगावे लागते. बेकार व्यक्तिंच्या मनात साचून राहिलेला असमाधान व चीड जेव्हा असमाजिक कृत्याकरवी प्रकट होते, तेव्हा समाजामधील सर्व आदर्श, उदात्त विचार व नैतिक मुल्ये रसातळाला गेल्याशिवाय राहत नाही. उद्योजकांनी कोणत्याही क्षेत्रामध्ये भांडवल गुंतवणूक करून उद्योगाची स्थापना केल्यास तेथे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्यामुळे तेथे अनेक बेकार पण सुयोग्य व्यक्तिंना काम मिळते. ह्या व्यक्तिमध्ये यंत्रज्ञ, तंत्रज्ञांपासून ते सुशिक्षित व अप्रशिक्षित कामगार अशा सर्व प्रकारच्या व्यक्तींचा अंतर्भाव होतो. अशा रीतीने उद्योजकतेचा विकास झाल्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी निर्माण होतात व पर्यायाने बेकारीची उग्रता कमी होते. उद्योजकतेचा विकास घडून आल्यास, मानवी संसाधनांचा सुयोग्य उपयोग घडून येण्याची स्थिती निर्माण होते.

## इ) संतुलीत प्रादेशिक विकास :

भौगोलिक दृष्टीने प्रचंड विस्तार असलेल्या भारतासारख्या प्रत्येक देशामध्ये आर्थिक विकासाची प्रक्रीया लवकरच सुरू होते. तेथे विकासाची संरचना निर्माण होते व ह्या कारणामुळे त्या प्रदेशाचा होते व ह्या कारणामुळे त्या प्रदेशाचा जलद गतीने आर्थिक विकास घडून येतो. उलट विकासाची संरचना अस्तित्वात नसलेल्या प्रदेशामध्ये विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती असूनही असे प्रदेश विकासाच्या मार्गावर खूप मागे रेंगाळतात. अशा परिस्थितीत प्रादेशिक विषमता वाढीला लागते. काही प्रदेशामधील साधनसंपत्तीचा नीट उपयोग संभवत नाही आणि तेथील जनतेवर मागासपणाच्या व दरिद्र्याच्या स्थितीमध्ये कायम खितपत पडून राहण्याची पाळी

येते. मागास प्रदेशात उद्योगांची स्थापना करावी ह्याकरिता मध्यवर्ती व राज्य सरकारांनी मागास प्रदेशात विकासाची संरचना निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, उद्योजकांना दिर्घ प्रयत्न करावेत, उद्योजकांना दिघे काळापर्यंत विशेष सवलत बद्दल कराव्या आणि त्यांना आर्थिक साह्य व संरक्षण द्यावे. सरकारने अशी बहुअंगी प्रभावी उपाययोजना केल्यास नवीन उद्योजक आपले उद्योग मागास प्रदेशात स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतात. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला वेग येतो. उद्योजकतेच्या विकासाच्या माध्यमातून संतुलीत प्रादेशिक विकास घडून आल्यास अनेक फायदे संभवतात. काही महत्त्वाची फायदे पुढे थोडक्यात उल्लेख केला आहे.

१) आर्थिक विकासाच्या बाबतीत उत्पन्न झालेली प्रादेशिक विषमता कमी होते.
२) अप्रगत प्रदेशांतील नैसर्गिक संसाधनांचा पूर्ण उपयोग होऊ शकतो.
३) फुटीरपणाच्या प्रवृत्तीचा पायबंद नसतो.
४) राजकीय असंतोष भडकत नाही.
५) सामाजिक कल्याण वाढते.
६) रोजगाराच्या संधी विस्तृत प्रमाणात निर्माण होतात.

**इ) विकासनशील देशांचे आर्थिक स्वातंत्र्य :**

मागील तीन दशकामध्ये बहुतेक देशांना राजकीय स्वातंत्र्य मिळाले आहे. राजकीय दृष्टीकोनातून गुलाम असलेले फार थोडे देश आजही गुलामगिरीत असल्याचे आढळून येतात. राजकीय गुलामगीरी अनेक वर्ष राहिलेल्या देशाची अर्थव्यवस्था इतर प्रगत देशावर अवलंबून असते. ह्या देशामध्ये अन्नधान्ये व इतर आवश्यक वस्तूंची अनिवार्यपणे आयात करावी लागते. राजकीय दृष्टीने स्वतंत्र झालेल्या जगातील अनेक देश आर्थिक दृष्टीने गुलामगिरीतच असल्याचे आढळून येतात.

राजकीय स्वातंत्र्य मिळालेल्या देशातील जनतेला आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्याची आकांक्षा असणे स्वाभाविक आहे. त्याकरिता देशातील जनतेला आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्याची आकांक्षा असणे. स्वाभाविक आहे. त्याकरीता देशातील जनतेला आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन त्या देशांमध्ये घडून येणे आवश्यक असते. ह्याकरिता ह्या देशांमध्ये सर्व प्रकारच्या उद्योगांची स्थापना घडून येणे, ह्या उद्योगांचा विस्तार व विकास घडून येणे व ह्या उद्योगांमध्ये विभिन्न वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घडून येणे आवश्यक आहे.

**ड) जीवनमान उंचावते :**

विकासनशील देशामद्ये उद्योजकानी केलेल्या प्रयत्नांमुळे उद्योजकतेचा विकास घडून आल्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणावर उद्योगांची स्थापना होते. नैसर्गिक संसाधनाचा पूर्ण उपयोग संभवतो. वेजगाराच्या संधी निर्माण होतात, अनेक बेकार व्यक्तिंना कामे मिळतात आणि ह्या देशांच्या अर्थकारणामध्ये आर्थिक विकासाचे निदर्शक असलेले विभिन्न बदल घडून येतात हे व विस्तराने स्पष्ट केले आहे, उद्योगांमध्ये वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन झाल्यामुळे त्या देशांचे राष्ट्रीय उत्पन्न वाढते. लोकांचे उत्पन्न वाढते आणि नागरिकांच्या क्रयशक्तीमध्ये वाढ होते. अशा रीतीने उद्योजकतेचा विकास आणि उद्योजकांनी केलेले प्रयत्न त्या देशातील नागरिकांच्या उत्पन्नमध्ये व क्रयशक्तीमध्ये वाढ होण्यासाठी कारणीभूत ठरतात. देशात विविध प्रकारचे उद्योग स्थापन झाल्यामुळे तेथे यंत्रसामुग्री, लोखंड, सिमेंट, रसायने, खते, तसेच सर्व प्रकारच्या उपभोग्य वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घडून येते व बाजारपेठेत ह्या वस्तूंची उपलब्धता

वाढते. ग्राहकांना हव्या असलेल्या सर्व प्रकारच्या वस्तू त्यांना बाजारपेठेत सर्व वेळी सहजपणे मिळू शकतात. अशा रीतीने समाजात उद्योजकतेची वाढ झाल्यामुळे आणि उद्योजकांनी नवनविन आवाहने स्वीकारल्यामुळे एका बाजूने सर्वसामान्य लोकांच्या क्रयशक्तीमध्ये वाढ होते.

## १.५ उद्योजकता विकास आणि भारत (Entreprenership Development and India):

भारतातील उद्योजकतेचा आढावा म्हणजे एका अर्थाने जागतिक उद्योजकता इतिहास अभ्यासण्यासारखे आहे. भारत हा एक महान प्राचीन संस्कृती लाभलेला खंडप्राय देश आहे. अनेकविध भाषा, विविध वंशीय लोक, समृद्ध कला व भौगोलिक वारसा प्रादेशिक विविधता इत्यादीमुळे प्रत्येक देशात प्रत्येक पिढीने समृद्धीला हातभार लावल्याचे दिसून येते. भारतातील उद्योजकतेचा अभ्यास खालील टप्प्यांनुसार करता येतो.

१) ब्रिटीशपूर्व काळ
२) ब्रिटीश सत्तेचा काळ
३) स्वात्रंत्र्य चळवळीचा काळ
४) स्वातंत्र्योत्तर काळ
५) नियोजन काळ

### १) ब्रिटीशपूर्व काळ

ब्रिटिशपूर्व काळातील भारतीय अर्तव्यवस्थेत एकाकी स्वावलंबी आणि स्वतःचाच आधार असलेली खेडी एकीकडे होती तर दुसरीकडे प्रशासन, वाणिज्य, हस्तकौशल्य असलेली शहरे होती. ग्रामीण जनता ही साध्या श्रमविभाजनावर आधारित होती. शेतकरी शेती करीत असत आणि गुरेढोरे पाळीत असत. तसेच विणकर, सोनार, सुतार, धोबी असे अनेक वर्गातील लोक असत. त्यांना केलेल्या कामाच्या मोबदल्यात त्यांना धान्य दिले जाई. हे सर्वच उपक्रम किंवा छोटे छोटे उद्योग पिढीजात असत आणि परंपरेने वडीलांकडून मुलांकडे येत असत.

### २) ब्रिटीश सत्तेचा काळ :

ब्रिटिशांनी भारतावर विजय मिळविला आणि ते भारतात स्थिरावले. त्यांनी स्वतःला जणू भारतीय बनवून टाकले. प्रत्यक्षात ब्रिटीशांनी भारतीय आणि त्यांच्यात कायम अंतर ठेवले आणि भारतीयांना अपरिचित असलेले अंतर निर्माण केले. हे अंतर परकीय सत्ताधिश आणि भारतीय प्रजनन यांच्यातील होत. भारतातील ब्रिटिश सत्तेचे दोन भाग पडतात. १७५७ ते १८५७ या कालावधीत ईस्ट इंडिया कंपनीने भारतावर राज्य केले. ब्रिटीश सरकारचे राज्य १८५८ मध्ये चालू झाले ते १९४७ मध्येच संपले. भारतावर ब्रिटिशांचे राज्य जेव्हा होते त्याच सुमारात इंग्लंडमध्ये उत्पादनाच्या तंत्रात प्रचंड बदल झाले. परिणामतः उत्पादनाची प्रक्रिया बदलून गेली. ब्रिटिशांनी भारत पादाक्रांत केल्यानंतर ब्रिटीशांना एक फार मोठी बाजारपेठ उपलब्ध झाली आणि ह्या बाजारपेठेत ब्रिटिशांनी यंत्राच्या साह्याने तयार केलेली उत्पादने मोठ्या प्रमाणावर विकली. साहजिकच ब्रिटीशंनी यंत्राच्या साहाय्याने तयार केलेली उत्पादने मोठ्या प्रमाणावर विकली. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीपूर्वी इस्ट इंडीया कंपनीने भारतातून युरोपात प्रचंड मागणी असलेल्या भारतीय बनावटीची उत्पादने कापड, मसल्याचे पदार्थ इत्यादींची प्रचंड

प्रमाणावर निर्यात केली. भारतीय हस्तकौशल्याच्या उद्योगाचा ऱ्हास आणि प्रचंड बेकारी वाढली ह्याचा दुसरा परिणाम असा झाला की, पुनःश्च लोक शेतीकडे अधिक प्रमाणात वळले.

**३) स्वातंत्र्य चळवळीचा काळ :**

ऑक्टोबर १९०५ मध्ये भारतातील राजकीय नेतृत्वाने 'स्वदेशी' चळवळीशी प्रारंभ केला. राष्ट्रीय भावना ह्या चळवळीमुळे चांगलीच जागृत झाली. १३ एप्रिल १९०५ च्या Tribune मधील जाहिरात ह्या संदर्भात बोलकी आहे. १८५० नंतरच्या काळात उद्योजकता वाढ होण्यास सुरूवात झाली. ब्रिटीश आणि अन्य परकीय उद्योगांच्या थोर, भीषण हल्ल्यापासून संरक्षण देण्याच्या दृष्टीने जेव्हा भारतीय उद्योजकतेसाठी वातावरणात पूरक बदल झाला, त्यामुळे १९२४ पासून औद्योगिक उद्योजकतेला वेग आला.

**४) स्वातंत्र्योत्तर काळ :**

स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने उद्योजकतेचा पाया मजबूत व विस्तृत करण्याच्या दृष्टीने अनेक उपाययोजना केल्या. ह्या संदर्भात सरकारने केलेल्या दोन ठळक उपाययोजना खालील प्रमाणे केल्या.

१) स्वतंत्र्य औद्योगिक धोरण आखण्यात येऊन लघुउद्योगांच्या विकासासाठी प्रोत्साहने आणि विविध सुविधा सरकारने उपलब्ध करून दिल्या.
२) ज्या उद्योजकांना औद्योगिक क्षेत्रातील अनुभवा अभावी बाजारपेठेची चिकित्सक पाहणी जमत नसेल. त्यांना आर्थिक साहाय्य देण्यासाठी, सरकारने वित्तीय संस्था स्थापन केल्या आणि अन्य सुविधा उपलब्ध करून दिल्या.

## १.६ सारांश

उद्योजकता म्हणजे माणसातील नवनिर्मितीची उभारणी अशी माणसे विशिष्ट ध्येयाने झपाटून जातात. अथक प्रयत्नाने, इतरांची मदत घेऊन नवे मार्ग शोधतात.

## १.७ स्वयं अध्यापनासाठी प्रश्न

१) उद्योजकता म्हणजे काय ? त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
२) उद्योजकतेची व्याख्या लिहून त्याची स्वरूप स्पष्ट करा.
३) उद्योजकतेचे महत्त्व स्पष्ट करा.
४) भारतीय उद्याजकता विकास टिप लिहा.

❖❖❖❖

# २

# “उद्योजकता विकास आणि उद्योजकतेचे सिद्धांत”

**घटक रचना :**

२.१ प्रस्तावना
२.२ उद्योजकता विकास
२.३ उद्योजकतेचे सिद्धांत
२.४ सारांश
२.५ स्वयं अध्यापनासाठी प्रश्न

## २.१ प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय उद्योजकतेचा अविभाज्य भाग म्हणून पंचवार्षिक योजना अभ्यासणे आवश्यक आहे. कारण त्यावरुन नियोजन उद्दिष्ट फलप्राप्ती, त्यातील अडचणी कळतील आणि उद्योजकता विकास कितपत झाला हे कळु शकते.

## २.२ उद्योजकता विकास (Entrepreneurship Development)

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने आखलेल्या विविध धोरणांचा परिणाम उद्योजकता विकासावर झाला. ह्या काळातील उद्योजक विविध प्रकारच्या आर्थिक आणि सामाजिक पार्श्वभूमी असणारे आढळतात. व्यापारी क्षेत्रात सुद्धा उद्योजक आहेत. प्रशिक्षित तंत्रज्ञ उद्योजक बनले आहेत. त्यांनी सुद्धा खरे उद्योजक असल्याचे त्यांच्या कर्तूत्वाने, कौशल्याने सिद्ध करुन दिले आहे. ग्रामीण भागातूनही उद्योजक आहेत. पूर्वी ते हस्तकौशल्य आणि शेतीत गुंतलेले होते. लघुउद्योग स्थापन करण्यात अगदी शिक्षक आणि पांढरपेशा समाजातील व्यक्तीसुद्धा उद्योजक बनलेल्या आहेत. लघुउद्योग म्हणून सुरु झालेले उद्योग पुढे बड्या उद्योगात रुपांतरीत झाले. अनेक संस्था उद्योजकता विकासासाठी प्रयत्नशील आहेत.

सरकारने उद्योजकता वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी औद्योगिक कायदे अमलात आणले. त्याच्या परिणाम म्हणजेच स्वातंत्र्योत्तर काळातील उद्योजकता विकास होय.

देशाचा औद्योगिक, उद्योजकीय विकास व्हावा या दृष्टीने विचार करुन सन १९४८ च्या औद्योगिक धोरणाविषयक ठराव संमत करण्यात आला. स्वातत्रोंत्तर काळातील उद्योजकतेचा विकास पंचवार्षिक योजणेत कसा होत गेला याचे स्पष्टीकरण पूढील प्रमाणे आहे.

## अ) पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-५६) :

**या योजनेत पूढील बाबीवर भर देण्यात आला.**

- सुरु असलेले औद्योगिक प्रकल्प पूर्ण करणे.
- महत्त्वपूर्ण नविन प्रकल्प सूरु करणे.
- उद्योजकता विकासासाठीच्या आवश्यक बाबींची पूर्तता करणे.
- ७९७ कोटीची तरतूद.
- या काळात टेलीफोन, लोकोमोटिव्ह, शिंद्री खते, केबल फॅक्टरी, पेनिलिलीन फॅक्टऱ्यांची निर्मिती करण्यात आली.

## ब) दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-६१) :

ह्या योजनेअंतर्गत सार्वजनिक क्षेत्रासाठी ८७० कोटी तर खाजगी क्षेत्रासाठी ६७५ कोटीची गुंतवणूक करण्यात आली. या योजनाकाळात औद्योगिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने पूढील क्रमवारी स्वीकारण्यात आली.

१. लोखंड व पोलाद, अवजड यंत्रसामग्री व इतर यंत्र बांधणी उद्योगांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ घडवून आणणे.
२. भावी काळात भांडवली वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनक्षमतेत वाढ घडवून आणणे. उदा. रसायने, खते, सिमेंट, कागदाचा लगदा, रंग, इ.
३. पारंपरिक उद्योगाचे आधुनिकीकरण घडवून आणणे.
४. आधीच ज्या उद्योगात स्थापित उत्पादनक्षमता वाढविण्यात आली आहे ती उत्पादनक्षमता व प्रत्यक्ष उत्पादन यामधील अंतर स्थापित उत्पादन क्षमता अधिकाधिक प्रमाणात वापरुन कमी करणे आणि
५. दूसऱ्या योजनेतील लक्ष्ये व लोकांच्या गरजा लक्षात घेऊन उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात वाढ घडवून आणणे.

## क) तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१-६६) :

या योजनाकाळात शेती आणि औद्योगिक क्षेत्र यांचा सुसंबद्ध विकास घडवून आणणे हा उद्देश होता. औद्योगिक व त्याचप्रमाणे उर्जा व वाहतूक क्षेत्र मजबूत करणे व औद्योगिक व तांत्रिक क्षेत्रात जलद गतीने योग्य बदल घडवून आणण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. उद्योग व खाणकाम यावरील एकुण खर्च रु. ३,००० कोटी सरकारकडून व रु. १,३०० कोटी खाजगी क्षेत्रातील उद्योगावर झाला. सार्वजनिक क्षेत्रातील औद्योगिक प्रगतीला मोठ्या प्रमाणावर हातभार लावण्याचे ठरले. या मागील मुख्य उद्देश म्हणजे लोखंड, पोलाद व अवघड अभियांत्रिकी उद्योगांच्या बाबतीत भारताचा स्वयं-निर्भर बनविणे हा होता. तसेच कमी प्रमाणात परकीय मदत घ्यावी लागावी हे ही उद्दिष्टे होते. भांडवली उद्योगांबरोबरच उपभोग वस्तूंचे उत्पादनही मोठ्या प्रमाणावर वाढवावयाचे ठरविण्यात आले. लघुउद्योग व ग्रामोद्योगांच्या विकासासाठी रु. ४२५ कोटीची तरतूद करण्यात आली.

**ड)** तीन वार्षिक योजनाकाळातील उद्योजकता तिसरी पंचवार्षिक योजना राबवत असताना देशापुढे काही गंभीर समस्या निर्माण झाल्या आणि बिकट परिस्थितीला सामोरे जावे लागले. ह्या साऱ्याचाच अर्थव्यवस्थेवर आणि पर्यायाने उद्योजकतेवर दुष्परीणाम झाला. चीनचे १९६२ मधील भारताविरुद्धचे आक्रमण भारत-पाकिस्तानमधील १९६५ मधील युद्ध आणि त्यामुळे आर्थिक विकासासाठी लागणारी साधनसामग्री संरक्षणाला लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनासाठी वापरली गेली. १९६५-६६ मधील अवर्षणामुळे करावी लागणारी अन्नधान्याची आयात व त्याच्या भारताच्या परकीय चलनाच्या साह्यावर व आंतरराष्ट्रीय व्यापारतोलावर प्रतिकूल परिणाम झाला. या तीन वर्षाच्या कालावधीत उर्जाक्षेत्रात रु. १,२१३ कोटी गुंतविण्यात आले. संघटित उद्योगात रु. १५११ कोटी गुंतविण्यात आले. लघूक्षेत्रात रु. १२६ कोटी गुंतविण्यात आले. १९६६-६७ मध्ये औद्योगिक क्षेत्राची वाढ फक्त ०.२ टक्क्यांनी तर १९६७-६८ मध्ये फक्त ०.५ टक्क्यांनी झाली. तूलनात्मक दृष्टीकोनातून १९६८-६९ मध्ये औद्योगिक क्षेत्राने बरीच प्रगती केली.

## इ) चौथी पंचवार्षिक योजना (१९६९-७४) :

या योजनेत औद्योगिक क्षेत्राच्या बाबतीत खालील उद्दिष्टे होती.

१. ज्या औद्योगिक प्रकल्पात आधीच गुंतवणूक करण्यात आलेली होती. ते औद्योगिक प्रकल्प पूर्ण करणे.

२. भावी काळात औद्योगिक विकास साधण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या वस्तूंचे व निर्यातीसाठी व आयात पर्यायी वस्तूंच्या वाढत्या उत्पादनासाठी त्या त्या उद्योगातील उत्पादकता वाढविणे. आणि

३. नवीन उद्योग स्थापन करणे. योजनाकाळात औद्योगिक क्षेत्रात एकुण रु. ५,३०० कोटीची गुंतवणूक करण्याचे ठरविण्यात आले. त्यापैकी उद्योगात गुंतवावयाचे होते. लघुउद्योग आणि ग्रामोद्योगात रु. ७४६ कोटी खर्च करावयाचे होते.

## ई) पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-७९) :

या योजने अंतर्गत औद्योगिक क्षेत्रातील मुख्य प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.

१. लोंखड व पोलाद अवजड यंत्रसामग्री, खनीज तेल, कोळसा खते. इत्यादी गाभा क्षेत्रातील उद्योगात अग्रक्रमाने वृद्धी घडवून आणणे.

२. ज्या उद्योगाच्या विकासामुळे भारताच्या औद्योगिक क्षेत्रात विविधता निर्माण होइल व देशाच्या निर्यातीत वृद्धी होईल.

३. जे उद्योग सर्वसाधारण माणसांना लागणाऱ्या उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करतात, अशा उद्योगाचा विस्तार घडवून आणणे.

४. अनावश्यक वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांवर नियंत्रणे लादणे.

५. लघुउद्योग, कुटिरोद्योग आणि पूरक उद्योगांचा विकास घडवून आणणे या योजनेअंतर्गत औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी रु. १०,२०० कोटीची तरतूद करण्यात आली. त्यापैकी रु. ९,६०० कोटी सार्वजनिक क्षेत्रातील विकासासाठी आणि रु. ५३५ कोटी लघुउद्योग व ग्रामोद्योगासाठी होती.

### उ) सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-८५) :

या योजनेची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे १९५६ च्या औद्योगिक धोरणविषयक ठरावाच्या चौकटीत राहून औद्योगिक क्षेत्रात विविधता निर्माण करणे आधुनिकता आणणे, उद्योगातील उत्पादकता वाढविणे या राष्ट्रहिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या उद्योगांच्या विकास घडवून आणून अशा वस्तूंच्या बाबतीत आत्मनिर्भर होणे असे होते.

मोठ्या व संघटित उद्योगात गुंतविण्यासाठी रु. २०,४०७ कोटीची तरतूद करण्यात आली व लघुउद्योग ग्रामोद्योगांच्या विकासासाठी रु. १,७८० कोटीची तरतूद करण्यात आली.

### ऊ) सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-९०) :

या योजनेत खालील उद्दिष्टे ठरविण्यात आली.

१. सामान्य नागरिकांच्या उपभोगाच्या वस्तूंचा पुरेसा पुरवठा करणे आणि त्याचवेळी त्यांच्या किंमती व गुणवत्ता योग्य पातळीवर राखणे.
२. तांत्रिक क्षेत्रात प्रगती करुन औद्योगिक उत्पादकतेत वाढ करुन उद्योगातील स्थापित उत्पादन क्षमतेचा जास्तीत जास्त वापर करणे. या योजनाकाळात सार्वजनिक क्षेत्रातील मोठ्या व मध्यम पातळीवरील उद्योगात रु. १९,०७८ कोटी गुंतविण्याचे ठरविण्यात आले. त्याच प्रमाणे लघुउद्योग व ग्रामोद्योग यांच्या विकासासाठी रु. २,७५२ कोटींची तरतूद करण्यात आली.

### प) आठवी पंचवार्षिक योजना (१९९०-९५) :

शेती विकासाबरोबर जलद औद्योगिक वाढ हे याही पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट होते. रोजगार संधीमध्ये वाढ, प्रादेशिक विकास तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उत्पादकता वाढ, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धेत प्रगती इत्यादी उद्दिष्ट्ये होती.

## २.३ उद्योजकता सिद्धांत :

विचारवतांनी वेळोवेळी उद्योजकतेचे सिद्धांत मांडले आहेत. या सिद्धांताचा आशय स्वाभाविकपणे वेगवेगळा आहे. या संदर्भात तीन विचारधारांचे अस्तित्व स्पष्टपणे जाणवते. या विचारधारांचे स्वरुप लक्षात घेऊन उद्योजकतेच्या सर्व सिद्धांताचे स्थूलमानाने आर्थिक सिद्धांत, समाजशास्त्रीय सिद्धांत व माणसशास्त्रीय सिद्धांत असे वर्गीकरण करण्यात आले आहे.



## अ) आर्थिक सिद्धांत (Economic Theorie) :

ज्या काळात उद्योजकतेला उत्पादनाचा स्वतंत्र घटक मानण्यात येत नव्हते त्या काळापासून अर्थशास्त्रज्ञांनी उद्योजकतेशी संबंधित अनेक विचार व्यक्त केल्याचे आढळते. या संदर्भात क्लासिकल अर्थशास्त्रज्ञाच्या प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. या विचारवंताच्या मते उद्योजकतेच्या उत्पत्तीवर व विकासावर प्रामुख्याने आर्थिक घटकांचा व आर्थिक पर्यावरणाचा तीव्रतेने परिणाम होतो. उद्योजकतेशी संबंधित आर्थिक घटक अनुकूल असतील तरच उद्योजकतेचा विकास होतो, उद्योजक सक्रिय होतात. मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक करतात, अनिश्चिततेमुळे उत्पन्न होणारी व्यावसायिक जोखीम स्वीकारतात आणि नवीन उद्योगांची स्थापना अस्तित्वात असलेल्या उद्योगांचा विस्तार करतात. हा विचार आर्थिक विचारधारेंचा आधार आहे.

उद्योजकीय प्रेरणा विविध आहेत. परंतू या प्रेरणांमध्ये आर्थिक मुलभूत व महत्त्वाच्या आहेत. जास्तीत जास्त नफा मिळविणे, आर्थिक उत्कर्ष साध्य करणे, आर्थिक शक्ती बनणे, औद्योगिक साम्राज्य निर्माण करणे, या सर्व आर्थिक प्रेरणा आहेत. आर्थिक प्रेरणांचे उद्योजकांवर होणारे परिणाम दिर्घकाळपर्यंत टिकून राहतात. अनेक विचारवंतांनी विकसनशील देशांमध्ये घडून येणाऱ्या विकासाबद्दल चिंतन केले आहे. या विचारवंतांमध्ये गुन्नार मिरडाल, रागणार नवर्स, विल्यम रोस्टोव्ह इ. अर्थ शास्त्रज्ञानाचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो.

## ब) सामाजिक सिद्धांत (Sociological Theories)

उद्योजक समाजात राहतात. समाजाचा एक घटक म्हणून कार्य करतात, त्यांचे प्रयतन् व उपक्रम समाजाच्या प्रगतीकरिता व कल्याणाकरिता कारणीभुत ठरतात. अनेक समाज शास्त्रज्ञानी या संदर्भात मौलिक योगदान केले आहे. त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे समाजशास्त्रीय विचारधारा प्रगल्भ झाली आणि समाजशास्त्रीय सिद्धांतांना व्यापक स्वीकृती प्राप्त झाली. मॅक्सवेबर यांनी प्रतिपादन केलेला सिद्धांत हा व्यापक मान्यता प्राप्त झालेला सिद्धांत आहे. मॅक्सवेबर यांच्या मते काही विशिष्ट प्रकारच्या धार्मिक श्रद्धा व मुल्यांची जोपासना करण्यात आल्यास संबंधित व्यक्तिंच्या मनात व्यवसायात यशस्वी होण्याकरिता, पैसा व भौतिक वैभव मिळण्याकरिता आवश्यक ते प्रयत्न व परिश्रम जिद्दिने करण्याची प्रबळ प्रेरणा उत्पन्न होते. थॉमस कोचरन यांनी प्रातीपादन केलेला सिद्धांत उद्योजकांच्या व्यक्तिमत्वाशी संबंधित आहे. कोचर यांच्या सिद्धांतानुसार समाजाच्या दृष्टीने उद्योजक हे एक आदर्श व्यक्तिमत्त्व असते आणि त्याच्या कार्यावर व यशावर प्रामुख्याने पुढील तीन बाबींचा प्रभाव पडतो. व्यवसायाच्या बाबतीत उद्योजकांचा वैयक्तिक दृष्टीकोन व प्रवृत्ती, सामाजिक मान्यता प्रदान करणाऱ्या समुदायाच्या उद्योजकांकडून असलेल्या अपेक्षा आणि उद्योजकांच्या कार्यविषयक गरजा सामाजिक मुल्यांच्या उद्योजकतेवर तीव्रतेने परिणाम होतो. फुन्कल यांच्या सिद्धांतानुसार समाज व्यवस्था आणि उद्योजकता यामध्ये संबंध असून सामाजिक रचना मागणीची रचना, संधीची रचना व कामगार रचना या घटकांचा उद्योजकतेवर परिणाम होतो. शमाजातील विभिन्न सामुहांमधील परस्परसंबंध, त्यामधील क्रिया-प्रतिक्रिया व त्या माध्यमातून घडून येणारी परिवर्तने हा फ्रँक यंग यांनी प्रतिपादन केलेल्या सिद्धांताचा विषय आहे.

### क) मानसशास्त्रीय सिद्धांत (Psychological Theories)

मानसशास्त्रीय विचारधारा समृद्ध करण्यामध्ये अनेक मानसशास्त्रज्ञांचे योगदान आहे. या मानसशास्त्रज्ञांमध्ये प्रामुख्याने जोसेफ शुम्पीटर, मॅक्र्ललँड, हेगेन, जे.ई. स्टेनेक, बी.सी. टंडन आणि जे. जे. बरना यांच्या प्रामुख्याने समावेश करावा लागेल. शुम्पीटर यांनी त्यांच्या सिद्धांतामध्ये नवनिर्मिती, उद्योजकता, परिवर्तन व आर्थिक विकास यामधील संबंध प्रस्थापित केला आहे. नवनिर्मीती करणारी व्यक्ति म्हणजे उद्योजक शुम्पीटर यांच्या सिद्धातानुसार उद्योजक विविध मार्गांनी नवनिर्मीती घडवून आणतात. या नवनिर्मीतीमुळे अर्थव्यवस्थेमध्ये परिवर्तन घडवून येतात व या परिवर्तनाचा परिणाम म्हणून आर्थिक विकासाला चालना मिळते असे घडून येण्याकरीता उद्योजक हे सत्ता मिळविण्याच्या, विजय मिळविण्याच्या लढ्याच्या, श्रेष्ठत्व सिद्ध करण्याच्या महत्त्वकांक्षेने अभिप्रेरित असले पाहिजे शिवाय या उद्योजकांमध्ये काही दुर्मिळ गुण, योग्यता व कौशल्ये असणे आवश्यक आहे. प्रो. हेगन यांनी उद्योजकतेची मानसशास्त्रीय बाजू लक्षात घेऊन एखाद्या वर्गाचे सामाजिक स्थान नष्ट झाल्यामुळे त्या वर्गाची कशी पडझड व अवनची होते आणि काही काळ लोटल्यानंतर कुटुंबातील मुलांचे विशिष्ट रितीने संगोपन केल्यानंतर दाबलेल्या वर्गामधून नवीन उद्योजक कसे निर्माण होतात, याबद्दल स्पष्टीकरण केले आहे. हेगन यांचा सिद्धांत मागास देश, मागास समाज, मागास वर्ग व मागास जातींच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. कुटुंबात सांस्कृतिक मुल्यांची जपणूक करण्यात आल्यास व स्त्रियांकडून मुलांना संस्कारित व अभिप्रेरित करण्यात आल्यास दबलेल्या जातींमधूनही कर्तबगार उद्योजक निर्माण होतात.

## २.४ सारांश

अनेक तंज्ञांनी मांडलेली मते विचारात घेतली असता उद्योजक आणि उद्योग अर्थव्यवस्थेत बदल घडवून आणणारे अविभाज्य घटक आहेत. पीटर डूकर, मॅक्लेंलँड आणि मॅक्स वेबर यांचे सिद्धांत आधुनिक उद्योजकता विकासाचे प्रमुख आधरस्तंभ आहेत.

## २.५ स्वयं अध्यापनासाठी प्रश्न

१) विकासाचे स्पष्टीकरण लिहा.
२) उद्योजकतेचे आर्थिक सिद्धांत स्पष्ट करा.
३) उद्योजकतेचे सामाजिक सिद्धांत विषद करा.
४) उद्योजकतेच्या मानसशास्त्रीय सिद्धांतावर टिप लिहा.

❖❖❖❖

# ३

# उद्योजक
## (Entrepreneur)

**घटक रचना :**

३.१ प्रस्तविक
३.२ उद्योजग अर्थ व व्याख्या
३.३ उद्योजकाचे गुण संपदा
३.४ उद्योजकाचे कार्य
३.५ व्यवस्थापक आणि उद्योजक
३.३ उद्योजकता संस्कृतीचा विकास
३.७ भारतीय उद्योजकासमोरील आव्हाने
३.८ स्वयं अध्यापनासाठी प्रश्न

## ३.१ प्रस्तावनाः (Introduction)

यशस्वी उद्योजकाच्या अंगी सर्वच गुण उपजतच असतात कुणी बऱ्याच जणांची श्रध्दा आहे. वास्तविक काही गुण हे प्रयत्नसाध्य सुध्दा असतात. आणि म्हणून यशस्वी उद्योजकांचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे आवश्यक आहे. यशस्वी उद्योजक किंवा आदर्श उद्योजक बणण्यासाठी आवश्यक गुण संपादन करुन आपण आपला संशोधन झाले असून प्रशिक्षद्वारे उद्योजकीय व्यक्तिमत्व धज्वता येऊ शकतात. असे सिध्द झाले आहे.

वास्तविक प्रत्येक व्यक्तीचा व्यक्तिमत्वात जन्मतःच नैसर्गिक प्रेरणा - प्रवृत्ती असतात. बालपणीच संस्कारांमुळे, कौटुबींक वातावरणामुळे, समाजातील रुठी व श्रध्दांमुळे आणि शालेय प्रवृत्ती खुटंतात किवा वाढीला लावतात. नैसर्गिक वा उपजव ताल- नाद - स्वरांची प्रेरणा देणगी असलेल्या मुलांना आवश्यक शिक्षण दिले नाही तर त्या गुणांची वाढ होणार नाही. नेमके तसेच उद्योनक प्रवृत्ती व्यक्तीचेही होते.

## ३.२ उद्योजक अर्थ आणि व्याख्या (Meaning and Definition)

विठयात अमेरिकब प्राध्यापक डॉ मॅक्लेलडँ यांनी मानवी व्यक्तिमत्व व वर्तन यांचा दीर्घ अभ्यास केला भारतासह अनेक राष्ट्रात प्रयोगशील वृत्तीने त्यांनी अनेक व्यक्तिमत्वांचा अभ्यास त्यांच्यातील उपजत प्रवृत्ती प्रेरणांचा शोध, त्यांची नोंद पध्दतशीर प्रशिक्षणाचा परिणाम आणि परीक्षण कार्यक्रमाची रचना, शिक्षणपध्दती याबद्दल सखोल आणि विस्तृत संशोधन केले हया संदर्भात श्री मनोहर नाडकर्णी यांच्या नावाचा उल्लेख अत्यंत महत्वाचा आहे. त्यांना भारतातील उद्योजकता विकास चळवळीचे पितामह असे संबोधले जाते.

## ३.३ यशस्वी उद्योजकाचे गुण

यशस्वी उद्योजक हा गुण समुच्चयनामुळे बनतो. अंगभूत गुणांना परिश्रम अभ्यास साहस, प्रशिक्षण यांची जोड दिली की एकातून दुसरा गुण अंगी भिनू लागतो व उद्योजकाचे व्यक्तिमत्व आकाराला येते. उद्योजक बनण्याची तीव्र  इच्छा असेल पूढाकार घेण्याची प्रवृत्ती असेल. एखादी समस्या आशावादी दृष्टीकोनातून सोडवण्याचा स्वभाव असेल तर अशा व्यक्ती खात्रीने यशस्वी उद्योजक होऊ शकते. असे अनेक तरुण तरुणीसुध्दा यश्स्वी उद्योजक तयार झालेले आहेत. अगदी त्यांच्याकडे भरपूर पैस अथवा व्यावसायिक पार्श्वभूमी नसतानासुध्दा ‘उद्योजकतेची क्षमता’ एवढी एकच गोष्ट त्यांच्याकडे विपूल प्रमाणात हाती.

यशस्वी उद्योजकता पारंपारिक विचारसरणी पासून दूर जाण्याची निरोगी मानसिक वृत्ती, चौकस मन सशोधन व विकास याद्वारे प्रयोगासाठी खर्च करण्याची तयारी नवीन कल्पना निर्माण करीत असतो.

यशस्वी उद्योजकाच्या अंगी असणाऱ्या विविध गुणांची सविस्तर चर्चा खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

**अ) जोखीम पत्करणे:** उद्योगात कोणत्या गोष्टीची शाश्वती नसते. त्यामुळे या गुणाला विशेष महत्व आहे, ज्या बाबतीत यशाची निश्चिती खाती देता येत नाही. असे अनेक निर्णय उद्योजक घेत असते. अनेक संसाधने उद्योजकाने गुंतवलेली व त्यांच्या बाबतीत जोखीमच पत्करलेली असते. अपयश आल्यास हे सर्व बुडीत जाण्याची शक्यता असते. म्हणूनच सर्वच अनिश्चित गोष्टींना सामोरे जाऊन विचलित न होता उद्योजकांच्या अंगी समयसुचकता निर्भयता आणि सोशिकपणा असायास हवा. कोणत्याही उद्योगात धोका असतोच. असे म्हटले जातेकी ज्या कामात साठ टक्क्यापेक्षा जास्त यशाची शक्यता आहे असेच साहस उद्योजक करतात. कोणतेही धाडस करताना सांभाव्य निकालावर जास्तीत जास्त स्वतःचे नियंत्रण असले हे ते पाहतात. ख्यातनाम उद्योगपती  जे. आर. डी. टाटा यांचे उद्गार या संदर्भात लक्षात घेण्याजागे आहेत. कोणाही माणसाने थोडेफार धोक्याच्या सावलीत जगायचे ठरवण्यास हरकत नाही. तशा प्रकारच्या जगण्यात. एक प्रकारचा उन्माद आणि स्वतःच्या इच्छापूर्तीची जाणीव वास करीत असते. त्यापासून मिळणारा आनंद अवर्णनीय असतो. उद्योजक अवाजवी जोखी कधीच पत्करत नाही. अनुत्पादन जोखीम कधीच पत्करत नाही तर तो समीकरण बध्द धाडस करतो.

**ब)नवीन शोध लावण्याची वृत्ती :** उद्योजकात नवीन शोध लावण्याची प्रवृत्ती तीव्रतेने असते. नवनवीन उत्पादन पध्दतीत तो अंमलात आणतो आणि उत्पादन संसाधनाचा पर्याप्त वापर करा होऊ शकेल, मनुष्यबळाचा पर्यापत उपयोग करुन घेऊन उत्पादन किंमत कमीत कमी कशी करता येईल याचा विचार करता येतो. ख्यातनाम उद्योगपती नवलमलजी फिरोदजी यांच्या मते माणसाला जर एखादया कामात आवड असली तर त्यातून तो नवनविन गोष्टी शिकु शकतो. डोक्यात आलेली कल्पना इकडून तिकडे जिथुन मिळते तिथून माहिती घेऊन जो पूढे जाऊ शकतो. तो खरा उद्योजक म्हणायला पाहिजे

**आ) सिध्दीप्रेरणा :** सिध्दीप्रेरणा म्हणजे आपले ईप्सित हरप्रयत्नाने साध्य करण्याची इर्षा हया आपला संदर्भात मॅक्लेलॅण्ड यांनी यशसिध्दिच्या गरजेची प्रेरणा उद्योजकात असणे महत्वाचे कसे आहे, हे स्पष्ट केले आहे. हे उद्योजकाचे सामान्यजनांहून एक आगळे वेगळे वैशिष्टय असते. उद्योजकाला नेहमीच काहीतरी नवनिर्मीती करण्याची तीव्र इच्छा असते. तो अल्पसंतूष्ट नसतो. सिध्दिप्रेरणा म्हणजे काहीतरी करुन दाखवायचे, काही तरी साध्य करण्याचे मनात असलेल्या उर्मी आणि त्यासाठीची धडपड होतकरु उद्योजकोने त्याच्या पर्वायुष्यात डोकावले तर अशा उर्मी आपल्या जवळ आहेत किंवा नाहीत याची कल्पना त्याला मिळू शकेल. उद्योजक डोळयासमोर एखादे ध्येय निश्चित ठेवतो व ते साध्य करणाच्या दृष्टीने येणाऱ्या अडी अडचणीचा विचार न करता मार्ग काढण्याची त्याची जिद्द लक्षात येते. अडचणीवर मात करण्यासाठी वेगवेगळे मार्ग शोधून काठताना अनेकांचे सहकार्य घेऊन तो पूढे जातो, नवीन पर्याय तपासून शोधून काढतो.

यशस्वी व्यक्तिमत्वाचे रहस्य उद्योजकांच्या सिध्दि - प्रेरणेत लपलेले असते. कांही वेळा ही शक्ती सुप्त स्वरुपात राहते. एखादया प्रसंगी, घटना, क्षण बदलाचा ठोस निर्णय घेण्यास कारणीभूत ठरतात आणि सर्वसामान्य व्यक्तीसुध्दा यश संपादण्यासाठी प्रयत्न करु लागतात असे म्हणतात की अपमानातच उन्नतीचे बीज असते.

**ड) मागील अनुभवावरुन शिकणे:** उद्योजक कांही ठराविक उद्दिष्टे मनात योजतो व ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो हा प्रयत्न करीत असताना त्या भुतकाळाचा आढावा घेतो. आतापर्यत का वाटचाल केलेली आहे त्यात त्याला रस असतो. आठावा घेतल्यावर उद्योजकाला त्याच्या प्रगतीचा आलेख मिळतो.

**इ) व्यावसायिक पर्यावरणाबाबत जागरुकता :** व्यावसायिक पर्यावरणातील घटक नेहमी बदलते या बदलत्या घटकांचे भास ठेवून त्यास अनुरुप असे निर्णय घ्यावे लागतात. विविध घटकातील बदलांना सामोरे जाणे महत्वाचे हया बदलांनुसार स्वतःच्या उद्योग व्यवसायात बदल करणे महत्वाचे असते.

**ई) उत्पादन संसाधने संपादन करण्याचे कौशल्य** - उद्योजकाला अनेकविध उत्पादन संसाधनांचे संयोजन करावयाचे असते. ही संसाधने किफायतशीर अराने प्राप्त करणे हे कौशल्य उद्योजकाजवळ असले पाहिजे. तरच त्याला वाढत्या स्पर्धेत टिकुन राहता येईल.

**उ) स्वंतत्र विचार करण्याची शक्ती -** कुणाच्याही नियत्रंणाखाली, कुणाच्याही विचाराने काम करणे हा उद्योजकाचा स्वभाव नसतो. इतरांच्या विचाराने निर्णय घेणे ही कल्पनाच उद्योजकाला रुचत नाही. स्वतःच्या विचारशक्तीला कल्पनाशक्तीला वाव देणे आणि त्यानुसार निर्णय घेण्यात उद्योजकाला धन्यता वाटते.

**ड) कालबध्दता -** उद्योजकाला वेळेचे चांगलेच भात असते. कोणतीही गोष्ट वेळेवर झाली तर त्या गोष्टीचे महत्व असते त्यामध्ये दिरंगाहू झाल्यास अपयशांची काटेकोर अमंलबजावणी करतो.

वरील गुणाठयतीरीक्त उद्योजकांच्या अगी खालील गुण असणे आवश्यक आहे

१. अनुकरणप्रीयता
२. उत्साही व आनंदी वृत्ती
३. चौकसवृत्ती आणि जागरुकता
४. प्रामाणिकपणा व निष्ठा
५. प्रभावी व्यक्तीमत्वृ
६. प्रश्न व अडचणी सोडविण्याची कला
७. जबाबदारी घेण्याची वृत्ती
८. दुर्मिळ गुण उत्तम अर्थव्यवस्थापण
९. सतत शिकणे
१०. दुरदृष्टी
११. वीजीगुण वृत्ती
१२. अपयाशाने खचुन न जाणे
१३. अपमानातून जिद्य
१४. संधीबाबत जागरुकता

## ३.४ उद्योजकांची कार्य (Functions)

ऑर्थर कोल यांच्या मते उद्योजकांची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) उद्योगाची उद्यिष्ये निश्चिती करणे आणि परिस्थितीनुसार हया उद्यिष्यांमध्ये बदल करणे.

२) उद्योगासाठी आवश्यक असलेली संघटना उभारणे आणि साहाय्यक व सर्व कर्मचाऱ्यांशी चांगले संबंध प्रस्थापित करणे.

३) पर्याप्त वित्तीय संसाधने प्राप्त करणे तसेच विद्यमान आणि संभाव्य विनियोक्ताशी सुयोग्य संबंध प्रस्थापित करणे.

४) श्रेष्ठ दर्जाची तांत्रिक उपकरणे मिळविणे आणि नवीन यंत्रसामुग्री उपलब्ध झाल्यावर त्या उपकारणांमध्ये आवश्यक तो बदल करणे

५) वस्तूकरीता बाजारपेठ विकसीत करणे तसेच उपभोक्त्यांची प्रचलित तसेच संभाव्य मागणी लक्षात घेऊन नवीन वस्तूंचे उत्पादन करणे.

**पीटर किल्बी यांच्या मते उद्योजकांनी पूढील कार्य करावी लागतात.**

१. बाजारपेठेमधील संधीचा शोध घेणे.
२. दूर्मिळ संसाधनावर ताबा मिळविणे.
३. उत्पादनाकरीता आवश्यक घटकांची खरेदी करणे.
४. वस्तूंचे विपणन करणे आणि स्पर्धेला तोड देणे.

काही महत्वाच्या कार्याबाबत पूढे थोडक्यात चर्चा केली आहे.

**उद्योजकांची कार्ये**

१. नवनिर्मीती
२. जोखीम स्वीकारणे
३. निर्णय प्रक्रिया
४. संघटनेची उभारणी
५. वित्तीय नियोजन
६. विपणन नियोजन
७. व्यवस्थापण नियोजन
   - नियोजन
   - संचालन
   - नेतृत्व
   - नियंत्रण
   - समन्वय

## १) नवनिर्मीती (Innovation)

उद्योजकता ही एक सृजनात्मक संकल्पना असल्यामुळे नवनिर्मिती हे उद्योजकतेचे अभिन्न अंग आहे सर्वसाधारण सामग्रीला संपत्तीचे स्थान मिळवून देण्याची क्षमता नवनिर्मिती मध्ये असते. नवनिर्मीती विभिन्न रीतीने केली जाऊ शकते नवनिर्मीतीमुळे बदल घडून येतो. हा बदल उत्पादनाला किंवा संपतीच्या निर्मीतीला कारणीभुत ठरतो. पर्यायाने हा बदल आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला चालना देतो. नवनिर्मीती करणे हे उद्योजकांचे एक महत्वाचे कार्य आहे.

शुम्पीटर यांच्या मते उद्योजक पुढील मार्गाने नवनिर्मिती घडवून आणु शकतो.

१. वस्तूंचे उत्पादन
२. उत्पादनाच्या पध्दती
३. बाजारपेठेचा शोध
४. कच्चा माल व इतर सामर्ग्री
५. नवीन संघटना

## २) जोखीम स्वीकारणे (Risk Taking)

आजच्या भांडवलप्रधान अर्थव्यवस्थच्या व मुक्त बाजारपेठ व्यवस्थेच्या काळात जीवनाच्या सर्व क्षेत्रामंध्ये कमालीची अनिश्चितता आढळून येते. प्रो. जे. एक किन्स यांनी म्हटल्याप्रमाने मृत्यू आणि सरकारने लादलेल्या कराचे शोधन या दोन गोष्टी तेवढया निश्चित

आहेत. हे दोन ठळक अपवाद सोडले तर बाकी सर्वच बाबतीत आत्यंतिक अनिश्चितता आहे. अनिश्चितता हे, कारण असून जोखीम हा त्याचा परिमाण आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थे सर्वत्र आढळून येणारी अनिश्चितता व त्यामुळे उत्पन्न होणारी जोखीम यासाठी अनेक कारणे जबाबदार असतात. कांही ठळक कारणे पुढील प्रमाणे आहेत.

अ) भांडवलशाही उत्पादन प्रणालित अनपेक्षितपणे घडून येणारी स्थित्यंतरे
ब) उत्पादनसंबंधीचे निर्णय होण्याच आलेल्या चुका
क) ग्राहकांच्या आवडी - निवडी
ड) व्यवसायचके
इ) आर्थिक,सामाजिक व राजकीय परिस्थितीमध्ये घडून येणारे बदल

### अ) निर्णय प्रक्रिया (Decision Making)

कोणत्याही उद्योगाच्या संदर्भात उद्योजक जी कार्ये करतात. त्या कार्याच्या तीन मुख्य अवस्था असतात उद्योगाची स्थापना करणे आणि उद्योगाची उत्तरेत्तर व जलद गतीने प्रगती व्हावी याकरीता आवश्यक ती सर्वकल धोरण आखणे व त्यांची अंमलबजावणी करते ही तीसरी अवस्था होय. हयापैकी प्रत्येक अवस्थेमध्ये उद्योजकांना अनेक निर्णय घ्यावे लागतात. या निर्णयाची अचूकता उद्योजकांचे यश निर्धारीत करते. उद्योजकीय निर्णयाची कांही ठळक वैशिष्टये पूढील प्रमाणे नमुद केले आहेत.

१. निर्णयप्रक्रिया ही एक बौध्दिक प्रक्रिया होय उद्योजकीय निर्णय हे उद्योगाच्या संघटनेच्या सवैच्च पातळीवरुन घेतले जातात.

२. उद्योगाची उद्यिष्टे ठरविण्याकरीता धोरणाची आखणी करण्याकरीता आणि धोरणाची अमंलबजावणी करण्याकरीता उद्योजकीय निर्णय घेतले जातात.

३. उद्योजकीय निर्णय घाईने कुणी दडपण आणले म्हणून किंवा भावनेच्या आहारी जाऊन कधीच घेतले जात नाहीत.

४. निर्णय म्हणजे उदिष्ट नव्हे, उद्योजकीय उदिष्टे गाठण्याकरिन उपयोगात आणले जाणारे हे साधन असते.

५. उद्योजकांपूढे अनेक समस्या असतात. या समस्या सोडविण्याचे विविध पर्याय असतात. त्या पर्यायापैकी सर्वोकृष्ट पर्याय म्हणजे उद्योजकीय निर्णय होय.

६. उद्योजकीय निर्णय नेहमीच धनात्मक असतील असे नाही. अनेकदा हे निर्णय नकारात्मक स्वरुपाचे असू शकतात.

### ४) संघटनेची उभारणी (Organisation Building)

व्यवस्थापनशायनाच्या प्रचलित परिभाण नुसार प्रशासनाचा संबध उपक्रमाची उद्यिष्ये ठरविणे, धोरणे निर्धारित करणे, कार्यक्रम तयार करणे, विभिन्त बाबींमध्ये समन्वय साधणे, इत्यादी क्रियांशी येतो. तर व्यवस्थापनाचा संबंध ही उद्दिष्ट साध्य करण्याकरिता कार्यक्रमांची अमंलबजावणी ज्या माध्यमातून किंवा यंत्रणेकरवी करवून घ्यावयाची असते त्या माध्यमाला किंवा यंत्रणेला ‘संघटना ’ असे म्हणतात. मूने व रेले यांच्या मत ‘ संघटना म्हणजे सामान्य

हिताच्या पूर्णतेसाठी एकत्रित आलेल्या क्यक्तींचा एक समुदाय होय. संघटनेची उभारणी करण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नाचे स्वरुप साधरतः पुढीलप्रमाणे असते.

१. उद्योगामध्ये करण्यात येणारे काही विभिन्न क्रियांमध्ये विभाजित करून प्रत्येक क्रिया तन्ज्ञांच्या सल्ल्यानुसार निरनिराळया कृत्यामध्ये विभाजन करणे.

२. प्रत्येक कृत्य करण्यासाठी कामगारांना कोणत्या हालचाली कराव्या लागतील ते ठरविणे तसेच हे कृत्य करण्यासाठी कामगारांमध्ये कोणती तांत्रिक कौशल्य ज्ञान, प्रशिक्षण आवश्यक आहे ते ठरविणे .

३. आवश्यक असलेली पात्रताा, योग्यता व कौशल्ये असलेल्या कामगारांची यंत्रज्ञ व तंत्रज्ञांची तसेच अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे.

४. उत्पादन कार्याला प्रारंभ करण्यापूर्वी उत्पादन कार्याची विभागणी विविध विभागांमध्ये करणे, प्रत्येक विभागाकडे निश्चित कार्य तसेच या विभागात काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे निश्चित क्रिया करण्याची जबाबदारी सोपविणे

५. उत्पादन कार्यात अनेक क्रिया समाविष्ट असतात. या सर्व क्रियांचे वर्गीकरण अशा रीतीने करणे की ज्यामुळे कार्याचा वेग वाढेल, पण कामगांराची गैरसोय होणार नाही.

६. प्रत्येक अधिकाऱ्याच्या कार्याची व जबाबदारीची स्पष्ट व्याख्या करणे तसेच त्याला आवश्यक ते अधिकार प्रदान करणे.

७. प्रत्येक अधिकाऱ्याचे नियंत्रणाचे क्षेत्र मर्यादित ठरविणे.

८. कामगार व कर्मचाऱ्यांच्या कार्यावर देखरेख ठेवण्यासाठी पर्यक्षणाची व नियत्रंणाची कार्यक्षम व्यवस्था अंमलात आणणे.

### ५) क्तीय नियोजन (Financial Planning)

आधुनिक काळात भांडवलात व्यवसायाचे जीवन रक्त मानतात उद्योंगाच्या स्थापनेकरीता व संचालनाकरीता विभिन्न उत्पादन घटकांची आवश्यकता भासत असली तरी हे सर्व घटक खरेदी कले जाऊ शकत असल्यामुळे, भांडवल हा घटक अत्यतिक महत्वाचा मानला जातो. उद्योगाच्या स्थापनेपासून त्यांच्या उद्योगाच्य विस्तार करण्यासाठी आक्रमक धोरणे व योजना कार्यान्वित करेपर्यंत सर्व अवस्थांमध्ये विभिन्न कार्ये करण्यासाठी वित्त व भांडवलाची गरज भासते

### ६) विपणन व्यवस्थापन (Marketing Management)

प्रत्येक औद्योगिक व व्यावसायिक उपक्रम हया ना त्या स्वरुपात वस्तू किंवा सेवेची विक्री विक्री करतो. त्यामुळे एरवादया उपक्रमाला वस्तू किंवा सेवेची विक्री करण्यामध्ये किती यश मिळते, यावर त्या उपकार्याचे एकून यश किंवा अवयश अवलंबून असते. प्रगत उत्पादन तंत्राच्या उपलब्धते मुळे आधुनिक काळात श्रेष्ठ दर्जाच्या वस्तूंचे मोठयां प्रमाणावर उत्पादन होणाचा वस्तू ग्राहकांपर्यत योग्य वेळी कशा पोचवायच्या ग्राहाकांच्या गरजा व वस्तूचे स्वरुप तसेच ग्राहकांशी क्रमशक्ती व वस्तुंची किंमत यामध्ये मेळ करत साधावयाचा आणि नफा मिळवीत असतानाच ग्राहकांना वस्तूखरेदीत आनंद आणि वस्तूंच्या खंरेदीचे समाधान करे मिळवून घ्यावयाचे हीच खरी समस्या आहे.

## ३.५ व्यवस्थापक आणि उद्योजक (Manager and Entrepreneurs)

एखादा व्यवसाय सूरु झाल्यानंतर इतराकडून काम करवून घेणे महत्वांचे असते. इतराकडून काम करुन घेण्याची कला म्हणजे व्यवस्थापन होय. व्यवस्थापकाला उद्योगसंस्था चालविण्याच्या दृष्टीकोनातून नियोजन, संघटन, संचालन, कार्य वेळावत्रक समन्वय, प्रेरणा देणे नियंत्रण ठेवणे ही कार्ये पार पाडावी लागतात. या सर्व कार्यापेक्षा अतिशय महत्वाचे कार्य व्यवस्थापकाला पार पाडावे लागतात. आणि ते म्हणजे निर्णय घेणे.

वरील पार्श्वभुमीवरून व्यवस्थापक आणि उद्योजक यांची तूलना खालील प्रमाणे स्पष्ट करता येऊ शकते. उद्योजक आणि व्यवस्थापक यांच्यात निश्चितच फरक आहे, उद्योजक केवळ नवीन नवीन कल्पना करीत नाही तर त्या प्रत्यक्षात आणण्याची जोखीम पत्करतो. प्रसंगी नुकसानही सोसतो आणि यशस्वी झाला तर भरपूर नफा मिळवतो शोधक हा कांही व्यवस्थापक नव्हे, शोधक नेहमीच यशस्वी होईल असे ठामपणे सांगणे अवघड आहे. प्रत्यक्षात आपल्याला बऱ्याचदा असंच दिसत की शोध लावतो तो उद्योजक व फायदा घेतो तो व्यवस्थापक उद्योजक आणि व्यवस्थापक यांच्या भुमिक वेगवेगळया आहेत, हे खरे असंल तरी असे आढळून आले आहे, की उद्योजकाला अनेक व्यवस्थापकीय कार्ये करावी. लागतात तर व्यवस्थापकालासुध्दा कांही वेळा उद्योजकांची भुमीका वाट पाडावी लागते. व्यवस्थापक आणि उद्योजक यांच्यात कांही मुलभूत फरक आहेत. नवनिर्मिती जोखीम पत्करणे हा उद्योजकांचा स्थायी स्वभाव असतो. व्यवस्थापकाला या दोन्हीची गरज नसते. उद्योगसंस्थेत ठरविलेल्या मुलभूत धोरणांशी सुसंगत असेच त्याचे वागणे असावे लागते. उद्योजक उद्योग निर्मीती करण्याचा अधिकाअधिक प्रयत्न करतो वर व्यवस्थापक पारंपारिक पध्दतीने निर्धारित मार्गाने काम पार पाडण्याचा प्रयत्न करतो.

## ३.६ उद्योजकता संस्कृतिचा विकास (Development Entreprencurial Culture)

भारतात प्राचीन काळापासून पंरपरागत कौटुंबिक व्यवसायांची पध्दत चालू आहे, त्यांना अलीकडचा इतिहास खंडित गतीचा असला तरी तो पूर्णतया मोडून पडलेला नाही. भारताच्या ग्रामीण भागात प्रामुख्याने चालणारे हस्तोद्योग आणि कुटिरोद्योग हे सामान्यतः एका कुटूंबाने त्या कुटूंबातील व्यक्तीच्या श्रमानीच चालविले जातात. अठराव्या व एकोणिसाव्या शतकात ग्रामीण भागात अलुते– बलुते म्हणजे निरनिराळया व्यवसायांवरुन निर्माण झालेल्या जाती उपजाती समाज शास्त्रज्ञाना आढळल्या. ग्रँट यांच्या म्हणन्यानुसार आकरा बलुतेदार व बारा अलुतेदार असे एकुण २३ होते. जोशी, भाट, गुरव सुतार लोहार कुंभार मुलाणी, न्हावी, परीट, मांग व चांभार असे अकरा बलूतेदार होते. आणि जंगम गोंधळी कोळी, सोनार, शिंपी माळी, गोसावी तांबोळी, घडशी, तेली, रामांशी, तराळ किंवा वेसकर असे बारा अलुतेदार होते. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतामध्ये उद्योगाची परंपरा किंवा उद्योजकता ही कांही थोडया पारशी व्यापारी कुंटुबे, हिदूमधील कांही विशिष्ट जाती, राजस्थान व गुजरातमधील जैन, मारवाडी समाज किंवा तामिळनाडूमधील चेट्टीयार यांच्यापूरतीची समीती होती. परंतू स्वतंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात +दक्षिणे कडील ब्राम्हण, नायडू गुजरातमधील पटेल बंगालमधील कायस्थ, पंजाबमधील शीख, खत्री अरोरा यासारख्या समाजातून उद्योजक निर्माण झाले.

टाटा, बिली, किर्लोस्कर बजाज मफतलाल, वालचंद, श्रीराम ही कुटुंबाची खरीच पण त्यांची जगाला ओळख आहे ती त्यांच्या औद्योगिक क्षेत्रातील कर्तुत्वामुळेच त्यांनी निर्माण केलेल्या व्यावसायिक परंपरामुळे.

## ३.७ भारतीय उद्योजकासमोरील आव्हाने (Challenges Before Indian Entrepreneurs)

भारतीय उद्योजकासमोरील प्रमुख आव्हाने खालील प्रमाणे आहेत.

स्वतःची असेच परदेशीच स्पर्धेक जागतिकीकरण व उदारीकरणामुळे परदेशी उद्योगाशी स्पर्धा, त्याचे फायदे आणि तोटे ग्राहकांच्या बदलत्या गरजा, राजकीय व भौतिक वातावरणातील होणारे बदल, वस्तू उत्पादनातील अडचणी बदला, समाज बदलता, नोकर वर्ग तंत्रज्ञानातील क्रांतीकारक बदल इत्यादी भारतीय उद्योजकासमोरील अव्हाने आहेत.

## ३.८ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१) उद्योजक या शब्दाचा अर्थ सागुण त्याचे गुण विशद करा.
२) उद्योजकांची प्रमुख कार्य स्पष्ट करा.
३) उद्योजक आणि व्यवस्थापनावर टिप लिहा.
४) भारतीय उद्योजकासमोरील आव्हाने स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ४

# भारतीय उद्योजकता विकास आणि यशस्वी उद्योजक

**घटक रचना :**

४.१ प्रस्तावना
४.२ भारतीय उद्योजकता विकास
४.३ भारतीय यशस्वी उद्योजक
- धीरुभाई अंबाणी
- अदित्य बीर्ला
- इतर उद्योजक

४.४ स्वअध्ययनासाठी प्रश्न

## ४.१ प्रास्तविक (Introduction)

भारतात औद्योगिक क्षेत्रामध्ये विकसित झालेली उद्योजकता ही कुटीर उद्योग, ग्रामोद्योग व लघु उद्योगांच्या स्वरुपाच होती या उद्योगांमध्ये उत्पादनाचे परीमान नेहमी मर्यादीत होते. उत्पादक व ग्राहक यांचेमध्ये प्रत्यक्ष संबंध होते आणि ग्राहकांच्या गरजा व अपेक्षांचा विचार करुनचा उत्पादनाचे कार्य केले जात होते. या उद्योगांमध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तूंची बाजारपेठ मर्यादीत होती. आजूबाजूच्या वातावरणाचा उद्योजकतेच्या विकासावर परिणाम घडत असतो. वातावरणाशी संबंधित अनेक घटक भारतीय उद्योजकतेच्या विकासावर प्रतिकुल परिणाम घडून आणणारे. असल्यामुळे अठराव्या शतकाच्या शेवटी, भारतात स्थापन झालेल्या उद्योंगाच्या साथी प्रक्रिया सुरु झाली. आपल्या देशात ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून प्रथम व्यापारी आले. नंतर या देशांच्या राजकीय जीवनात अनेक नाटयमय घटना घडल्या व शेवटी पेशात ब्रिटीशांचे साम्राज्य प्रस्थापित झाले. इंग्लडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आल्यानंतर तेंथे कारखाना पध्दती अस्तीत्वात आली. कारखानदारीच्या विकास घडून आला उत्पादनाच्या कार्यात यंत्राचा व शक्तीचा मोठया प्रमाणावर उपयोग करणे सुरु झाले व सर्व प्रकारच्या वस्तूंचे मोठया प्रमाणावर उत्पादन करणे शक्य झाले. या वस्तू भारतामधील बाजारपेठांमध्ये विकल्यात जात. भारतामधून इग्लंडमध्ये सर्व प्रकारचा कच्चा माल निर्यात होत. या कच्च्या मालाचे उपभोग्य वस्तूमध्ये परिवर्तन घडवून आणले जात असे व नंतर या वस्तू भारतामध्ये नसून भारतीय बाजारपेठेत त्या वस्तूची विक्री केली जात असे. ब्रिंटीशांनी अशा रीतीने भारतात वसाहतवादी अर्थव्यवस्था निर्माण केली.

## ४.२ भारतीय उद्योजकता विकास

भारतात औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योजक तेचा जा विकास घडून आला त्या प्रक्रीयेची कांही ठळक वैशिष्टये पूढील प्रमाणे आहेत.

भारतात संघटित समाजव्यवस्था निर्माण झाली तेव्हांच तेथे औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योजकतेचा उदभव झाला. भारतातील औद्योगिक उद्योजकता ही मानवी संस्कृती इतकीच जुनी आहे. भारतात उद्योजक कारागीरांची कधीच कमतरता नव्हती. या कारागीराजवळ वंशपरंपरेने आलेले कसब व कौशल्य होते. पण त्यांना भांडवलाची समस्या नेहमीच भडसावीत असे. स्वार्थी सावकांरानी कारागीरांची पिळवणूक केल्यामुळे या कारागीरांचे कर्तृत्व ठराविक भौगोलिक क्षेत्रामध्येच मर्यादित राहिले.

राजाश्रयामुळे उद्योजकता विकसित झाली पण ब्रिटीश सरकारची स्थापना झाल्यांनतर राजे व संस्थानिकांची पडझड सुरु झाली. कला व कौशल्यांनुसार असलेला राजाश्रय संपूष्टात आला आणि ग्रामोद्योग व लघू॒ उद्योगांच्या ऱ्हासाची प्रक्रिय सुरु झाली. ब्रिटीश सरकारने या देशात वसाहतवादी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नामुळे उद्योग उद्योजकतेच्या विकासामध्ये गतीरोध उत्पन्न झाले. ब्रिटीश सरकार आपली धोरणे कार्यान्वीत करण्यासाठी वेळोवळी स्थानिक व्यक्तिचे साहाय्य घेणे भाग पडले. या अंगानेच पारशी समाजात कांही उद्योजक घडविले गेले व पारशी समाजात औद्योगिक उद्योजकतेचा प्रादुर्भाव झाला.

भारतात औद्योगिक क्षेत्रामधील उद्योजक तेची खरी सुरुवात १९व्या शतकात शेवटी घडून आली. मुंबई अहमदाबाद शहराच्या आसमतात सुती कापड गिरण्या कलकत्ता व परिसरात ज्युटच्या गिरण्या स्थापन झाल्या व नंतर कोळशाच्या खाणी चहाचे मळे कागदाचे कारखाने, वीजनिर्मीती लोखंड व पोलाद अशा विविध क्षेत्रामध्ये उद्योजकतेचा चहू अंगानी विकास घडून आला.

ब्रिटींश सरकारने स्वतःचे हितसंबध वाढविण्याकरीता त्यांच्या राजवटीत प्रयत्न केले. प्रशासनाच्या सोयीकरीता व आपले हितसंबंध वाढविण्याकरीता येथे व्यापार वाढविण्याकरिता ब्रिटीश सरकारने उपाययोजना केली. असे कांही उपाय भारतात उद्योजकतेच्या वाढीला साहाय्यक ठरले.

ब्रिटीश सरकार भारतीयांची पध्दशीरपणे पिळवणूक करीत आहे. यांची भारतामधील विचारवंताना व समाजधुरीयतांना जाणीव झाल्यानंतर त्यांची विविध क्षेत्रात प्रतिक्रिया उमटली. हयाची प्रतिक्रिया म्हणून भारतीयांनी पूढाकार घेऊन देशात आधूनिक पध्दतीच्या उद्योगांची स्थापना केली पाहिजे या विचाराने मुल धरले व त्यामधून देशात स्वदेशीची चळवळ सुरु झाली. स्वदेशी चळवळमुळे भारतात उद्योजकतेच्या विकासाकरीता करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना बळ मिळाले भारतात विशिष्ट परिस्थितीमध्ये मॅनेजिंग एजन्सी पध्दतीची स्थापना व विकास झाला. प्रारंभीच्या काळात या देशात काम करणाऱ्या मॅनेजिंग एजन्सीची भूमिका रचनात्मक स्वरुपाची होती. त्यामुळे उद्योगधंदयाची प्रगती घडून आली. पण कालांतराने मॅनेजिंग एजन्टस्च्या कार्यपध्दतीमध्ये अनिष्ट प्रवृत्तीचा शिरकाव झाला व मॅनेजिंग एजन्सी पध्दती एक अभिशाप बनली.

पहिल्या व दुसऱ्या महायुध्दात उदभवलेली परिस्थिती उद्योजकतेचे सर्वांगीण विकासाकरिता साहाय्यक ठरली महायुध्दानंतर निर्माण झालेल्या मंदीचा उद्योगांच्या विकासावर विपरीत परिणाम होणे स्वाभाविकच होते. १५ऑगस्ट १९४७ रोजी झालेल्या फाळणीमुळे सुती कापड व ज्युट उद्योगांपूर कच्चा मालाची गंभीर समस्या निर्माण झाली. इतरही काही उद्योग प्रभावित झाले. व औद्योगिक अर्थव्यवस्था मध्ये असंवूलनाची स्थिती निर्माण झाली. पण या घटनेची सर्वात महत्वाची निरपष्ठी देशाला मिळालेले स्वातत्र्यं ही होय. स्वातंत्र्य मिळाल्यामुळे देशाची नियती घडविण्याची संधि आपल्यालाा मिळाली.

स्वांत्र्यप्राप्तीपर्यत व त्यानंतर ही काही काळापर्यंत औद्योगिक क्षेत्रामधील उद्योजकता ही व्यावसायिक पार्श्वभूमि लाभलेल्या व वंशपरंपरागत व्यापार उद्दीत करणाऱ्या काही विशिष्ट जामतीपूरतीच मर्यादीत राहिली उदा. पारशी, गुजराती, मारवाडी, चेट्टीयार इ. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारतामधील उद्योजकतेचा सामाजिक आधार विस्तृत झाला. ब्राम्हण, पटेल, कायस्थ, खत्री, अरोडा, इ. जातीमध्ये अनेक उद्योजक निर्माण झाले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारचे नवे औद्योगिक धोरण जाहीर झाले. या धोरणानुसार मिश्र अर्थव्यवस्थेचा आधार मान्य करण्यात आला व सार्ष जातिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्राचे सहअस्तित्व गृहीत धरुन यापैकी प्रत्येक क्षेत्रामध्ये कोणत्या उद्योगांचा विकास करण्यात येईल याबद्दल अभ्यास करण्यात आला. स्वातंत्र्यांत्तर काळात देशाचा जलद गतीने आर्थिक विकास व्हावा व कांही विशिष्ट आर्थिक व सामाजिक उद्दिष्टये साध्य करता यावीत याकरीता आर्थिक नियोजन तंत्राचा आवलंब करुन पंचवार्षिक योजनांची आखणी करण्यात आली. पंचवार्षिक योजनांच्या अंतर्गत सरकारी पातळीवर करण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या प्रयत्नांमुळे सार्वजनिक क्षेत्राचा झपाटयाने विस्तार घडून आला व सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योजकतेचा विकास झाला. या प्रकारच्या उद्योजकतेला सरकारी उद्योजकता असे ही म्हणतात. पंचवार्षिक योजनेमध्ये सरकारी पातळीवरून करण्यात आलेल्या प्रयत्नामुळे अर्थव्यवस्थेमधील सार्वजनिक क्षेत्राचा व्यापक सामर्थ्य वाढले . आर्थिक विकासाकरीता आवश्यक संरचना तयार झाली. मुलभूत उद्योबात वाढ झाली. निवडक औद्योगिक घराण्याच्या अनिबंध वाढीला पायबंद बसल, मक्ते दारीला आळा बसला सत्ता व संपत्तीच्या केंद्रीकरणाचे क्षेत्र मर्यादित राहिले आणि आर्थिक विषमतेची वाढ प्रतिबंधांत झाली. स्वांतत्र्यप्राप्तीनंतर ओद्योगिक धोरणाची अमलबजावणी करण्याचे दृष्टीने खाजगी क्षेत्रामध्ये उद्योगांची स्थापना करण्यावर अनेक प्रतिबंध लादण्यात आले होते या निंबंधामुळे देशात खाजगी क्षेत्रामधील उद्योजकतेची म्हणावी त्या वेगाने वाढ होऊ शकली नाही. श्री नरसिंहराव हे देशाचे पंतप्रधान व त्यांच्या सरकारा मनमोहन सिंग हे अर्थमंत्री होईपर्यंत ही स्थिती कायम होती. त्यानंतर देशाच्या अर्थकारणात परिवर्तनाचे मन्वंतर घडून येण्यास प्रारंभ झाला.

नरसिंहराव पंतप्रधान व श्री मनमोहन सिंग अर्थमंत्री झाल्यानंतर त्यानी सरकारच्या आर्थिक धोरणाला सर्वस्वी वेगळी दिशा दिली. मध्यवर्ती सरकारने स्वीकारलेल्या या नवीन धोरणामुळे उद्योगांना परवाने देण्यात धोरण उदार करण्यात आले. अनावश्यक निंबर्ध व नियत्रंण दृटविण्यात आली आयात व निर्यात व्यापारातील निर्बंध सैल करण्यात आले सरकारची कार्यपध्दती बदलण्यात आली, कर्जपूरवठा भरपूर व स्वस्त व्यावा यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात आली.

उद्योगाच्या राष्ट्रीयीकरणाची भीती दूर करण्यात आली, स्पर्धेला प्रोत्साहन देण्यात आले आणि सरकार व उद्योगपती यामध्ये सुसंवाद व सहकार्यावर सर्व बदलांमुळे देशात खाजगी क्षेत्रातील उद्योजकतेच्या वाढीकरीता अनुकूल वातावरण निर्मीती होणे फार स्वाभाषिक होते.

अलिकडे आपल्या देशात उद्योजकांना विविध प्रकारे साहाय्य करण्यासाठी अनेक संस्थाची स्थापना करण्यात आली आहे. या संस्था उद्योजकांना विविध प्रकारे मार्गदर्शन करतात सर्व प्रकारची मदत करतात आणि त्यांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी मदत करतात या संस्था मध्यवर्ती सरकार व राज्य सरकारे अशा दोन्ही पातळीवर कार्य करीत आहेत. या संस्थाच्या कार्यामुळे देशात नवनवीन उद्योजक तयार होत आहेत आणि पूर्वीचे उद्योजक व्यापक आवाहने स्वीकारण्यासाठी तयार होत आहे.

स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर बरीच वर्षेपर्यंत यशस्वी उद्योजक जन्मतात ही संकल्पना चिटकून होती. या विशिष्ट संकल्पनेने भारतीय समाजाच्या मानसिकतेला दिर्घकाळापर्यंत प्रभावित केल्यामुळे आपल्या देशात उद्योजकीय कर्तृत्वाचे स्त्रोत हे समाजातील विशिष्ट जमाती जाती व कुटूंबापर्यंत मर्यादित राहिल.

## ४.३ भारतीय यशस्वी उद्योजक

भारताला समृध्दीच्या मार्गावर नेणाऱ्या टाटा, बिर्ला, बजाज, किर्लोस्कर, वालचंद, मफतलाल, गरवारे, मच्छिंद्र आदींचा समावेश आहे. निवडक उद्योजकांचा व उद्योगगृहाचा अभ्यास खालील प्रमाणे स्पष्ट केला आहे.

### अ) बिर्ला उद्योग समुह

‘ अविकसि भागातील साधनसंपत्तीचा उपयोग ’ भारताच्या सर्वांगीण औद्योगिक विकासात महत्वाचा वाटा उचलणारे बिर्ला घराणे जगप्रसिध्द आहे. श्री. घनः श्यामदास यांचे तीन बंधु, जुगलाकिशोर, रामेश्वरदास व ब्रिजमोहन ही तीन मुले, पूतणे व नातू त्यांच्या कर्तृत्वामुळे बिर्ला घराण्याने आज भारतात सर्वोच्च स्थान मिळविले आहे, स्वातत्र्य चळवळीत बिर्ला घराण्याने हिरीरीने भाग घेतला, महात्मा गांधी यांच्या तत्वज्ञानाच्या

### ब) धीरुभाई अंबाणी :

धीरजलाल हिराचंद अंबाणी उर्फ धीरुभाई हिराचंद्र अंबाणी हे गुजराती भारतीय उद्योजक होते. व्यावसायिक हुशारीने गरीबीतून वर येऊन त्यांनी आपल्या चुलतभाबासोबत रिलायन्स उद्योग समुह स्थापला. इ.स. १९७७ साली सार्वजनिक घोषित केलेली रिलायन्स कंपनी विस्तारत जाऊन इ.स. २००७ साली अंबाणी कुटूंबीयाची मालमत्ता ६० अब्ज डॉलर म्हणजे वॉल्टन कुटींबीया पाठोपाठ दूसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत कुटूंब ठरण्याइतपत हा उद्योग वाढला.

धीरुभाई यांचा जन्म गुजरात राज्यातील सौराष्ट्राच्या जुनागढ जिल्ह्यातील चोखाड या गावी २८ डिसेंबर १९३२ रोजी झाला. त्यांचे वडील हिराचंद्र गोवर्धनदास अंबाणी हे प्राथमिक शाळेत शिक्षक होते तर आई जमनाबेन या गृहिणी होत्या. धीरुभाई हे आपल्या पाच भांवडातले

मधले अपत्य धिरुभाई शिक्षणात सर्वसामान्य विद्यार्थी होते. त्याचे इंग्रजीचे ज्ञान चांगले तर गणित कच्चे होते. इ.स. १९४९ साली आपले १० वी पर्यतचे शिक्षण पूर्ण करुन धीरुभाई नोकरीच्या शोधात एडन येथे गेले. तेथे बर्मा रोल कंपनीची उपकंपनी म्हणून काम करणारया ए.बेस नावाच्या कंपनीत धीरुभाई मासिक ३०० रुपये पगारावर पेट्रोल पंपावर नोकरी करु लागले. ही कंपनी लहान मोठ्या अनेक उद्योगांमध्ये कार्यरत होती. आंतरराष्ट्रीय कंपनीचा भाग असल्याने तेथे अनेक देशांचे व्यापारी येत असत. तेथेच धीरुभाईनी स्वत:ची रिफायनरी स्थापन करावी असे स्वप्न पाहण्यास सुरुवात केली. धीरुभाईचे वडील बंधू रमणीकलाला यांच्यासह एडन येथे राहत. गुजराती लोकांची आवड निवड चा दोघा भावाना माहित असल्याने त्यांनी गुजराती खाद्यपदार्थ भारतातून मागवून ते पदार्थ एडनला विकण्यास सुरु केले. थोड्याच दिवसात अंबाणी बंधू लोकप्रिय होऊ लागले. यामुळे ओळखी वाढत गेल्या. पण व्यापारी धीरुभाईनी प्रत्येकाकडून काहीतरी माहिती मिळत गेली. धंद्याचे गणित मांडता येऊ लागले. आपल्या हुशारी, मेहनत, चिकाटी या गुणांच्या जोरावर धिरुभाई ए.बेस मध्ये कारकून ते सेल्स मॅनेजर या पायऱ्या ओलांडून गेले. आपल्या कामापूरचे आरबी भाषेवर प्रभूत्व ही धीरुभाईनी मिळवीले होते. आणेक मीत्रही जोडले या मीत्रपरीवारात भारतीय आणि परदेशी असे सगळेच होते. इ.स. १९५१ साली धीरुभाई यांचे वडील हिराचंद्र अंबाणी यांचे निधन झाले. आईच्या पूढाकाराचे धिरुभाईचा विवाह जामनगरच्या कोकीलाबेन पटेल यांच्याशी मार्च १९५४ मध्ये पारंपरिक पद्धतीने झाला. विवाहानंतर धीरुभाई आणि कोकीलाबेन यांनी एडनला संसार थाटला. लग्नानंतर तीन वर्षांनी मुकेश यांचा जन्म झाला. आपला स्वतंत्र व्यवसाय भारतातच उभा करावा हे धिरुभाईनी ठरवले. शेवटी ३१ डिसेंबर १९५८ला धीरुभाईनी एडन कायमचे सोडून दिले आणि ते आपल्या कुटूंबीयासह भारतात परतले.

सन १९५९ साली धीरुभाई यांनी १५,०००/- रुपये गुंतवणूक करुन मजीदबंदर मुंबई येथे त्र्यंबकलाल दामाणी यांच्यासह ६५.३५ अशी भागीदारी करुन "रिलायन्स कमर्शियल कॉर्पेरशनची" स्थापना केली आणि ते मसाले आणि रेयॉन कापडाचा व्यवसाय करु लागले. मुंबईला आल्यावर धीरुभाई भुलेश्वर येथील चाळीत राहू लागले. अनील यांचा जन्म जुन १९५९ मध्ये तर मुलगी दिप्ती हीचा जन्म जानेवारी १९६२ व मीना हीचा जन्म १९६३ मध्ये झाला.

इ.स. १९६६ साली धीरुभाई अंबाणी यांनी अहमदाबाद जवळ अरोडा येथे अत्याधुनिक 'टेक्सटाइल मीलची' सुरुवात केली. इ.स. १९७५ साली जागतिक बँकेने विकसनशील देशांमधील सर्वोत्कृष्ट प्रकल्प म्हणून नरोडाच्या प्रकल्पांची नीवड केली. इ.स. १९७७ साली धीरुभाईनी रिलायन्स चे रुपांतर पब्लिक लिमीटेड कंपनीत केली. त्यांच्या प्रयत्नानुसार ५८,००० लोकांनी आपले पैसे गुंतविले. १९७८ साली धीरुभाई कापड व्यापारात पूर्णपणे उतरले. त्यांनी विमल या नावाने कापड विकायला सुरुवात केली. सन १९८१ साली मुकेश अंबाणी अमेरीकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठातून शिक्षण संपवून भारतात परतले. व १९८३ साली अनील अंबाणी अमेरीकेतील वॉर्टन स्कुल येथून आपले शिक्षण पूर्ण करुन भारतात आले. इ.स. १९९९-२००० मध्ये रिलायन्सने २५,००० कोटीची गुंतवणूक करुन जामनगर गुजरात येथे जगातील सर्वात मोठी रिफायनरी सुरु केली. तसेच इ.स. २,००० मध्ये २५,००० कोटीची गुंतवणूक करुन इन्फोकॉम क्षेत्रातही प्रवेश केला.

२४ जुन २००२ चा दिवशी धिरुभाईनी मेंदूत रक्ताची गाठ झाल्याने पक्षाघाताचा तीव्र झटका आला. त्यांना इस्पितळात दाखल करण्यात आले. पण उपचारांना यश आले नाही. अखेर ६ जुलै २००२ या दिवशी धीरुभाई अंबाणी यांचे निधन झाले.

**इतर उद्योगपती :**

शंतनूराव किर्लोस्कर (२८ मे १९०३ ते २४ एप्रिल १९९४) पूणे महाराष्ट्र भारतीय उद्योजक. किर्लोस्कर समुहाचे संस्थापक लक्ष्मनराव त्यांचे वडील होते.

रतन टाटा (२८ डिसेंबर १९३७ मुंबई, महाराष्ट्र हे भारतीय उद्योजक व टाटा उद्योगसमुहाचे संचालक मंडळाचे पदाधिकारी होते.)

**भारतीय उद्योजक :**

१. अनील अंबाणी
२. मुकेश अंबाणी
३. एल.एस. ओबेराय
४. शंतनुराव किर्लोस्कर
५. भालचंद्र दिगंबर गरवारे
६. एस. पी. गेदरेज
७. जमनालाल बजाज
८. जहांगीर रतनजी टाटा
९. दोराबजी टाटा
१०. जमशेटजी टाटा
११. रतन टाटा
१२. करमचंद थापर
१३. कावसजी दादर
१४. संजीव नंदा
१५. दादाभाई नौरोजी
१६. मोहनलाल पिरामल
१७. अझीम प्रेमजी
१८. नवलमल फिरोदीया
१९. कमलनथन बजाज
२०. राहूल बजाज
२१. के.के. बिर्ला
२२. अदित्य बिर्ला
२३. घनश्यामदास बिर्ला
२४. विजय मल्ल्या
२५. लक्ष्मीजीदास मित्तल
२६. सुमती मोरारजी

२७. प्रफुल्लचंद्र राय

२८. नेस वाडीया

२९. वालचंद हिराचंद

३०. जगन्नाथ शंकरशेट

३१. सुभाष चंद्र

## ४.४ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१) भारतीय उद्योजकता विकास स्पष्ट करा.

२) खालील उद्योजकावर थोडक्यात टिप लिहा.

    १) धीरूभाई अंबानी

    २) आदित्य बिर्ला

❖❖❖❖

# ५

# व्यवसाय नियोजन
# (Business Planning)

**घटक रचना :**

५.१ प्रस्तावना
५.२ व्यवसाय नियोजन पद्धती
५.३ व्यवसाय जिवण चक्र
५.४ वस्तू जीवन चक्र
५.५ स्वअध्ययनासाठी प्रश्न

## ५.१ प्रस्तावना

दात घेऊन कुणालाही आत्मसन्मान मीळत नाही पण कामाने नक्कीच मिळतो. फक्त उद्योगच मोठ्या प्रमाणावर कामाची निर्मिती करतात.

**- किर्लोस्कर**

१८१० साली किर्लोस्कर उद्योग समुहाला सुरूवात झाली. त्यांची ही जवळ जवळ दोन शतकाची वाटचाल अतिशय रोचक आणि साहसपूर्ण आहे. किलोस्कर म्हणजे महाराष्ट्रातील एक आद्य उद्योग समुह किर्लोस्कर वाडीच्या माळरानावर त्यांनी आपल्या उद्योगाचे रोपटे लावले. लक्ष्मणराव किर्लोस्कर, शंतनुराव, शंभुअण्णा, शंकरराव, नानासाहेब इ. किलोस्कर समुहाचे शिल्पकार होय.

प्रत्येकाला कठीण काळातून जावे लागले. आपण त्याचा सामना किती निर्धाराने आणि समर्पणाने करता हेच आपल्या प्रभावीपणाचे मोजमाप आहे.

**- लक्ष्मी निवास मित्तल**

भारतात जन्मलेल्या पण लंडनमध्ये वास्तव्यास असणाऱ्या या स्टील सम्राटाचाच जन्म १५ जून १९५० मध्ये राजस्थानमधील सादुलपूर या गावी झाला. केवळ १९८० साली सुरू केलेल्या कंपनीचे रूपांतर लक्ष्मी मित्तल यांनी वार्षिक उलाढाल सद्या मिलियन डॉलर्स आणि ८०,००० कामगार असणाऱ्या जगातील सर्वात मोठ्या स्टील उत्पादक कंपनीत केले अशी अनेक भारतीय उद्योजकांची नावे आपणास सांगता येतील जसे, धीरूभाई अंबानी, नारायण

मूर्ती, अक्षिम पेमजी, किरण मुजूमदार, अनु आगा, नवलमल फिरोदिया इ. इतिहास वाचणे हे इतीहास घडवणाऱ्यांशी प्रेरणा देणारे असते. भारतीय उद्योजक अतिशय कष्टातून यशस्वी उद्योजक म्हणून निर्माण झालेले आहेत.

बदल हाच तर आयुष्याचा स्थायीभाव आहे. जे ही गोष्ट करून किंबहुना स्वीकारून होणाऱ्या बदलास उपयुक्त ठरतात अशा नवीन गोष्टी शिकून नव्या युगाचा सामना करण्यास तयार आहेत. त्याच्यासाठी भरपूर संधी उपलब्ध आहेत. त्या त्या वाढणारही आहेत.

## ५.२ व्यवसाय नियोजन पद्धती

व्यवसाय नियोजन ही उद्योगनिर्मितीची प्रथम पायरी असून उद्योजकतेची सुरूवात व्यवसाय नियोजनापासून होत असते. एखाद्या उद्योजकास कोणता व्यवसाय करावयाचा आहे, कुठे किंवा कोणत्या ठिकाणी उद्योगाची स्थापना करावयाची आहे? याचे सविस्तर नियोजन करणे महत्त्वाचे असते.

व्यवसाय नियोजन प्रक्रीया पद्धती खालीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

१) स्वअध्ययन
२) बहिर्गत वातावरणाचा अभ्यास
३) योजना तयार करणे
४) योजनेची प्रत्यक्षात अमलबजावणी करणे
५) सातत्यता
६) नियंत्रण आणि परिक्षण

### १) स्वअध्ययन :

स्वअध्ययन अर्थात अंतर्गत वातावरणाची अभ्यास उद्योजकाने स्वअध्यनामध्ये स्वतःला त्या उद्योगाची आवड आहे किंवा ज्या उद्योगाबाबत माहिती आहे अशा उद्योगांचा अभ्यास करणे गरजेचे असते. व्यवसायाची दिशा, व्यवसायाची नीती, व्यवसायाची मुल्ये व्यवसायाची उद्दिष्ट्ये इत्यादी गोष्टीचा अभ्यास उद्योजकांनी करावा लागतो. आपण कोणत्या गोष्टी करू शकतो. त्या संबंधीच्या सर्व कल्पना गोळा करणे.

### २) बहिर्गत वातावरणाचा अभ्यास :

व्यवसाय नियोजनातील दुसरी पायरी म्हणजे बहिर्गत वातावरणाचा अभ्यास करणे. स्वअध्ययन किंवा अंतर्गत वातावरणाच्या अभ्यासानंतर बहिर्गत वातावरणाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. यामध्ये बाजारपेठेचा अभ्यास करणे व बाजार पेठ निश्चित करणे.

### ३) उद्दिष्ट ठरविणे :

व्यवसायिक वातावरण परिक्षण आणि व्यवसाय निश्चितीनंतर व्यवसायाची निश्चित उद्दिष्टे ठरवणे आवश्यक असते. उद्योजकांने व्यवसायाची सामाजिक आर्थिक आणि राष्ट्रीय उद्दिष्टे निश्चीत करावीत त्याच बरोबर व्यवसायाची दिर्घ, मध्यम व अल्प मुदती उद्दिष्टे स्पष्ट करणे गरजेचे असते.

**४)  व्यवसायाची निती ठरविणे :**

उद्योजकतांनी उद्दिष्ट निश्चितीनंतर व्यवसायाची निती उद्दिष्ट पूर्तीकरीता आवश्यक असते. व्यवसाय निती उच्च, मध्यम व खालच्या पातळीवरील व्यवस्थापनाशी निगडीत असते.

**५)  विविध व्यवसाय नितीचे मुल्यमापन :**

योग्य व्यवसाय नितीचे निवड करताना व्यवसायिकांनी विविध नितींचा अभ्यास करणे आवश्यक असते आणि विविध नीतीपैकी योग्य नितीची निवड करणे गरजेचे असते.

**६)  अनुकरण व मुल्यांकन :**

योग्य व्यवसाय आराखडा व निती ठरविल्यानंतर त्या व्यवसाय कृती आराखड्याची प्रत्यक्षात रूपांतर करणे गरजेचे असते व कृती आराखडा प्रत्यक्षात अनुकरण करून त्याचे योग्य ठराविक वेळी किंवा वेळोवेळी मुल्यांकन करणे गरजेचे असते.

## ५.३  व्यवसाय जीवन चक्र (Business life cycle)

मानवी जीवनाच्या विविध अवस्था असतात जसे बिजांकुर, जन्म, बालपण, तारूण्य, प्रौढावस्था, वृद्धावस्था आणि मृत्यू त्याचप्रमाणे व्यवसाय लहान असो की मोठा; लोकल असो विदेशी, राष्ट्रीय असो की आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक. प्रत्येक व्यवसायाला या अवस्थेतून जावे लागते. जन्म आणि मृत्यू दोन्ही मानवी जीवनाच्या अपरिहार्य आणि निश्चीत अशा अवस्था आहेत फक्त या दोन अवस्थेमधील कालावधी हा वेगवेगळा असतो. जसे कोणते बालक जन्मतः मृत्यू पावते, कुणी बालपणात, कुणी तारूण्यात, कुणी प्रौढावस्थेत तर कुणी वृद्धापकाळात परंतु मृत्यू हे अटळ आहे. जन्म आणि मृत्यु जन्मलेला पहिला खास आणि मृत्युचा शेवटचा खास यालाच जीवन असे म्हणतात. यामधील विविध अवस्थांना जीवन चक्र असे म्हणतात.

व्यवसाय जीवन चक्र हेसुद्धा एक अटळ आणि अनिश्चित स्थितीचे चक्र आहे. व्यवसाय जीवनचक्र स्थिती खालील आकृतीवरून स्पष्ट होते.



प्रथम अवस्था - बिजांकुर
दुसरी अवस्था - सुरूवात
तिसरी अवस्था - विकास / वृद्धी
चौथी अवस्था - स्थैर्य
पाचवी अवस्था - विस्तारीकरण
साहवी अवस्था - ऱ्हास
सातवी अवस्था - विसर्जन

प्रत्येक व्यवसाय वरील विविध अवस्थेमधून जात असतो. जीवन चक्राचा कालावधी व्यवसायाची निती व त्याला मिळालेले यश यावर अवलंबून असते.

वरील विविध स्थिमध्ये विविध आव्हाने असतात आणि विविध दृष्टीदोषाचा अर्थात क्रिया केंद्राचा विचार होतो. त्याचप्रमाणे विविध अवस्थेत भांडवलाचे स्त्रोत पण बदलतात. ते खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**प्रथम अवस्था : बिजांकुर**

| अर्थ | आव्हाने | क्रियाकेंद्र | भांडवली स्त्रोत |
|---|---|---|---|
| व्यवसायाची प्रथम अवस्था म्हणजे बिजांकुर अवस्था होय. | १. बाजारपेठ ठरवणे<br>२. भांडवल उभारणी<br>३. मनुष्यबळ<br>४. यंत्रसामग्री | योग्य बाजारपेठ, ग्राहक व व्यवसायाची संधी याची निवड करणे | भांडवलाचे प्रमुख स्त्रोत स्वतःचे भांडवल, मित्र, नातेवाईक, बँक-लोन, शासन योजना इत्यादी |
| **दुसरी अवस्था : सुरूवात** | | | |
| व्यवसायाची संकल्पना प्रत्यक्षात उतरवणे म्हणजे व्यवसायाची सुरूवात होय. | १. भांडवलाचा प्रश्न<br>२. ग्राहक<br>३. योग्य जागा<br>४. संसाधनाचा प्रश्न | प्रमुख लक्ष बाजारपेठा आणि ग्राहक होय | भांडवल स्वतः नातेवाइक मित्र, बँक लोन, तारण कर्ज, भाडेपट्टी इत्यादी भांडवलाचे स्त्रोत उपलब्ध असतात. |
| **तिसरी अवस्था : वृद्धी/विकास** | | | |
| व्यवसायाची तिसरी अवस्था म्हणजे वृद्धी होय. यात व्यवसायाच्या विक्रीमध्ये जलद गतीने वाढ होते. | या अवस्थेत वस्तूचा पुरवठा ग्राहकांचे समाधान संसाधनाचे व्यवस्थापन इ. व्यवसायिकासमोरील अडवणे असतात. | प्रमुख लक्ष या अवस्थेत ग्राहक असते. | व्यवसायातून भांडवलाची निर्मित एक नवीन भांडवली स्त्रोत या स्थीतीमध्ये व्यवसायिकास मिळतो. |

| | | | |
|---|---|---|---|
| **चौथी अवस्था : स्थैर्य / परिपक्वता** | | | |
| या अवस्थेत व्यवसाय परिपक्व व परिपूर्ण झालेला असतो. | व्यवसायामध्ये सातत्यता टिकवणे आवश्यक असते. | उत्पादन नविनीकरण यावर व्यवसायाचे प्रामुख्याने केंद्र असते. | या अवस्थेत भांडवलाचे अनेक स्त्रोत उपलब्ध असतात व ते सहजपणे प्राप्त करता येते. |
| **पाचवी अवस्था : विस्तार** | | | |
| व्यवसायाची परिपक्वता प्राप्त झाल्यानंतर अंतर्गत किंवा बहिर्गत मार्गाचे आवलंब करून व्यवसायाचे विस्तारीकरण करणे या अवस्थेमध्ये समाविष्ट आहे. | व्यवसायाचे विस्तारीकरणासाठी विविध संसाधनाचा शोध घेणे आणि चालू व्यवसाय यशस्वीपणे चालू ठेवणे होय. | साधारणपणे व्यावसायिकाचे लक्ष विस्तारी करणासाठी संसाधनाचा शोध घेणे हा असतो. | विस्तारीकरणासाठी भांडवलाची उभारणी मोठ्या प्रमाणावर व्यवसायातून किंवा इतर मार्गांनी करण्यात येते. |
| **सहावी अवस्था : ऱ्हास** | | | |
| कालांतराने प्रत्येक व्यवसायाचा ऱ्हास होत असतो या अवस्थेत व्यवसायाची अधोगती स्थिती सुरू होते. | या अवस्थेमध्ये व्यवसायिकास अनेक आव्हानाला समोरे जावे लागते. जसे आर्थिक प्रश्न, विपणन बाजारपेठ ग्राहक इत्यादी | व्यवसायिकाचे लक्ष प्रामुख्याने व्यवसाय टिकवून ठेवणे ग्राहक टिकवून ठेवणे हे असते. | या अवस्थेत आहे त्या भांडवलात व्यवसायाची स्थिती मजबुत करणे होय. |
| **सातवी अवस्था – विसर्जन** | | | |
| शतत तोट्यात चालणाऱ्या व्यवसायाचे विसर्जन हे अपरिहार्य असते. कधी न कधी प्रत्येक व्यवसायाला या स्थितीला सामोरे जावे लागते. याला वातावरणातील होणारे बदल हे पण कारणीभूत असतात. | या अवस्थेत व्यवसायाची देयता व संपत्ती स्थितीचे मोजमाप व जुळवाजुळव आवश्यक असते. | व्यवसायिकाचे लक्ष व्यवस्थीत विसर्जीत करणे हे असते. | व्यवसायाच्या उपलब्ध संपत्तीचे निराकरण करून उपलब्ध भांडवलाची तरतूद करणे. |

## ५.४ वस्तू जीवन चक्र (Product life Cycle)

वस्तू जीवनचक्र अर्थ

"कोणत्याही वस्तू उत्पादन आणि विक्री प्रक्रियेच्या विविध अवस्था म्हणजेच वस्तू जीवनचक्र होय"

उत्पत्ती, वृद्धी, परीपक्वता, ऱ्हास या वस्तू जीवनचक्राच्या विविध आवस्था होय, हे पुढील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करता येते.




| | | |
|---|---|---|
| शून्य अवस्था | : | विकास अवस्था |
| प्रथम अवस्था | : | उत्पत्ती |
| दुसरी अवस्था | : | वृद्धी |
| तिसरी अवस्था | : | परिपक्वता |
| चौथी अवस्था | : | ऱ्हास |

**शून्य अवस्था :**

जिथे वस्तुचे स्वरूप कल्पनेच्या अवस्थेत असते किंवा ज्या अवस्थेत वस्तूचे भौतिक स्वरूप नसून काल्पनिक स्वरूप असते त्या अवस्थेला किंवा स्वरूपाला **शुन्य अवस्था** असे म्हणतात.

**प्रथम अवस्था : उत्पत्ती**

ज्या आवस्थेमध्ये वस्तूचे प्रत्येक्ष उत्पादन करण्यात येते किंवा प्रत्यक्षात वस्तूचा जन्म होणे ती प्रथम अवस्था होय. यामध्ये एका नविन नाविन्यपूर्ण वस्तूचा विश्वामध्ये उदय होतो. अर्थात एका उद्योजकाच्या काल्पनिक संकल्पनेला प्रत्यक्ष आकारामध्ये अस्तीत्व प्राप्त होते.

जिथे फक्त उद्योजकालाच याचे महत्त्व माहिती, उपयोगिता, आकार याचे ज्ञान असते. व्यवसायिकास किंवा उद्योजकास माहित नसते. ग्राहक वर्ग यापासून अज्ञात असतो. यामुळे उद्योजक मोठ्या प्रमाणावर विक्रीवृद्धीवर भर देऊन वस्तुचे महत्त्व ग्राहकापर्यंत पोहजविण्याचे कार्य करतो. अर्थात थोड्याच काळात वस्तुची माहिती ग्राहकांना करून देण्याचे कार्य घडते. या अवस्थेत अतिशय कमी प्रमाणात वस्तुचे उत्पादन करण्यात येते. त्याचप्रमाणे एखाद्या विशिष्ट बाजारपेठेत वस्तुची विक्री केली जाते. कमी किंमत, कमी नफा, लहान बाजारपेठ, जास्त विक्रीवृद्धीचा खर्च असे या अवस्थेचे वैशिष्ट्य आहे.

### दुसरी अवस्थाः वृद्धी

वस्तु जीवन चक्राची दुसरी आणि महत्त्वाची अवस्था म्हणजे वृद्धी होय. वस्तूच्या विक्रीमध्ये व वस्तु उत्पादन मिश्रमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ आणि विकास होणे म्हणजेच वृद्धी होय. या अवस्थेमध्ये वस्तूची माहिती ग्राहकापर्यंत विविध प्रकारे आणि मार्गाने पोहचते. त्याचप्रमाणे आशा प्रकारच्या वस्तुचे उत्पादन इतर उद्योजकपण सुरू करतात म्हणजेच मोठ्या किंवा लहान प्रमाणात या अवस्थेत उद्योजकाला स्पर्धकाशी तोंड द्यावे लागते.

विशेष म्हणजे या अवस्थेत उद्योजकास सर्वात जास्त नफा मिळतो आणि विक्रीवृद्धीचा खर्च किंवा इतर खर्चात आपोआप कमी होतो. णोठी बाजारपेठ, विविध विक्रेते, जास्त नफा, जास्त विक्री, कमी खर्च, कमकुवत स्पर्धक हे या अवस्थेची वैशिष्ट्ये होय.

### तिसरी अवस्था : परिपक्वता

सर्व दृष्टीने व्यवसाय आणि वस्तू बाजारपेठेमध्ये नावारूपाला येते व ग्राहक स्वतः होऊन त्या वस्तुची मागणी करतात ही अवस्था म्हणजे परीपक्व अवस्था होय. ही अवस्था म्हणजे शिखर अवस्था होय. ग्राहकांच्या मनात, ध्यानात कंवा जीभेवर या वस्तुचे नाव असते. जसे मोबाइल म्हणजे नोकीया, बाटा शूज, उषा फॅन, मारूती कार इत्यादी ही अवस्था जी परिपक्व अवस्था असली तरी या अवस्थेत अणिक उत्पादक स्पर्धक बाजारात उतरतात नवनवीन वस्तुचा शोध, नविन तंत्र या सर्व बाबींमुळे उद्योजकांचे मन नेहमी अस्थिर असते. वस्तूचे महत्त्व सातत्याने टिकवून ठेवण्यासाठी उद्योजक अहोरात्र प्रयत्न करीत असतो.

### चौथी अवस्था : ऱ्हास

प्रत्येक वस्तूचा ऱ्हास हा निश्चीत असतो. ग्राहकांचे राहणीमान, त्यांच्या आवडी-निवडी, त्यांचे उत्पन्न यामधील होणाऱ्या बदलामुळे तसेच वातावरणातील होणाऱ्या बदलामुळे वस्तुचा ऱ्हास होत असतो. कोणतीही एक प्रकारची वस्तू कोणताही ग्राहक जन्मभर वापरत असतो. कालपरत्वे त्याला वस्तूमध्ये बदल आवश्यक वाटतो. वस्तूची मागणी कमी होणे, नफ्याच्या प्रमाणात व विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात घसरण होणे हे या अवस्थेचे वैशिष्ट आहेत.

### वस्तूजिवनचक्र व विपणन नितीः

वरील प्रमाणे वस्तू जीवनचक्रच्या विविध अवस्था आहेत. उद्योजक वरील विविध आवस्थानुरूप वेगवेगळी विपणन नितीचा वावर करीत असतो. प्रत्येक अवस्थेमध्ये उत्पादन

नीती, मुल्य निती, वितरत निती व विक्रीवृद्धी नितीचा विपणन, नितीमध्ये समावेश होतो यामध्ये उद्योजकांसमोर विविध प्रश्न उभे असतात.

१) वस्तू जीवनचक्रच्या विविध अवस्थेत विपणन निती काय असेल.
२) वस्तू जीवनचक्राच्या प्रथम अवस्थेत (उत्पत्ती) विपणन निती काय असेल ?
३) वृद्धी आवस्थेमध्ये विपणन निती काय असेल ?
४) परीपक्व आवस्थेत विपणन निती काय असेल ?
५) ऱ्हास आवस्थेमध्ये विपणन निती काय असेल.
६) वस्तू जीवनचक्रच्या विविध अवस्थेत उत्पादन निती काय असेल ?
७) वस्तू जीवनचक्राच्या विविध अवस्थेत मुल्य निती काय असेल ?
८) वस्तू जीवनचक्रच्या विविध अवस्थेत वितरण निती काय असेल/

इत्यादी अनेक प्रश्नाचे निराकरण उद्योजकास करणे गरजेचे असते आणि प्रत्येक अवस्थेशी पोषक असणारी विपणन निती उद्योजकांनी अवलंबली पाहिजे.

## ५.५ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१. व्यवसाय नियोजन म्हणजे काय ? व्यवसाय नियोजनाच्या विविध पद्धती विशद करा.

२. व्यवसाय जीवन चक्रच्या विविध स्थीतींचे स्पष्टीकरण लिहा.

❖❖❖❖

# ६

# वातावरण निरीक्षण

# (Environment Scan)

**घटक रचना :**

६.१ प्रस्तावना
६.२ व्यावसायिक वातावरणाचे घटक
६.३ उद्योजकतेमधील संधी आणि अडथळे
६.४ सामर्थ्य आणि कमजोरी
६.५ सारांश
६.६ स्वअध्ययनासाठी प्रश्न

## ६.१ प्रस्तावना

कोणत्याही व्यवसार्च चशापयश विविध घटकांवर अवलंबून असते. यापैकी काही घटक हे व्यवसायाच्या थेट नियंत्रणाच्या बाहेरील असतात. हे घटक व्यावसायिक पर्यावरणातून उदभवलेले असतात. प्रत्येक व्यवसाय व्यावसायिक पर्यावरणाच्या चौकटीत कार्यरत असतो. उद्योजक व्यवस्थापक यांना प्रत्येक निर्णय घेण्यापूर्वी व्यावसायिक पर्यावरणाचा विचार करावाच लागतो. आणि म्हणूनच व्यवसायिक पर्यावरणाचा अभ्यास महत्वाचा ठरतो. प्रस्तूत प्रकरणात व्यावसायिक पर्यावरणाचे घटक संधी व अडथळे याचा सविस्तर अभ्यास करण्यात आलेला आहे.

व्यावसायिक पर्यावरणात man is the product environment मनुष्य म्हणजे पर्यावरणाचे अपत्य होय. ताणबी जीवन म्हणजे नैसर्गिक घटक व त्याबाबत मानवी दृष्टीकोन यांचा संयुक्त पविपाकच म्हणावा लागेल.

व्यावसायिक पर्यावरण म्हणजे व्यवसाया भोवतीच्या वातावरणातील घटक हा घटक व्यवसायाची कार्ये आणि स्थिती यावर परिणाम करीत असतात.

भारतीय व्यावसायिक पर्यावरण म्हणजे भारतीय व्यवसायाच्या कार्यावर परिणाम करण्याचा किंवा परस्परांवर क्रिया करणाऱ्या घटकांचा अभ्यास भारतातील व्यावसायिक पर्यावरणांचे विविध घटक आणि त्यातील कल यांचे आकलन होण्याचा दृष्टीने व्यावसायिक पर्यावरण ही संज्ञा, त्यातील घटक आणि त्याचे महत्व समजून घेणे उचित ठरले.

**व्याख्या**

नैसर्गिक आणि सामाजिक परिस्थितीचा एकत्रितरीत्या व्याक्तिवर अथवा समाजावर परिणाम करणारे घटक म्हणजे पर्यावरण होय. व्यावसायिक पर्यावरण म्हणजे व्यवसाय संस्थेवर परिणाम करणारे घटक होय.

१) व्यावसायिक संस्थेपूरे संधी आणि आव्हाने म्हणून उभ्या राहणाऱ्या संस्थेबाहेरच्या घटकांना व्यावसायिकांच्या पर्यावरण म्हणतात. असे अनेक घटक असतात. त्यापैकी ठळक घटक म्हणजे आर्थिक शासकीय कायदेशीर बाजारपेठ व स्पर्धा पूरवठादार व तंत्रज्ञानात्मक भौगोलिक व सामाजिक हे होत. - विल्यम एक ब्रेक

व्यावसायिक पर्यावरण म्हणजे व्यावसायिक संस्थेच्या कार्यवर प्रभाव पाडणारी व तिचा परिणामकारकता ज्यावर अवलंबुन असते अशी व्यवसायसंस्थेच्या सभोवतालची परिस्थिती होय.- बी. सी. टंडन

प्रा. बी. सी. बाऊन यांच्या मते व्यावसायिक पर्यावरण म्हणजे असे वातावरण ही ज्यात व्यवसायाच्या उद्यिष्टांना छंद देणाऱ्या अनेक परस्परांविरोधी घटकांचा समावेश केला जातो. उदा. परिस्थिती, तांत्रिक प्रगती, सांस्कृतिक जडनघडन इत्यादी.

व्यावसायिक पर्यावरणाचे ठळक वैशिष्टे वरील व्याख्येवरुन व्यावसायिक पर्यावरणा विषयीची ठळक वैशिष्टे खालील प्रमाणे सांगता येते.

१) व्यावसायिक पर्यावरण अविश्वय गुंतागुतीचे असते.

२) व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योगव्यवसाय यांचा आवआपसात परस्परांना परिणाम होत अगदी व्यवसायिक पर्यावरणातील विविध घटकांचा सुध्दा आपापसात एकमेकांवर परिणाम होऊ असतो.

३) आर्थिक, सामाजिक वैधानिक तांत्रिक राजकीय इत्यादी घटक बह्गि व स्वरुपाचे असून त्यांच्यावर उद्योग व्यवसायाचे नियंत्रण असते नाही साहजिकच त्यांचा थेट परिणाम होऊन उद्योजकांना आपल्या उद्योग व्यवसायात बदल घडवून आणावे लागतात.

४) व्यावसायिक पर्यावरणाच्या अनुषगांने कांही घटक स्थिर तर कांही घटक अस्थिर असतात. घटनात्मक तरतूदी, भौगोलिक पर्यावरण इत्यांदीसारखे घटक तुलनेने स्थिर असतात तर तंत्रज्ञान, ग्राहकांच्या आवडी- निवडी फॅशन्स इत्यांदीसारखे घटक तूलनेने अस्थिर असतात.

५) व्यावसायिक पर्यावरणातील कांही घटकांचा संख्यात्मक विचार करता येतो. उदा. लोकसंख्या वह, आर्थिक विकारण विकास पट,राष्ट्रीय उत्पन्न, इत्यादी.

६) व्यावसायिक पर्यावरण हे सापेक्ष आहे. एखादी विशिष्ट परिस्थिती एखादया व्यवसायाला अत्यंत अडचणीची ठरेल तर तीच परिस्थिती दुसऱ्या एखादया व्यवसायाला फायदाचा व सोपीची ठरते.

## ६.२ व्यावसायिक वातावरणाचे घटक

उद्योजकतेची उत्पत्ती आणि विकास व्यावसायिक पर्याचरणावर अवलंबून असतात. एखादया देशात उद्योजकांची कमतरता का आहे किंवा आकांक्षा असून व प्रसंगी संसाधनांचा

अनुकूलता असूनही, व्यक्ती नवीन उद्योगांची स्थापना करण्यासाठी का पुढाकार घेत नाहित. या प्रश्नांचे नेमके उत्तर त्या पेशामधील व्यावसायिक पर्यावरणामध्ये आढळते. तसेच एखादया देशात उद्योजकतेचा झपाटयाने विकास घडून येण्याचेही कारण त्या देशातील व्यावसायिक पर्यावरणामध्ये आढळते. पहिल्या उदाहरणामध्ये व्यावसायिक पर्यावरणाची प्रतिकुलता असते. तर दुसऱ्या उदाहरणामध्ये व्यवसायिक पर्यावरणाच्या पूढे नमुद केलेल्या घटकांची चर्चा पूढे करण्यात आली आहे.

१. आर्थिक घटक
२. सामाजिक घटक
३. राजकीय घटक
४. सांस्कृतिक घटक
५. समाजशास्त्रीय घटक
६. विज्ञान व तंत्रज्ञानाचे घटक

## अ) आर्थिक घटक (Economic Factors)

देशामधील आर्थिक पर्यावरण (Economic) हा व्यावसायिक पर्यावरणाचा फार महत्वाचा भाग आहे. आर्थिक पर्यावरणामध्ये अनेक घटकांचा अंतर्भाव होतो. आपण त्यांना सोडूसाठी आर्थिक घटक म्हणू शकतो. व्यावसायिक पर्यावरणामधील घटकांचा उद्योजकतेवर थेट न अत्यंत तीव्र स्वरुपाचा परिणाम होतो. उद्योजकता विकासाला विविध प्रकारे प्रभावित करणाऱ्या खाली नमुद केलेल्या घटकांबद्दल येथे चर्चा केली आहे.

१. अर्थव्यवस्थेचा प्रकार
२. नैसर्गिक संशाधणे
३. भांडवल
४. मुलभूत सोयी
५. जोखीम
६. कामगांराची समस्या
७. बाजारपेठ

### १) अर्थव्यवस्थेचे प्रकार :

एखादया देशामधील उद्योजकतेला प्रभावित करणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे त्या देशामधील अर्थव्यवस्थेचे स्वरुप किंवा प्रकार हा आहे. देशामध्ये हया प्रकारची अर्थव्यवस्था असेल त्यानुसार देशात राहणाऱ्या सर्व नागरिकांच्या आर्थिक व्यवसायाचे संचालन होत असते. भाडवलशाही अर्थव्यवस्था आणि समाजवादी अर्थव्यवस्था हे अर्थव्यवस्थेचे ठळक पण परस्परविरोधी प्रकार आहेत.

### अ) भांडवलशाही अर्थव्यवस्था (Capitalistic Economic)

औद्योगिक क्रांतीमुळे सामंतवादी स्वरुपाची अर्थव्यवस्था नष्ट होऊन भांडवलशाही या भांडवलावर आधारित नवीन व्यवस्थेची रचना घडून आली. या व्यवस्थेमध्ये उत्पादन, विबिमय आणि वितरणाच्या साधानावर खाजगी मालकी व अधिकार असतो, नागरिकांना स्वतःच्या इच्छेनुसार आपले सर्व व्यवहार करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते

## ब) समाजवादी अर्थव्यवस्था (Socialistic Economy)

अर्थव्यवस्थेचे दूसरे प्रमुख समाजवाद किंवा समाजवादी अर्थव्यवस्था हे आहे. समाजवादी अर्थव्यवस्थेमधील उत्पादनात सर्व साधनावर समाजाची मालकी राहते. नागरिकाचं स्वातंत्र्य व अधिकार मर्यादित राहतात. आर्थिक व्यवहारांच्या संचालनामध्ये सरकारचा भरपूर हस्तक्षेप राहतो. उत्पादक साधनांचा उपयोग व्यक्तिगत नफा मिळविण्यासाठी न करता सामाजिक हीत लक्षात घेऊनच केला जातो. आणि सरकार समाजाची प्रतिनिधीक सत्व म्हणून संपूर्ण अर्थव्यवस्थेचे संचालत करते. समाजवादी अर्थव्यवस्था उद्योजकतेच्या विकासाला पोषक नसते. हया प्रकारच्या अर्थव्यवस्थेमध्ये सरकार स्वतःच सार्वजनिक क्षेत्राची निर्मिती करते आणि विविध प्रकारच्या उद्योंगाची स्थापना करुन त्यांचे संचालन करते.

समाजवाद अर्थव्यवस्था खाजगी उद्योजकतेच्या विकासाला पोषक नसण्याची ठळक कारणे पुढील प्रमाणे आहेत.

१. समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादनाची सर्व साधने सरकारच्या मालकीची असतात.
२. नागरीकांना आर्थिक सामाजिक व राजकीय स्वरुपाच्या सर्व अधिकारांपासून बऱ्याच मर्यादेपर्यंत वंचित केले जावू शकते.
३. या अर्थव्यवस्थेत नफा मिळविण्याच्या प्रेरणेला पूर्ण नाव मिळत नाही.

## क) मिश्र अर्थव्यवस्था (Mixed Economic)

कांही देशामध्ये भांडवलशाही व समाजवादी अशा दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये समन्वय असणारी मिश्र अर्थव्यवस्था अस्तित्वात असते. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खाजगी अशी दोन्ही क्षेत्र असतात. प्रत्येक क्षेत्राची व्याप्ती व मर्यादा सरकार्य धारेणानुसार निश्चित केली जाते. सार्वजनिक क्षेत्रामध्ये सरकारच्या मालकीचे उद्योग असतात तर खाजगी क्षेत्रामध्ये खाजगी उद्योजक आपले उद्योग स्थापन करतात भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर आपल्या देशात मिश्र अर्थव्यवस्थेचा अंगिकार करण्यात आला होता. डॉ. मनमोहन सिंग भारताचे अर्थमंत्री झाल्यानंतर पेशात मिश्र अर्थव्यवस्था विकसित करण्यात आली आणि उदारीकरणाच्या धोरणामुळे उद्योगांना मदत करण्यासाठी विविध प्रकारच्या सवलती प्रदान करण्यात आल्या. अशा रीतीने जून १९९१ पासून आपल्या देशाच्या अर्थकारणात सुधारणांचे एक नवे वर्ष सूरु झाले.




## २) नैसर्गिक संसाधन ( Natural Resources)

प्रत्येक उद्योगात विशिष्ट कच्चा मालाचा उपयोग करुन उत्पादनप्रक्रिया केल्या जातात. कच्चा मालाशिवाय उद्योगाची कल्पना करणेही संभवत नाही. उद्योगांना लागणाऱ्या कच्चा मालाचा पूरवठा हा नैसर्गिक संसाधनांच्या उपलब्धतेवर अवलंबून असतो जगातील काही देश विविध प्रकारच्या नैसर्गिक संसाधनांच्या उपलब्धतेबद्दल समृध्द असतात.

### ३) भांडवल

उद्योजकांजवळ पूरेसे भांडवल असल्याशिवाय तसेच व्यवसायाच्या गरजेनुसार हवे तेव्हा भांडवल मिळण्याची  खात्रीची व्यवस्था असल्याशिवाय कोणत्याही उद्योगाची स्थापना करणे संभवत नाही भांडवल हाच भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा आधार आहे.

### ४) मुलभूत सोयी ( Basic Facilities)

कोणत्याही प्रदेशात एखादया उद्योगाची स्थापना करण्यासाठी तेथे पाण्याची उपलब्धता, विजेची उपलब्धता, जलद व स्वस्त वाहतुकीची साधने , सस्ते, दळणवळणची व्यवस्था इ. मुलभूत सोयी उपलब्ध असणे आवश्यक  असते.

### ब) सामाजिक घटक ( Social Factors)

व्यवसाय पर्यावरणामधील आर्थिक घटकांचा उद्योजकतेवर थेट परिणाम होतो, तर सामाजिक पर्यावरणाचा किंवा सामाजिक घटकांचा उद्योजकतेवर अप्रत्यक्षपणे व सुक्ष्म स्वरुपात परिणाम होतो. सामाजिक घटक हया संज्ञेची व्याप्ती तशी मोठी आहे. पुढे नमुद केलेल्या सामाजिक घटकांचा उद्योजकतेच्या विकासावर कसा परिणाम होतो. याबद्दल तेथे विवेचन केले आहे.

१. धर्माच्या प्रति दृष्टीकोन
२. जातिव्यवस्था
३. सामाजिक बदल
४. सामाजिक गतिक्षमता
५. कुटुंब व्यस्था
६. शिक्षणप्रणाली

### क) राजकीय घटक ( Political Factors)

राजकीय पर्यावरण हा व्यावसायिक पर्यावरणाचा एक महत्वाचा भाग आहे. आधुनिक काळात राजकरणात समाजाच्या जीवनाची सर्व क्षेत्र व्यापली आहेत. राजकारण आणि अर्थकारण यामध्ये तर एका नाण्याच्या दोन बाजूइतका जवळचा संबंध प्रस्थापित झालेला आढळतो. त्यामुळेच उद्योजकांच्या प्रत्येक निर्णयावर प्रत्येक क्रियेवर व प्रत्येक व्यवहारावर राजकीय घटकांचा कधीही पूसला न जाणारा परिणाम झाल्याचे आढळून येते राजकीय घटक तशी व्यापक संज्ञा आहे. सर्वच राजकीय घटकांचा उद्योजकतेच्या विकासावर अनुकूल किंवा प्रतिकुल परिणाम घडून येतो. ते खालील आकृतीमध्ये दर्शविले आहे,

उद्योजकता
- राजकीय व्यवस्था
- राजकीय पक्षांचे तत्वज्ञान
- राजकीय नेतृत्व
- राजकीय शांतता
- राष्ट्रीय चारित्र्य
- कायदे

### ड) सांस्कृतिक घटक ( Cultural Factors)

उद्योजकता ही शेवटची एक वृत्ती असते. ही वृत्ती बरीचशी समाजातील काही करु शकणाऱ्या लोकांच्या मानसिकतेवर अवलंबून असते. समाजाचा सांस्कृतिक पोत व नागरिकांना स्वीकारलेली मुल्य व्यवस्था याचा लोकांच्या मानसिकतेवर निश्चित स्वरुपाचा परिणाम पडत असल्यामुळे, सांस्कृतिक घटक उद्योजकतेच्या विकासावर परिणाम घडवून आणतात हे मान्य करावे लागेल.

### इ) मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय घटक ( Psychological and Sociological Factors)

प्रत्येक समाजात उद्योजकतेची उत्पत्ती आणि विकास या प्रक्रियेवर अनेक प्रकारच्या घटकांचा सातत्याने प्रभाव पडतो. यापैकी कांही मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय घटक असतात. उद्योजकतेच्या विकासाला प्रभावित करणारे. हे घटक अनेकदा वेगळे काढता येत नाहीत. त्यामुळे मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय घटकांबद्दल अभ्यास यात येणे.

### ई) विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे घटक ( Science and Technology Factors)

विज्ञान किंवा शास्त्र आणि तंत्रज्ञान यांचेशी निगडीत असलेल्या सर्व बाबींना एकत्रितपणे हा व्यावसायिक पर्यावरणाचा एक महत्वाचा भाग आहे, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या पर्यावरणाचा उद्योजकतेच्या विकासावर निश्चितपणे व अत्यंत प्रकर्षाने परिणाम घडून येतो विज्ञानाचा प्रगती, उच्च दर्जाचे तंत्रज्ञान आणि उद्योजकतेच्या विकासाचा वेग यामध्ये धनात्मक स्वरुपाचा सहसबंध आहे. एखादया समाजात विज्ञानाची प्रगती जेवढी जास्त राहील तेवढी तेथे तंत्रज्ञानामध्ये व तंत्र विद्येमध्ये सुधारणा घडून येईल आणि त्याचा परिणाम होवून त्या समाजामध्ये उद्योजकतेची प्रवृत्ती वाढीला लागुन अर्थव्यवस्थेच्य सर्वच क्षेंत्राचा कार्याकल्प घडून देण्याला मदत होईल माणस समाजात विज्ञानाची प्रगती झालेली नसते. त्यामुळे या समाजात तंत्रज्ञान व तंत्रविद्येची प्रगती होणे संभवत नाही. परिणामतः अशा समाजात उद्योजकतेची प्रवृत्ती मुल धरु शकत नाही.

## ६.३ उद्योजकतेमधील संधी व अडथळे (Opportunities and Threats to Entrepreneurship)

अनेकदा उद्योजक योग्य व्यावसायिक संधीचा शोध घेतात, तज्ज्ञांची मदत घेऊन प्रकल्पाची शास्त्रशूध्द योजना तयार करतात. भांडवल मिळवितात उद्योगाकरिता आवश्यक असलेल्या संघटनेची उभारणी करतात. पण हे सर्व करुनही उद्योजकांचे प्रयत्न परिणामकाकर ठरत नाहीत. कांही उद्योजकांचे प्रकल्प आकार घेत नाहीत. हे उद्योजक आपली योजना राबविण्याचे प्रयत्न करतात. पण कांही काळानंतर त्यांचेवरही, योजना मध्येच सोडून देण्याचा प्रसंग येतो. कांही उद्योजकांच्या बाबतीत त्यांचे उद्योग स्थापन होतात, व्यवसाय करु लागतात. पण कांही काळानंतर हे उद्योग आजारी पडतात व तोटयात चालतात. कांही उद्योजकांना बऱ्याच काळापर्यंत नफा मिळतो. परंतू नंतर निरनिराळया कारणामुळे या उद्योगाचा कारभार अकार्यक्षम होतो. तोंटयाचे प्रमाण वाढत जाते व कालांतराने हे उद्योग कायमचे बंद पडतात.

बहुसंख्याक उद्योगांच्या जीवनातवर वर्णन केलेली पारीस्थिती अपरिहार्यपणे उत्पन्न होते कांही उद्योगांच्या बाबतीत या प्रकारची परिस्थिती लवकरच उत्पन्न होते, तर कांही उद्योगांच्या बाबतीत या प्रकारची परिस्थिती उशीरा उत्पन्न होते. उद्योगासाठीचा संधीचे वर्णन खालील प्रमाण करण्यात आहे.

१. नविन परवाना धोरण
२. परदेशी गुंतवणुक
३. परदेशी तंत्रज्ञान
४. आरंक्षण धोरण
५. खाजगीकरण धोरण
६. लघुउद्योगासाठी पोषक वातावरण.

बदलच्या वातावरणाचा फायदा / संधी वरील प्रमाण दर्शविण्यात आल्या आहेत. नवीन औद्योगिक धोरण उदारीकरण, जागतिकीकरण आणि खाजगीकरणावर जास्त भर देण्यात आला आहे. यामुळे प्रामुख्याने खालील निर्णय घेण्यात आले या निर्णयाचा फायदा उद्योग जगवास घेता येतो.

१. नविन परवाना धोरण यानूसार कांही उद्योग वगळून इतर उद्योगास परवाना घेण्याची आवश्यकता नाही. या संधीचा फायदा मोठे उद्योग व लघू – उद्योगांना विशेषा करुन झाला.

२. परदेशी गुंतवणूक धोरण परदेशी गुंतवणूक धोरण ३३% वरुन १००% वर आणण्यात आले यामुळे परदेशी भांडवलाच्या प्रमाणात वाढ होऊन उद्योजकतेस चालना मीळाली .

३. परदेशी तंत्रज्ञान परदेशी तंत्रज्ञानास परवाना देण्याचे धोरण निश्चित करण्यात झाल्यामुळे नविन आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात येवू लागला.

४. नविन आरक्षण धोरणानुसार शासकीय क्षेत्रासाठी ३७ वरुन फक्त तीन उद्योग वगळता सर्व क्षेत्र उद्योग खाजगी उद्योगांना खुले करण्यात आले.

५. खाजगीकरणाच्या धोरणामुळे खाजगी उद्योग क्षेत्रास चांगलेच प्रोत्साहन भेटले. ज्याप्रमाणे नविन धोरण फायदयाचे किंवा नविन संधी निर्माण करुन देणारे असले तरी काही नविन अडचणी नविन अडथळे निर्माण करुन देणारे आहे. खालीलप्रमाणे कांही अडथळे उद्योगास निर्माण होतात.

१) परदेशी गुंतवणूक धोरणाचा परिना भारतीय उद्योगावर झाला.
२) परदेशी तंत्रज्ञानामुळे भारतीय तंत्रज्ञानाचा ऱ्हास होत गेला.
३) नविन परवाना धोरणामुळे आणिक नविन स्पर्धाकांचा सहभाग झाला.
४) खाजगीकरणामुळे सार्वजनिक क्षेत्र तोटयामध्ये येण्याची शक्यता भेडसावते.

वरील प्रमाणे आणिक अडथळे नविन उद्योगास निर्माण होऊ लागले.

## ६.४ सामर्थ्य आणि कमजोरी (Strengths and Weabnesses)

उद्योगाच्या अंतर्गत घटकावर उद्योगाचे सामर्थ्य आणि उद्योगांची कमजोरी ठरत असते. उद्योगाचे सामर्थ्य हे उद्योगाचे गुण वैशिष्ट असून उद्योग यंशासाठी व फायदयासाठी ठराविक घटक परिणामकारक ठरतात.जसे

**सामर्थ्य**

- कार्यक्षम विपणन संशाधन
- कार्यक्षम प्रमोशन धोरण
- कार्यक्षम प्रेरणात्मक धोरण
- उच्च विपणन भाग
- चांगले उत्पादन
- व्यवसाय पत
- योग्य किंमत धोरण

**कमजोरी**

- कमी विक्री
- अकार्यक्षम धोरण
- अकार्यक्षम विक्रीते
- अकार्यक्षम किंमत धोरण
- अकार्यक्षम वितरण धोरण

## ६.५ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१) उद्योजकता वतावरणाचे घटक स्पष्ट करा.
२) उद्योजकतेची संधी व अडथळे स्पष्ट करा.
३) उद्योजकतेची कमजोरी व सामार्थ्य विशद करा.

❖❖❖❖

# ७

# जागेची निवड आणि मालकी
# (Location and Ownership)

**घटक रचना :**


७.१ प्रस्तावना

७.२ योग्य जागेच्या निवडीचे महत्व

७.३ जागा निवडीवर परिणाम करणारे घटक

७.४ जागेच्या निवडीची प्रक्रीया

७.५ मालकीचे विविध प्रकार

७.६ मालकीवर परिणाम करणारे घटक

७.७ स्वअध्ययनासाठी प्रश्न


## ७.१ प्रास्ताविक

उद्योगाची सुरुवात करण्यापूर्वी उद्योजकाने जो उद्योग सुरु करण्याचे निश्चीत केलेले आहे, त्या उद्योगासंबधी तपशील योग्य जागेची निवड करणे आवश्यक असते. उद्योगाची जागा निवड करणे हे उद्योजकाचे महत्वाचे कार्य व महत्वाचा निर्णय असतो. उद्योगासाठी जागेची निवड करीत असताना उद्योजकाने उद्योगासंबधी आणिक गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहेत जागा निवडीवर आणिक घटकांचा परिणाम घडत असतो. त्यामुळे जाग निवड करीत असताना उद्योजकाने विपणन संसाधन, साधन, मानव, संशाधन सोयी इत्यादी बाबींचा विचार करुन जागेची निवड करणे गरजेचे असते.

## ७.२ योग्य जागेच्या निवडीचे महत्व ( Importance of suitable location)

योग्य जागेची निवड हा व्यवस्थापण व उद्योजकांचा एक महत्वाचा निर्णय असते योग्य जागेच्या निवडीमुळे खालील प्रमाणे महत्व स्पष्ट करण्यात आले आहे.

१. उत्पादन विक्री वाढ
२. उत्पादन खर्चात घट
३. स्पर्धाक्षमता
४. पतनिर्मीती
५. गुंतवणूक खर्च निश्चिती
६. विकास आणि वाढ
७. ग्राहकांचे समाधान
८. कर्मचारी सुवीधा

वरीलप्रमाणे योग्य जागेच्या निवडीचे महत्व स्पष्ट करण्यात आले आहे.

१ योग्य जागेची निवड केल्यामुळे विक्री मध्ये वाढ होऊन नफा वाढतो.

२ योग्य जागेच्या निवडीमुळे उत्पादन खर्चामध्ये घट होऊन उपभोक्त्यांचे समाधान करता येते.

३ उद्योगाची उभारणी योग्य जागेत करण्यात आल्यास उद्योजक कोणत्याही प्रकारच्या स्पर्धकाच्या परीस्थितीमध्ये टिकुन राहू शकतो.

४ योग्य जागेची निवडीमुळे व्यवसायाची पत निर्मीती तयार होते व वसायाची पत निर्मिती करता येते.

५ योग्य जागेच्या निवडीमुळे एकुण गुंतवणूक खर्च निश्चित करता येतो.

६ उद्योगाचा विकास आणि पाठ करणे शक्य होते.

## ७.३ जागा निवडीवर परिणाम करणारे घटक (Factors Influencing location)

जागेची निवड हा एक महत्वाचा व अतिशय क्लिपट असा निर्णय असून जागेच्या निवडीवर आंतर्गत व बहिर्गत अशा दोन्ही प्रकारचे घटक परिणाम करतात साधारणपणे जागेच्या निवडीवर खालील घटक परीणाम करतात.

१. जागेची निवड करताना त्या ठिकाणाची कायदा व्यवस्था यांचा परीणाम होतो.
२. जागेची निवड करताना प्रामुख्याने जागेच्या सोयीसुविधा उपलब्धतेच्या विचार करणे आवश्यक असते.
३. जागा निवड करताना मनुष्य बळ उपलब्धतेचा परीणाम घडून येतो.
४. योग्य व्यवस्थापनाचा व नियंत्रणाचा जागेवर परिणाम घडून येतो.
५. सामाजिक वातावरणाचा परिणाम जागा निवडीवर परिणाम घडून येतो.
६. सुरक्षीतता उपलब्धतेचा परीणाम जागेवर निर्माण होत असतो.

## ७. ४ जागेची निवड प्रक्रिया

जागेची निवड प्रक्रिया पुढील प्रमाणे निश्चित करता येते.

राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय जागेबाबतचा निर्णय

↓

विभागाची निवड

↓

ठिकाणाची निवड

↓

निश्चित स्थळाची निवड

उद्योजकाने जागेची निवड करीत असताना उद्योग कोणत्या पातळीवर सुरुवात करावयाचा आहे, हे निश्चित करणे आवश्यक आहे. उद्योग राष्ट्रीय पातळीवर की आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरुवात करावयाचा आहे, यांचा निर्णय घेणे आवश्यक आहे. देशाची निवड झाल्यांनतर दुसरी पायरी म्हणजे त्या देशात कोणत्या (रीजन) विभागामध्ये व्यवसाय सुरु करणे योग्य ठरेल. कोणत्या विभागात उद्योग यशस्वी ठरेल याची निश्चित करणे आवश्यक आहे, जागेच्या निवडीची तीसरी पायरी म्हणजे निश्चित करण्यात आलेल्या विभागामध्ये निश्चित स्थळ / ठिकाणाची निवड करणे व योग्य ठिकाण निवडणे आवश्यक असते. जागा निवडीची शेवटची पायरी म्हणजे निश्चित स्थळाची निवड करणे होय जागेचा आकार क्षेत्र जागेची निश्चिती जागा वावतचे वातावरण इत्यादी बाबत निश्चिती करणे आवश्यक आहे.

जागा निवड हे अत्यंत महत्वाचे निर्णय आहे. आणि यासाठी उद्योजकांना निश्चित करणे गरजेचे आहे.

## ७.५ मालकीचे विविध प्रकार (Types of Ownership)

प्रामुख्याने मालकीचे दोन प्रकारामध्ये विभागण्यात आलेली आहे, ती खालील तक्त्यावरुन स्पष्ट होईल.

मालकीचे प्रकार

- खाजगी मालकी
  - व्यक्तिगत मालकी
  - सामुहिक मालकी
    - भागीदारी संस्था
    - सहकारी संस्था
    - संयुक्त भांडवल
- सार्वजनिक मालकी
  - सहकारी खाते
  - सहकारी कंपनी
  - शासकीय महामंडळे

### अ) एकल मालकी संस्था

या प्रकारात व्यवसायाची मालकी व्यवस्थापन नियत्रंण व नफ्या- तोटयाची जोखीम एकटया व्यक्तीची असते. उद्योजक स्वतःचे भांडवल वापरुन व्यवसाय उभारतो अथवा स्वतःच्या वैयक्तिक जबाबदारीवर कर्ज - भांडवल उभारतो. व्यवसायाचे व्यवस्थापन व नियंत्रण स्वतःच्या निर्णयानुसार करतो आणि नफ्या – तोटयांची अमर्याद जबाबदारी स्वीकारता या संघटन प्रकारात व्यवसायाला मालकापासून स्वतंत्र असे अस्तित्व नसते. तोटा भरुन काठण्यासाठी उद्योजकाची खाजगी मालमत्ता देखील जप्त केली जाऊ शकते थोडक्यात, मालकी संस्थेचे स्वरुप एकपात्री नाटकासारखे असते.

### ब) भागीदारी संस्था

काही व्यक्ती एकच व्यवसाय उभारण्यासाठी एका येतात भांडवल संघटन व व्यवस्थापन कौशल्य सामुदा टिकवणे व्यवसायात आणतात व व्यवसायाची मातकी आपापसात

कराराने ठरवतात. या संयुक्त व्यवसायात ते आपल्या आवडीप्रमाणे व पात्रतेप्रमाणे कामे वाटून घेतात. भारतात भागीदारी कायद्याप्रमाणे भागीदारी ही दोन किंवा दोनपेक्षा जास्त लोकांनी एकत्र येऊन धंदा, व्यापार किंवा व्यवसायासाठी आणि ठरविल्याप्रमाणे त्यातून उत्पन्न होणारा नफा किंवा तोटा वाटून घेण्यासाठी करण्यात येते. भागीदारीसाठी किमान संख्या दोन असून जास्तीत जास्त २० आहे. करार तोंडी किंवा लेखी असू शकतो. पण सर्वसाधारणपणे करार लेख स्वरुपात असतो. तेव्हा त्यास भागीदारीचे करारपत्र असे म्हणतात.

## क) संयुक्त भांडवल प्रमंडळ

औद्योगिक क्रांतीनंतर व्यवसायाच्या भांडवलविषयक गरजा वाढल्या याची प्रमुख्य कारणे म्हणजे मोठया – प्रमाणावरील उत्पादन विस्तारणाऱ्या बाजारपेठा आणि वाठती स्पर्धा ही होती. मालकी संस्था किंवा भागीदारी संस्था यांची भांडवल उभारणीची क्षमता मर्यादीत असते तसेच या व्यवसायातील मालकाची जबाबदारी अमर्यादित असते. त्यामुळे त्यांच्या व्यवसायावर काही मर्यादा पडतात या मर्यादा दूर करण्याच्या हेतूने १९व्या शतकांच्या उत्तरार्धात संयुक्त भांडवल प्रमंडळ हा संघटना प्रकार अस्तित्वात आला. संयुक्त भांडवल प्रमंडळ ही नोंदणी झालेली संस्था असते व तिला कायद्याने  स्वतंत्र, कृत्रिम अस्तित्व प्राप्त होते, कंपनीला स्वतःचा शिक्का असतो व तिचे अस्तित्व दिर्घकाळ टिकणारे असते.

प्रकल्पाचा आवाका प्रचंड असेल आणि जेव्हा अबेकांच्या सहभागाची गरज आहे, असे वाटते तेव्हा खासगी मर्यादीत किंवा सार्वजनिक मर्यादित कंपनी काढता येते. खाजगी मर्यादीत कंपनीत २ व जास्तीत जास्त ५० गुंतवणूकदार लागतात. जास्तीत जास्त लोकांच्या संख्येवर बंधन नाही. अशा प्रकारच्या संस्था स्थापन करताना अनेक कागदपत्रे तयार करावी लागतात. हया घटनापत्रक आणि नियमावली यांना विशेष महत्व असते संयुक्त भांडवल प्रमंडळाची ठळक वैशिष्टये पूढील प्रमाणे सांगता येतील.

१. नोंदविलेली ऐच्छिक संघटना
२. कायदेशीर स्वतंत्र व्यक्तिमत्व
३. सातत्यपूर्ण किंव चिरतर स्थायी अस्तित्व
४. सर्वसामान्य मुद्रा किंवा बोधचिन्हे
५. भाग विकुन भांडवल उभारणी
६. भागधारक हेच सभासद
७. सभासदांची मर्यादित जबाबदारी
८. मालकी आणि व्यवस्थाबाबत फरक
९. लोकशाहीत्व
१०.कायदेशीर बंधने

## ड) सहकारी संस्था

सहकारी संस्थेची व्याख्या पुढील प्रमाणे आहे, आपल्या हिताच्या उन्नतीसाठी स्वेच्छेने व समानतेच्या भावनेने संघटित होणाऱ्या व्यक्तींचे संघटन म्हणजे सहकार ज्या व्यक्तीकडे पूरेसे भांडवल नसते परंतू त्यांना आर्थिक लाभासाठी व्यवसायात सहभागी व्हायचे असते असे सभासद एकत्र येऊन सहकारी कायद्याखात्री सहाकरी संस्था नोंदवू शकतात. व्यावसायिक साहस आणि सहभाग यासाठी ही एक प्रकारची सांधिक उद्योजकता म्हणावी लागेल सहकारी संस्था किमान

आकरा लोंकाना घेऊन सुरु करता येते. जे सभासद अशा सहकारी संस्थेचे सभासद होऊ इच्छितात ते शक्यतो एकाच उद्योगाचे असणे आवश्यक असते. सभासदांच्या कमाल संख्येवर बंधन नाही सहकारी संघटने बाबत घटनात्मक आणि नियमावली ही महत्वाची कागदपत्रे आहेत. प्रत्येक संस्थेचे उपविधी असतात. परस्पर सहकार्याचे उद्दिष्ट सेवा हेतू अत्यल्प भागमुल्य खळे सभासदत्व, लोकशाही कारभार अशी सहकार या संघटन प्रकारची ठळक वैशिष्टय सांगता येतील.

## ७.६ मालकीवर परिणाम करणारे घटक (Factors Responsible for the choice of ownship pattern)

वरील विवेचनावरुन संघटन प्रकारची निवड हा उद्योजकाचे दृष्टीने एक अत्यंत महत्वाचा प्रश्न असतो हे सिध्द होते. मालकीच्या कायदेशीर तरतूदीनुसार संघटन प्रकारची निवड हा एक भाग झाला. परंतू स्वीकारलेला संघटन प्रकार हा गरजेनुरुप आणि परिस्थितीजन्य करा राहील हे पाहणे उद्योजकाचे काम आह, प्रत्येक प्रकाराचे गुण – दोष आहेत. भारतात एकल मालकी संस्था आणि कौटुंबिक प्रभावाखालील भागीदारी संस्था हे लोकप्रिय प्रकार आहेत. भांडवलाची वाढती गरज भागविण्यासाठी संयुक्त भांडवली प्रमंडळ या प्रकाराकडे उद्योजक वळतात. जागतिकीकरण २०

## ७.७ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१) जागेच्या निवडीचे महत्त्व स्पष्ट करा.
२) जागा निवडीवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा
३) जागा निवडीची प्रक्रिया विषद करा.
४) मालकीचे विविध प्रकार लिहा.

❖❖❖❖

# ८

# उद्योजकतेच्या पध्दती
## (Entreprenerial Models)

**घटक रचना :**

८.१ प्रस्तावना
८.२ नविन कल्पनेचा शोध
८.३ व्यवसाय नियोजन
८.३.१ विपणन नियोजन
८.३.२ वित्त नियोजन
८.३.३ संघटन नियोजन
८.४ उद्योजकता पद्धती
८.४.१ फ्रांचाझीज (अधिकार प्रदान पद्धती)
८.४.२ बी.पी.ओ. (Business Process outsouring)
८.४.३ के.पी.ओ. (Knowledge process outsourcing)
८.५ नविन व्यवसाय सुरू करण्याच्या पद्धती
८.६ स्वअध्ययनासाठी प्रश्न

## ८.१ प्रास्ताविक

उद्योजक सातत्याने नविन उद्योगाच्या शोधात असतो. उद्योजकाने ठरविलेल्या कल्पना अमलात आणण्याकरिता त्यास योग्य पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असते. आर्थिक दृष्टीने प्रबळ असणाऱ्या उद्योजकास कोणत्याच प्रकारचा प्रश्न समोर उद्‌भवत नाही.

## ८.२ नविन कल्पनेचा शोध

उद्योजक हा नवीन वस्तू, नविन बाजारपेठ, नविन उत्पादन पद्धती म्हणजेच जो सतत नविन उद्योग नविन कल्पना, याच्या विचारात असतो. उद्योगाच्या नव-नविन कल्पना करणे, उत्पादनाबाबत नविन कल्पना करणे, उत्पादनाबाबत नविन प्रक्रिया शोधणे किंवा एकदम नविन

वस्तूंचा शोध घेणे इत्यादी विषयी सातत्याने चिकाटी व जिज्ञासा अंगी बाळगणे हे उद्योजकाच्या अंगी असलेले गुण आहेत. उद्योजक हा नेहमी नविन्याच्या शोधात असतो. उद्योजक सतत नविन कल्पनेच्या शोधात असतो. उद्योजकाला खालील विविध मार्गाने नविन कल्पनेचा शोध घेता येतो.

**१) ग्राहक संशोधन कार्यक्रम :** ग्राहक संशोधन कार्यक्रमापासून ग्राहकांच्या आवडी, ग्राहकांच्या गरजा, ग्राहकांच्या राहणीमान, ग्राहकांची आर्थिक स्थिती याचा अभ्यास उद्योजकास करता येतो व त्यातून नविन कल्पनेचा शोध घेणे शक्य होते. ग्रामीण ग्राहक व शहरी ग्राहक, शिक्षीत ग्राहक व अशिक्षित ग्राहक, स्त्री किंवा पुरुष, आर्थिक दृष्ट्या मागास किंवा श्रीमंत ग्राहक, मजूर, नोकरदार अधिकारी, वकील, डॉक्टर, बालक, वृद्ध, गरीब इत्यादी प्रत्येकांच्या आवडी-निवडी गरजा, राहणीमान, उत्पन्न वेगवेगळे असते. ह्याचप्रमाणे ग्राहकांचा एखाद्या वस्तूवर असलेला विश्वास, ग्राहकांच्या मनावरील उत्पादकांची पकड इत्यादी बाबींचा यावर परिणाम दिसून येते.

**२) कर्मचारी वर्ग :** नविन कल्पनेचा दुसरा मार्ग म्हणजे कर्मचारी वर्ग होय. वस्तू व वस्तू उत्पदनाशी सर्वात जवळचा संबंध व माहिती असणारा वर्ग कर्मचारी वर्ग होय. कर्मचारी वर्ग हा वस्तूच्या प्रत्येक प्रक्रीयेशी जवळून ओळखतो उदाहरणार्थ वस्तू उत्पादन, वस्तू वितरण, वस्तू विपणन इ. याकरीता उद्योजकांनी नवीन कल्पनेचा शोध घेतात, कर्मचारी वर्गाची मते जाणून घेणे गरजेचे असते.

**३) स्पर्धक व वितरक :** उद्योजकाला नविन कल्पनेचा शोध घेणे करिता महत्त्वाची भूमिका बजावणारे व्यक्ती म्हणजे स्पर्धक आणि वितरक होय. स्पर्धक प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे वस्तूच्या वैशिष्ट्यांची किंवा गरजेची, विक्रीची, मागणीची माहिती स्पष्ट करतो त्याचप्रमाणे वितरक वर्ग नविन किंवा जुन्या वस्तूच्या विक्रीबाबत वितरणाबाबत, गुणधर्मीबाबत परीपूर्ण ज्ञान असते. उद्योजक नविन उद्योगांची कल्पना किंवा शोध करताना या वितरक व स्पर्धकांचे मत घेऊ शकतो.

**४)** तज्ञव्यक्ति किंवा शासन उद्योग व्यवसायाची निवड करण्यासाठी उद्योजक तज्ञ व्यक्तीचा सावला घेऊ शकतो. तज्ञ व्यक्तिशी सल्ला मसलत करून उद्योजक नविन कल्पनांचा शोध लावू शकतो. त्याच प्रमाणे शासन यंत्रणा उदा. उद्योजकता विकास केंद्र, उद्योजकता शिक्षण व प्रशिक्षण इत्यादी शासकीय कार्यालयातून उद्योगासंदर्भात भरपूर माहिती मिळू शकते.

**५) स्वअध्यन :** स्वतःच्या कल्पना, स्वतःचे विचार हे अत्यंत महत्त्वाचे असतात. झसे ऐकावे जनाचे करावे मनाचे. जो उद्योग जरी कल्पना उद्योजकास स्वतःसाठी योग्य वाटते. त्या उद्योगाचे प्रत्यक्षात उतरवणे, स्थापना करणे, गरजेचे असते. स्वअध्ययन पद्धतीमधये खालील बाबींचा परिणाम दिसून येतो.

१) स्वतःला असलेले झाला
२) उद्योजकाचा अनुभव
३) उद्योजकाचे इतराशी असलेले संबंध
४) उद्योजकाची पात्रता
५) उद्योजकाची निर्णय क्षमता
६) उद्योजकांची कल्पक क्षमता इ.

## ८.३ व्यवसाय नियोजन (Business plane)

व्यवसाय नियोजन ही व्यवसाय संकल्पना किंवा योग्य व्यवसायाची निवड केल्यानंतरची प्रक्रीया आहे. व्यवसाय नियोजनामध्ये प्रामुख्याने विपणन विषयक नियोजन वित्त नियोजन, उत्पादन नियोजन आणि संघटन नियोजन प्रक्रिया असते. याचे सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

१. विपणन नियोजन (Makerting plan)
२. उत्पादन नियोजन (Production plan)
३. वित्त नियोजन (Financial plan)
४. संघटन नियोजन (Organizational plan)

### १. विपणन नियोजन (Makerting plan):

विपणन प्रक्रियेला व्यवसायामध्ये सर्वात जास्त महत्त्व आहे. ज्या व्यवसायाची विपणन निती प्रभावी असते तो उद्योग नेहमीच यशस्वी ठरतो. विपणन नियोजन प्रक्रियेमध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

१. बाजारपेठेचे नियोजन
२. वस्तुमूल्य नियोजन
३. वस्तू वितरण नियोजन
४. विक्रीवृद्धी नियोजन
५. उदार विक्री धोरण
६. विक्री-नंतर सेवा धोरण
७. पब्लीसिटी बाबत धोरण
८. जाहिरात संबंधीचे धोरण
९. योग्य मध्यतेबाबतचे धोरण
१०. स्पर्धकांबाबत संशोधन
११. ग्राहकाबाबतचे शोधन
१२. योग्य बाजारपेठेची निवड
१३. स्पर्धकाचे किंमत धोरण व वस्तूची किंमत यातील फरक
१४. स्पर्धा व परदेशी उद्योगांचा अभ्यास
१५. व्यावसायिक विपणन वातावरणाचा अभ्यास

इत्यादी गोष्टींचा अभ्यास करून विपणन नियोजन करण्यात येते.

वस्तूचे मुल्य निर्धारण निती ठरविताना वस्तूची मागणी, स्पर्धकांच्या वस्तूची किंमत, शासन निर्णय इत्यादी बाबींचा पूर्णपणे अभ्यास करून उद्योजक वस्तूची किंमत धोरण ठरवित असतो. वस्तूची किंमत धोरण ठरवित असताना वस्तू उत्पादनासाठी येणारा एकूण खर्च याचा विचार करण्यात येतो.

वितरण धोरण निश्चित करताना आधुनिक वितरण पद्धतीचा विचार करून वितरण धोरण ठरवावे. विस्क किंवा मध्यस्थ हे जर प्रभावी व कार्यक्षम म्हणजेच वस्तूची विक्री योग्य वेळी करणेस कार्यक्षम असतील. थरच त्या वितरकांचा अर्थात मध्यस्थांचा व्यवसायाला फायदा होतो.

### २. उत्पादन नियोजन (Production plan):

उत्पादन नियोजन ही एक व्यवसायाची प्रथम व महत्त्वाची नियोजन प्रक्रिया असून वस्तूचे उत्पादन किती प्रमाणात कोणत्या पद्धतीचे इत्यादी बाबींचे नियोजन करणे आवश्यक आहे. उत्पादन नियोजनात वस्तूच्या दर्जा बाबत नियोजन, वस्तूचा रंग, वस्तूचा आकार, वस्तूचे गुणधर्म, वस्तूचे नाव, वस्तू उत्पादन प्रक्रीया, कच्च्या सामग्रीचे नियोजन इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यात येतो.

### ३. वित्त नियोजन (Financial plan):

वित्त नियोजन आर्थिक दृष्टीने खूप महत्त्वाची प्रक्रीया आहे. व्यवसायासाठी लागणारे एकूण भांडवल व त्या भांडवलाचे नियोजन व त्याचे विनीयोजन या दोन्ही बाबी महत्त्वाचे आहेत. भांडवल नियोजनात स्वतःचे भांडवल किंवा कर्जावू भांडवल, भाग भांडवल किंवा कर्जरोखेद्वारे उभारण्यात येणारे भांडवल नफ्यांचे भांडवलीकरण की व्यवसाय अनामत भांडवल इत्यादी बाबींचे व्यवस्थीत पद्धतीने नियोजन करणे महत्त्वाचे आहे. व्यवसायासाठी लागणाऱ्या भांडवलाची उभारणी झाल्यानंतर त्या भांडवलाचे विनियोजन करणे कसरत असते. कोणते भांडवल कोणत्या कारणासाठी वापरण्यात येते. कोणते भांडवल कशा पद्धतीने गुंतवणूक करावे याबाबत उद्योजकाला अभ्यास असला पाहिजे व त्याचे योग्य नियोजन असणे आवश्यक आहे. भांडवली गुंतवणुक दिर्घ किंवा अल्प मुदतीसाठी करण्यात येऊ शकते. अल्प मुदती भांडवल किंवा स्पिट भांडवल असे संबोधण्यात येते.

### ४. संघटन नियोजन (Organizational plan):

आवश्यक संसाधनाची जुळवाजुळव करून व्यवसायाची प्रत्यक्षात उभारणी करण्याच्या प्रक्रीयेस व्यवसाय संघटन असे म्हणतात. प्रभावी व्यवसाय संघटन हे योग्य नियोजनाचे प्रतिक आहे. उपलब्ध संसाधन पैसा, मनुष्यबळ, इमारत, उपस्कर इत्यादीचे योग्य नियोजन करण्याच्या प्रक्रीयेस संघटन नियोजन असे म्हणतात.

### ५) मानव संसाधन नियोजन (Human Resource plan)

व्यवसायिक यश प्राप्त करणेसाठी मानव संसाधनाचे योग्य नियोजन करणे आवश्यक असते. यात कर्मचारी निवड, नेमणूक, मुलाखत, प्रशिक्षण, मुल्यमापन इत्यादी बाबींचा विचार करण्यात येतो व त्याचे योग्य नियोजन करण्यात येते. योग्य जागी योग्य माणसाची निवड करणे हे मानव संसाधनाचे प्रमुख उदिष्ट असते. अर्थात अधिकाराचे हस्तांतरण व जबाबदारी ठरविणे ही पण मानव संसाधन नियोजनाचा एक भाग आहे. तक्रार निवारण व व्यवस्थापण पद्धती योग्य पद्धतीने हताळणे गरजेचे असते.

## ८.४ उद्योजकता पद्धती (Entreprenerial Models)

प्रामुख्याने उद्योजकतेच्या अनेक पद्धती आहेत. त्याच प्रमाणे उद्योजकता मालकीच्या पण विविध पद्धती आहे. एकलव्यापारी, भागीदारी किंवा कंटाणी पद्धतीचा आपण या अगोदर

अभ्यास केलेला आहे व या पारंपारिक पद्धती आहे. उद्योजकता पद्धतीमध्ये खालील आधुनिक पद्धतीचा आवलंब करण्यात येतो. जसे-

८.४.१ फ्रांचाझीज (अधिकार प्रदान पद्धती)
८.४.२ बी.पी.ओ. (Business Process outsouring)
८.४.३ के.पी.ओ. (Knowledge process outsourcing)

### ८.४.१ फ्रांचाझीज (अधिकार प्रदान पद्धती):

फ्रांचायझी ही एक उद्योगाची आधुनीक पद्धती आहे. फ्रांचायझी हा एक दोन पार्टीमधील करार असून दोन व्यक्ती करारास कायदेशीरित्या बांधीत असतात. फ्रांचायझी एक अधिकार प्रदान करण्याची पद्धत आहे व त्याच्या बदल्यात अधिकार प्रदान करणारी व्यक्ति/व्यवसाय/कंपनी मोबदला अकारीत असते. अर्थात फ्रांचायझी म्हटजे दोन व्यक्ती किंवा दोन व्यवसाय यामधील व्यावसायिक किंवा आर्थिक अधिकाराचे विशिष्ट मोबदल्याच्या बदल्यात, करण्यात येणाऱ्या हस्तांतरणाचा दिर्घकालीन ठराव होय.

फ्रांचायझीची कांडी वैशिष्टे पुढील प्रमाणे सांगता येतील-

१) फ्रांचायझी हा कायदेशीर करार आहे.
२) फ्रांचायझी हा दिर्घमुदती ठराव आहे.
३) फ्रांचायझीमध्ये व्यवसायाचे मोबदल्याच्या बदल्यात करण्यात येणारे हस्तांतरण होय.
४) या पद्धतीमध्ये दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्ति/व्यवसायाचा समावेश असतो.

**फायदे :** फ्रांचायझीचे फायदे हस्तांतरण कर्ता आणि अधिकार धारण कर्ता अशा दोन्ही व्यक्तिस मिळतात. एखाद्या नामांकीत व्यवसायाशी करार करून त्या व्यवसायाचे नाव, उत्पादन पद्धती, संसाधन इत्यादींचा वापर करून व्यवसाय करणे व्यवस्थापन करणे हस्तातरण धारणकर्त्यास सोपे व फादेशीर असते. जास्त कष्ट न करता उद्योग चालू करता येऊ शकतो. अधिकार हस्तांतरण कर्तास, आणि वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या व्यवसायाचे व्यवस्थापण करणेस अतिशय अवघड असते. त्यामुळे अधिकाराचे हस्तांतरण करून त्यास योग्य मोबदला मिळतो.

### ८.४.२ बाह्यस्त्रोत प्रक्रिया व्यवसाय पद्धती(Business Process outsouring):

बदलत्या व्यावसायिक वातावरण आणि बदलती धोरणे व नीती यामधून अनेक व्यवसायाला लहानातून मोठे होणे व्यवसायाचा विस्तार करणे आणि व्यवसाय प्रक्रीयेशी निगडीत असलेली सेवा किंवा वस्तूचे बाह्य उद्योजकाकडून तयार करून घेणे/मागणी करून घेणे ही पद्धत आधुनिक काळात अस्तीत्वात आली. यामध्ये दोन उद्योग किंवा दोन पेक्षा जास्त उद्योग एकाच वस्तू उत्पादनाशी निगडीत असतात किंवा सेवेशी निगडीत असतात. थोडक्यात बी.पी.ओ. म्हणजे दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यवसायामधील दिर्घ किंवा अल्प मुदतीत बरेच किंवा वस्तूचे एका उद्योगाकडून दुसऱ्या पूरक उद्योगांना पुरवठा करण्याचा ठराव होय. भारतीय बँका, विदेशी बँक, भारतीय उद्योग या पद्धतीचा आवलंब करतात. याची वैशिष्टे थोडक्यात खालील प्रमाणे स्पष्ट केलेली आहेत.

**वैशिष्ट्ये :**

१) ही एक सहाय्यक व्यवसाय पद्धती आहे.

२) व्यवसायाशी आवश्यक असणारी वस्तू किंवा सेवेचे बाह्य उद्योगाकडून पूर्तता करून घेणे म्हणजेच बी.पी.ओ.

३) हा अल्प किंवा दिर्घ कालीन करार आहे.

४) यामध्ये विशिष्ट मोबदल्याच्या बदल्यात फक्त विशिष्ट उद्योगाशीच व्यापार करण्यात येतो.

### ८.४.३ माहितीचे बाह्यस्त्रोत प्रक्रीया पद्धती (Knowledge process outsourcing):

ही आधुनिक व जागतिक व्यापार पद्धतीतील प्रक्रीया आहे. जगामध्ये अनेक व्यवसाय किंवा व्यवसायिक आहेत की ज्यांना नवीन माहितीची सातत्याने आवश्यकता असते. उदा. औषेधी उद्योग, संगणक, कृषीउद्योग इत्यादी उद्योजकांना स्वतः माहितीचे संकलन करणे शक्य नसते. परंतु माहिती पुरवठा करणाऱ्या बाह्य उद्योगांचे सकार्य असे उद्योग घेतात व आपली गरज पूर्ण करतात. माहितीचे बाह्यस्त्रोत प्रक्रिया पद्धती म्हणजे दोन किंवा दोनपेक्षा जास्त उद्योगामधील माहितीचा पुरवठा करणे संदर्भातील करण्यात येणारा करार होय.

## ८.५ नविन व्यवसाय सुरू करण्याच्या पद्धती

उद्योजकाला एखादा उद्योग सुरू करणेसाठी कोणत्या विशिष्ट पद्धतीचा आवलंब करावा असे कोणतेही बंधन नाही. परंतु उद्योजकांनी एका विशिष्ट पद्धतीचा आवलंब करणे. उद्योजकाच्या दृष्टीने योग्य असते. उद्योजकांनी उद्योग स्थापन करताना खालील पद्धतीचा अवलंब करावा.

**अ) व्यवसाय पूर्व प्रक्रिया :**

यामध्ये उद्योजकांनी व्यवसाय चालू करणेसाठी आवश्यक असणारी कायदेशीर प्रक्रिया, नोंदणी प्रक्रीया, माहिती, व्यवसाय आराखडा, प्रकल्प अहवाल, भाडे करार इत्यादी बाबींची पूर्तता करणे आवश्यक असते.

**ब) संसाधनाचे नियोजन :**

व्यवसाय चालू करणेच्या दुसऱ्या प्रक्रिया पद्धतीमध्ये

## ८.६ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१. नविन कल्पना शोधुन काढण्याचे विविध मार्ग सांगा.

२. व्यवसाय नियोजन म्हणजे काय ? व्यवसाय नियोजनाचे घटक स्पष्ट करा.

३. टिपा लिहा.

अ) अधिकार प्रदान पध्दती

ब) बाह्यस्त्रोत प्रक्रिया व्यवसाय पध्दती

❖❖❖❖

# १

# प्रकल्प नियोजन

**घटक रचना :**

१.१ प्रस्ताविक
१.२ प्रकल्प व्याख्या व व्याप्ती
१.३ प्रकल्प अहवालाचे महत्त्व
१.४ प्रकल्प अहवालाचे घटक
१.५ प्रकल्प अहवालातील महत्त्वाचे टप्पे
१.६ प्रकल्प अहवालाचा नमुना
१.७ स्वअध्ययनासाठी प्रश्न

## १.१ प्रस्ताविक

स्वतंत्रपणे एखादा उद्योग सुरू करण्यासंदर्भात जेव्हा निर्णय घेतला जातो. तेव्हा सर्वप्रथम विशाल अशा उद्योग, व्यापार विश्वातील घटकांचा अभ्यास करावा लागतो. विविध उपक्रमाचा पर्यायी उद्योग संधीचा पूर्ण विचार केला जातो. उद्योग समुहाचा नाही मात्र दृष्टीकोन असेल आणि कोणताही अभ्यास न करता स्थापित केला तर त्याद्वारे फक्त नुकसान मिळू शकते असे होऊ नये म्हणून विविध उद्योग समुहाची माहिती शास्त्रीय दृष्टीकोनात्मक अभाव आपल्या जवळ असलेला कौशल्य शिक्षण व अवांतर ज्ञान याचाही अभ्यास महत्त्वपूर्ण असतो. उद्योग संधीची ओळख आणि निवड या माध्यमातून यशस्वी असेल तर त्यासाठी प्रकल्प व्यवस्थापनाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. कोणताही उद्योग स्थापित करत असताना भक्कम इच्छाशक्ती आवश्यक असते. मात्र केवळ त्या आधारावर यश मिळवता येत नाही. आधुनिक युगात यशस्वी उद्योजकाजवळ शास्त्रशुद्ध पद्धतीची व त्यामार्गाने जाण्याची गरज असते. प्रकल्प म्हणजे काय त्याची गरज काय याबाबतची माहिती आवश्यक असते.

## १.२ प्रकल्प व्याख्या व व्याप्ती

विविध औद्योगिक वस्तू व सेवा यांची जनतेमधील गरज भागविण्यासाठी आवश्यक ते उत्पादन व सेवा, यासाठी करावी लागणारी भांडवली गुंतवणूक योजना म्हणजे प्रकल्प होय.

ज्या वस्तूचे उत्पादन करायचे आहे त्या प्रकल्पाचे सविस्तर लेखी स्वरूपात नियोजनबद्ध केलेले विश्लेषण म्हणजे प्रकल्प होय.

"तांत्रिक दृष्टीने सविस्तर केलेले लेखी नियोजन म्हणजे प्रकल्प अहवाल होय."

हेन्री फयाल यांचे मते प्रकल्पास उपलब्ध असलेल्या व्यावसायकि संधीचा विचार करून त्यांची प्रत्यक्ष कार्यवाही करण्यापूर्वी त्याच्या व्यावहारिक व तांत्रिक बाबीसंबंधी निर्देशन करणारा आराखडा म्हणजे प्रकल्प अहवाल.

वरील व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, जेव्हा एखाद्या उद्योजक एखाद्या उपक्रमाचा विचार करतो, तेव्हा उत्पादन पूर्व योजना तयार करावी लागते. ज्यात माहितीचे पृथ्थःकरण, मुल्यमापन, विश्लेषण व मिळू शकणारा लाभ याविषयी शास्त्रीय पद्धतीने स्वतंत्रपणे तंज्ञाच्या माध्यमातून विश्लेषण केलेले असते थोडक्यात प्रकल्प अहवाल म्हणजे उपक्रमाची परिपूर्ण योजना होय. कारण कोणताही प्रकल्प असेल त्यासाठी नियोजीत जागा, नियोजीत खर्च, श्रमाची आवश्यकता, उत्पादन पद्धती, बाजारपेठेची निश्चिती, अपेक्षित ग्राहक, प्रत्यक्ष उत्पादनाचा कालावधी व उत्पादन दर्जा याबाबत निश्चिती होणे आवश्यक असते. याच सगळ्या गोष्टींचा प्रकल्प अहवालात समावेश असतो. असा अहवाल तयार करतांना प्रथमतः उपक्रमाची उद्दिष्टे निश्चित असावी लागते. आपले लक्ष्य काय? यानुसार प्रकल्पाचा आराखडा, संघटनात्मक नियोजन आणि प्रत्यक्ष आखणी याचा विचार करावा लागतो.

वरील विश्लेषणावरून औद्योगिक प्रकल्प तयार करताना शास्त्रीय दृष्टीकोन व परिपूर्ण प्रकल्प अहवाल महत्त्वपूर्ण ठरतो.

## १.३ प्रकल्प अहवालाचे महत्त्व

प्रकल्प अहवालाचे महत्त्व पुढील प्रमाणे आहे.

**१) परिपूर्ण माहिती :** नियोजित प्रकल्प कसा असणार आहे. प्रकल्पाबाबद शासन धोरण काय आहे? शासकीय निर्देश आणि सूचना काय आहेत, ग्राहकांच्या अपेक्षाबाबत स्थिती पर्यायी उत्पादनातील स्पर्धेक व आर्थिक नियोजन या संदर्भात परिपूर्ण माहिती प्रकल्प अहवालातून प्राप्त होते म्हणून प्रकल्प अहवालास महत्त्व आहे.

**२) विश्वास :** नियोजीत उपक्रम राबविण्यास व प्रत्यक्षात सुरू केल्यास परिस्थिती कशी असेल, नफा मिळविण्याचे मार्ग काय असतील. दर्जेदार उत्पादन काय असतील? बाजार पेठेतील वातावरण कसे असेल, या संदर्भात प्रकल्प अहवालातून मार्गदर्शन होते. त्यामुळे प्रकल्प राबविण्याचा आत्मविश्वास वाढतो व प्रत्यक्ष प्रकल्प राबवित असतांना सर्वच बाबतीत विश्वास दृढ होतो. सर्वच बाबतीत लेखी विश्लेषण व पृथःकरण असल्याने कार्य विश्वासाने घडते.

**३) पाश्वभूमी :** कोणताही नवा उपक्रम सुरू करतांना प्रकल्प अहवाल दिग्दर्शनाचे कार्य करतो. उद्योगाची पार्श्वभूमी काय? तांत्रिक पार्श्वभूमी कशी आहे. आर्थिक घटकाचे नियोजन कसे आहे, प्रकल्पात गांभिर्य आहे का? कर्ज घेतल्यास, परतफेड करण्याचे मार्ग काय? प्रकल्प कर्त्याचा प्रमाणिकपणा त्यांचे धाडस, त्यांची शैक्षणिक पात्रता, त्याचे यापूर्वीचे कार्य याबाबत सविस्तर

वर्णन प्रकल्प अहवालात केले जाते. त्यामुळे सर्वच घटकांची पार्श्वभूमी स्पष्ट होते म्हणून प्रकल्प अहवालास महत्त्व आहे.

**४) प्रकल्प स्वरूप :** ज्या प्रकल्पाविषयी अहवाल तयार करण्यात आलेला आहे, त्या प्रकल्पाचे सविस्तर स्वरूप कसे असणार आहे? कोणत्या यंत्रसामग्रीचा उपकरणाचा वापर केला जाणार आहे? या उपक्रमाची समाजाला काय गरज आहे? समाजाचे संरक्षण कसे केले जाणार आहे? कोणत्या यंत्रसामग्रीचा उपकरणाचा वापर केला जाणार आहे? या उपक्रमाची समाजाला काय गरज आहे? समाजाचे संरक्षण कसे केले जाणार आहे? असे किती उपक्रम परिसरात आहेत? त्याची स्थिती काय आहे? याची माहिती प्रकल्प अहवालात असल्याने उपक्रमाचे स्वरूप स्पष्ट होते म्हणून सामाजिक दृष्टीने प्रकल्प अहवाल महत्त्वपूर्ण असतो.

**५) पर्यावरण :** नियोजीत प्रकल्पामुळे पर्यावरणावर कसा परिणाम होणार आहे त्याचे नियंत्रण कसे करण्यात येईल. पर्यावरणाची सुरक्षा कशी केली जाईल, उपाय योजना काय आहेत, प्रामुख्याने पाणी, धूर, आवाज या प्रदूषणाचे नियंत्रण कसे केले जाईल. यामुळे समस्या निर्माण होऊ शकतात काय? या विषयीची माहिती प्रकल्पात सविस्तरपणे मांडलेली असते.

**६) आर्थिक स्थिती :** प्रकल्प अहवालात आर्थिक विवरण स्पष्ट केलेले असते पैसे किंवा भांडवल उभारण्याचे मार्ग प्रकल्पावर होणारा खर्च, कर्जाची आवश्यकता असल्यास बँकाचे वित्तीय संस्थांचे पतप्रमाणपत्र याबाबत सविस्तर वर्णन केलेले असते. आर्थिकदृष्ट्या प्रकल्प कसा सक्षम असणार आहे हे प्रकल्प अहवालात नमुद केलेले असल्याने प्रकल्प अहवालाचे महत्त्व वाढते.

**७) तांत्रिक माहिती :** प्रकल्प उभारत असतांना, प्रकल्प प्रत्यक्षात सुरू करतांना व प्रकल्प संचलन करताना कोणत्या तंत्राचा वापर केला जाणार आहे त्या तंत्राची पार्श्वभूमी, आखणी व तंज्ञ विश्वार्हता याबाबत सविस्तर विवेचन केलेले असते. त्यामुळे प्रकल्प अहवालाचे महत्त्व वाढते. कोणते तंत्र तांत्रिक सहकार्य करणारे आहेत त्याची मदत व मार्गदर्शन कसे घेण्यात येईल याबाबत करार आहे काय? तांत्रिक जबाबदारी स्विकारण्याचे लेखी विवेचन प्रकल्प अहवालात द्यावे लागते.

## १.४ प्रकल्प अहवालाचे घटक

**१) उद्दिष्ट :** प्रकल्प अहवालात प्रकल्पाची उद्दिष्टे काय आहेत हे सुत्र रूपाने स्पष्ट केलेले असते. आर्थिक उद्दिष्ट सामाजिक उद्दिष्टे व गरजेची उद्दिष्टे स्पष्ट केलेली असतात. त्याचप्रमाणे उद्योजकाची पार्श्वभूमी याच पूर्ण माहिती आर्थिक व तांत्रिक क्षमता स्पष्ट केलेली असते, प्रकल्पाची जागा, जागा निश्चितीचे कारण वापरला जाणारा कच्चा माल, वाहतुक, बाजारपेठ, विजपाणी व मनुष्यबळ या घटकांचा विचार प्रकल्प अहवालात नमुद करणे आवश्यक असते.

**२) उत्पादनाची वैशिष्ट्ये :** उत्पादनाची वैशिष्टे काय आहे, उत्पादनाचा दर्जा, उत्पादनाची प्रक्रिया थोडक्यात उत्पादन पूर्वपासून ते उत्पादन ग्राहकाच्या उपभोगापर्यंतच्या अवस्था काय

असतील याबाबत सविस्तर माहिती प्रकल्प अहवालात नोंदविलेली असते. उत्पादन साठवण, विपणन व वितरण पद्धती, दर्जा नियंत्रण पद्धती याबाबत सुस्पष्ट माहिती प्रकल्प अहवालात मुद्देसूदपणे असते.

**३) वेळापत्रक :** उद्योग प्रकल्पात वेळ हा घटक महत्त्वपूर्ण असतो, वेळेबाबतची जागरूकता व नियोजन स्पष्ट असले पाहिजे. वेळेची उपयुक्तता, वेळेचे महत्त्व याबाबत प्रकल्पात संपूर्ण प्रकल्पाचे वेळापत्रक स्पष्ट होणे महत्त्वाचे असते. त्यात प्रामुख्याने कार्यालयीन कामकाज विविध प्रकल्पांच्या भेटी व उत्पादन प्रक्रीयेचा कालावधी यासंदर्भात परिपूर्ण माहिती असावी.

**४) साधन सामग्री व कच्चा माल:** प्रकल्प अहवालात साधन-सामग्री कच्चा माल या संदर्भातील स्पष्टीकरण असावे, कोणती साधन-सामग्री कशी वैशिष्ट्यपूर्ण असते.

**५) संभाव्य बाजारपेठ व विक्री :** ग्राहकांचा प्रतिसाद कसा प्राप्त केला जाईल. विक्रीचे टप्पे कसे असतील, कोणत्या तज्ञाचे मार्गदर्शन घेतले जाईल ही माहिती देऊन अंदाजे ग्राहकाची संख्या, बाजारपेठेचा आकार, वाहतुकीची सुविधा, स्पर्धक, शैक्षणिक व मानसिक पार्श्वभूमी याचे स्पष्टीकरण प्रकल्प अहवालात असावे. त्याचप्रमाणे बाजारपेठ, बाजारपेठेची परिस्थिती, बाजारपेठेचा आकार, वाहतुकीची सुविधा, स्पर्धक, शैक्षणिक व मानसिक पार्श्वभूमी याचे स्पष्टीकरण प्रकल्प अहवालात असावे. त्याचप्रमाणे बाजारपेठ, बाजारपेठेची परिस्थिती, बाजारपेठेचा आकार, वाहतुकीची सुविधा, स्पर्धक, शैक्षणिक प्रकल्प अहवालात असावे. त्याचप्रमाणे बाजारपेठ, बाजारपेठेतील परिस्थिती, बाजारपेठेचे केलेले संशोधन, आकडेवारी व स्पर्धकाचा अनुभव तसेच भुतकाळातील बाजारपेठेविषयी प्रसारित झालेली अधिकृत आकडेवारी यांचे विश्लेषण प्रकल्प अहवालात महत्त्वपूर्ण असते.

**६) मनुष्यबळ :** उपक्रमासाठी किती व कोणत्या प्रकारचे मनुष्यबळ आवश्यक आहे त्यांच्या नियुक्तीचे धोरण कसे असेल, त्यात प्रशासकीय व शारीरिक कार्यालयीन कामाकाजाची विभागणी कशी असेल, निवडक प्रक्रिया कशी राबविली जाईल, कामाचे वेळापत्रक कसे असेल, मजूरी व वेतनविषयक धोरण कसे असेल, याचे विवेचन प्रकल्प अहवालात महत्त्वपूर्ण असते.

**७) आर्थिक तपशील :** प्रकल्पासाठी भांडवल उभारणी कशी केली जाईल, वित्त व्यवस्था तसेच अधिकार कोणाला असतील, आर्थिक नोंदी कश्या ठेवल्या जातील, विशेष तपासणी कशी केली जाईल. या संदर्भात पारदर्शीपणा आवश्यक असतो. म्हणून या संदर्भात पारदर्शीपणा आवश्यक असतो म्हणून या संदर्भातील माहिती प्रकल्प अहवालात महत्त्व असते.

## १.५ प्रकल्प अहवालातील महत्त्वाचे टप्पे :

**१) उद्योजकाची संपूर्ण माहिती :**

उद्योजक प्रकल्प अहवाल तयार करीत आहे. त्यास स्वत:बद्दलची संपूर्ण माहिती किंवा आवश्यक ती माहिती प्रकल्प अहवालात भरायची असते. ज्यामध्ये त्याचे संपूर्ण नाव, घरचा

पत्ता, फोन नंबर, रहिवासी क्षेत्र, राष्ट्रीयत्व, कौटुंबिक माहिती, त्याला विविध बाजुनी मिळणारे उत्पन्न, व्यवसायाचा पूर्वीचा अनुभव, शैक्षणिक पात्रता, तांत्रिक ज्ञानाची माहिती, प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केल्याची माहिती, पॅन नं. इत्यादी व इतर माहिती हवी असल्यास, वित्तसंस्था ती उद्योजकाकडून मागवून घेतात. वित्तसंस्था प्रकल्प अहवालाबरोबर अशी माहिती आवर्जुन घेतात. ती याकरिता की सदर उद्योजक समाजात एक चांगला नागरिक आहे काय, त्याची पत काय आहे, तो खरोखरच या देशाचा रहिवाशी आहे काय? अशा अनेक बाबी यापाठीमागे असतात.

### २) उत्पादनाचा तपशील :

उद्योजक निर्मिती करीत असलेल्या वस्तू बाबत व उत्पादन प्रक्रियेबाबत संपूर्ण माहिती प्रकल्प अहवालात अंतर्भूत करावी लागते. ज्यामध्ये वस्तूचे नाव, वस्तूचा आकार, स्वरूप, उपयोगीता, वस्तूच्या उत्पादन प्रक्रियेबद्दल, उत्पादन तंत्रज्ञान, उत्पादीत वस्तूचे आयुष्य किंवा उपयोगिता, कालावधी, उत्पादित वस्तूचे घटक, प्रयोगशाळेबाबत माहिती, तपासणीच्या पद्धती, उत्पादनक्षमता, उत्पादनाची नगसंख्या, मानवी बळाचा व यंत्रांचा वापर इत्यादी आवश्यक ती माहिती द्यावी लागते. त्याचबरोबर वस्तू खाद्यपदार्त असल्यास अन्न व औषधी मंडळाची परवानगी व इतर वेळी आवश्यक असतील त्या विभागाचा परवाना प्राप्त केलेला आहे काय, याबाबत माहिती, वस्तू व उत्पादन प्रक्रियेबाबत मागवली जाणारी माहिती उद्योजकास भरून द्यावी लागते.

### ३) बाजारपेठ संशोधन :

उद्योजकाला त्याची वस्तू बाजारपेठेत विक्री करावयाची असते. बाजारपेठ उपलब्ध आहे याची खात्री पटवून द्यावी लागते. तेव्हा प्रकल्प अहवाल तयार करण्यापूर्वीच त्याला बाजारपेठेचे सर्वेक्षण करावे लागते. ज्यामध्ये सध्याच्या बाजारपेठेचे आकारमान, त्यामध्ये अपेक्षित संभवनीय वाढ, बाजारपेठेचा नेमका हिस्सा, मुख्य ग्राहक, ग्राहकांच्या संख्येतील अपेक्षित वाढ, त्यांच्या आवडी-निवडी, बदलणारी फॅशन, बाजारपेठेतील स्पर्धक व स्पर्धा, त्या स्पर्धेत टिकून राहण्याबाबत यशस्वी होण्याबाबतचे नियोजन, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील निर्यात संधी, संभाव्य मागणी व बाजारपेठेत सध्या होणारा पुरवठा वितरणकांची माहिती, त्यांच्या अटी, नियम राजकीय स्थैर्य इत्यादी. यापेक्षाही अनेक बाबींचा समावेश होतो. तेव्हा बाजारपेठेचे सर्वेक्षण केल्याची माहिती प्रकल्प अहवालात द्यावी लागते. आज बाजापेठेचे सर्वेक्षण व्यावसायिक संस्थांकडून देखील केले जाते किंवा अनेक उद्योजकता विकास संस्थादेखील अशी सुवीधा प्रशिक्षणार्थीला देतात. नवीन उपक्रमाची सुरूवात करण्यासाठी उद्योजकाचा बाजारपेठेचा अभ्यास होणे आवश्यक असते असा अभ्यास असेल तरच त्याचा प्रकल्प अहवाल सक्षम होऊ शकतो.

### ४) कच्च्या मालाची उपलब्धता :

उद्योजक ज्या वस्तूची निर्मिती त्याच्या नवीन उपक्रमातून करणार असेल त्या वस्तूंच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाबाबत संपूर्ण माहिती प्रकल्प अहवालात द्यावी लागते. लागणारा कच्चा माल उपक्रमासाठी लागणा आहे, अशा मालावर सरकारचे किंवा इतर राष्ट्रांचे

निर्बंध आहेत काय, असा कच्चा माल वापरण्यास सरकारची व इतर विभागाची परवानगी आहे किंवा नाही, कच्च्या मालात होणारी गुंतवणूक किती आहे, साठवणूकीची व्यवस्था आहे किंवा नाही, मालाची दुर्मिळता, कच्च्या मालाचे रेशनिंग आहे काय, अशा अनेक बाबींची माहिती या संदर्भात देणे आवश्यक असते.

**५) भांडवल उभारणीचा तपशील :**

नवीन उपक्रमासाठी लागणारे भांडवल हे दोन प्रकारचे असते. स्थिर भांडवल व खेळते भांडवल, कोणताही प्रकल्प अहवाल भांडवलाच्या आकडेवारीशिवाय व विश्वासार्हतेशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. प्रकल्प अहवालाच्या माध्यमातून उद्योजक प्रकल्पाची एकूण किंमत काढतो. त्याला लागणारे एकूण भांडवल म्हणून जर विचारात घेतले तर तो स्वतः किती भांडवल गुंतवणार आहे व वित्त संस्थांकडून त्याला किती भांडवल उभारावयाचे आहे. याची स्पष्ट माहिती कोणत्याी उद्योजकास बँकेला देणे गरजेचे असते. व त्याचा सतत पुरवठा होणे देखील आवश्यक असते. त्याकरिता त्याने कॅश प्लो व फंड फ्लो स्टेटमेंट, वित्त संस्थेला देणे आवश्यक असते. भांडवली गुंतवणूक किती व कार्यकारी भांडवली किती लागणार आहे हे त्याला प्रकल्प अहवालावरूनच लक्षात येते. नंतर ही माहिती प्रकल्प अहवालातच द्यावी लागते. व्यवसायासाठी लागणारे भांडवल हे उत्पादनाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

**६) यंत्रे व तंत्रज्ञानाबद्दल माहिती :**

उत्पादन, प्रक्रियेसाठी यंत्रे, सयंत्रे व तंत्रज्ञानासाठी आवश्यकता असते यावर केला जाणारा खर्च हा भांडवली खर्च असतो. उत्पादनासाठी कोणत्या प्रकारची यंत्रसामग्री लागणारे आहे. ही यंत्रसामग्री भारतातूनच खरेदी करावयाची आहे का विदेशातून आणावयाची आहे? विदेशी यंत्रसामग्री आणायची असल्यास त्याबाबत निविदा मागविल्या आहेत किंवा नाहीत, यंत्रसामग्री सहज उपलब्ध होणार आहे काय, यंत्रसामग्री मानवी वापरासाठी सुरक्षित आहे काय, त्याबाबतचे तंत्रज्ञान कसे मिळविणार आहात, यंत्राचे स्पेअरपार्टर्स उपलब्ध होती काय, यंत्राचे आयुष्य किती आहे, त्यावरील आयात कर बसविण्याचा व वाहतुकीचा खर्च इत्यादीबाबत सविस्तर माहिती द्यावी लागते. यंत्र सामग्री व तंत्रज्ञान हा महत्त्वाचा घटक व खर्च आहे तेव्हा त्याबाबत सखोल माहिती अपेक्षित असते.

**७) इतर भांडवली गुंतवणूक :**

व्यवसायात जागा, इमारत, यंत्रसामग्री याबरोबरच इतरही भांडवली गुंतवणूक करावी लागते. तेव्हा या गुंतवणूकीबाबत देखील सविस्तर माहिती प्रकल्प अहवालात द्यावी लागते. इतर भांडवली गुंतवणूकीत वीज कनेक्शन, डिपॉजिट, इलेक्ट्रिक फिटिंग्ज, डाईज, अवजारे, हत्यारे, फ्रेन्स टॉलीज, वाहतुकीची साधने, संगणक प्रणाली, कार्यालयीन साधने, गोडाऊन्स, साठवणूकीची साधने, वजन-मापे, पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते व बांधकामे, कर्मचारी व व्यवस्थापकांची निवास व्यवस्था, कँटीन सुविधा, कर्मचारी व्हेईकल्स, संदेशवहनाची साधने अशा अनेक बाबीवर खर्च सुरुवातीला करावा लागतो. या व्यतिरिक्त अनेक प्रारंभिक खर्च देखील विचारात घेऊन त्याबाबत माहिती प्रकल्प अहवालात द्यावी लागते.

**८) कामगार व श्रमिकांची माहिती :**

प्रकल्प चालविण्याकरिता श्रमिकांची आवश्यकता असते. प्रकल्प खर्चात श्रमिकांना दिल्या जाणाऱ्या मजुरीचा विचार केला जातो. व्यवसायासाठी कुशल, अर्धकुशल, अकुशल, तांत्रिक, अतांत्रिक मजूर किती लागणार आहेत.

## १.६ प्रकल्प अहवालाचा नमुना

**१) उद्योजकासंबंधी सविस्तर माहिती:**

अ) उद्योजकांचे नाव
ब) उद्योगाचे नाव
क) पत्ता
ड) घटना
इ) उद्योगाची पार्श्वभूम
ई) उत्पादनाचा तपशील
उ) बाजारपेठ
ऊ) उत्पादन पद्धती
ए) बाजारातील स्पर्धा
ऐ) कारखाण्याचे ठिकाण
ओ) कच्च्या मालाची उपलब्धता
अ) भारतीय बनावटीचा
ब) परदेशी

**२) योजना भांडवल उभारणीबाबत माहिती भांडवली खर्च :**

**अ) जागा व इतारत : स्वतःची /भाड्याची**

| क्र. | वितरण | क्षेत्रफळ | किंमत / भाडे |
|---|---|---|---|
| १ | जागा | | |
| २ | इमारत | | |

**ब) मशिनरी**

| क्र. | नाव व तपशील | भारतीय /परदेशीय | संपूर्ण तपशील | उत्पादन क्षमता | किंमत |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

**क) यंत्र सामग्रीवरील भांडवली खर्च**

| क्र. | वितरण | रूपये |
|---|---|---|
| १. | आयात कर | |
| २. | मशिनरीवरील जकात | |
| ३. | वाहतुक खर्च | |
| ४. | उभारणी खर्च | |

**ड) टेस्टींग उपकरणे**

**इ) इतर भांडवली गुंतवणूक**

| क्र. | वितरण | रूपये |
|---|---|---|
| १. | आकारीत खर्चाची तरतूद | |
| २. | वीज कनेक्शन | |
| ३. | जिगज | |
| ४. | ऑफीस फर्निचर | |
| | एकूण | |

**फ. एकूण भांडवली खर्च :**

**(अ + ब + क + ड)**

**आवर्ती खर्च :**

**अ) मनुष्यबळावरील खर्च**

| क्र. | विवरण | एकूण पगार | शेरा |
|---|---|---|---|
| १. | कुशल कामगार | | |
| २. | निमकुशल कामगार | | |
| ३. | अकुशल कामगार | | |
| ४. | व्यवस्थापक | | |
| ५. | कार्यालयीन कर्मचारी | | |

**ब) कच्चा माल:**

| क्र. | विवरण | मागणी | वजन | किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | भारतीय | | | |
| २. | परदेशी | | | |
| | एकूण | | | |

**क) इतर खर्च**

| क्र. | वितरण | रुपये |
|---|---|---|
| १. | वीज | |
| २. | पाणी | |
| ३. | जाहिरात | |
| ४. | पोस्टेज | |
| ५. | इतर | |

**ड) एकूण आवर्ती खर्च :**

**(अ + ब + क)**

**इ) खेळते भांडवल :**

**फ) एकूण भांडवली गुंतवणूक :**

**जी) भांडवली गुंतवणूकीची व्यवस्था :**

| क्र. | वितरण | गुंतवणूक | आर्थिक संस्थांचे कर्ज | बीज भांडवल | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |

**एच) वार्षिक :**

| क्र. | वस्तू | एकूण उत्पादन | दर | एकूण विक्री किंमत |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**१) वार्षिक उत्पादन खर्च:**

| क्र. | वितरण | रुपये |
|---|---|---|
| १. | वार्षिक आवर्ती खर्च | |
| २. | दुरुस्ती व देखभाल ३.५ % | |
| ३. | घसारा - यंत्रसामग्रीवर १०% | |
| ४. | घसारा- इमारतीवर ५ % | |
| ५. | गुवतणुकीवरील व्याज | |
| | एकूण | |

जे) एकूण नफा = वार्षिक विक्री – वार्षिक खर्च

के) वार्षिक कर आकारणी

एल) निव्वळ नफा = एकूण नफा – कर

एम) यंत्रसामग्री पुरविणाऱ्यांचे पत्ते

एन) कच्चा माल पुरवठादारांचे पत्ते

दिनांक :

उद्योजकांची स्वाक्षरी

स्थळ :

## १.७ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१. प्रकल्प अहवालाचे महत्त्व स्पष्ट करा.

२. ग्रामीण भागात दुध उत्पादन व प्रक्रिया उद्योगाचा प्रकल्प अहवाल तयार करा.

❖❖❖❖

# १०

# भांडवल उभारणी

**घटक रचना :**

१०.१ प्रस्ताविक
१०.२ भांडवलाचे महत्त्व
१०.३ भांडवलाचे प्रकार
अ) स्थिर भांडवल
ब) चल भांडवल
१०.४ चल भांडवलाचे महत्त्व
१०.५ भांडवलाचे स्त्रोत
१०.६ स्वअध्ययनासाठी प्रश्न

## १०.१ प्रस्ताविक

उद्योजक लहान असो की मोठा मॅन्फुफॅक्चरींग युनिट असो की सर्व्हिस सेक्टर. उद्योगाचा सुरूवातीचा काळ असो की ५० वर्षानंतरचा कुणालाही पोटात गोळा आणणारा असा एकच शब्द आहे आणि तो म्हणजे भांडवल अगदी साध्या अगरबत्ती किंवा केळी विकणाऱ्यांला लागणार २०० रुपयांचे सुद्धा भांडवल असो की टाटा, बिर्ला किंवा अंबानी ग्रुपचा विस्तार असो, कितीही मोठा ग्रुप असला तरी त्यांना भांडवल उभारताना प्रत्येक वेळी अडचणीला सामोरे जावे लागते. भांडवल उभारणीचे विविध मार्ग म्हणजे प्रायव्हेट इक्विटी, पब्लिक इश्यु, बँक पायनान्स आणि सरकारी योजना प्रत्येक मागे एक स्वतंत्र विषय आहे. त्याचबरोबर सुरूवातीच्या भांडवल उभारणीपासून ते विस्ताराच्या योजना आखेपर्यंत उद्योजकांची मानसिकता प्रसंगावरून बदलत जाते. त्यात सुरवातीचा काळ हा कठीण असतो.

## १०.२ भांडवलाचे महत्त्व (Importance of Capital)

व्यवसायामध्ये भांडवलाचे काय महत्त्व आहे हे वेगळे स्पष्ट करण्याची गरज नाही. जसे प्रत्येक जिवाला मानवी रक्ताचे महत्त्व असते. त्याच प्रमाणे भांडवल हे व्यवसायाचे जीवन आहे. कोणताही व्यवसाय, व्यवसायातील कोणत्याही प्रक्रीया या भांडवलाशिवाय म्हणजेच पैश्याशिवाय साध्य होत नाहीत. भांडवलाचे महत्त्व साधारणपणे पुढील प्रमाणे व्यक्त करता येते.

१) पुरेशा भांडवलामुळे उद्योगाची व्यवस्थीत उभारणी करता येवू शकते.

२) आवश्य असणाऱ्या संसाधनाचे एकत्रिकरण पुरेश्या भांडवलाशिवाय शक्य नसते. वस्तु यंत्रसामर्ग्री, संपत्ती, मानव संसाधन इ.साठी योग्य भांडवलाचा पुरवठा आवश्यक असतो.

३) योग्य भांडवल योग्य नियोजन योग्य व्यवस्थापन व योग्य नियंत्रण प्रक्रीया असे सुत्र व्यवसायाचे पुरेश्या भांडवलामुळे दिसून येते. म्हणजेच योग्य व्यवस्थापण प्रक्रीयेसाठी पुरेश्या भांडवलाची आवश्यकता असते. जर भांडवलाचा तुटवडा असेल तर योग्य नियोजन करणे शक्य नसते किंवा व्यवस्थापनात अडथळे निर्माण होतात. याकरिता पुरेश्या भांडवल पुरवठा आवश्यक असतो.

४) व्यवसायाची उद्दिष्टे साध्य करणेसाठी योग्य भांडवल आवश्यक असते. व्यवस्थापन, नियोजन आणि उद्दिष्टपूर्ती व्यवसायातील व्यवस्थापनाच्या कार्यांचे व एकमेकाला संबंधीत असणारे घटक आहेत. प्रत्येक उद्योजक डोळ्यासमोर विशिष्ट उद्देश ठेवून तो बाजारपेठेत प्रवेश करीत असतो. परंतु प्रत्येकांची प्रत्येक उद्दिष्टे साध्य होतातच असे नाही; परंतु व्यवसायाची उद्दिष्टे कोणतेही असे ते साध्य करणेसाठी योग्य भांडवलाचा पुरवठा किंवा उपलब्धी असणे आवश्यक असते.

५) व्यवसायाचा विकास व विस्तार करणेसाठी भांडवलाची आवश्यकता असते. प्रत्येक व्यवसायिकास स्थैर्य, विकास आणि विस्तार या तीन गोष्टीची आवश्यकता वाटते जो व्यवसाय एखाद्या बाजारपेठेमध्ये स्थीर होतो म्हणजेच यशस्वी होतो. तेव्हा उद्योजकाला त्या व्यवसायाचा विकास करणे आवश्यक वाटते. व्यवसायाचा विकास दोन मार्गानी होतो. एक अंतर्गत व दुसरा बहिर्गत. वस्तू किंवा बाजारपेठेमध्ये बदल करून अंतर्गत विकास घडवून आणता येवू शकतो. परंतु बहिर्गत विकास किंवा विस्तारासाठी इतर व्यवसायाच्या सहकार्यानेच हा विकास घडून येतो. उदा. व्यवसायाचे एकत्रिकरण, अक्वीजीश, टेकओव्हर इ. प्रक्रीया बहिर्गत विस्तारामध्ये मोडतात.

६) नविन संपत्तीची उभारणी, नविन यंत्राची खरेदी, नविन इमारत, संपत्ती इत्यादी योग्य भांडवलामुळे शक्य होऊ शकते. जर भांडवलाचा तुटवडा असेल किंवा योग्य भांडवल उपलब्ध नसेल तर नवनविन तंत्रज्ञानाचा वापर करणे शक्य नसते.

## १०.३ भांडवलाचे प्रकार

व्यवसाय चालवण्यासाठी लागणारे वित्त / पैसा म्हणजे भांडवल होय. साधारणपणे एक वर्षाच्या काळासाठी लागणारे भांडवल लक्षात घेऊन भांडवलाची आखणी किंवा भांडवलाचा अराखडा तयार करण्यात येतो. उपलब्ध भांडवल किंवा उपलब्ध स्त्रोत या मार्गातून मिळालेले भांडवल विविध मार्गांनी गुंतवणुक करण्यात येते. अर्थात, विविध स्त्रोतापासून मिळणारे भांडवल व त्यांची करण्यात येणारी गुंतवणूक यालाच वित्तीय व्यवस्थापन असे म्हणतात.

प्रामुख्याने भांडवलाची गुंतवणूक दोन प्रकारामध्ये विभागली जाते. दिर्घ मुदतीत गुंतवणूक आणि अल्प मुदतीत गुंतवणूक, यावरून भांडवलाचे दोन प्रकार प्रामुख्याने पडतात, एक स्थिर भांडवल आणि दुसरे आवर्ती किंवा चल भांडवल. दोन्ही भांडवलाचे स्त्रोत साधारणपणे एक किंवा वेगळे असू शकतात; परंतु दोन्ही भांडवलाचे वैशिष्ट्ये वेगळी असतात.

अ) स्थिर भांडवल (Fixed Capital)ः जे भांडवल दिर्घ कालासाठी म्हणजेच तीन किंवा जास्त कालासाठी गुंतवणूक करण्यात येते अशा भांडवलाला स्थिर भांडवल असे म्हणतात. उदाहरणार्थ जमीन, संपत्ती, इमारत, मशीन, यंत्रसामग्री, फर्निचर इत्यादी खरेदी करणेसाठी केलेली भांडवलाची गुंतवणूक म्हणजे स्थिर गुंतवणूक होय.

सर्वसाधारणपणे स्थिर भांडवल उत्पादनाच्या काही पातळीपर्यंत स्थिर असून ते बदलत नाही म्हणून या भांडवलास स्थिर भांडवल असे म्हणतात. स्थिर भांडवल उत्पादनाच्या प्रमाणात बदलत नसून ते उत्पादन युनीटनुसार बदलते. म्हणजेच जेवढे उत्पादन जास्त तेवढा स्थिट भांडवली एकक खर्च कमी येतो. हे खालील आकृतीवरून स्पष्ट होते.




वरील आकृतीवरून आपणास दिसून येते की उत्पादन १० हजार युनीट असो किंवा २०, ३०, ४० किंवा ६० स्थिर खर्च हा शुन्य उत्पादनाला व ६०,००० युनीट उत्पादनाला ६० लाख रूपये स्थिर आहे. तो उत्पादनाच्या प्रमाणात बदलत नाही.

ब) चल भांडवल (Working Capital)ः

**१) अर्थ :** चल भांडवल म्हणजेच अस्थिर भांडवल चल भांडवल अर्थात जे चल आहे किंवा जे बदलणारे आहे असे भांडवल ज्या भांडवलात उत्पादनाच्या प्रमाणात बदल घडून येतो त्या भांडवलास चल भांडवलास चल भांडवल असे म्हणतात.

जे भांडवल अल्प मुदतीसाठीच्या किंवा अती अल्प मुदती करीता किंवा आवर्ती खर्चासाठी गुंतवण्यात येते अशा भांडवलास चल भांडवल असे म्हणतात.

दुसऱ्या शब्दात जे भांडवल उत्पादन प्रत्यक्षपणे संबंधीत असते अशा भांडवलास चल भांडवल असे म्हणतात. उत्पादनाच्या प्रमाणात ज्या भांडवलात वाढ किंवा घट होते. ते भांडवल म्हणजे चल भांडवल होय.

**२) चल भांडवलाची गरज आणि महत्त्व** (Need & Significance): चल भांडवल हे व्यवसायामध्ये प्रत्यक्ष अभिप्रेरणेची प्रक्रिया करणारे भांडवल असते. चल भांडवलाची अभिप्रेरण प्रक्रिया जेवढी जलद असेल तेवढे नफ्याचे प्रमाण जास्त असते.




वरील आकृतीवरून स्पष्ट होते की, चल भांडवल हे रूपांतरीत होणारे अतिशय अस्थिर असे भांडवल असून ज्याचे रोखीमध्ये त्वरित रूपांतर होते. जसे रोखीचे सामग्रीमध्ये- सामग्रीचे प्रक्रियेमध्ये- प्रक्रियेचे वस्तूमध्ये आणि वस्तू विक्रीचे रोखी मध्ये आणि परत रोखीचे सामग्रीमध्ये अशा प्रकारे व्यवसायामध्ये चल भांडवलाची प्रक्रिया असते.

वरील स्पष्टीकरणावरून चल भांडवालाचे महत्त्व स्पष्ट होते. म्हणजेच चल भांडवलाशिवाय उत्पादन अशक्य असते, उत्पादनाशिवाय विक्री शक्य नसते, विक्रीशिवाय नफा म्हणजेच उद्योग शक्यच नसतो. चल भांडवल खालील बाबींसाठी आवश्यक असते.

१) दैनंदिन खर्चासाठी चल भांडवलाची आवश्यकता असते.
२) प्रत्यक्ष खर्चासाठी चल भांडवलाची आवश्यकता असते.
३) आवर्ती खर्चासाठी चल भांडवलाची आवश्यकता असते.

स्थिर भांडवल ज्याप्रमाणे व्यवसायामध्ये महत्त्वाचे असते त्याचप्रमाणे चल भांडवलाचे महत्त्व आहे. स्थिर भांडवल हे व्यवसायाची स्थिती मजबूत करून व्यवसायाचा खरा विकास व विस्तार चल भांडवलामुळेच घडून येतो.

भांडवलनिर्मिती किंवा स्वतःचे भांडवल अर्थात व्यवसायाचे भांडवल निर्माण करण्याचे खरे कार्य चल भांडवल करीत असते.

चल भांडवलामुळेच व्यवसायाची उद्योजकांनी निश्चित केलेली ध्येय साध्य करता येतात. चल भांडवल हे एक व्यवसायाचा आर्थिक कणा असून तो मजबूत असणे आवश्यक आहे.

चल भांडवलाची निर्मिती ही त्वरित व उपलब्ध असलेल्या अतिशय साध्या व सोप्या मार्गाने करण्यात येते व या भांडवलाचे रूपांतर त्वरित व्यवसायामध्ये करता येऊ शकते.

## १०.४ चल भांडवलाचे घटक (Determinants of working capital)

व्यवसायामध्ये चल भांडवल शोधून काढणे ही एक अतिशय अवघड प्रक्रिया आहे. चल भांडवलावर चल संपत्ती आणि चल देयता या दोन घटकांचा परिणाम दिसून येतो.

**१) चल संपत्ती :** ज्या संपत्तीचे रोखीमध्ये त्वरित रूपांतर करता येऊ शकते त्या संपत्तीस चल संपत्ती असे म्हणतात. व्यवसायामध्ये स्थिती विवरणात दोन प्रकारची संपत्ती दर्शविलेली असते. स्थिर संपत्ती व चल संपत्ती, इमारत, यंत्रसामुग्री, जमीन इत्यादी संपत्ती व्यवसायाची स्थिर संपत्ती होय. संपत्तीचा दुसरा प्रकार म्हणजे चल संपत्ती. उदार विक्री, बिल्स, ????, रोख रक्कम, अनामत, सुरक्षा फंड, बँक बॅलन्स इ. चल संपत्ती होय. चल भांडवल शोधण्याच्या पहिल्या पद्धतीचे सूत्र खालील प्रमाणे आहे.

चल भांडवल = चल संपत्ती

व्यवसायातील एकूण चल संपत्तीची बेरीज म्हणजेच चल भांडवल. चल भांडवल शोधण्याची ही एक व्यवसायाची किंवा चालू व्यवसायाची पद्धत आहे.

**२) चल देयता :** चल देयता ही चल भांडवलावर परिणाम करणारी आहे. चल देयता चल भांडवलाचा घटक असून चल भांडवलावर याचा परिणाम दिसून येतो.

चल देयता म्हणजे अल्प मुदती कर्ज किंवा अल्प मुदती देणी. जे उद्योजकास मागणी केल्याबरोबर द्यावे लागते अथवा अतिशय अल्प काळात देणे आवश्यक असते.

व्यवसायाचे ऋणको/सावकार, पुरवठादार व बिल्स पेबल अल्प मुदती कर्ज इ. घटक चल देयतेमध्य मोडतात.

चल भांडवल शोधण्याची दुसरी पद्धत खालील प्रमाणे आहे.

चल भांडवल = चल संपत्ती - चल देयता

व्यवसायाची एकूण चल संपत्ती वजा चल देयता म्हणजे चल भांडवल होय. चल भांडवल शोधण्याच्या दोन पद्धती आहेत हे आपण वरील स्पष्टीकरणातून पाहिलेले आहे.

## १०.५ भांडवलाचे स्त्रोत (Source of Finance)

भांडवलाचे विविध स्त्रोत आहेत ते खालील प्रमाणे थोडक्यात स्पष्ट करण्यात आले आहेत.

**अ) स्थिर भांडवलाचे स्त्रोत :** व्यवसायास लागणारे स्थिर भांडवल खालील मार्गाने गोळा करता येते.

**१) भागभांडवल :** भागभांडवल ही एक अतिशय महत्त्वाची पद्धत असून या पद्धतीने भांडवलाची उभारणी अल्प खर्चात करता येऊ शकते. कोणतीही भारतीय कंपनी कायद्यानुसार स्वतःला आवश्यक असणाऱ्या भांडवलाचे लहान स्वरुपातील भाग / अंश (Share) सामान्य जनतेस विकून भागभांडवलाची उभारणी करता येऊ शकते. यामध्ये तीन प्रकारे भागाची विक्री करता येते.
१) सामान्य भाग
२) अधिकार क्षम भाग
३) खाजगी एजंटद्वारे

**२) कर्जरोख :** ठराविक दराने व्याज देऊन कंपनी कर्जरोख्याची विक्री करीत असते. यामध्ये कर्जरोखधारकांना विशिष्ट दराने व्याज मिळते. कंपनी विसर्जनाच्यावेळी कर्ज रोखेची रक्कम प्रथमतः देण्यात येते. कर्जरोख दोन प्रकारची असतात. जसे
१) सुरक्षित कर्जरोख
२) साधारण कर्जरोख

सुरक्षित कर्जरोखामध्ये व्यवसायाची संपत्ती तारण म्हणून ठेवण्यात येत असते.

**३) इतर मार्ग :** टर्म लोन/मुदती कर्ज, नफा, व्हेंचर भांडवल इ. बाबींचा भांडवल उभारणीसाठी उपयोग करण्यात येतो.

**ब) चल भांडवलाचे स्त्रोत :** स्थिर भांडवलाप्रमाणे चल भांडवलाच्या उभारणीची वेगवेगळी स्त्रोत आपणास पहावयास मिळतात. जसे
१) बँकेकडून ॲडव्हान्स/अनामत रक्कम घेणे.

२) शीसी किंवा बँक ओडी घेणे. यामध्ये बँक स्थितीविवरणाच्या आधारावर एक वर्षासाठी कर्ज सुविधा उपलब्ध करून देतात.

३) अल्प मुदती कर्ज, लेटर ऑफ क्रेडीट ट्रेड क्रेडीट, पब्लीक डिपॉझीट, कमरशियल पेपर, अनामत जमा, कर्जरोखे, अल्प मुदती कर्ज इत्यादी मार्गानी चल भांडवलाची उभारणी करता येते.

## १०.६ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१) भांडवलाचे प्रकार विशद करा.

२) भांडवलाचे महत्त्व लिहा व त्याचे स्त्रोत स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ११

# वित्तीय संस्था

**घटक रचना :**

११.१ प्रस्ताविक
११.२ वित्तीय संस्थेची कार्य
११.३ लघू उद्योग विकास बँक (SIBDBI)
११.४ महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (SIICOM)
११.५ महाराष्ट्र औद्योगिक आणि तांत्रिक संघटना (MITCON)
११.६ महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED)
११.७ लघू उद्योग सेवा संस्था (SISI)
११.८ राष्ट्रीय लघू उद्योग महामंडळ (MSIC)
११.९ स्वअध्ययनासाठी प्रश्न

## ११.१ प्रस्ताविक

गेल्या काही वर्षामध्ये जागतिक अर्थव्यवस्थेच्या उदयानंतर वित्त व लेखा क्षेत्राच्या कार्यामध्ये मोठी क्रांती झाली आहे. आजकाल प्रत्येक धंद्याचे मूल्यमापन त्यामध्ये मिळणाऱ्या नफ्यावर केले जाते. वित्त विभागाकडे आता खर्चास कारण अशा दृष्टीने न पाहता लाभक्षेत्र म्हणून पाहिले जाते. जमाखर्चाची नोंद करणे हिशेब लिहीणे आणि धंद्याचा इतीहास तयार करणे, अशा दुय्यम स्वरूपाचे स्थान असलेल्या वित्तीय सेवांमध्ये, आजकाल करीअर करणे हे एक आकर्षक व आव्हानपूर्ण कार्य झाले असून निर्णय घेणे, धंद्याचे नियोजन व त्याचे कामकाज, व्यवहार नियंत्रण करणे यामध्ये वित्त क्षेत्रामधील व्यक्तीची भूमिका महत्त्वाची असते. बँक व त्याचे व्यवहार कोणत्याही अर्थव्यस्थेमध्ये बँकांची भूमिका महत्त्वाची असते. बँका संपत्तीचे व्यवस्थापन करीत असतात. उत्पादन, वितरण व वापर किंवा विनियोग या सर्व आर्थिक प्रक्रिया बँकांच्या कामामुळे सुकर होतात. बँक लोकांनी बचत केलेल्या प्रवाशांना उपलब्ध करून देतात. ट्रॅव्हल चेक प्रवाशांना उपलब्ध करून देतात. नवीन उद्योगांना किंवा प्रकल्पांना वित्तपुरवठा करतात. मृत्यूपत्राचा व्यवस्थापक आणि विश्वस्थ म्हणून काम करतात व शिवाय कर्ज उधारीची सेवा प्रदान करतात व शिवाय कर्ज उधारीचा सेवा प्रदान करतात. याशिवाय बँका उद्योजकता व

स्वयंरोजगार यांना मदत करून प्रोत्साहन देतात. आजकाल बँकांचे व्यवहार संगणीकृत झाले आहेत आणि ऑटोमॅटिक टेलर मशीन (ए.टी.एम.) आणि इतर आधुनिक साधनांमुळे बँकांचे व्यवहार संगणीकृत झाले आहेत आणि ऑटोमॅटिक टेलर साधनांमुळे बँकाचे व्यवहार वेगाने होू लागले आहेत. बँकांनी त्यांचे व्यवहार भिन्न क्षेत्रात सुरू केले आहेत आणि वैयक्तिक बँकींग हे त्यापैकी एक आहे. या क्षेत्रात गृहकर्ज, भाड्याने किंवा भाडेतत्त्वावर किमती वस्तूची खरेदी इ.चा समावेश होतो. या सर्व बदलामुळे कामाच्या गुणवत्तेत वाढ झाली आहे आणि तांत्रिक शिक्षण घेतलेल्या माणसाची गरज वाढली आहे, त्याचाच परिणाम होऊन व्यवस्थापकीय स्तरावर कमी कर्मचाऱ्यांची गरज बँकांना पुढे लागणार आहे. भारतीय वित्तव्यवस्थेच्या (बँक) शिरोमणी भारतीय रिझर्व्ह बँक आहे. तिचे कार्य प्रामुख्याने बँक व्यवसायाचे नियमन व विकास हे आहे. चलनपद्धती प्रमुख या नात्याने ती संस्थांच्या बांधणीकार्यात महत्त्वाची भूमिका बजावते. त्याचप्रमाणे अस्तित्व असलेल्या बँकांच्या उत्पादकतेमध्ये व परिणामकारकतेमध्ये सुधारणा घडवण्यासाठी रिझर्व्ह बँक व वित्त मंत्रालय दोन्ही मिळून एकत्रितपणे चलन धोरण ठरवून त्याच्या बाह्यमर्यादा निश्चित करते. भारतीय रिझर्व्ह बँक मार्गदर्शाक तत्वे ठरवून देऊन कार्यपद्धती संबंधी प्रस्तृत सूचना करते व बँका आणि सर्व वित्तीय संस्थांना त्या कार्यान्वीत कराव्या लागतात.

## ११.२ वित्तीय संस्थेची कार्य

लोकांच्या ठेवी स्वीकारणे, पैसे एका ठिकाणाहून दुसरीकडे पाठवणे, कर्ज व क्रेडिटची सुविधा देणे. याशिवाय बँक अनेकविध कार्यामध्ये गुंतलेल्या असतात.

**अ) किरकोळ किंवा वैयक्तिक बँकींग :** व्यक्तीशः ग्राहकांना आणि छोट्या व्यवसायिकांना आणि लघुउद्योगांना वित्तीय सेवा देण्याचे काम हा विभाग करतो आणि किरकोळ आणि वैयक्तिक बँकींग हे दोन स्वतंत्र विभाग असल्याप्रमाणे अथवा एकत्र काम करतात. किरकोळ बँक व्यवहार म्हणजे वैयक्तिक ग्राहकांनी त्यांचे पैसे ठेवणे, काढणे, दूसरीकडे पाठवणे. दुसऱ्या खात्यात जमा करणे, परकीय चलन उपलब्ध करून देणे, ट्रॅव्हलर चेक वटवणे या सेवा देऊ करणे तर वैयक्तिक बँकिंग म्हणजे कर्ज देणे, क्रेडिट किंवा उधारीवर पैसे देणेस संमती देणे, गहाण व्यवहार, विमा व्यवसाय, निवेश योजना, सेवानिवृत्ती निधी आणि विविध आर्थिक व्यवहारांबद्दल ग्राहकांना सल्ला देणे.

**ब)कॉर्पोरेट बँकींग :** उद्योगांना किंवा कंपन्यांना या बँका प्रामुख्याने सेवा देतात. या बँकांचे व्यवहार मुख्यतः मोठ्या कंपन्या व सरकारी कार्यालये किंवा संस्थांबरोबर असतात. हे व्यवहार बँकेच्या शाखाप्रमुखाच्या स्तरावर सुरू होतात. अधिक गुंतागुंतीचे व्यवहार क्लिअरिंग बँकेच्या कॉर्पोरेट विभागातर्फे आणि तिच्या दुय्यम व्यापारी बँकांच्यामार्फत पूर्ण केले जातात.

**क) कॉर्पोरेट स्वरूपाचे आर्थिक व्यवहार :** यामध्ये क्रेडिट देण्यामध्ये असलेल्या धोक्याचा अंदाज घेतला जातो. सल्ल्यासाठी असलेल्या कंपनीला दान कंपन्यांच्या एकत्रिकरणासंबंधी किंवा अन्य कंपनी ताब्यात घेण्यासंबंधी सल्ला देण्यात येतो. अधिक भांडवल उभे करणे, धंद्यामधील स्पर्धकांच्या बाबतीत कृती किंवा नावी, बाह्य देशांमधील घडामोडीचा आर्थिक व्यवहार होणारा परिणाम यासारख्या विषयावर सल्ल्यासाठी ग्राहकांना मार्गदर्शन करणे हे काम बँका करतात.

**ड) व्यापारी बँकाचे व्यवहार :** निधी उपलब्ध करून देणे हा मुख्य हेतू असलेल्या निरनिराळ्या सेवा व्यापारी बँक त्यांच्या ग्राहकांना देत असतात. गुंतवणूकीचे व्यवस्थापन हे या विभागाचे मुख्य काम आहे. ही सेवा मोठ्या उद्योगसमुहाच्यावतीने किंवा सेवानिवृत्ती निधी (पेन्शन फंड) गुंतवणूक करणारी, ट्रस्ट किंवा सिक्युरीटीज (सुरक्षा) ठेवीच्या धंद्यामध्ये असतील त्यांच्यावतीने दिली जाते. कंपन्यांच्या भाग भांडवलांच्या विक्रीचे व्यवहार आंतरराष्ट्रीय वित्त व्यवहार लोकांना भागभांडवलाची विक्री करणे आणि भागभांडवलाची खरेदी-विक्री या कामाच्या भारावर बँकांच्या सेवकांची संख्या अवलंबून असते.

**इ) ट्रेझरी :** अमेरीकन बँकीग पद्धतीमधून या कामाचा उदय झाला असून परकीय चलनाच्या राखीव निधीची काळजी घेण्याचे काम त्यामध्ये केले जाते. परकीय चलनांचे व्यवहार व गुंतवणूकीचे व्यवस्थापन इ. या विभागाच्या जबाबदाऱ्या आहेत आणि लघुउद्योगांना उत्तेजन, हस्तकला, कुटिरउद्योग व ग्रामीण उद्योग आणि ग्रामीण क्षेत्रामधील इतर आर्थिक कार्यक्रमांना साहाय्य करणे हा ग्रामीण बँकिंगचा मुख्य हेतू असतो.

**ई) आंतरराष्ट्रीय बँकींग :** जेव्हा एका राष्ट्रातील बँकेचे दुसऱ्या राष्ट्रातील बँकेबरोबर व्यवहार होतात तेव्हा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे बँक व्यवहार होतात. लेटर ऑफ क्रेडीटच्या आधारावर साधे कर्ज देणे व त्याद्वारे खातेदारांना आयात-निर्या व्यवहारांना मदत करणे आणि कर्जाचे रूपांतर करण्यासाठी परकीय चलन उपलब्ध करणे हे या विभागाचे प्रमुख कार्य असते.

**उ) खाजगी क्षेत्रातील बँका :** राष्ट्रीयकृत बँका जे व्यवहार करतात ते सर्व व्यवहार खाजगी क्षेत्रातल्या बँका करतात. फरक फक्त एवढाच आहे की त्यांची मालकी सरकारकडे नसते. रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे या बँका अनुसरतात.

## ११.३ लघु उद्योग विकास बँक (Small Industries Development Bank of India)

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर फोर्ड फाऊंडेशन अभ्यास गटाने केलेल्या शिफारशीनुसार भारताच्या अर्थव्यवस्थेमधील लघु उद्योग क्षेत्र सुदृढ व्हावे आणि लघू उद्योगांना सर्व शक्य ती मदत करता यावी, याकरिता देशात विविध संस्थांची स्थापना करण्यात आली. लघु उद्योग विकास बँक ही अशाच संस्थांपैकी एक संस्था आहे. भारत सरकारने लघु उद्योग विकास बँक १९९० मध्ये स्थापन केली. प्रस्तुत संस्था केंद्रीय पातळीवरून कार्य करते.

**३.१ लघु उद्योग विकास बॅकेची पार्श्वभूमी :** लघु उद्योगांचा विकास घडवून आणण्यासाठी केंद्रीय सरकारने पुढाकार घेऊन स्थापन केलेल्या संस्थांच्या कार्यामध्ये व कार्यपद्धतीमध्ये अनेक दोष आहेत. लघुउद्योगांना अर्थपुरवठा किंवा कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांची वित्तीय साधने अपुरी होती. त्यामुळे या संस्था लघु उद्योजकांना त्यांच्या गरजेनुसार कर्ज पुरवठा करण्यासाठी अकार्यक्षम सिद्ध झाल्या. ध्सरे असे की, लघु उद्योगांना विविध प्रकारे साहाय्य करणाऱ्या संस्थांच्या कारभारात एकवाक्यता व समन्वय नव्हता. या दोन प्रमुख कारणांमुळे लघु उद्योग क्षेत्राला मदत करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या संस्थांना आपली भुमिका प्रभावीपणे पार

पाडता आली नाही. हे दोनही दोष दूर करण्याच्या हेतूनेच देशात लघु उद्योग विकास बँकेची स्थापना करण्यात आली.

**३.२ लघु उद्योग विकास बँकेची कार्ये :** लघु उद्योग विकास बँक आपल्या देशात लघु उद्योजकांना साहाय्य करणाऱ्या राष्ट्रीय संस्थांना दिर्घमुदतीचा पुनर्वितांचा पुरवठा करते. हा पुनवित्ताचा पुरवठा विशिष्ट योजनांच्या अंमलबजावणीकरिता दिला जातो.
१) देशातील लघु उद्योगांमध्ये उपयोगात आणले जाणारे उत्पादनतंत्र अद्यावत असावे, तंत्रज्ञानाची पातळी उच्च दर्जाची असावी, याकरीता काही संस्था लघु उद्योजकांना मदत करण्यासाठी विशिष्ट योजनांची आखणी करतात. बँकेकडून संबंधित संस्थांना या योजनांची अंबलबजावणी करण्यासाठी पूर्नवित्ताचा पुरवठा केला जातो.

२) विभिन्न प्रदेशामध्ये, प्रामुख्याने मागास प्रदेशामध्ये विकासाच्या संरचनात्मक सोयीची कमतरता असते. संरचनात्मक सोयीचे अस्तित्व असल्याशिवाय लघु उद्योजक या प्रदेशामध्ये लघू उद्योगांची स्थापना करण्यासाठी धजावत नाहीत.

३) लघु उद्योजकांना आवश्यक असलेली यंत्रसामुग्री त्यांना भाडेतत्वावर पुरविण्याकरिता राष्ट्रीय लघु विकास संस्थेला कर्जपुरवठा केला जातो.

४) लघु उद्योजकांना त्यांची उत्पादने योग्य बाजारपेठांमध्ये विकणे शक्य व्हावे याकरिता त्यांना मदत करण्यासाठी काही संस्था योजना आखतात. या योजनांच्या अंमलबजावणीसाठी संबंधीत संस्थांना कर्जपुरवठा केला जातो.

५) अनेकदा लघु उद्योग आजारी पडतात. त्यांची सर्व प्रकारे पडझड होते. या सर्व प्रकारे पंगु झालेल्या लघु उद्योगांचे पुनर्वसन करण्यासाठी बँका किंवा विशिष्ट संस्था योजना राबवू शकतात. या योजनांची व्यवस्थित अंमलबजावणी व्हावी, याकरिता बँकांना व विशिष्ट संस्थांना लघु उद्योग विकास बँकेकडून पुनवित्ताचा पुरवठा केला जातो.

६) लघु उद्योग विकास बँकेच्या कार्याचे मुल्यमापन : लघु उद्योग विकास बँकेच्या स्थापनेची पार्श्वभूमी ह्या संस्थेची उद्दिष्टे व लघु उद्योग विकास बँकेने अंगिकृत केलेल्या कार्याबद्दल वर विवेचन केले आहे. लघु उद्योग विकास बँकेने आपली भूमिका किती प्रभाविपणे पार पाडली आहे ? लघु उद्योग विकास बँकेच्या कार्याचे वस्तूनिष्ठ मुल्यमापन करण्यामध्ये पुढील अडचणी जाणवतात.

१) लघु उद्योग विकास बँक ही बँक व विशिष्ट संस्थांना विभिन्न योजनांच्या अंमलबजावणीसाठी पुनर्वित्वाचा पुरवठा करते. पुनर्वित्ताच्या परिणामकारकतेचे किंवा निष्पत्तीचे निश्चितपणे मोजमाप कसे करणार ?

२) लघु उद्योग विकास बँकेने केलेल्या कामगिरीबद्दल विस्तृत तपशिल व आकडेवारी उपलब्ध नाही.

३) लघु उद्योग विकास बँक अनेक प्रकारच्या लघुउद्योगांना त्यांनी स्विकारलेली आवहने पूर्ण करण्याकरीता साहाय्य करते. परंतु लघु उद्योग विकास बँक आणि लाभार्थी लघुउद्योजक यांचा प्रत्यक्ष संबंध कधीच येत नाही.

४) सरकारने अर्थकारणाच्या संदर्भात स्वीकारलेले उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचे धोरण, अंतर्गत बाजारपेठेमधील वाढती स्पर्धा, विदेशातून आयात होणाऱ्या व स्वस्त किंमतीवर विकण्यात येणाऱ्या वस्तूंची विपुलता, लघु उद्योग क्षेत्राची दुर्दशाइ. भाबी विचारात घेतल्यास, लघु उद्योग विकास बँकेच्या कार्याचे महत्त्व आता वाढत आहे.

## ११.४ महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (State Industrial and Investment Corporation)

**महामंडळाच्या स्थापनेची पाश्वभूमी :** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मुंबई महानगरामध्ये औद्योगिक केन्द्रीकरण कमाल मर्यादेपर्यत घडून आले होते. त्यानंतर नवीन उद्योग मुंबईमध्ये स्थापन करण्याच्या प्रक्रियेमध्ये अनेक अडचणी जाणवू लागल्या, औद्योगिक केन्द्रीकरणाचे दुष्परिणाम तीव्रतेने जाणवू लागले. न्रंतरच्या काळात नव्याने स्थापन होणारे उद्योग हे ठाणे व पुणे शहरांच्या दिशेने सरकले आणि महाराष्ट्राचा औद्यागिक विकास मुंबई-पुणे-ठाणे ह्या त्रिकोणातच केन्द्रीत झाला. परिणामतः औद्योगिक विकासाच्या दृष्टीकोनातून प. महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि कोकण हे प्रदेश उपेक्षित राहिले. महाराष्ट्राच्या मागास भागात उद्योजकांना उद्योग स्थापन करण्यासाठी अभिप्रेरित करून त्यांना सर्व प्रकारचे मार्गदर्शन व मदत करण्यासाठी एका स्वतंत्र व प्रभावी सरकारी यंत्रणेची गरज होती. उद्योजकांची ही विशिष्ट गरज भागविण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने १९६६ साली महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणुक महामंडळाची स्थापना केली. सिकॉम हे या महामंडळाचे सुटसुटीत नाव आहे.

**सिकॉमची उद्दिष्टे :** महावित्तप्रमाणे सिकॉम ही शुद्ध वित्तीय संस्था नाही. सिकॉमची व्यापक उद्दिष्टे आहेत. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचा वेग वाढावा पण त्याचबरोबर हा विकास संतुलीत असावा. विकसनशिल प्रदेशांमध्ये व मागास जिल्ह्यामध्ये विकासाची संरचना निर्माण करून उद्योजकांनी त्यांचे नवीन उद्योग ह्या भागात स्थापन करावेत याकरिता उद्योजकांना सर्व प्रकारचे साहाय्य करावे, प्रादेशिक विषमतेची तीव्रता कमी करावी आणि महाराष्ट्राचा जलद व संतुलीत आर्थिक विकास घडवून आणावा, लोकांना रोजगार व उत्पन्नाचे नवीन स्त्रोत प्राप्त व्हावेत. अशी सिकॉमची विविध उद्दिष्टे आहेत.

**सिकॉमची कार्ये :** महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळाची सार्वजनिक क्षेत्रामधील संस्था म्हणून नोंदणी करण्यात आली आहे. प्रस्तुत महामंडळ ही एक स्वायत्त संस्था आहे. हे महामंडळ म्हणजे विकास बँक आहे. त्यामुळे इतर महामंडळाच्या तुलनेत हे महामंडळ बऱ्याच बाबतीत भिन्न आहे, शिवाय ह्या महामंडळाची कार्ये ही बरीच व्यापक आहेत.

**१) वित्तीय कार्ये :**

- उद्योगांच्या भागभांडवलामध्ये प्रत्यक्ष योगदान करणे.
- मर्चंट बँकिंग सेवा प्रदान करणे. इ.

**२) विकासात्मक कार्ये :**

- उद्योजकांना प्रकल्पांची निवड करीत असतांना तांत्रिक सल्ला देणे.
- उद्योजकांना वेळोवेळी विविध कारणास्तव आवश्यक असलेले तांत्रिक अहवाल तयार करण्यासाठी मदत करणे.

**३)** उद्योजकांना उद्योगांची स्थापना करण्यासाठी योग्य जागेची निवड, कच्चा मालाची उपलब्धतता, बाजारपेठांमधील परिस्थिती इ. बाबतीत मार्गदर्शन करणे.

**४)** औद्योगिक दृष्टिने मागास भागात उद्योगांचे प्रवर्तन करणे.
**५)** उद्योगांच्या स्थापना व विकास होण्याकरीता आवश्यक असलेल्या मुलभूत किंवा संरचनात्मक सोयी निर्माण करण्यासाठी इतर संस्थांशी सहकार्य करणे.
**६)** परदेशात राहणाऱ्या भारतीय उद्योजकांना महाराष्ट्रात उद्योग स्थापन करण्यासाठी मदत करणे.

**सिकॉमची कामगिरी :** सिकॉमची उद्दिष्टे व कार्याबद्दल वर उल्लेख केला आहे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सिकॉमने बरीच वाटचाल केली आहे. महाराष्ट्राचा जलद व संतुलित औद्योगिक विकास साध्य करण्यासाठी सिकॉमने केलेल्या कामगिरीबद्दल पुढे थोडक्यात स्पष्टीकरण केले आहे.

१) उद्योजकांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून देणे. प्रत्येक उद्योजकाला उद्योगाची स्थापना करण्यासाठी व त्यानंतर अनेक निर्णय घ्यावे लागतात. या सर्व निर्णयांचा उद्योगाच्या भवितव्यावर दूरगामी परिणाम घडून येतो. त्यामुळे हे निर्णय अचूक असायला हवेत. उद्योजकांनी निर्णय घेण्यापूर्वी त्यांना विविध प्रकारची माहिती आवश्यक असते. ही सर्व माहिती पर्याप्त व वास्तविक असली पाहिजे. उद्योजकांना आवश्यक असलेली माहिती त्यांना तत्परतेने पुरविण्याचे कार्य सिकॉम करते. हे कार्य व्यवस्थितपणे करण्यासाठी सिकॉममध्ये उद्योग प्रसार विभाग आहे. हा विभाग भारतीय उद्योजकांप्रमाणेच विदेशी विनियोगते आणि अनिवासी भारतीय व्यक्तिंनाही आवश्यक ती माहिती पुरवितो.

२) उद्योगांना सोयी उपलब्ध करून देणे, मागास भागात उद्योगांचा विकास व्हावा याकरिता सिकॉम दुहेरी कार्य करते. उद्योगांच्या स्थापनेसाठी आवश्यक असलेल्या संरचनात्मक सोयी निर्माण करणे आणि उद्योजकांना त्यांच्या गरजेनुसार या सोयी उपलब्ध करून देणे असे हे कार्य आहे.

३) पायाभूत सोयी विकसीत करण्यासाठी अहवाल तयार करणे. उद्योगाची स्थापना घडून येण्या करिता रस्ते, वीज, पाणी, वाहतुक साधने, तांत्रिक शिक्षणाच्या सोयी अश्या विविध सोयींची

उपलब्धता असणे आवश्यक आहे. या सोयींना संरचनात्मक किंवा पायाभूत सोयी अशी संज्ञा आहे. या विविध प्रकारच्या सोयींच्या अनुलब्धतेमुळे व अपर्याप्ततेमुळे कोकण, मराठवाडा व विदर्भ हे प्रदेश विकासाच्या मार्गावर खूप मागे रेंगळात राहिले.

कोणत्या प्रदेशात कोणत्या सोयींची नेमकी आवश्यकता आहे व या सोयी कश्यारितीने निर्माण करता येतील. या संबंधी विस्तृत अहवाल तयार करण्याचे काम ‘प्रकल्प विभाग’ करीत असतो. या अहवालांच्या आधारावरच सरकारचे विभिन्न विभाग सरकारी यंत्रणा या पायाभूत सोयींच्या निर्मितीचे कार्य प्रभावीपणे करू शकतात.

४) विकास केंद्राच्या संकल्पनेचे कार्यान्विकरण : विकास केंद्राची संकल्पना व या संकल्पनेची अंमलबजावणी करून सिकॉमने महाराष्ट्र राज्यात अनेक औद्योगिक केंद्रे निर्माण केली आणि महाराष्ट्राचा संतुलित औद्योगिक विकास घडवून आणला. विकास केंद्र म्हणजे सिकॉमने शास्त्रीय पाहणी करून निश्चित केलेले असे ठिकाण जेथे उद्योगांना आवश्यक असलेल्या सोयी उपलब्ध आहेत, जेथे उद्योगांची स्थापना केल्यामुळे उद्योजकांना अडचणीचा सामाना तर करावा लागणार नाही, उलट उद्योगांचा झपाट्याने विकास घडून येईल, उद्योजकांप्रमाणे संपूर्ण समाजाचाही फायदा होईल आणि प्रदेशाच्या संतुलित औद्योगिक विकासाला चालना मिळेल.

५) प्रोत्साहन योजनांचे स्वरूप ठरविणे : महाराष्ट्रात जसे मागासलेले प्रदेश आहेत तसेच मागासलेले जिल्हे व मागासलेले तालुकेही आहेत. प्रगत प्रदेशांमधील सर्वच जिल्हे प्रगत नसतात, त्यामध्ये काही जिल्हे अत्यंत मागासलेले असतात. त्याप्रमाणेच पुढारलेल्या किंवा प्रगत समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यांमधील काही तालुके फार मागासलेले असतात. राज्याचा संतुलीत आर्थिक विकास साधण्याकरीता प्रत्येक तालुक्याचा स्वतंत्रपणे विचार करणे अगत्याचे आहे. नवीन उद्योजकांनी त्यांचे उद्योग मागास जिल्ह्यांमध्ये व मागास तालुक्यांमध्ये स्थापन करावेत, याकरिता त्यांना अभिप्रेरित करण्याच्या उद्देशाने विविध प्रकारच्या अनुदानांचा अंतर्भाव असलेली एक व्यापक योजना आखण्यात आली.

**सिकॉमची वित्तीय साधने :** महाराष्ट्राचा जलद व संतुलित आर्थिक औद्योगिक विकास घडून यावा याकरिता सिकॉमने व्यापक जबाबदाऱ्या स्विकारल्या आहेत. हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक सुधारणा घडवून आणण्याच्या सरकारी धोरणानुसार १९९४ साली ५१ टक्के समभाग विकण्यात आले आणि ४० टक्के भाग युनिट ट्रस्टकडे हस्तांतरीत करण्यात आले.

## ११.५ महाराष्ट्र औद्योगिक आणि तांत्रिक संघटना (Maharashtra Industrial and Technical Consultancy Organisation)

**पार्श्वभूमी :** भारताच्या अर्थकारणामधील लघु उद्योग क्षेत्र सर्व दृष्टिने सुदृढ आणि स्पर्धेमध्येही टिकून राहतील असे असावे याकरिता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्याची गरज आहे.

लघुउद्योग क्षेत्रामधील उद्योजकांना सातत्याने अभिप्रेरित करण्यात यावे, कोणत्याही परिस्थितीमध्ये उद्योजकांना आत्मविश्यास कमी होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

लघु उद्योजकांना त्यांच्या गरजेप्रमाणे योग्य व्याजदरावर भरपूर पत पुरवठा करण्यात यावा.

लघु उद्योजकांना भेडसावणाऱ्या सर्व समस्यांची तातडीने सोडवणूक करण्यात यावी.

महाराष्ट्र राज्यामध्ये हे विशिष्ट उद्दिष्ट गाठण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक आणि तांत्रिक संघटना (मिटकॉन) स्थापन करण्यात आली. कालांतराने या प्रकारच्या तांत्रिक सल्लागार संस्थांची इतर राज्यामध्येही स्थापना करण्यात आली. लघु उद्योग आणि मध्यम उद्योग क्षेत्रातील उद्योजकांना त्यांच्या गरजेनुसार व तत्परतेने तंत्रज्ञानाविषयक सल्ला प्राप्त व्हावा हे उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेवून १९८२ मध्ये महाराष्ट्र इंडस्ट्रियल ॲन्ड टेक्निकल कन्सलटन्सी ऑर्गनायजेशन लिमिटेड, या संस्थेची स्थापना करण्यात आली.

**मिटकॉनची उद्दिष्टे :** प्रत्येक मोठ्या उद्योगांमध्ये विभिन्न विषयांचे तज्ञ असतात. त्यामुळे उद्योगपतीला किंवा व्यवस्थापकांना काही समस्या निर्माण झाली तर त्या समस्यांचे तत्परतेने निराकरण होऊ शकते. लघु उद्योगांमध्ये व मध्यम आकाराच्या उद्योगांमध्ये उत्पादनाच्या क्षेत्रामध्ये अनेक गतीरोध व समस्या उद्‌भवतात याप्रसंगी उद्योजकांना तंत्रज्ञानाविषयक सल्ला, मार्गदर्शन व मदतीची आवश्यकता असते. अशा प्रसंगी उद्योजकांना एकाच छत्राखाली सल्ला, मार्गदर्शन व मदत सहजपणे व योग्य दराने उपलब्ध करून देणे हे मिटकॉनचे उद्दिष्ट आहे.

**मिटकॉनचे कार्य :** मिटकॉनची काही कार्य पुढीलप्रमाणे आहे.

१) विशिष्ट प्रदेशातील हवामान, तेथे असलेली संसाधने, विकासाची संरचना बाबींचा विचार करून, तेथे विशिष्ट उद्योग स्थापन करावा काय या प्रश्नाचे उत्तर मिळविणे.

२) उद्योजकांनी तयार केलेल्या उद्योगांच्या प्रकल्पांच्या रूपरेषेचे मुल्यमापन करणे.

३) उद्योजकांकरिता प्रकल्प अहवाल तयार करणे.

४) उद्योगांचे आधुनिकीकरण करण्यासाठी उद्योजकांना अहवाल तयार करून देणे.

५) बाजारपेठेचे संशोधन करणे.

६) आजारी उद्योगांचे पुनर्वसन करणे.

७) उद्योगांना तंत्रज्ञानविषयक सल्ला देणे.

## ११.६ महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (Maharashtra Centre for Entreprenership Development (M.C.E.D.))

भारतात इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये औद्योगिकरणाच्या प्रक्रियेचा फार लवकर प्रारंभ झाला. औद्योगिकरणाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास सध्या संपूर्ण देशात महाराष्ट्राचा पहिला नंबर आहे. महाराष्ट्रात सर्व प्रकारचे उद्योग आहेत. दर दिवशी नवनविन उद्योग स्थापन होत आहेत आणि त्यामुळे महाराष्ट्रातील बहुतेक प्रदेशांचा व शहरांचा चेहरा

संपूर्णपणे बदलला आहे. एकेकाळी नाशिक हे देवळांचे शहर होते, आज ते एक प्रमुख औद्योगिक केंद्र बनले आहे.

महाराष्ट्रात जेव्हा औद्योगिकरणाची सुरूवात झाली तेव्हा अनेक प्रकारच्या व्यवसायिक संधी येथे निर्माण झाल्या. या संधींचा उपयोग राजस्थान, गुजरात, पंजाब व दक्षिणेकडून येथे आलेल्या व्यवसायिकांनीच घेतला त्यामुळे महाराष्ट्रात विशेषतः भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरात स्थापन झालेल्या उद्योगांची मालकी मारवाडी, गुजराथी अशा बिगर महाराष्ट्रीय लोकांकडेच आहे. मराठी समाजाचे लोक या उद्योगांमध्ये कामगार, कारकून व मध्यम पातळीवरचे व्यवस्थापक म्हणून कार्य करीत आहेत. मुंबई शहरामधील मराठी लोक कष्ट करणारे, राबणारे होते, ते तसेच आहेत, मुंबई शहराची संपूर्ण आर्थिक सत्ता बिगर महाराष्ट्रीय लोकांकडे आहेत, त्यांच्या वैभवाचे इमले उभे झाले आहेत, मुंबई शहराच्या सामाजिक जीवनावरही त्यांचेच वर्चस्व आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मुंबई आहे, पण मुंबईमध्ये महाराष्ट्र नाही ही वास्तविकता आहे.

मराठी समाजातील लोकांनी महाराष्ट्रात उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी पुढाकार का घेतला नाही ? मुंबई व महाराष्ट्रातील इतर भागातही विकसीत झालेल्या उद्योगांची मालकी मराठी लोकांकडे का नाही ? उद्योगधंद्यांच्या माध्यमातून जो विकास घडून आला, जी भरभराट झाली व जी आर्थिक समृद्धी निर्माण झाली, त्यापासून मराठी समाज वंचित का राहिला आहे ? या सर्व प्रश्नांचे उत्तर एकच आहे. ते आहे मराठी समाजाची मानसीकता.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य जन्माला आले. राज्यात मराठी समाजाचे सरकार आरूढ झाले. मराठी समाज मागे का याची कारणमिमांसा करण्यात आली. डेव्हिड मॅकलेलँड यांच्या संशोधनामधून व काकीनाडा येथे झालेल्या प्रयोगामधून अभिप्रेरण व प्रशिक्षणाच्या माध्यमातून उद्योजक बनविले जाऊ शकतात. ही धारणा प्रस्थापित झाली. गुजरात राज्यामधील उद्योजगीकरणाच्या प्रयत्नांचे परिणाम स्पष्ट झाले. महाराष्ट्राच्या समाज मनामध्ये अस्वस्थता निर्माण झाली. सरकारी पातळीवरही त्यादृष्टीने विचार होऊ लागला आणि १९८४ साली महाराष्ट्र सरकारने श्री प्रभाकर करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्राचे उद्योजकीकरण गतीमान करण्यासाठी एक समिती स्थापन केली. या समितीने महाराष्ट्रात उद्योजकीकरणाच्या चळवळीला संघटीत करण्यासाठी, या चळवळीला दिशा देण्यासाठी आणि मराठी समाजामधून नवनवे उद्योजक निर्माण व्हावेत याकरिता सर्वंकष प्रयत्न करण्यासाठी एक स्वतंत्र संस्था स्थापन करण्याची शिफारस केली.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राची स्थापना १९८८मध्ये श्री सु. प. रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली मिटकॉन या संस्थेमध्ये उद्योजकीकरणासाठी प्रयत्न करण्यात आले. महाराष्ट्राच्या उद्योजकीकरणा करता व्यापक व संघटीत प्रयत्न करण्यासाठी, एका स्वतंत्र संस्थेची आवश्यकता होती. त्यादृष्टीने १ ऑक्टोबर १९८८ रोजी महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राची औरंगाबाद येथे स्थापना केली.

**महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राची उद्दिष्टे :**

१) मराठी समाजाच्या मानसिकतेमध्ये मुलभूत बदल घडवून आणून या समाजाने उद्योजकता हे एक मूल्य म्हणून स्विकारावे.

२) मराठी समाजातील तरुणांना उद्योजक बनन्यासाठी अभिप्रेरित करणे, पहिल्या पिढीचे नवे उद्योजक घडविणे.
३) उद्योजक बनू इच्छिणाऱ्या व्यक्तिंना अपेक्षित माहिती पुरविणे.
४) उद्योजकता विकासाकरिता विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणे.
५) महाराष्ट्रामध्ये उद्योजकीय संस्कृती रूजविण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करणे.

**महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राने केलेली कार्ये :**

१९८८ साली स्थापन झालेल्या महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राने एका दशकाच्या काळात केलेल्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे आहे.

१) **उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम :** महत्त्वाकांक्षी व्यक्तिंना उद्योजक बनण्यासाठी अभिप्रेरित करून त्यांना उद्योजकतेच्या सर्व आवश्यक पैलू बाबत व्यवस्थित प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करते.

२) **उद्योजकता परिचय कार्यक्रम :** मराठी समाजातील तरूणांची मानसिकता बदलावी, नोकरीचा कधीही न संपणारा शोध न घेता त्यांनी स्वयंरोजगाराकडे वळावे, उद्योजक म्हणून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण व्हावे. या करिता तरूणांना प्रेरित व प्रशिक्षित करण्यासाठी उद्योजकता परिचय कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांची मुदत सामान्यपणे तीन दिवसांची असते. या मुदतीत सवलतीत प्राथमिक प्रकल्प अहवाल या बाबतीत सर्वंकष माहिती दिली जाते. हे कार्यक्रम प्रामुख्याने विज्ञान महाविद्यालये, यंत्रशास्त्राचे शिक्षण देणारी महाविद्यालये व तंत्र शिक्षण संस्थांमध्ये आयोजित केले जातात.

## ११.७ लघू उद्योग सेवा संस्था (Small Industries Service Institaate)

भारतात लघु उद्योग क्षेत्राचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी तीनपदरी उपाययोजना करण्याची गरज आहे.
१) महत्वाकांक्षी व्यक्तिंना उद्योजक बनवण्यासाठी अभिप्रेरित करणे.
२) लघु उद्योजकांना आवश्यक तो अर्थपुरवठा करणे आणि
३) लघु उद्योजकांना कच्चा माल यंत्रसामुग्री उत्पादनाचे तंत्र, उत्पादन प्रक्रीया, उत्पादनाचे तंत्र इ. बाबतीत सल्ला देणे. मार्गदर्शन करणे, प्रशिक्षण देणे इ.

**लघु उद्योग सेवा संस्थेची कार्ये :**
लघु उद्योग सेवा संस्थेची कार्ये पुढे थोडक्यात विवेचन केले आहे.

१) माहिती पुरविणे, लघु उद्योग सेवा संस्थेमध्ये आर्थिक अन्वेषण विभाग आहे. लघु उद्योगांना ज्या वस्तूंचे उत्पादन करावयाचे असते. त्याकरीता आवश्यक असलेला कच्चा माल,

या वस्तूकरीता असलेली मागणी, बाजारपेठेमध्ये या वस्तूचा पुरवठा, बाजारपेठेमधील परिस्थिती इ. अनेक बाबतीत संस्था माहिती व अद्यावत अकडेवारी गोळा करते. या माहिती व आकडेवारीवर संस्कार केले जातात व नंतर ही माहिती गरजू लघु उद्योजकांना योग्य स्वरूपात पुरवली जाते.

२) सल्ला देणे : प्रत्येक लघु उद्योजकाला उत्पादन करण्यासाठी यंत्रसामुग्रीची आवश्यकता असते. लघु उद्योगांना हवी असलेली श्रेष्ठ दर्जाची यंत्रसामुग्री तसेच उत्पादनकार्यामध्ये उपयोगात आणला जाणारा कच्चा माल कुठे कुठे मिळू शकेल. याबाबत लघु उद्योजक अनभिज्ञ असतात. लघु उद्योजकांना उपयुक्त सल्ला देते.

३) तांत्रिक प्रशिक्षण देणे : लघु उद्योग सेवा संस्थेच्या कार्याचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे ही संस्था लघु उद्योजकांना नुसताच सल्ला देत नाही तर त्यांना विविध विषयांचे प्रशिक्षणपण देते. हे प्रशिक्षण उत्पादनाचे तंत्र, उत्पादन प्रक्रिया, उत्पादनाचा दर्जा अशा विषयांचे व तांत्रिक स्वरूपाचे असते. याशिवाय लघु उद्योग सेवा संस्था लघु उद्योजकांना व्यवस्थापनाकडे व उद्योजकतेच्या विविध पैलूबाबतही प्रशिक्षण देते.

४) विक्री वाढविणेसाठी मदत करणे : देशातील सर्व लघु उद्योजकांना उत्पादित वस्तूंची विक्री कशी वाढवायची, विक्रीचा उच्चांक कसा गाठावयाचा ही समस्या भेडसावीत असते. लघु उद्योजकांना विपणनाच्या क्षेत्रात ही संस्था मदत करते.

## ११.८ राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ (National Small Industries Corporation)

**महामंडळाची स्थापना :** भारताच्या अर्थकारणात लघू उद्योगांची भूमिका फार महत्त्वाची असल्यामुळे आपल्या देशात लघु उद्योगांचा विकास पूर्वनियोजित पद्धतीने घडून येणे आवश्यक आहे. लघु उद्योग क्षेत्राची अंगभूत दुर्बलता; बाजारामधील परिस्थिती, ग्राहकांच्या अपेक्षा, वाढती स्पर्धा लघु उद्योजकांची मर्यादित साधने, सरकारने स्वीकारलेले खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण अशा विविध कारणांमुळे लघु उद्योजकांना सरकारी पातळीवरून विशेष प्रकारची मदत होणे आवश्यक आहे. भारतामधील लघु उद्योग क्षेत्रामधील उद्योजकतेचा विकास करण्याचा उद्देशाने लघु उद्योग महामंडळ ही एक महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेची कंपनी कायद्याच्या तरतुदीनुसार नोंदणी झाली आहे. १९५५ साली स्थापन करण्यात आलेले व राष्ट्रीय पातळीवरून कार्य करणारे हे महामंडळ लघु उद्योग क्षेत्रांची वाढ व्हावी व लघु उद्योजकांच्या विविध समस्यांचे निराकरण व्हावे, याकरीता उपयुक्त कार्य करीत आहे.

**राष्ट्रीय लघु उद्योगाची कार्ये :**

१) कच्च्या मालाची आयात अनेक लघुउद्योगांना आवश्यक असलेला कच्चा माल त्यांना देशात उपलब्ध होत नाही. हा कच्चा माल विदेशातून आयात करावा लागतो. विशिष्ट लघुउद्योगांची गरज लक्षात घेऊन राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ विदेशातून कच्च्या मालाची आयात करून, लघु उद्योगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार पुरवठा करते. अनेक लघु उद्योजकांना कच्च्या मालाच्या किंमतीचे ताबडतोब शोधन करणे शक्य होते. या परिस्थितीमध्ये हे महामंडळ

लघुउद्योजकांना आयात केलेल्या कच्च्या मालाचा उधारीवर पुरवठा करते. या प्रकारच्या कर्जाची मुदत ९० दिवस असते. राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ देशातील काही उद्योगांच्यावतीने अल्युमिनियम, झिंक, तांबे इ. सामग्रीची आयात करते.

२) पतपुरवठा : राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळाचे मुख्य कार्य हे लघुउद्योगांना पतपुरवठा किंवा कर्जपुरवठा करणे हे आहे.

३) निर्यातीकरीता साहाय्य : लघु उद्योग क्षेत्रामध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तूंची विदेशी बाजारपेठेमध्ये विक्री व्हावी याकरीता राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ सर्व पातळ्यावरून विविध प्रकारचे प्रयत्न करते.

## ११.९ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१) विटीय संस्थेचे कार्ये स्पष्ट करा.

२) महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ टिप लिहा.

❖❖❖❖

# १२

# जिल्हा उद्योग केंद्र व शासकीय अनुदान योजना

**घटक रचना :**

१२.१ प्रस्ताविक
१२.२ केंद्रीय गुंतवणूक अनुदान योजना
१२.३ जिल्हा उद्योग केंद्र
१२.४ उद्योजकता विकास विशेष संघटना
१२.५ स्वअध्ययनासाठी प्रश्न

## १२.१ प्रस्ताविक

स्वातत्र्यंप्राप्तीनंतर देशात उद्योजकतेची सर्वागीण वाढ व्हावी, अपरंपरागत स्त्रोतांमधून पहिल्या पिढीचे नवीन उद्योजक मोठया प्रमाणावर निर्माण व्हावेत, उद्योजकांनी भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण व्हावे आणि या उद्योजकांनी स्वीकारलेला मार्ग प्रशस्त व्हावा, हया हेतूने आपल्या देशात मध्यवर्ती सरकार आणि राज्य सरकार अशा दोन्ही पातळयांवरुन विविध प्रोत्साहनपर योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी कांही निवडक व महत्वांच्या योजनाबद्दल पूढे चर्चा केली आहे.

## १२.२ केन्द्रीय गुंतवणूक अनुदान योजना : (Central Investment Subsidy Scheme)

उद्योजकांनी मागास जिल्हांमध्ये नविन उद्योगांची स्थापना करण्याकरीता पूढाकार घ्यावाव आवश्यक ते प्रयत्न करावेत. हयाकरीता मध्यवर्ती सरकारने १९७१ साली. केन्द्रीय गुंतवणूक अनुदान योजना सुर केली. या योजनेनुसार मागास प्रदेशात नवीन उद्योगांची स्थापना व्हावी याकरिता स्थिर संपत्तीमध्ये उद्योजकाने केलेली गुंतवणूक हा अनुदानाचा आधार आहे. उद्योजकांना हे अनुदान टप्प्याटप्याने दिले जात नाही, एकहाती दिले जाते. मध्यवर्ती सरकारने विशेप्पज्ञाची मदत घेऊन मागासपणाचे निकष ठरविले. मागास जिल्हयांची एक यादी तयार केली या मागास जिल्हयांची तीन श्रेणीमध्ये वर्गवारी केली व प्रत्येक जिल्हयाकरीता अनुदानाची टक्केवारी निश्चित केली. तूलनेने सर्वात जास्त माणास जिल्ह अ श्रेणीमध्ये व तूलनेने सर्वात कमी मागास जिल्हे क श्रेणीमध्ये अंतर्भुत करण्यात आले. अ श्रेणीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या मागास जिल्हयांमध्ये नवीन उद्योगांची उभारणी करणाऱ्या उद्योजकांना त्यांनी उद्योगांमधील स्थिर संपत्तीमध्ये केलेल्या गुंतवणुकीपैकी २५ टक्के रक्कम अनुदान म्हणून दिली जाऊ शकते. उद्योजकांना देण्यात येणाऱ्या अनुदानाची कमाल मर्यादा २५ लक्ष रुपये आहे.

डोंगराळ व दुर्गम भागात इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाची स्थापना करणाऱ्या उद्योजकांना देण्यात येणाऱ्या या प्रकारच्या अनुदानाची कमाल मर्यादा ५० लक्ष रुपये आहे व श्रेणीमधील मागास जिल्हयाकरिता अनुदानाची टक्केवारी १५टक्के व अनुदानाची कमाल मर्यादा १५लक्ष रुपये आणि क श्रेणीमधील मागास जिल्हांकरीता अनुदानाची टक्केवारी १० टक्के आणि अनुदानाची कमाल मर्यादा १० लक्ष रुपये इतकी आहे. योजनेच्या तपशीलामध्ये वेळोवेळी बदल करण्यात आले आहेत.

## २. बीज भांडवल योजना (Seed Capital Scheme)

भारतात बेकारीच्या समस्येची तीव्रता सध्या टोकाला पोचली आहे, तहानेमुळे व्याकुळ झालेल्या हरिणाने वाळवंटामध्ये मृगजळामागे धाव घ्यावी, मृगजळ पूढेपूढे सरकत जाते व शेवटी हया हरिणाने थकून दम सोडावा, तसे अलिकडे सुशिक्षित व्यक्ती नोकरीचा शोध घेतात. त्याकरीता वाटेल त्या ठिकाणी जातात व हवे ते करतात व शेवटी निराश होऊन, खचलेल्या मनाने, विवशा होऊन, अपमानास्पद परिस्थितीशी तडजोड करुन, परावलंबी जिणे जगु लागतात. बेकार व्यक्तिंनी स्वयरोजगाराच्या क्षेत्राकडे वळावे किंवा स्वतःचा लघू उद्योग सूरु करावा याकरीता व असे करीत असताना आर्थिक अडचणी किंवा अभावामुळे त्यांचेवर निराश होण्याचा प्रसंग येऊ नये, या हेतूने मध्यवर्ती सरकारने १९७९ साली बीज भांडवल योजना सुरु केली. १९७६ पासून या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी राज्य सरकारांकडे सोपविण्यात आली. ज्या उद्योजकांना वित्तीय महामंडळ किंवा बँकाकडून कर्ज हवे असते त्यांना या संस्थांकडे प्रस्तावित उद्योगाचा प्रकल्प अहवाल सादर करावा लागतो. हे कर्ज मिळविण्यासाठी प्रकल्पाच्या अवेक्षित खर्चापैकी २५टक्के रक्कम उद्योजकाने स्वतःच्या साधनांमधून उभी करावयाची आहे. ही रक्कम म्हणजे उद्योजकांचे बीज भांडवल किंवा 'मार्जिन मनी' होय. समाजाच्या खालच्या स्तरांमधून आलेल्या अनेक उद्योजकांना ही रक्कम त्यांच्या व्यक्तिगत साधनांमधून उभी करता येत नाही. बीज भांडवल योजनेनुसार आर्थिक अडचणी व विवशतेच्या दलदलीमध्ये खोलवर रुतलेल्या उद्योजकांना योजनेनुसार आर्थिक अडचणी व विवशतेच्या दलदलीमध्ये खोलवर रुतलेल्या उद्योजंकाना त्यांच्या प्रस्तावित प्रकल्प खर्चाच्या १५ ते २२ १/२टक्के बीज भांडवल म्हणून मिळू शकते. त्यानंतर हे उद्योजक वित्तीय संस्थाकडून कर्ज मिळवू शकतात. या प्रकारे उद्योजकांना मिळू शकणाऱ्या कर्जाची कमाल मर्यादा प्रकल्प अहवालामधील प्रस्तावित खर्चाच्या ७५टक्के इतकी राहील.

## ३) पंतप्रधान रोजगार योजना (Prime Ministers Employment Schme)

भारतामध्ये बेकारीच्या समस्येची भीषणता कमाल मर्यादेपर्यंत पोचली आहे, रोजगारसंधीची निर्मीती अत्यंत मंद वेगाने घडून येत असल्यामुळे बेकार व्यक्तींना सन्माननीय जीवन जगणे शक्य व्हावे याकरीता त्यांना स्वयंरोजगाराकडे वळविणे आवश्यक आहे. हा विशिष्ट दृष्टीकोण समोर ठेऊनच मध्यवर्ती सरकारने एक व्यापक योजना आखली ही योजना संपूर्ण देशात २ ऑक्टोंबर १९९३ पासुन सुरु झाली. विशिष्ट योजना पंतप्रधान रोजगार योजना हया नावाने ओळखली जाते. बेकार व्यक्ती अल्प भांडवलामध्ये जे व्यवसाय करु शकतात. अशा व्यवसायांची एक यादी तयार करण्यात आली आहे. आर्थिक साहाय्याची अपेक्षा करणाऱ्या व्यक्तींना प्रस्तावित प्रकल्पांना मजूरी मिळवावी लागते. या प्रकल्पांच्या खर्चाची मर्यादा १ लक्ष रुपये ठरविण्यात आली आहे. उद्योजकांचा प्रस्तावित प्रकल्प खर्च १लक्ष रुपये असल्यास त्याला ५टक्के भांडवल स्वतःच्या स्त्रोतांमधून उभे करावे लागते. उरलेले ९५ टक्के भांडवल बँकाकडून कर्जांच्या स्वरुपात मिळू शकते. प्रकल्प खर्चाच्या १५ टक्यापर्यंत रक्कम

उद्योगजकांना सरकारकडून अनुदान किंवा साक्सीडीच्या स्वरुपात मिळू शकते. या योजनेची अंमलबजावणी जिल्हा औद्योगिक केन्द्रांच्या माध्यमातून केली जाते. प्रस्तुत योजनेअंतर्गत लाभान्वित होण्यासाठी अर्जदारांनी कांही अटींची पूर्णता करणे आवश्यक असते.

**प्रोत्साहनपर योजनेचे घटक**

उद्योजकांना अभिप्रेरित किंवा प्रोत्साहीत करण्यासाठी विभिन्न मार्गाचा अवलंब केला जातो. हे मार्ग पूढे नमूद केल्याप्रमाणे प्रामुख्याने तीन प्रकारचे आहेत.

**१. अर्थसहाय्य :** उद्योजकांची व्यक्तिगत आर्थिक साधने मर्यादित असतात. उद्योगांची स्थापना करण्याकरीता, उद्योगांचे संचालन करण्याकरीता उद्योजकांना स्थिर व खेळत्या भांडवलाची गरज असते. उद्योजकांची भांडवलसंबंधी गरज उत्तरोत्तर वाढत जाते. मागास देशामध्ये भांडवल बाजार असंघटीत व अप्रगत असल्यामुळे उद्योजकांना भांडवल बाजारपेठेमधून आवश्यक तेवढे भांडवल योग्य वेळी व योग्य खर्चामध्ये उभारणे शक्य होत नाही.

**२) सवलती :** उद्योजकांचे अभिप्रेरण कायम टिकून राहवे व त्याच बरोबर त्याचबरोबर त्यांच्या मार्गात येणाऱ्या विविध अडचणीचे निराकरण व्हावे. हयाकरीता सरकार उद्योजंकाना सवलती उपलब्ध करुन देते. सरकारने उद्योजकांना विविध प्रकारच्या सवलती उपलब्ध करुन दिल्यामुळे, उद्योजकांना कराव्या लागणाऱ्या भांडवल गुंतवणुकीमध्ये व भांडवली खर्चामध्ये बरीच बचत होते. त्यामुळे उत्पादन खर्चावर नियंत्रण ठेवता येते. भारतात विविध कार्यक्रम माध्यमातून सरकारने उद्योजकांना सवलती उपलब्ध करुन दिल्या आहे.

**३) अनुदाने:** उद्योजकांना विविध कारणास्तव आणि विविध प्रसंगी अनुदाने देणे, ही उद्योजंकाना अभिप्रेरित करण्याकरीता अमंलात आणली जाणारी एक महत्वाची उपाययोजना आहे. अनुदाने रोक स्वरुपात दिली जातात. उद्योजकांना देण्यात येणारी अनुदानाची रक्कम एकाच वेळेस व एकरकमी दिली जाते. किंवा हप्त्या हप्त्याने दिली जाऊ शकते.

## १२.३ जिल्हा उद्योग केंद्रः

स्वयंउद्योग आणि रोजगाराच्या सहनार्थ त्या संबधाने शासनाच्या विविध योजनांची सवी प्रकारची माहिती सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी या उद्देशाने जिल्हा उद्योग केद्राची रचना केली गेली आहे. त्या मार्फत होणाऱ्या कामकाजाचा आठावा आवश्यक आहे.

उद्योगासंबधी सर्व प्रकारची माहिती, सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी या उद्देशाने जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. महव्यवस्थापक हे जिल्हा उद्योग केंद्राचे प्रमुख असूते ते वर्ग एक चे अधिकारी असतात. त्यांना व्यवस्थापक असे म्हणतात. जिल्हाप्रमाणे त्यांची संख्या दोन किंवा तीन असते. यांना कामात मदत करण्यासाठी उद्योग निरिक्षण नेमणुक केलेले असतात. उद्योग निरिक्षकांचे मुख्यालय जरी जिल्हा ठिकाण असले तरी त्यांना कामाच्या सोयीसाठी तालूके वाटून दिलेले असतात व त्या तालूक्याचा औद्योगिक विकास हा महाव्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योग निरीक्षक करीत असतो. उद्योग निरिक्षकांना आठवडयातून नेमलेल्या दिवशी तालूका मुख्यालयाचा दावा करावा लागतो. व बहुधा त्यांची

पंचायत समीती कार्यालयात बसण्याची व्यवस्था केलेली असते. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत खालील प्रकारच्या योजना राबविण्यात येतात.

१. पंतप्रधान रोजगार निर्माण कार्यक्रम
२. बिज भांडवल योजना
३. जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना
४. उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम
५. जिल्हा पूरस्कार
६. सामुहिक प्रोत्साहन योजना
७. उद्योगासाठी स्थायी (Eml) व अस्थायी (Eml)
८. मुद्रांक शूल्क माफी
९. उद्योगासाठी कच्चा माल शिफारस
१०. माहिती व तंत्रज्ञान घटकांना इरादा पत्र
११. माहिती व तंत्रज्ञान विभागाची नोंदणी

जिल्हा उद्योग केंद्राशी संबधीत असलेल्या इतर विभागातर्फे राबवण्यात येणाऱ्या उद्योगांसाठीच्या योजना पूढील प्रमाणे आहेत.

अ) संत रोहिदास चर्मोद्योग व चमत्कार विकास महामंडळ मर्यादित योजना.

१. बीज भांडवल योजना
२. मुदती कर्ज सहाय्यता योजना
३. माहिला समृध्दी योजना
४. ५०% अनुदान योजना

**व) कृषी विभाग योजना:**

१. फळ रसवंती गृह चालवणे
२. फळे व भाजीपाला विक्री बाजार सहाय्य योजना
३. डाळ मीठ स्थापणेकरीता अर्थसहाय्य
४. शितगृह / वातानुकूलित वाहन योजना
५. काजू प्रक्रिया उद्योग स्थापित करणे
६. कर्ज प्रक्रिया उद्योग स्थापन करणे
७. मसाला प्रक्रिया उद्योग स्थापन करणे

**क) समाज कल्याण विभाग (जि. प.)**

१. अपंगासाठी बीज भांडवल योजना.

**ड) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित.**

१. महिला सशक्तकिरण योजना
२. केद्रं पूरस्कृत योजना
३. मुदती कर्ज योजना

**इ) महिला व बाल कल्याण विभाग**

१. व्यक्तिगत अनुदान योजना
२. महिला प्रशिक्षण केंद्र चालवणे करीता अर्थसहाय्य

उ) नेहरु युवा संघटन यांच्या योजना
ज) सैतिक कल्याण विभाग
च) रेशीम संचालनालय

इतर विभागामार्फत उद्योगासाठी राबवण्यात येणाऱ्या योजना

१. क्रिडा व युवक संचालनालय
२. रोजगार व स्वयरोजगार विभाग
३. मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित
४. मत्स्य व्यवसाय विभाग
५. जिल्हा ग्रामीण विकास योजना
६. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित
७. महात्मा फुले मागासवर्गीय योजना
८. आदिवासी विकास विभाग
९. सामाजिक वनीकरण संचालनालय
१०.लोकशाही अन्नाभाऊ साठे विकास योजना
११.सार्वजनिक बांधकाम विभाग
१२.पशुसंवर्धन विभाग

## १२.४ उद्योजकता विकास विशेष संघटना

लघू उद्योग क्षेत्रामधील उद्योजकांच्या विविध गरजा भागविण्यासाठी हयांना सर्व शक्य ते साहयय करण्यासाठी आणि त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांची सोडवणुक करण्यासाठी अनेक संघटनांची स्थापना करण्यात आली आहे. मध्यवर्ती सरकार व राज्य सरकारचे कार्यक्रम हया संघटनांच्या माध्यमातून राबविले जातात.

१. उद्योजकत आणि लघू व्यवसाय विकासाकरिता राष्ट्रीय संस्था
२. राष्ट्रीय लघू उद्योग महामंडळ
३. महाराष्ट्र लघू उद्योग महामंडळ
४. लघू उद्योग विकास बँक

५. लघू उद्योग सेवा संस्था
६. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ
७. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ
८. महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणुक महामंडळ (सिकॉम)
९. महाराष्ट्र औद्योगिक आणि तांत्रिक संघटना
१०. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र

**१) उद्योजकता आणि लघू व्यवसाय विकासाकरीता राष्ट्रीय संस्था (The National Institure for Entreprenouship)**

ही संस्था भारत सरकारच्या १८६० च्या संस्थाच्या कायद्यामधील तरतुदीनुसार नोंदविण्यात आली आहे. या संस्थेने जुलै १९८३ मध्ये आपल्या कामाला प्रारंभ केला.

**संस्थेची उद्दिष्टे-**

१) उद्योजकता विकास प्रक्रियेला चालना देणे.
२) उद्योजकता विकास कार्यक्रम पाठविणाऱ्या संस्थाना मदत करणे.
३) संशोधन सहाय्य करणे
४) उद्योजकता विकास गुंतवलेल्या यंत्रणांना धोरणाची आखणी करणे.

**२) राष्ट्रीय लघुउद्योग – महामंडळ (National Small Industries Corporation)**

भारतातील लघू उद्योग क्षेत्रामधील उद्योजकतेचा विकास करण्याचा उद्देशाने १९५५ साली या संस्थेची स्थापना करण्यात आली. या महामंडळाची कार्ये खालील प्रमाणे आहेत.

१. कच्च्या मालाची आयात.
२. विकलेल्या मालाच्या तारणावर पतपूरवठा
३. निर्यातीकरीता साहय्य
४. आधुनिक तंत्रज्ञानाचे हस्तांतरण

**३) महाराष्ट्र लघूउद्योग महामंडळ (Maharashtra Small Industries Corporation)**

१९६२ साली महाराष्ट्र लघू उद्योग महामंडळाची स्थापना करण्यात आली. कंपनी कायद्याच्या तरतूदीनुसार या महामंडळाची सार्वजनिक प्रमंडळ म्हणून नोंदणी करण्यात आली आहे.

**महामंडळाचे कार्य**

१. लघु उद्योगांना कच्च्या मालाचा पूरवठा
२. लघु उद्योग क्षेत्रामध्ये उत्पादित होणाऱ्या वस्तूंचे विपणन
३. निर्यातीला प्रोत्साहन
४. हस्तकला उद्योगांचे संरक्षण व संवर्धन

### ४) लघु उद्योग विकास बँक (Small Industries Development Bank of India)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर फोर्ड फाऊन्डेशनच्या अभ्यास गटाने केलेल्या शिफारशीनुसार भारताच्या अर्थव्यवस्थेतील लघु उद्योग क्षेत्र सुद्ढ व्हावे आणि लघू उद्योगांना सर्व शक्य ती मदत करता यावी, याकरीता देशात विविध संस्थाची स्थापना करण्यात आली.लघू उद्योग विकास बँक ही अशाच संस्थापैकी एक संस्था आहे. भारत सरकारने लघू उद्योग विकास बँकेची १९९० मध्ये स्थापना केली प्रस्तूत संस्था केद्रींय पातळीवरुन कार्य करते.

### ५) लघु उद्योग सेवा संस्था ( Small Industries Services Institute)

भारतात लघु उद्योग क्षेत्राचा सर्वागीण विकास घडवून आणण्यासाठी तीनपदरी उपाययोजना करण्याची गरज लक्षात घेऊन १९२४ साली भारतात राष्ट्रीय पातळीवरुन काम करण्याकरीता लघू उद्योग सेवासंस्थेचे कार्य

१. माहिती पूरविणे
२. सल्ला देणे
३. तांत्रिक प्रशिक्षण देणे.
४. विक्रि वाढविण्यासाठी मदत करणे.
५. परीक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देणे.
६. प्रकल्प अहवाल तयार करणे.
७. लघुउद्योग क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या संस्थाशी सहकार्य करणे.

### ६) महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (Maharashtra State Finance Corporation)

देशातील सर्व राज्यामंध्ये राज्य वित्तीय महामंडळे कार्य करीत आहेत. १९६२ पासून महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाची कार्य करीत आहे, या महामंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये १९६४ पासून गोवा राज्य व दमण या केंद्रशासित प्रदेशाचा समावेश करण्यात आला. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ हे भारतीय औद्योगिक वित्तीय महामंडळाचीच प्रतिकृती आहे. महाराष्ट्र राज्यामधील मध्यम उद्योगांना आणि लघू उद्योगांना जमीन, इमारत, यंत्रसामुग्री अशी विविध प्रकारची स्थिर स्वरुपाची संपत्ती खरेदी करणे शक्य व्हावे, याकरिता या उद्योगांना दिर्घमुदतीचा कर्जपरूरवठा करणे हे या महामंडळाचे कार्य आहे.

### ७) मराहाष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (Maharashtra State Industrial Development Corporation) (MIDC)

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने प्रत्येक जिल्हयामध्ये कमीतकमी एक औद्योगिक क्षेत्र स्थापन करुन तेथे उद्योगांना आवश्यक असलेल्या सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत ३१ मार्च १९९९ पर्यंत राज्य सरकारने अधिसुचित केलेल्या औद्योगिक केंद्राची संख्या २७० होती. यामध्ये ९४ मोठी औद्योगिक क्षेत्र, राज्य सरकारची ६२ विकास केंद्रे, केंद्र सरकारची ५ विकास केद्रें व १०९ लघु औद्योगिक क्षेत्रांचा अंतर्भाव आहे. महामंडळाच्या ताब्यात सुमारे ५१,०९९ हेक्टर जमीन आहे.

**महामंडळाची कार्ये**

१. तयार शेड्स व गाळे पूरविणे
२. पाणीपूरवठा व सस्ते उपलब्ध करून देणे.
३. रासायनिक उद्योग स्थापणे.
४. इलेक्ट्रॉनिक्स विभागांची निर्मीती.
५. प्रदूषित सांडपाण्याची निचरा व्यवस्था करणे.
६. पंचवाराकीत औद्योगिक क्षेत्राची स्थापना करणे
७. भुखंडाचे वाटप करणे
८. औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योगांची स्थापना.

## ८) महाराष्ट्र राज्य, औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ( सिकॉम) (State Industrial and Investment Corporation)

महाराष्ट्राच्या मागास भागात उद्योजकांना उद्योग स्थापन करण्यासाठी अभिप्रेरीत करुन त्यांना सर्व प्रकारचे मार्गदर्शन व मदत करण्यासाठी एका स्वतंत्र व प्रभावी सरकारी यंत्रणेची गरज लक्षात घेऊन उद्योजकांची ही गरज भागविण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने १९६६ साली महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळाची स्थापना केली.
सिकॉमची कार्ये

**अ) वित्तीय कार्ये**

१. उद्योगांना स्थिर संपत्ती निर्माण करण्यासाठी दिर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणे.
२. उद्योगांच्या भागभांडवलामध्ये प्रत्यक्ष योगदान करणे.
३. मर्चट बँकिंग सेवा प्रदान करणे.

**ब) विकासात्मक कार्ये**

१. उद्योजकांना प्रकल्पांची निवड करणेबाबत सल्ला देणे.
२. तांत्रिक अहवाल तयार करणेस मदत करणे.
३. जागेची निवड करुन देणे.
४. मागास भागात उद्योगांचे प्रवर्तन करणे
५. उद्योगांना मुलभूत व संरचनात्मक सोयी निर्माण करून देणे.

## ९) महाराष्ट्र औद्योगिक आणि तांत्रिक संघटना (Maharashtra Industrial and Technical Consultancy Organisation) (मीटकॉन)

लघुउद्योग आणि मध्यमा उद्योग क्षेत्रामधील उद्योजकांना, त्यांच्या गरजेनुसार व तत्परतेने तंत्रज्ञानाविषयक सल्ला प्राप्त न्हावा हे उदिष्ट दृष्टीसमोर ठेऊन १९८२ मध्ये महाराष्ट्र इंडस्टियल ॲन्ड टेक्निकल कन्सलटन्सी ऑर्गनायक्षेशन लिमीटेड या संस्थेची स्थापना करण्यात आली.

**मिटकॉनची कार्ये**

१. उद्योगांचा विकास करणे.
२. उद्योगाच्या प्रकल्पाच्या रुपरेषेचे मुल्यमापन करणे.
३. उद्योजकांकरिता प्रकल्प अहवाल तयार करणे.
४. बाजारपेठेचे संशोधन करणे
५. उद्योजकांना प्रशासनविषयक सल्ला देणे

### १०) महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (Maharashtra Centre for Entrepioneurship Development)

१ ऑक्टोंबर १९८८ रोजी महाराष्ट्र सरकारने उद्योजकता विकास केन्द्रांची औरगांबाद येथे स्थापना केली.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केन्द्रांची कार्य

१. उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम
२. महिला उद्योजकतेस प्रोत्साहन
३. उद्योजकता परिचय कार्यक्रम

## १२.५ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१) केंद्र शासन पुरस्कृत अनुदान योजनेचे थोडक्यात स्पष्टीकरण लिहा.
२) जिल्हा उद्योग केंद्राची कार्ये स्पष्ट करा.
३) टिपा लिहा-
अ) मिटकॉन
ब) सीकॉम
क) एमआयडीसी

❖❖❖❖

# १३

# उद्योजकता प्रशिक्षण आणि विकास कार्यक्रम

## (Entrepreneurship Training and Development)

**घटक रचना :**

१३.१ प्रास्तविक

१३.२ उद्योजकता विकास म्हणजे काय ?

१३.३ उद्योजकता विकास कार्यक्रमांची उद्दिष्टे

१३.४ उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या पद्धती

१३.५ उद्योजकता विकास कार्यक्रमांचे महत्व.

१३.६ स्वअध्ययनासाठी प्रश्न

## १३.१ प्रस्तावना

प्रत्येक देशाचा आर्थिक विकास हा प्रामुख्याने त्या देशात असलेल्या उद्योजकांच्या संख्येवर त्यांच्या प्रकारावर दर्जावर, कार्यप्रवणतेवर आणि उद्योजकांनी केलेल्या प्रयत्नांच्या परिणाम कारकतेवर अवलंबून असतो. आर्थिक विकासाकरीता आवश्यक असलेल्या इतर सर्व गोष्टी विदेशातून आयात करता येतात उद्योजकीय गुणवत्ता व क्षमतेकरीता मात्र आपल्याला आपल्या समाजावरच अवलंबून राहवे लागते.

## १३.२ उद्योजकता विकास म्हणजे काय?

यशस्वी उद्योगकांची विशिष्ट मानसिकता असते त्यांच्या व्यक्तिमत्वाची व कार्यपध्दतीचीही कांही वेगळी वैशिष्टे असतात. ही मानसिकता व वैशिष्टये असलेल्या महत्वांकाशी व्यक्तिंची काळजीपूर्वक निवड करुन त्यांना व्यवस्थितपण प्रशिक्षण देण्यात आल्यास, तसेच त्यांना आवश्यक असलेले साहाय्य करण्यात आल्यास, नव्याने उद्योजक निर्माण केले जाऊ शकतात. नव्याने उद्योजक निर्माण करण्याच्या प्रक्रियेला उद्योजकता विकास असे म्हणतात. उद्योजकता विकासाचे प्रयत्न सातत्याने व निंरतरपणे करावे लागतात. उद्योजकता

विकास ही एक व्यापक स्वरुपाची शैक्षणिक प्रक्रिया असून देशाचा सर्वांगीण विकास दृष्टीसमोर ठेवून मानवी संशोधनाचा विकास करणे हे या प्रक्रियेचे अंतिम उद्दिष्ट आहे.

उद्योजकाना विकासाची प्रक्रिया प्रभावी ठरण्यासाठी समाजात अनुकूल वातावरण असणे आवश्यक आहे, हे वातावरण असे असावे की ज्यामुळे उद्योजकतेच्या क्षेत्रात प्रवेश करु इच्छिणाऱ्या व्यक्तींना ज्ञान संपादन करता येईल विभिन्न कौशल्ये अर्जित करता येतील, आपली कार्ये पार पाडता येतील. नवनवीन आच्छाने स्वीकारता येतील आणि आपला संकल्प सिध्द करता येईल उद्योजक बनवण्यासाठी आवश्यक असलेली मानसिक, प्रवृत्ती व योग्यता असलेल्या व्यक्तिचा शोध करुन त्यांना व्यवस्थितपणे प्रशिक्षण देण्यासाठी योजनाबध्द प्रयत्न करणे आवश्यक आहे हे प्रयत्न करण्याकरीता एक कालबध्द कार्यक्रम तयार केला जातो. या कार्यक्रमालाच उद्योजकता विकास कार्यक्रम असे म्हणतात. उद्योजकता विकास कार्यक्रमाची व्याख्या पूढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

“उद्योजक बनण्याकरीता इच्छुक असलेल्या व्यक्तिच्या उद्योजक बनण्याच्या हेतूला बळकटी आणण्यासाठी आणि त्या व्यक्तिला उद्योजकीय भुमिका परिणामकारकपणे पार पाडणे शक्य व्हावे याकरीता आवश्यक असलेली कौशल्ये व योग्यता अर्जित करता यावीत याकरीता साहाय्य करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कार्यक्रमाला उद्योजकता विकास कार्यक्रम असे म्हणतात.

## १३.३ उद्योजकता विकास कार्यक्रमांची उद्दिष्टे (Objectives of EDP)

योग्य व्यक्तींना शोधून त्यांचा उद्योजकीय क्षेत्रात प्रवेश व्हावा आणि त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या निटपणे पार पाडता पाण्यात याकरीता त्यांना तयार करणे, हा उद्योजकता विकास कार्यक्रमाचा मुळ हेतू होय या दृष्टीने उद्योजकता विकास कर्यक्रमाची उद्दिष्टे पूढील प्रमाणे सांगता येतील

१) यशस्वी उद्योजक बनण्यासाठी आवश्यक असलेली मानसिकता, योग्यता व गुणवैशिष्टये असलेल्या आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात प्रवेश करण्याची आकांक्षा असलेल्या व्यक्तिचा शोध घेणे.

२) या व्यक्तिंना पध्दतशीर प्रशिक्षण देणे.

३) इच्छुक व्यक्तिंना उद्योजकांना आवश्यक असलेले ज्ञान मिळविण्यासाठी, कौशल्ये अर्जित करण्यासाठी व योग्यता विकासित करण्यासाठी सर्वतोपरी साहाय्य करणे

४) उद्योगांचे संचालन व व्यवस्थापन करणेसाठी उद्योजकामध्ये आवश्यक योग्यता निर्माण करणे.

५) प्रशिक्षण संपल्यानंतर उद्योजकांना विविध प्रकारे साहाय्य करणे.

६) उद्योजकांमध्ये त्याच्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी आवश्यक असलेली क्षमता निर्माण करणे इत्यादी उद्योजकता विकास कार्यक्रमाची उद्दिष्टे आहेत.

## १३.४ उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या अवस्था / पध्दती (Execution)

उद्योजकता विकास कार्यक्रमांची व्यापक उद्दिष्टे साध्य करुन घेण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी स्वीकारलेल्या यंत्रणेला सातत्याने व बरेच प्रयत्न करावे लागतात उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या ठळक अवस्था व प्रत्येक अवस्थेमध्ये करावे लागतात. उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या ठळक अवस्था व प्रत्येक अवस्थेमध्ये संबंधित यंत्रणेला करावे लागणारे प्रयत्न याबद्दल पूढे थोडक्यात स्पष्टीकरण केले आहे.

### १) आखणीची पध्दती

उद्योजकता विकास कार्यक्रम हा एक प्रशिक्षण कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाची आखणी काळजीपूर्वक व्हायला हवी पहिल्या अवस्थेमध्ये उद्योजकता विकास कार्यक्रमाची आखणी करण्याचे कार्य केले जात असल्यामुळे या अवस्थेला आखणीची अवस्था असे म्हणतात या अवस्थेमध्ये खालील कार्ये केली जातात.

(१) प्रशिक्षणाच्या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या सर्व भौतिक स्वरुपाच्या सोयींची जुळवाजुळव करणे.

(२) सौभाग्य उद्योजकाचा प्रकार किंवा प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्दिष्ट गट लक्षात घेऊन प्रशिक्षण तपशिल अभ्यास कार्यक्रम तयार करणे.

(३) अभ्यासक्रम शिकविण्यासाठी व्याख्याने व प्रशिक्षकांची योजना करणे.

(४) प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रशिक्षण घेऊ इच्छीणाऱ्या व्यक्तिची निवड करणे.

(५) प्रशिक्षणार्थ्यांची रीतसर निवड करण्यासाठी निवड समीती तयार करणे.

### २) प्रशिक्षण अवस्था (Training Phase)

उद्योजकता विकास कार्यक्रमाची आखणी शास्त्रशुध्द रीतीने होणे जेवढे आवश्यक आहे तेवढेच या कार्यक्रमाची अमंलबजावणी प्रभावी रीतीने करणे, हेही महत्वाचे आहे. उद्योजकता विकास कार्यक्रमांच्या दूसऱ्या अवस्थेमध्ये हा कार्यक्रम प्रत्यक्षात राबविला जातो. उद्योजक होण्यासाठी व्यक्तींना अभिप्रेरीत करणे विशिष्ट प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी त्यांना आवश्यक ते ज्ञान देणे, या व्यक्तीमध्ये उद्योजकतेकरीता आवश्यक असलेली कौशल्ये व क्षमता निर्माण करणे. इ. व्यापक हेतू दृष्टीसमोर ठेवून पहिल्या पिठीचे उद्योजक निर्माण केले जातात. प्रशिक्षण घेणाऱ्या व्यक्तिच्या मानसिकतेमध्ये वागणूकीमध्ये व व्यवहारामध्ये अपेक्षित बदल घडून येत आहेत किंवा नाही याबद्दल प्रशिक्षक लक्ष ठेवून असतात.

### ३) मुल्यांकन पध्दती (Post Training Phase)

उद्योजकता विकास कार्यक्रमांची ही तिसरी व शेवटची अवस्था असते. या विशिष्ट अवस्थेमध्ये उद्योजकता विकास कार्यक्रमाचे मुल्यांकन केले जाते. कार्यक्रमांचे मुल्यांकन कुणी व कसे करावयाचे हा या संदर्भात महत्वाचा प्रश्न आहे. उद्योजकता विकास कार्यक्रमांचे आयोजन करणारी यंत्रणा स्वतः वरिपठ अधिकाऱ्यांच्या व तज्ञ्यांच्या साहाय्याने मुल्यमापनाचे कार्य करु शकते किंवा ही जबाबदारी एखादया स्वतंत्र यंत्रणेकडे सोपवली जाऊ शकते.

## १३.५ उद्योजकता विकास कार्यक्रमांचे महत्व (Importance of EPD)

भारतामधील विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात उद्योजकता विकास कार्यक्रमाचे महत्व पूढे थोडक्यात स्पष्ट केले आहे.

### १) अपारपारिक स्त्रोतामधुन उद्योजकीय प्रतिभेचा अविष्कार

डेव्हीड मॅक्लेलँड यांचे उद्योजकतेच्या क्षेत्रामधील मौलिक स्वरुपाचे वैचारिक योगदान आणि काकीनाडा प्रयोगाची निष्पत्ती सिध्द झाल्यांनतर योग्य मानसिकता प्रवृत्ती व योग्यता असलेल्या व्यक्तिंना प्रशिक्षण दिल्यास अशा व्यक्ती उद्योजक बनू शकतात हे स्पष्ट झाले. पूर्वी उद्योजकतेची उत्पत्ती कुटुंबाच्या व्यावसायिक पार्श्र्वभुमीशी निगडीत होती. त्यामुळे उद्योजकतेचे स्त्रोत हे अशी पार्श्र्वभुमी आर्थिक सुबत्ता अनुभव व योग्य संपर्क लाभलेल्या निवडक जाती जमाती व कुटुंबापूरते मर्यादीत होते. हे स्त्रोत मर्यादित असल्यामुळे, देशात महत्वाकांक्षा उद्योजकांचा पूरवठा फार सीमीत होतो. भारतासारख्या देशाचा प्रचंड भोगोलिक आकार, विभिन्न संशोधनाची उपलब्धता अत्यंत वेगाने वाढणारी लोकसंख्या देशामधील विस्तृत बाजारपेठा सर्व प्रकाराच्या वस्तूंचे उत्पादन वाढविण्याची निकड इ. कारणांमुळे उद्योजकांची गरज व उद्योजकांची मागणी मोठी होती. त्यामानाने परंपरागत स्त्रोतांमधून घडून येणारा उद्योजकांचा पूरवठा अत्यंत कमी असल्यामुळे आपल्या देशाचे जलद गतीने औद्योगिकरण घडून आले नाही. व्यक्तीमध्ये विशिष्ट प्रवृत्ती व योग्यता असल्यास या व्यक्तींना योग्य प्रशिक्षण देण्यात आल्यास व त्यांना आवश्यक ती मदत मिळाल्यास अशा स्वतंत्र उद्योगाची स्थापना करु शकतात. हे कार्य तसे फार अवघड आहे पण विभिन्न पावळयांवर उद्योजकता विकास कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आल्यास उद्योजकाचाा पूरवठा वाठविता येतो. आपल्या देशात उद्योजकता विकास कार्यक्रमांमुळे आर्थिक व सामाजिक क्रांतीच्या प्रक्रियेला मोठी चालना मिळाली आहे. उद्योजकता विकास कार्यक्रमामुळेच समाजव्यवस्थेच्या खालच्या पातळयावर असलेल्या मागात जाती व जमातीमधील महत्वाकांक्षी तरुण उद्योजक बनू लागले आहेत. मागास जाती व जमातीमधून पहिल्या पिठीचे उद्योजक निर्माण होण्याची प्रक्रिया आर्थिक दृष्टिने महत्वाची आहे. पण प्रक्रियेचे सामाजिक परिणाम हे अतिशय महत्वाचे आहेत. उद्योजकता विकास कार्यक्रमांमुळे भारतात सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा वेग वाढला आहे, यात शंका नाही.

### २) रोजगार निर्मीती

बेकारीची समस्या ही देशाला भेडसावणारी गंभीर समस्या आहे ही बेकारीची समस्या व्यापक व सर्वकष आहे. अशिक्षिताप्रमाणेच उच्चविद्याविभूषित, अप्रशिक्षितांप्रमाणेच वैज्ञानिक व तंत्रज्ञ अशा लक्षावधी व्यक्तीव्य हातांना व मेंदूना काम नाही. देशाचा आर्थिक विकास मंद वेगाने होत असल्यामुळे आणि दुसऱ्या बाजूने लोकसंख्या झपाटयाने वाढत असल्यामुळे बेकारीच्या समस्येची भीषणता वाढली आहे. विभिन्न कारणांमुळे संघटित व मोठया उद्योगाच्या क्षेत्रात उत्पन्न होणाऱ्या रोजगार संधीचे क्षेत्र अतिशय मर्यादितआहे हे उघड आहे. उद्योजकता विकास कार्यक्रमांच्या अमंलबजावणीमुळे समाजातील सर्व स्तरांमधील व्यक्तींना स्वतःच्या मालकीचे उद्योग सुरु करणे शक्य झाले आहे त्यामुळे उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये प्रवेश करणाऱ्या या महत्वाकांक्षी तरुणांना काम तर मिळतेच पण शिवाय या तरुणांनी स्थापन केलेल्या उद्योगांमध्ये अनेक बेकार व्यक्तींना रोजगार प्राप्त होतो. उद्योजकता विकास कार्यक्रम हा राष्ट्रीय

अर्थव्यवस्थेमधील अनौपचारिक व असंघटित क्षेत्राला सुदृढ करीत असल्यामुळे हा कार्यक्रम बेकारीचा प्रश्न काही प्रमाणात सोडविण्यासाठी निश्चितपणे साहय्यक ठरेल.

**३)** मागास प्रदेशामध्ये उपलब्ध असलेल्या संशोधनांचा विपूलता आहे. आर्थिक नियोजनाचे तंत्र उपयोगात आणून विकास साधण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत त्यालाही आता ५१वर्षे झालीत पण बहुतेक राज्यांमधील नैसर्गिक साधन संपत्तीचा हवा तसा उपयोग घडून न आल्यामुळे ही राज्ये व प्रदेश अजूनही विकासाच्या मार्गावर रेंगाळत आहेत. बाहेरच्या राज्यातील उभोगपतीनी मोठया प्रमाणावर भांडवल गुतवणूक करुन कांही मोठया प्रकल्पांची स्थापना केली तर मॉडेल म्हणून ते ठीक आहे. स्थानिक उद्योजकांचा मोठया प्रमाणावर सहभाग असल्याशिवाय मागास भागांमध्ये सुदृढ आधारावर औद्योगिकरण घडून येणे व त्याचा वेग वाढणे संभवत नाही. उद्योजकता विकास कार्यक्रमांची अमलबजावणी केल्यामुळे, मागास राज्यांमध्ये व मागास राज्यांमध्ये व मागास प्रदेशांमध्ये नव्याने उद्योजक तयार होतात या उद्योजकांजवळ मर्यादित वित्तीय संशोधने असल्यामुळे स्वाभाविकपणे ते ज्या उद्योगांमध्ये त्या भागात आढळणारा कच्चा माल व सामग्रीचा उपयोग करणे शक्य आहे. अशा लघू उद्योगांची स्थापना करतात. अशा रीतीने उद्योजकता विकास कार्यक्रम हे विभिन्न राज्यांमध्ये व प्रदेशांमध्ये स्थानिक उद्योजकांची पहिली पिढी तयार करतात आणि त्याबरोबरच या भागांमध्ये असलेला कच्चा माल व इतर सामग्रीचा उपयोग घडून येण्यासाठी साहाय्यक असतात.

## ४) संतुलित प्रादेशिक विकास

आपल्या देशात आजवर संघटित क्षेत्रामध्ये स्थापन झालेले मोठे उद्योग हे प्राधान्याने पूढारलेल्या रांज्यामध्ये तेही कांही ठराविक प्रदेशांमध्य, स्थापन झाले आहेत त्यामुळे जो आर्थिक विकास घडून आला, तो असंतुलित स्वरुपाचा आहे , दिवसें दिवस प्रादेशिक असमतोल वाढतच आहे. मोठया उद्योगांच स्थापना करण्यासाठी मोठया प्रमाणावर भांडवल गुतवणूक करावी लागते. देशामधील निवडक व बडया औद्योगिक घराण्यांमधील उद्योगपतीजवळच असे सामर्थ्य असते. जास्तीत जास्त नफा कमविण्याचे उद्दिष्ट असल्यामुळे मोठया उद्योगांची स्थापना सर्व दृष्टींनी प्रगत असलेल्या राज्यांमध्ये व प्रदेशामध्येच केली जाते. अशा उद्योगांच्या स्थापनेमुळे हया प्रदेशांच्या आर्थिक विकासाला चालता मिळत असली तरी प्रादेशिक असमतोल व आर्थिक सत्ता व संपत्तीचे केद्रीकरण घडून येते. लघू उद्योगांची स्थापना करण्यासाठी मर्यादित भांडवल लागते. उद्योजकांना पूर्वीचा अनुभव नसला तरी ते त्यांच्या उद्योगांचे नीट संचालन करु शकतात मागास प्रदेशांमधील उद्योजक त्यांच्याच प्रदेशामंध्ये लघू उद्योगाची स्थापना करतात. उद्योजकता विकास कार्यक्रम प्रभावीपणे कार्यान्वित करण्यात आल्यास ग्रामीण औद्योगिकरणाची गती वाढते, संतूलित प्रादेशिक विकास साधता येतो आणि मुठभर व्यक्तीच्या हातात घडून येणारे आर्थिक सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण ही कांही प्रमाणात टाळता येते.

## ५) समाजातील असंतोष व सामाजिक तणावांचे निराकरण

समाजातील असंतोष व सामाजिक तणावांची कारणे वेगवेगळी आहेत. पूढे नमुद केलेल्या कांही कारणांमुळे ही परिस्थिती उद्रेकांच्या स्थितीकडे वेगाने सरकत आहे.

१. सरकारने राबविलेल्या उदारीकरण खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या धोरणांमुळे आपल्या देशात भाडवलशाही अर्थव्यवस्थेचा आधार विस्तृत झाला असून या व्यवस्थेची पाळेमुळे फार खोलवर गेली आहेत.

२. आर्थिक सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण घडून आले आहे. आर्थिक सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण घडून आले आहे. आर्थिक विषमता वाढली आहे.

३. बेकारीची समस्या अत्यंत उग्र स्वरूपात आहे.

४. प्रादेशिक असमतोल वाढत आहे.

५. प्रचलित शिक्षणव्यवस्थेची सर्वाच्या प्रत्ययाला आली आहे.

६. शमाजाला योग्य दिशा दाखविण्यासाठी राजकीय नेतृत्व अपयशी ठरले आहे.

७. सामाजिक परिवर्तनांची गती फार धीमी आहे.

८. अपारंपारिक स्त्रोतामधून उद्योजकीय प्रतिभेचा अविष्कार घडून येईल.

## १३.६ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१) उद्योजकता विकास म्हणजे काय ? उद्योजकता विकास कार्यक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट करा.
२) उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या पद्धती विषद करा.
३) उद्योजकता विकास कार्यक्रमाचे महत्त्व लिहा.

❖❖❖❖

# १४

# भारतीय उद्योजकासमोरील आव्हाने प्रश्न आणि अडचणी (Problems and Difficulties)

**घटक रचना :**

१४.१ प्रस्तावना
१४.२ विपणनाचा प्रश्न
१४.३ मनुष्य बळ संसाधनाचा प्रश्न
१४.४ उत्पादनाचा प्रश्न
१४.५ संशोधनाचा प्रश्न
१४.६ इतर प्रश्न
१४.७ स्वअध्ययनासाठी प्रश्न

## १४.१ प्रस्तावना

भारताच्या अर्थकारणामध्ये आणि आर्थिक विकासामध्ये उद्योजकांची भूमिका फार महत्त्वाची आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उद्योजगाच्या भुमिकेच्या महत्त्वाबद्दलचे आकलन उत्तरोत्तर वाढत गेले. त्यामुळेच देशात लघू उद्योग क्षेत्राची निरंतर व निकोप वाढ घडून यावी आणि त्या माध्यमातून रोजगाराच्या संधी विपूल प्रमाणात निर्माण व्हाव्यात, याकरिता सरकारी पातळीवरुन विविध संस्था निर्माण करण्यात आल्या लघू उद्योगांच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या संरचनात्मक सोयी निर्माण करण्याकरिता प्रयत्न करण्यात आले. लघू उद्योजकांना विभिन्न सवलती प्रदान करण्यात आल्या आणि त्यांना विविध प्रकारे साहाय्य करण्यात आले. लघू उद्योग क्षेत्राच्या विकासाकरिता सरकारी पातळीवरुन करण्यात आलेल्या सर्वकष उपाययोजनेमुळे आणि उद्योजकांनी त्यांच्या परीने केलेल्या प्रयत्नांमुळे देशात लघू उद्योग क्षेत्राच्या परिमाणात्मक विकास घडून आला. परंतु रोजगारनिर्मिती, उपभोग्य वस्तूंच्या उत्पादन पातळीमध्ये वाढ, राष्ट्रीय उत्पन्नाच्या वृद्धीमध्ये योगदान होय.

## १४.२ विपणनाचा प्रश्न (Problem of Marketing)

जसजसा काळ व्यतीत होतो तसतशी परिस्थिती बदलते आणि जसजशी परिस्थिती बदलते तसतशा उद्योग क्षेत्रापुढे काही नवीन समस्या उभ्या ठाकतात. आणि काही जुन्या

समस्याची तीव्रता अधिकाधिक वाढत जाते. अलिकडे भारतामधील लघूउद्योग क्षेत्राला भेडसावणाऱ्या काही समस्या अत्यंत गुतागुंतीच्या झाल्या आहेत व या समस्यांची तीव्रताही अतोनात वाढली आहे. विपणनाची समस्या उद्योग क्षेत्राला भेडसावणारी अशीच एक गंभीर व महत्त्वाची समस्या आहे.

पाच-सहा दशकापूर्वी देशामधील उद्योजकांची व उद्योगाची संख्या मोजकी होती. बाजारपेठांचे भौगोलिक क्षेत्र मर्यादित होते, उद्योजक व ग्राहक यामध्ये थेट संबंध होता व ग्राहकाच्या आवडी, गरजा, अपेक्षा किमंत देण्याची त्यांची क्षमता, याबद्दल उद्योजकांना व्यवस्थित माहिती मिळत होती. या माहितीच्या आधारावर उद्योजक उत्पादनाशी संबंधीत त्यांचे सर्व निर्णय घेत असत. त्यावेळेस उपभोगाकरीता उत्पादन केले जात होते. त्यामुळे लघुउद्योजकापुढे त्यांच्या उद्योगांमध्ये उत्पादन करण्यात आलेल्या वस्तू कुठे कोणाला कशा व कोणत्या किमतीवर विकायच्या ही समस्याच नव्हती.

उद्योजकांना भेडसावणाऱ्या विपणन समस्येच्या विभिन्न पैलूबद्दल पूढे थोडक्यात विवेचन केले आहे.

१) उद्योगामध्ये उत्पादित होणाऱ्या वस्तूचा दर्जा विभिन्न बाबीवर अवलंबून असतो. या बाबीमध्ये उत्पादन कार्यामध्ये उपयोगात आणल्या जाणाऱ्या कच्च्या मालाचा दर्जा ही महत्त्वाची बाब आहे. उद्योगांच्या हव्या असलेल्या दर्जाचा कच्चा माल मिळवीतांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अनेकदा संबंधित उद्योजकांनी आवश्यक ते प्रयत्न केल्या नंतरही त्यांना अपेक्षित दर्जाचा कच्चा माल मिळू शकत नाही. त्यामुळे या लघू उद्योजकांना निर्धारित दर्जापेक्षा कमी दर्जाचा कच्चा माल खरेदी करणे भाग पडते. याचा उत्पादित वस्तूच्या दर्जावर अपरिहार्यपणे विपरित परिणाम होतो. निर्धारीत दर्जापेक्षा कमी दर्जाच्या वस्तू पूर्वीच्याच किमतीवर विकण्यात आल्यामुळे, संबंधित उद्योगाच्या विश्वसनीयतेला जबर धक्का बसतो. कालांतराने या वस्तूची विक्री घसरते. वस्तूंचे काही ग्राहक कायमचे गमावले जातात आणि बाजारपेठेमध्ये तीव्र स्पर्धा असल्यास. त्या स्पर्धेमध्ये टिकून राहणे अनेक लघू उद्योगांना शक्य होत नाही.

२) उद्योगांना भेडसावणारी उत्पादित वस्तूंच्या विपणनाची समस्या या उद्योगांमध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तूंच्या दर्जाशी निगडीत आहे. लघू उद्योगामध्ये उत्पादित होणाऱ्या वस्तूंचा दर्जा हा एका बाजूने तेथे उपयोगात आणल्या जाणाऱ्या यंत्रसामग्रीचा प्रकार व दर्जा कामगारांची कार्यक्षमता व कौशल्य आणि पर्यवेक्षण व्यवस्थेच्या परिणामकारकतेवर अवलंबून आहे.

३) शास्त्रीय संशोधनाच्या प्रगतीमुळे लघू उद्योगामध्ये वावरले जाणारे उत्पादन तंत्र व यंत्रसामुग्रीच्या प्रकारामध्ये बदल घडून येतात. भारतामधील बहुसंख्याक उद्योगामध्ये अद्यावत उत्पादनतंत्र उपयोगात आणले जात नाही. या उद्योगामध्ये उपयोगात आणली जाणारी यंत्रसामग्रीही तुलनेने जुनी असते. परिणामतः या लघू उद्योगांमध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तूंचा दर्जा श्रेष्ठ नसतो. उत्पादनाचा खर्चही जास्त असतो. या प्रकारच्या वस्तू बाजारपेठे मध्ये मोठ्या उद्योगामध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तूंशी स्पर्धा करु शकत नाहीत.

४) प्रत्येक उद्योगामध्ये मोजकेच कामगार काम करतात. उद्योगामध्ये काम करणारे बहुसंख्यांक कामगर अप्रशिक्षित व अकुशल असतात. या कामगारांकडून वेळोवेळी अपघात होतात. सामग्रीची नासधूस होते. आणि शिवाय या कामगारांच्या कार्यक्षमतेची पातळी कमालीची कमी असते.

५) प्रत्येक उद्योगाची उत्पादकता ही काही प्रमाणात तरी या उद्योगामधील पर्यवेक्षण व्यवस्था अभावानेच आढळते. ज्या लघू उद्योगामध्ये पर्यवेक्षणाची व्यवस्था अस्तित्वात असते, तेथे ती अत्यंत जुजबी स्वरुपात असते.

६) जुने उत्पादनतंत्र व जुनी यंत्रसामुग्री, अप्रशिक्षित व अकुशल कामगार आणि परिणामकारक पर्यवेक्षण व्यवस्थेचा अभाव या कारणांमुळे लघू उद्योगामध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तूंचा दर्जा श्रेष्ठ नसतो. लघू उद्योगांमध्ये प्रामुख्याने उपभोग्य, ग्राहकापयोगी वस्तूंचे उत्पादन केले जाते. अलिकडे आपल्या देशामधील ग्राहक हे सुशिक्षित व चिकित्सक बनले आहेत. त्यांचे जवळ खर्च करण्यासाठी पुरेशी कार्यशक्ती आहे आणि जीवनमान वाढविण्याकरीता आतूर झालेले हे ग्राहक वस्तूच्या दर्जाबाबत तडजोड न करण्याच्याच मनोवृत्तीचे आहेत.

७) वस्तूचे अल्प प्रमाणावर करण्यात येणारे उत्पादन हे सर्व लघू उद्योगांच्या संचालनाचे एक महत्त्वाचे व्यवच्छेदक असे लक्षण आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये उत्पादनाचे परिमाण आणि उत्पादनाचा सरासरी खर्च यामध्ये व्यस्त स्वरुपाचा संबंध असतो. उत्पादनाचे परिमाण जेवढे कमी असेल, तेवढा प्रत्येक एकेकामागे उत्पादन खर्च जास्त असतो. या कारणामुळेच लघू उद्योगामध्ये उत्पादनाचा दर एककामागे उत्पादनाचा खर्च जास्त असतो, तर मोठ्या उद्योगामध्ये उत्पादनाचे कार्य मोठ्या प्रमाणावर करण्यात येत असल्यामुळे, दर एककामागे उत्पादनाचा खर्च कमी असतो. त्यामुळे लघू उद्योगांमध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तूंची बाजार किंमत तुलनेने जास्त असते. लघू उद्योगांमध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तूंना मोठ्या उद्योगांमध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तूंशी बाजारपेठेमध्ये अपरिहार्यपणे स्पर्धा करावी लागते. या कारणांमुळे सुद्धा लघू उद्योगांमध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तूंची विपणनसमस्या बिकट होते. या वस्तूंकरिता ग्राहक जास्त किंमत देण्यासाठी तयार होत नसतील, तर त्यात अस्वाभाविक असे काय आहे.

८) बाजारपेठेवर अनेक शक्तीचा परिणाम होतो. त्यामुळे बाजारपेठेमधील परिस्थितीमध्ये फार काळ स्थैर्य राहू शकत नाही. ग्राहकांच्या खरेदी व्यवहारावरही प्रत्यही अनेक गोष्टींचा परिणाम होतो. ग्राहकाच्या अपेक्षा त्याची आवड, चालीरिती व कौशल्य नेहमी बदलत असतात. व्यावसायिक यश मिळविण्यासाठी प्रत्येक उद्योजकाने विपणन व उत्पादनामध्ये सर्व अंगानी आलेल्या बदलांचा विचार करुन, उद्योजकांनी त्यांच्या उद्योगामध्ये उत्पादन झालेल्या वस्तूंचा, दर्जा व गुण वैशिष्ट यामध्ये परिवर्तन घडवून आणणे आवश्यक आहे.

९) बाजारपेठेच्या अभ्यास करण्याकरिता, बाजारपेठेचे संशोधन करण्याकरिता बाजारपेठेवर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा शोध घेण्याकरीता तसेच ग्राहकांचा बदललेली माणसिकता जाणून घेण्याकरीता जे पद्धतशीर प्रयत्न केले जातात. त्यांना बाजारपेठ संशोधन असे म्हणतात. बाजारपेठे संशोधन हे एक तंत्र आहे. ती एक पद्धती पद्धतशीर प्रक्रीया आहे. बहूसंख्याक लघूउद्योजक बाजार संशोधनाच्या तंत्राचा उपयोग करुन घेत नाहीत. याची काही ठळक कारणे पूढीलप्रमाणे आहेत.

अ) अनेक लघू उद्योजकांचे बाजारपेठ संशोधन तंत्राबद्दल अज्ञान आहे.

ब) काही लघू उद्योजक बाजारपेठ संशोधनाच्या तंत्राचा प्रत्यक्षात उपयोग करुन घेण्याबाबत उदासीन असतात.

क) उद्योजकांची वित्तीय संसाधने फार मर्यादीत असतात.

१०) लघू उद्योजकांच्या बाबतीत उत्पादन व विपणन कार्यामध्ये उत्कृष्ठ समन्वय निर्माण होण्यासाठी लघूउद्योजकांनी एक कार्यक्षम विक्रीसंघटना उभारणे व या व्यवहारात कौशल्याने उपयोग करुन घेणे आवश्यक असते. प्रत्यक्षात लघू उद्योजक स्वतःची विक्रय संघटना उभारण्याचा विचार करीत नाहीत व काही प्रसंगी काही लघुउद्योजकांनी तसा विचार केला तरी प्रत्यक्ष व्यवहारात त्यांना तसे करणे शक्य हात नाही. असे घडून येण्यासाठी पूढील कारणे जबाबदार आहेत.

१) बहुतेक लघूउद्योग त्यांच्या वस्तू स्थानिक किंवा जिल्हा बाजारपेठेत किंवा लगतच्या मोठ्या शहरात विकण्याचा प्रयत्न करतात.

२) लघू उद्योगामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संस्था मोजकी असते.

## १४.३ मनुष्य बळ संसाधनाचा समस्या (Problem of Human Resource)

कारखानदारांकडून उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारांचे शोषण, कामगारांवर होणारा अन्याय, उद्योगपती किंवा उद्योगांचे व्यवस्थापन आणि कामगार यामधील ताणलेले संबंधी कामगारांना देण्यात येणारी वागणुक, संदेशवाहन व्यवस्थेचे अपयश, कामगार संघटनाचा वाढता प्रभाव, कामगार संघटनेचे धोरण, अशा विविध कारणांमुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये श्रम समस्यांचा उद्भव होतो. मोठ्या उद्योगांमध्ये श्रम समस्यांचा उद्भव ही सामान्य बाब असते. शिवाय मोठ्या उद्योगांची विभिन्न वैशिष्ट्ये श्रम समस्यांचा उत्पत्तीला कारणीभूत ठरतात. लघू उद्योगांची विविध वैशिष्ट्ये या क्षेत्रात श्रम समस्या निर्माण न होण्यासाठी मदत करतात. उद्योग क्षेत्रामध्ये उद्भवणाऱ्या श्रमसमस्यांची काही प्रमुख स्वरुपे थोडक्यात विशद केली आहेत.

१) आधुनिक काळात लघू उद्योगांमध्ये विविध प्रकारच्या यंत्राचा उपयोग करुन घेतला जातो. लघूउद्योग उद्योजकांना उत्पादनाचा खर्च कमी करण्यासाठी अद्यावत यंत्राचा शक्य तेवढा उपयोग करुन घेणे आवश्यक आहे. या यंत्रावर काम करण्यासाठी प्रशिक्षित व कुशल कामगारांची गरज असते. लहान गावामध्ये तसेच ग्रामीण प्रदेशामध्ये असे कामगार मिळत नाहीत. त्याकरिता लहान गावांमधील व ग्रामीण प्रदेशातील लघू उद्योजकांना विशेष प्रयत्न करावे लागतात.

२) उद्योगामध्ये काम करणारे अनेक कामगार अप्रशिक्षित अशिक्षित व ग्रामीण पार्श्वभूमी असलेली असतात. असे कामगार नियमांचे काटेकोर पालन करीत नाहीत. या कामगारांची व्यवस्थापनाला पूर्वसूचना न देता गैरहजर राहण्याची प्रवृत्ती असते. काही कामगारांच्या वारंवार गैरहजर राहण्यामुळे उत्पादनाचे कार्य विस्कळीत होते.

३) उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगाराकरिता मजूरीचा दर निश्चित असतो. कामगारांना विशिष्ट दराने मजूरी देण्याचे लघू उद्योजकांवर बंधन असते. अनेक उद्योजक ठरलेल्या

दरापेक्षा कमी दराने कामगारांना मजूरी देतात. शिवाय कामगारांकडून जास्त काळ काम करवून घेण्याकडेही त्यांचा कल असतो. लघू उद्योगांमध्ये काम करणारे कामगार ज्या परिस्थितीमध्ये त्याचे काम करतात, ती परिस्थिती ही समाधानकारक नसते. या सर्वच बाबी कामगारांच्या मनात असंतोष निर्माण करण्यासाठी कारणीभूत ठरतात. कामगारांच्या मनात उत्पन्न होणाऱ्या असंतोष प्लेगच्या रोगासारखा असतो. प्लेगप्रमाणे कामगारांच्या मनातील असंतोष जंगलातील वणव्यासारखा पसरतो.

४) अनेक लघूउद्योजक कामगारांशी संबंधित कायद्यामधील तरतूदींचे पालन करीत नाहीत. कामगार त्यांच्या भाकरीसाठी आपल्यावर पूर्णपणे अवलंबून आहेत. आपण त्यांना मजूरी देतो म्हणून कामगारांच्या घरांमधील चुली पेटतात. काही कामगारांच्या मनात असंतोष असला तरी तो पाण्यामधील बुडबुड्यासारखा असतो अशी या उद्योगाची धारणा असते.

## १४.४ उत्पादनाचा प्रश्न (Problem of Production)

भारतासारख्या विकसनशिल देशांमधील लघू उद्योगांना भेडसावणारी एक महत्त्वाची समस्या तंत्रज्ञानाच्या पातळीशी संबंधीत आहे. भारतामधील उद्योगांच्या विकासाकरीता सर्व प्रकारचे प्रयत्न केल्यानंतरही, या उद्योगांच्या अर्थकारणामध्ये लक्षणीय सुधारणा घडून आली नाही. ही परिस्थिती निर्माण होण्यासाठी कारणीभूत असलेल्या कारणांमध्ये, लघुउद्योग क्षेत्रामध्ये उपयोगात आणले जाणारे जुने तंत्रज्ञान हे एक महत्त्वाचे कारण आहे. भारतात उद्योगक्षेत्रामध्ये प्रामुख्याने जुने तंत्रज्ञान उपयोगात आणले जाते. त्यामुळे लघू उद्योगांमध्ये उपयोगात आणले जाणारे उत्पादनाचे तंत्र जुने आहे. या उद्योगांमध्ये जी तंत्रे वापरली जातात, ती जुनी आहेत. कामगारसुद्धा जुनी उपकरणेंच हाताळतात.

लघू उद्योगामध्ये जुने उत्पादनतंत्र उपयोगात आणले जात असल्यामुळे या उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची कार्यक्षमता कमी असते. सामग्रीचा अपव्यय होतो, अपघात होतात, उत्पादनाचा दर्जा घसरतो. उत्पादनाच्या खर्चामध्ये वाढ होते आणि उत्पादकतेची पातळी कमालीची कमी असते.

लघू उद्योगांना आवश्यक असलेले प्रगत तंत्रज्ञान विदेशांतून आयात करता यते. पण आपल्या देशातील उद्योजकाजवळ तेवढे आर्थिक सामर्थ्य शास्त्रीय ज्ञान व प्रशिक्षित तसेच कुशल कामगार नाहीत. उद्योग क्षेत्रामधील तंत्रज्ञानाची पातळी आहे तशीच राहिली तर लघू उद्योगांच्या विकासाकरीता विविध प्रकारची उपाययोजना केल्यानंतरही देशामधील लघू उद्योगांच्या अर्थकारणामध्ये मुलभूत सुधारणा घडून येणार नाही. तंत्रज्ञानाच्या संदर्भात आतापर्यंत आपल्यासमोर दोन पर्याय होत. प्रगत तंत्रज्ञान विकत घेणे किंवा देशात आपल्याला हवे असलेले तंत्रज्ञान विकसित करणे. या दोनही पर्यायांचे गुणदोष आहेत.

## १४.५ संशोधनाचा प्रश्न (Problem of Research)

भारतामधील उद्योजक विकसीत देशाच्या तुलनेत संशोधनावर खुप कमी खर्च करतात. भारतीय उद्योजक व भारतीय व्यवस्थापनाने संशोधनास दुय्यम महत्त्व दिले गेले आहे. तर इतर देशात संशोधनास प्रथम महत्त्व देण्यात येते.

उद्योजकता विकास कार्यक्रम हा उद्योगातील होणाऱ्या संशोधन कार्यावर अवलंबून असते. एखाद्या क्षेत्रात झालेले आधुनिक संशोधन हे त्या क्षेत्रातील प्रगतीशी कारणीभूत असते. संशोधन प्रक्रीया व संशोधनाचा सोयी सुविधा. संशोधनातील आवड आणि संशोधनाच्या प्रेरणादायी योजना याचा प्रश्न भारतामध्ये उद्योजकांना असतो.

## १४.६ इतर प्रश्न

वरील समस्येव्यतीरिक्त उद्योजकासमोर खालील काही समस्या स्पष्ट केली आहेत.

**अ) मोठ्या उद्योगांशी स्पर्धा :**

मध्यवर्ती सरकारने लघू उद्योगांकरीता ८४० वस्तूंचे उत्पादन राखीव ठेवले आहे. या वस्तूंचे उत्पादन लघूउद्योग क्षेत्राकरीता सुरक्षित ठेवण्यात आले आहे. लघू उद्योगाच्या विकासाकरिता सरकारी पातळीवरुन विविध प्रकारचे प्रयत्न केले जात असले तरी देशातील बहूसंख्याक लघू उद्योगांच्या अर्थकारणांमध्ये फारशी सुधारणा घडून आल्याचे आढळत नाही. या परिस्थितीला कारणीभूत असलेले एक महत्त्वाचे कारण म्हणजे लघू उद्योगांना मोठ्या उद्योगाशी करावी लागणारी स्पर्धा हे होय.

**ब) अकार्यक्षम व्यवस्थापन :**

लघू उद्योग आजारी का पडतात. आजारी लघू उद्योग बंद का पडतात. या प्रश्नांची चिकित्सा करण्याचे प्रयत्न सरकारी संघटना, यंत्रणा, विशेषज्ञ व संशोधकानी केले आहेत. या प्रयत्नांची निष्पत्ती म्हणून जे अभ्यास किंवा अहवाल प्रसिद्ध झाले आहेत, त्यामध्ये लघू उद्योगाच्या आजारपणाची विविध कारणे आढळतात.

## १४.६ स्वअध्ययनासाठी प्रश्न

१) उद्योजकांसमोरील विपणन विषयक आणि उत्पादन विषयक येणाऱ्या अडचणी विशद करा.
२) मनुष्यबळ संसाधन व संशोधनाचा प्रश्न उद्योजकतेवर कसा परिणाम करतो ते लिहा.

❖❖❖❖

# १५

# भारतीय स्त्री उद्योजक
## (Women Entrepreneurs in India)

**घटक रचना :**

१५.१ प्रास्तविक

१५.२ स्त्री उद्योजक

१५.३ स्त्री उद्योजकांची कार्ये

१५.४ स्त्रियांची उद्योजकता

१५.५ स्त्री उद्योजकांची वैशिष्ट्ये

१५.६ स्त्री उद्योजकांचे प्रकार (Types of Women Entrepreneurs)

१५.७ स्त्री उद्योजकांचे मानचित्र (Profile of Women Entrepreneurs)

१५.८ स्त्री उद्योजकांचे अभिप्रेरण (Motivation of Women Entrepreneurs)

१५.९ स्वअध्ययनासाठी प्रश्न

## १५.१ प्रास्ताविक

पुरुष आणि स्त्रिया - हे दोघेही समाजव्यवस्थेचे घटक दोघांचीही निश्रित भूमिका आहे आणि ती परस्पंराना पूरक अशीच आहे. हया दोनही वर्गाच्या भूमिकांच्या परस्परपूरकतेवर प्रत्येक कुटूंबाचे अस्तित्व व प्रगती आणि प्रत्येक समाजाचे स्वास्थ व उज्वती अवलंबून असते. पण आपली समाजव्यवस्था पुरुषप्रधान आहे. जी संस्कृती आपल्या समाजात विकसित झाली, ती पण पुरुषांना केन्द्रस्थानी मानणारी, पुरुषांचे वर्चस्व मान्य करणारी, पुरुषांना अमर्यादित अधिकार बहाल करणारी तर दुसऱ्या बाजूने स्त्रियाना विभिन्न बंधनामध्ये जखडणारी अशी आहे. लिंकन यांनी लोकशाहीचे वर्णन लोंकाचे, लोकांकडून चालविण्यात येणारे आणि लोकांकरिता असलेले राज्य असे केले होते. वर्षानुवर्षापासून रुढ झालेल्या आपल्या समाजव्यवस्थेचे वर्णनही पुरुषांची पूरुंषाकरीता चालविण्यात येणारी व पुरुषांकरिताच असलेली व्यवस्था असे अत्यंत समर्पकपणे केले जावू शकते.

वैदिक काळात स्त्रियाना पूरुषांबरोबर हक्क होते. स्त्रियांना वैद्यध्ययनाचाही अधिकार होता. मार्गी, मैत्रेयी, घोषा, लोपामूद्रा या ब्रह्वादिनी स्त्रियांनी विद्त्तेचे / आदर्श प्रस्थापित केले होते “यत्र नार्यस्तू पूज्यन्ते ! रमन्ते तत्र देवता:”! असे म्हणून मनूने स्त्रियाचा गौरव केला

होता. हा मर्यादित कालखंड संपल्यानंतर आपल्या देशातील स्त्रिंयाचा जो प्रवास सूरु झाला, तो गुलामगिरीतून अधिक गुलामगीरीकडे, अन्यायाकडून अधिक अन्यायाकडे आणि शोषणाकडे, असाच होता.

स्त्री ही शक्ती आहे' असे आम्ही म्हणतो, पण खरे म्हणजे हे वाक्य फक्त टाळया घेण्याकरिताच असते प्रत्यक्ष व्यवहाराची त्याचा अजिबात संबंध नसतो, पूरुषांच्या ट्रस्टीने स्त्री हा करमणूकीचा विषय आहे. तर कुटूंबाला वारस देण्याची जबाबदारी तिच्यावर आहे काही ठिकाणी तर स्त्रियांना कुटूंबाची एक प्रकारची चल संपत्ती मानली जात असे. स्त्रिंयाना भोगवस्तू मानले जात होते आजही मानले जाते पूरुषाचा मृत्यू झाल्यानंतर पूर्वी त्याच्या पत्नीला सती जाण्यासाठी भाग पाडून जीवन जगण्याचाही अधिकार नाकारण्यात येत असे ब्रिटिशांनी सतीप्रथा बंद केली. अलिकडे स्त्रियांना आपण अधिकृतपणे सती बनवीत आहे पण स्त्री ने माहेरुन भरपूर हूंडा न आणल्यास, सासूची आज्ञापालन न केल्यास पतीची म्हणावी तशी सेवा न केल्यास अत्यंत संपन्न कुटूंबातही स्त्रिया राजरोप्तपणे जाळल्या जातात, समाजाने स्त्रियांना घरांमध्ये कोंडून इतके दूर्बल बनविले आहेत की हया स्त्रियांना उंबरठयाच्या बाहेर बलात्काराला सामोरे जावे लागते.

स्वांतत्र्यप्राप्तीनंतर आपल्या देशात सर्वांगिण बदल घडून येत आहेत आर्थिक विकासाचा संदर्भात आपण खून प्रगती केली आहे शास्त्री य संशोधनाच्या क्षेत्रातही आपण केलेली प्रगती नेत्रदीपक ठरेल असी आहे एस.टी. सर्वत्र पोचली. शिक्षणाच्या क्षेत्रात आपण आघाडी घेतली आहे. स्त्रियांना शिक्षणाच्या निःशूल्क सोयी उपलब्ध करुन देेण्यात आल्या आहेत. अनेक सामाजिक सूधारणा घडून आल्या आहेत राजकीय इस्थि कोणातून विचार केल्यास लोक आता जागरुक झाले आहेत. हया परिस्थितीच्या पार्श्वभूमीवरच आपल्या देशातील स्त्रिया सर्व क्षेत्रामध्ये सक्रिय होतांना आढळून येतात. औद्योगिक उद्योजकता हे क्षेत्र कालपरवापर्यंत पूरुंषाकरिता जणू कांही राखून ठेवलेले- स्त्रियांकरिता प्रतिबंधक असलेले. असे क्षेत्र होते. परिवर्तनाच्या प्रक्रियेपासून हे क्षेत्रही आता अस्पर्शित राहिलेले नाही. आपल्या देशात अलीकडे स्त्री उद्योगकत्तेचे अस्तित्व नव्याने निर्माण झाले आहे आपल्या देशातील स्त्री - उद्योजकतेच्या विभिन्न पैल्लूबद्दल पूढे थोडक्यात चर्चा केली आहे

## १५.२ स्त्री उद्योजक :

उद्योजकांची भूमिका आणि उद्योजकांना वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या कार्यांबद्दल इतरत्र विस्तुत विवेचन करण्यात आले आहे. उद्योजकता हा पूरुषांच्या प्रांत आहे. पूरुषांच्या कर्तव्याकरिता राखून ठेवलेले ते क्षेत्र आहे. अशी धारणा पूर्वी होती ही स्थिता तिसऱ्या जगातील विकसनशील देशामध्येंच होती असे नाही अत्यंत प्रगत देंशामध्ये व अलत समाजांमध्येही हयापेक्षा कांही फार भिन्न परिस्थिती नव्हती. पण अलिकडच्या I दशकांचा कालखंडात, वादळाच्या वेगात आणि वादळाच्याच पध्दतीने, अनेक बदल घडून आले आहेत. बदल घडून येण्याची प्रक्रिया अजूनही सुरु आहे.

उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये एंकदरीत पूरुषांचे वर्चस्व असले तरी स्त्रियांनीही उद्योगकतेची निकोप वाढ व्हावी हयाकरिता प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे. आपल्या परीने योगदान केले आहे.

प्रत्येक यशस्वी उद्योजकामागे निश्चितपणे एक स्त्री असते. कधी ही स्त्री हया उद्योजकाची आई असेल. कधी ही स्त्री हया उद्योगकाची पत्नी असेल. कधी ही स्त्री त्याची मूलगी असेल तर कधी ही स्त्री त्या उद्योजकाची प्रेयसी असेल. स्त्रिया महत्वाकांक्षी पूरूषांना उद्योजक बनवण्याकरीता प्रवृत्त करतात. त्यांना हया क्षेत्रात मोठेमोठी आवाहने स्वीकारण्याकरिता अभिप्रेरित करतात, हे खरे आहे अलिकडे विकसित व विकसनशील अशा दोन्ही समाजामध्ये स्त्रिया स्वतः पुढाकार घेवून उद्योजकांची भूमिका पार पाडण्यासाठी सिह झाल्या आहेत. आज की उद्योजक ही एक वास्तवता आहे

स्त्री उद्योजक म्हणजे काय ?(उद्योजक हया संज्ञेची बेटकी व्याख्या करणे तसेच अवघड आहे ' स्त्री - उद्योजक आणि स्त्रियांची उद्योजकता हया संज्ञांची वाख्या करणे तसेच अवघड आहे.

जेव्हा एखादी महत्वाकांक्षी आणि अभिप्रेरित स्त्री पूढाकार घेवून उद्योजकाची भूमिका स्वीकारते आणि ही भूमिका पार पाडण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करते, तेव्हा अशी स्त्रीला स्त्री उद्योजक असे म्हणता येईल. स्त्री - उद्योजक म्हणजे अशी स्त्री जी एखादया उद्योगाची स्थापना करते उद्योगाचे संचालन करते किंवा त्या उद्योगाला यशस्वी करण्यासाठी कांही कार्याची जबाबदारी पार पाडते. उंद्योजकांवर अनेक कार्याची जबाबदारी असते स्त्री उद्योजकांची उद्योगाच्या स्थापनापासून हया सर्वच कार्याची जबाबदारी पार पाडणे आवश्यक नसते स्त्री उद्योंजकांचे कार्यक्षेत्र परिस्थितीनुसार कमी जास्त होवू शकते किंवा बदलू शकते

## १५. ३ स्त्री उद्योजकांची कार्ये

उद्योजकांच्या विविध कार्याबद्दल हयापूर्वी विस्ताराने चर्चा केली आहे. सैध्दांतिक दृष्टीकोणातून विचार केल्यास. पण पूरुष उद्योजकांची कार्ये वेगळी व स्त्री उद्योजकोची कार्ये वेगळी असे म्हणता येणार नाही. त्यामुळे स्त्री उद्योजकांनाही उद्योजकांच्या सर्व कार्यांची जबाबदारी स्वीकारुन ती पार पाडण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करावे लागतात. सामान्यपणे स्त्री उद्योजक ज्या प्रकारच्या उद्योंगाची स्थापना करतात. ते उद्योग लघू उद्योगांच्या क्षेत्रात समाविष्ट होणार, ठराविक प्रकारचे व मर्यादित प्रमाणावर उत्पादन करणारे असतात.

### स्त्री उद्योजकांची प्रमूख कार्ये पूढीलप्रमाणे आहेत

१. योग्य व्यावसायिक संधीचा शोध घेवून कोणत्या प्रकारच्या व कशा उद्योगाची स्थापना करावयाची हया संबधीच्या निर्णय घेणे.

२. सर्व औपचारिक बाबींची पूर्णता करुन उद्योगाची रीतसर स्थापना घडेवून आणणे.

३. जोखीमीची जबाबदारी स्वीकारणे व आर्थिक अनिश्रिततेमूळे उद्‍भवणाऱ्या समस्यांची सोडवणूक करणे.

४. उद्योगाची गरज विचारात घेवून भांडवल उभारणी करणे व उद्योगाची वित्तीय गरज भागविणे

५. विविध मार्गांनी नवनिर्मिती घडवून आणणे आणि हया नवनिर्मितीचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग करुन घेवून उद्योगाची उत्पादकता वाढविणे.

६. उद्योगाचे प्रशासन करणे आणि उद्योगाच्या सर्व क्रियावर नियंत्रण ठेवणे.

७. उद्योगाचे नेतृत्व करणे आणि उद्योगाचा निंरतर विकास घडवून यावा हयाकरिता वेळोवळी आवश्यक ते प्रयत्न करणे.

उद्योगाचा आकार लहान असला तरी स्त्री उद्योजक ही सर्व कार्ये स्वतः करु शकत नाही. स्त्री उद्योजकांना कुटूंबातील सभासंदाची तज्ज्ञांची व अनुभवी साहाय्यकांनी मदत घ्यावी लागते. आपले कार्यक्षेत्र किती विस्तृत करावयाचे किंवा किती मर्यादित करावयाचे हयाचा निर्णय स्त्री उद्योजकांनाच घ्यावयाचा असतो.

## १५.४ स्त्रियाची उद्योजकता :

स्त्रियांची उद्योजकता म्हणजे स्त्रियांनी स्थापन केलेले किंवा स्त्रिंयाकडून ज्यांचा कारभार संचलित होतो असे उद्योग. भारताच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास स्त्रिंयानी उद्योजकता हे स्त्रिंयाच्या कर्तृत्वासाठी नण्याने उपलब्धन झालेले क्षेत्र आहे.

पुरुषांनी उद्योजकता आणि स्त्रियाची उद्योजकता यामध्ये तसे कोणतेही मूलभूत अंतर नाही असे असले तरी स्त्री उद्योजकांना उद्योजकतेचा क्षेत्रामध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रवत्त करणाऱ्या प्रेरणाही वेगळया आहेत. स्त्री उद्योजकांचे इंतरापेक्षा वेगळे प्रश्न आहेत आणि स्त्री उद्योंजकांना सरकारी यंत्रणांकडून कांही वेगळया मदतीची पण अपेक्षा आहे हया सर्व बाबी विचारात घेता. स्त्री उद्योजक आणि स्त्रियाची उद्योजकता यांचा सर्व पातळयांवरुन स्वंतत्रपणे विचार होण्याची फार निकड आहे.

भारतात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्री उद्योजक महत्वपूर्ण योगदान करु शकतात, ही बाब दीर्घकाळापर्यंत दुर्लक्षित राहीली. परिणामतः भारत सरकारला औद्योगिक धारेणाविषयक ठराव करीत असताना स्त्री उद्योजकांची तसेच त्यांच्या समस्यांचा विचार अव्याची किंवा स्त्री उद्योजकांना विशेष सवलती प्रदान अव्याची, गरज जाणवली नाही. स्त्रियांच्या जागतिक व राष्ट्रीय स्तरावरील परिषदांमधून करण्यात आलेल्या मागण्याचे पडसाद सर्वत्र उमटले १९९१ साली औद्योगिक धोरणविषयक जागामध्ये स्त्रियांच्या उद्योजकतेबाबत प्रथमच विचार करण्यात आला. हया आवरमध्ये स्त्री उद्योजकांच्या उद्योगाची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली.

एखादा उद्योग हा स्त्री उद्योजकाचा उद्योग आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी पूढील अटी निर्धारित करण्यात आल्या.

१. हया उद्योगाची मालकी व नियंत्रण स्त्रीकडे असावे.
२. उद्योगाच्या भांडवलामध्ये किमान ५१ टक्के भांडवल हे स्त्रियानी पूरविलेले असावे.
३. हया उद्योगांमध्ये निर्माण होणाऱ्या रोजगारापैकी किमान ९१ टक्के रोजगार स्त्रियांना दिलेला असावा.

एखादा उद्योग हा स्त्री उद्योजकांचा उद्योग आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी सरकारने ठरविलेल्या व वर उल्लेख करण्यात आलेल्या अटीमध्ये किती औचित्प आहे, हे तपासून

पाहण्याची फार गरज आहे हया सर्व अटी पूर्ण करण्याचा आग्रह धरल्यामुळे स्त्रियाच्या उद्योजकतेचे क्षेत्र वाढण्याऐवजी उलट ते संकुचित झाले.

स्त्री उद्योजकांच्या उद्योगाची जी व्याख्या करण्यात आली आहे. ती स्त्रियाच्या उद्योजकतेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अडथळा ठरु शकते. ही बाब लक्षात आल्यानंतर भारत सरकारने हया व्याख्येमध्ये सूधारणा केली. स्त्री उद्योजकांचा उद्योगांची ही सूधारित व्याख्या पूढीलप्रमाणे आहे.

उपरोक्त व्याख्येमधील महत्त्वाच्या बाबीत पुढे उल्लेख केला आहे.

१) स्त्रियांचे उपक्रम हे लघु उद्योग, उद्योगांशी संबंधित सेवा किंवा व्यावसायिक उपक्रम- हया स्वरुपाचे असू शकतात.

२) स्त्रियांच्या उद्योगांचे संघटन व्यक्तिगत मालकिचे उपक्रम, भागीदारी, सहकारी संस्था किंवा खाजगी मर्यादित संस्था - हयापैकी कोणत्याही पध्दतीने करण्यात आले असावे

३) स्त्रियांच्या उद्योगाचा कारभार प्रत्यक्षात भांडवल. व्यक्तिशः किंवा संयूक्तपणे : किमान ५१ टक्के असणे आवश्यक आहे.

उद्योगांच्या व्यवस्थापनामध्ये सर्वोच्च पातळीवर चालणारी निर्णय प्रक्रिया महत्त्वाची असते. हया निर्णयामूळेच उद्योगाची मालकी व नियंत्रण निश्रित होते आणि त्या उद्योगाचे यश किंवा अपयश प्रभावित होते. स्त्रियाच्या उद्योजकतेची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्याच्या दृष्टीने उद्योगाच्या वरच्या पातळीवरील निर्णयप्रक्रियेमध्ये स्त्रियांचा जास्तीतजास्त सहभाग असावा. सरकारकडून स्त्री उद्योजकांचया उद्योगांना विशेष सवलती देत असतांना उद्योगाची मालकी, उद्योगाचे नियंत्रण, भांडवल उभारणीत स्त्रियांचा वाटा, हया बाबीबरोबरच निर्णय - प्रक्रियेतील स्त्रियांचा प्रत्यक्ष सहभाग. हया निकषाचाही आवर्जून विचार करण्यात यावा. उद्योगांच्या संचलनात व कारभारात स्त्री उद्योजकांची भूमिका प्रत्यक्ष व थेट असावी. हया उपक्रमाचे नेतृत्व स्त्री उद्योजकांकडेच असावे. कळसूत्री बाहुल्यांसारखी कधीच नसावी, तर हा खेळ दाखविणाऱ्या कलाकारांसारखी असावी.

## १५.५ स्त्री उद्योजकांची वैशिष्टये

### १) पूरुषांचा पाठिंबा - उद्योजकतेचा आधारः-

स्त्रियांची उद्योजकता प्रामूख्याने पूरुषांच्या पाठिंब्यावर आधारित आहे स्त्री उद्योजकांची मालकी असलेल्या अनेक उद्योगांमध्ये स्त्रियांचे अस्तित्व फक्त नाममात्र स्वरुपाचेच आहे. असा उद्योगांमध्ये स्त्रियांचे नाव पुढे करुन, स्वरुपाचेच आहे अशा उद्योगांमध्ये स्त्रियांचे नांव पुढे करुन, कामदोपत्री स्त्रियांचे नांव दाखवून, सर्व व्यवहार पूरुषांकरवीच केले जातात. काही मोजक्या उद्योगांमध्ये स्त्री उद्योजक सक्रिय आहेत. पण येथेही स्त्री उद्योजक पूरुष नातलग व पूरुष साहाय्यकांच्य मार्गदर्शनावर आणि पांठिब्यांवर संपूर्णपणे विसंबून असावे हे वेगळे.

## २) आर्थिक संकल्पनेची कौटुंबिक पार्श्र्वभूमी :

आपल्या देशातील बहुतांशी स्त्री लद्योगक हया मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय किंवा श्रींमत कुटूंबातूनच आल्या आहेत. उच्च सामाजिक स्थान आणि आर्थिक संपन्नता अशी हया स्त्री उद्योजकांची कौंटुबिंक पार्श्र्वभूमी आहे. अनेक स्त्री उद्योजकांच्या बाबतीत तर माहेरी व सासरी अशा दोन्ही ठिकाणी व्यापार, व्यवसाय व उद्योनांची परंपरा आणि आर्थिक समृध्दी असतेे.

## ३) उद्योजकीय प्रेरणांची भिन्नता :-

भारतामधील पूरूष उद्योजकांच्या तूलनेत स्त्री उद्योजकांच्या प्रेरणा फार वेगळया आहेत. विधायक कार्यामध्ये स्वतःला व्यस्त ठेवणे, स्वतःची आवड जोपासणे. आर्थिक स्वातंत्र्य मिळविणे. शन्मान व प्रतिष्ठा मिळविणे. हया स्त्री उद्योजकांच्या प्रमूख प्रेरणा आहेत.

## ४) अभिप्रेरणावर अनेक घटकांचा परिणाम:-

स्त्री उद्योजकांच्या अभिप्रेरणावर अनेक घटकांचा परिणाम होतो. हया घटकांचे वर्गीकरण स्थूलमानाने दोन प्रकारात करता येईल. पहिल्या वर्गामधील घटक स्त्रियांना उद्योजक बनण्यासाठी प्रेरित करतात तर दुसऱ्या वर्गामधील घटक स्त्रियांना उद्योजकांच्या मार्गावर ढकलतात. त्यांना उद्योजक बनवण्यासाठी भान पाडतात.

## ५) उद्योजकतेवर कौटुबिंक बाबींचा प्रभाव :

स्त्री उद्योजकांच्या बाबतीचे त्यांचे व्यक्तिगत जीवन त्यांच्या सासरची मंडळी, त्यांचे वैवाहिक जीवन, कौटुबिंक जीवन, हया सर्व बाबींचा त्यांच्या उद्योजक बनण्याच्या निर्णयावर, उद्योजक म्हणून कार्य करण्यावर, त्यांना अनूभवाला लागणाऱ्या अडचणींवर तसेच त्यांच्या व्यवसायिक यश किंवा अपयशावर निश्रितपणे परिणाम होतो.

## ६) सवलतीची उपलब्धता :

अलिकडे सरकारने विविध योजनाच्या माध्यमातून स्त्री उद्योजकांना अनेक सवलती उपलब्ध करुन दिल्या आहेत. भविष्यकाळात आणखीही कांही सवलती उपलब्ध करुन दिल्या जातील हे उघड आहे. वेल जशी एखादया मोठया झाडाच्या आधाराने वाढते. तशीच भारतामधील स्त्रियांची उद्योजकता ही सरकारी यंत्रणानी स्त्री उद्योजकांना उपलब्ध करुन दिलेला विरोध सवलतीच्या आधारावर वाढते आहे.

## ७) कार्यक्षमतेचा कस लागायचा आहे:

भारतामधील स्त्रियांची उद्योजकता एका बाजूने पूरुषांचा पाठिंब्याने आणि दूसऱ्या बाजूने सरकारी यंत्रणानी दिलेल्या विशेष सवलींतीच्या आधारावर वाढते आहे. हे वास्तव मान्य केल्यास स्त्री उद्योजकांच्या प्रेरणांच्या सच्चेपणाचा आणि स्त्री उद्योजकांच्या अर्थक्षमतेचा कस अजन लाभायचा आहे, असा निष्कर्ष काढता येईल.

## ८) पहिला पिढीची उद्योजकता :

आपल्या देशातील स्त्रियांची उद्योजकता ही प्रामुख्याने पहिल्या पिढीची उद्योजकता आहे. मागच्या पिढीतही काही स्त्री उद्योजक उदा. शिपिंग कॉर्पेरेशनच्या श्रीमती मोरारजी, होत्या, पण अशी उदहारणे फार मोजकी व आवाहात्मक स्वरुपाची आहे.

**९) लघु उद्योग क्षेत्रापुरती मर्यादित :**

स्त्रियांची उद्योजकता ही प्रामुख्याने लघु उद्योगांच्या क्षेत्रांपुरतीच मर्यादित आहे. स्त्रियांची साक्षरता, स्त्रियांमधील शिक्षणाचे प्रमाण स्त्रियांच्या दृष्टीने आर्थिक स्वातंत्र्याची निकड, राजकीय जागरुकता , राज्य सरकारांचे स्त्री उद्योजकांच्या बाबतीत असलेले धोरण- हया सर्व बाबींचा स्त्रियांच्या उद्योजकतेवर परिमाण होता. आपल्या देशात इतर राज्यांच्या तुलनेत केरळ आणि महाराष्ट्र हया दोन राज्यांमध्ये स्त्रियांचा उद्योजकतेची चळवळ धरतांना दृष्टीला पडते.

**१०) वेगळे प्रश्न :**

उद्योजकांपूढे जे प्रश्न आहेत ते स्त्री उद्योजकांपूढेही निश्रितच आहेत पण त्या शिवाय भारतामधील स्त्री उद्योजकांपूढे काही वेगळे प्ररतही आहेत. हया वेगळया प्ररताचे महत्वाचे कारण स्त्री असणे हेच आहे.

## १५.६ स्त्री उद्योजकांचे प्रकार (Types of women Entrepreneurs)

**१) अभिप्रेरित आणि प्रशिलित स्त्री उद्योजक :**

अलिकडे आपल्या देशात स्त्रियांच्या अद्योजकतेचा विकास करण्यासाठी सरकारी पातळीवरुन विशेष प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. १) ज्या स्त्रियाचे उद्योजक होण्याकरिता आवश्यक असलेली प्रवृत्ती, गुण व महत्वाकांक्षा आहे अशा स्त्रियाचा शोध घेणे, २) मूलाखत व विविध चाचाण्यांच्या माध्यमातून उद्योजकीय योग्यता असलेल्या स्त्रियांची निवड केल्यानंतर, हया स्त्रियांना उद्योजकता विकास कार्यक्रमांमध्ये रीतसर सहभागी करुन घेऊन - त्यांना पध्दतशीर प्रशिक्षण देणे, आणि ३) उद्योजकतेचे प्रशिक्षण घेतलेल्या स्त्रियाना उद्योगांची स्थापना करण्यासाठी सर्वतीपरी साहाय्य करणे, त्यांना विभिन्न यंत्रणाकडुन वित्तीय व इतर मदत मिळवून देणे आणि त्यांच्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे.

**२)अशिक्षित स्त्री उद्योजकः-**

अनेकदा परुष उद्योकांचा आकस्मिकपणे मृत्ये होतो. हया उद्योजकांना वयात आलेला व उद्योगाची जबाबदारी सांभाळू शकेल असा मुलगा नसल्यास , हया उद्योजकांनी स्थापना केलेल्या उद्योगांचे संचालन करण्याची जबाबदारी मयत झालेल्या उद्योजकांच्या पत्नीवर किंवा मूलीवर येऊन पडते. ऱ्या परिस्थितीमध्ये हया स्त्रियांना उद्योगाचे संचालन, करण्यासाठी, जबाबदारी स्वीकारण्याशिवाय दूसरा पर्याय नसतो. अशारीतीने परिस्थिच्या रेय्यामुळे काही स्त्रियांना उद्योजकांची जबाबदारी स्वीकारणे भाग पाडले.

परिस्थिच्या रेटयामुळे उद्योजक बनणाऱ्या हया स्त्री उद्योजकांचे कोणत्याही प्रकारचे प्रक्षिशण झालेले नसते. त्यांना उत्पादक प्रक्रियांबद्दल तांत्रिक ज्ञानही नसते पती किंवा वडील जिवंत असतांना त्याचेकडून हया स्त्रियांना उद्योगाच्या संचलनाबद्दल जी काही माहिती मिळाली असेल, त्या माहीतीच्या भरवशावर, जवळचे नातलग व विश्वासू कर्मचाऱ्यांनी मदत घेऊन, त्या आपली जबाबदारी निस्ठेने पार पाडण्याचा प्रयत्न करतात. अशा रीतीने उद्योजक बनलेल्या स्त्री उद्योजक उच्च विद्यविभूषित, बाजारपेठेमधील परिस्थितीची माहीती असलेल्या, स्वतंत्रपणे व

निर्भयतेने निर्णय घेण्याची क्षमता असणाऱ्या असल्या आणि त्यांना प्रामाणिक नातलग व विश्र्वासू सहकाऱ्याचे पूर्ण सहकार्य मिळाले, तर हया प्रकारच्या स्त्री उद्योजकांना व्यावसायिक यश मिळण्याची शक्यता असते. एरवी, परिस्थिमूळे उद्योजक बनलेल्या स्त्री उद्योजक उच्च विद्याविभूषित, बाजारपेठेमधील परिस्थितीची माहिती, असलेल्या, स्वतंत्रपणे व निर्भयपणे निर्णय घेण्याची क्षमता असणाऱ्या असल्या आणि त्यांना प्रामाणिक नातलग व विश्र्वासू सहकाऱ्याचे पूर्ण सहकार्य मिळेल, तर हया प्रकारच्या स्त्री उद्योजकांना व्यावसायिक पश मिळण्याची शक्यता असते. पूरवी परिस्थिमूळे उद्योजक बनलेल्या स्त्रियाना आकस्मिकपणे त्यांचेवर येऊन पडलेली जबाबदारी पार पाडणे शक्य होत नाही. हयाचा परिणाम अपरिहार्यपणे उद्योगाची मालकी बदलण्यात किंवा उद्योग बेहमीकरिता बंद पडण्यात घडून येतो व परिणामात संबंधित उद्योजक व समाज हया दोघांचेही नुकसान होते.

### ३) योगायोगाने उद्योजकतेच्या क्षेत्राकडे वळलेल्या स्त्री उद्योजक :

अपघातामुळे किंवा योगायोगामुळे कोणत्याही उद्योजकाला व्यवसायामध्ये यश मिळू शकत नाही, ही सूर्यप्रकाशाइतकी सत्य गोष्ट आहे. पण अपघातामुळे किंवा योगायोगामुळे एखादया पुरुषाचा किंवा स्त्रीचा उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये प्रवेश घडून येतो, हे मात्र सत्य आहे. अनेकदा काही स्त्रियांचा उद्योजक होण्याचा मुळीच हेतू नसतो त्यांनी हया बाबतीत कधीही विचार केलेला नसतो, तशी त्याची योजना तर अजिबात नसते, पण असे असूनही कुणी प्रोत्साहन दिल्यामुळे कुणी मदतीचा हात पूढे केल्यामुळे किंवा एखादया प्रकल्पांचा अमंलबजावणीमध्ये सहभागी करुन घेतल्यामुळे कांही स्त्रिया जीवनाच्या विशिष्ट वळणावर, उद्योजक होण्याचा निर्णय घेतात व हा निर्णय कार्यान्वित करतात. मग त्यांना आपली उद्योजकीय जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी स्वतःची साधने खर्ची करण्याशिवाय पर्याय नसतो. भारतासारख्या विकसतशील देशांमध्ये संधीचा तसा अभावच असतो, स्त्री पूरुषांना त्यांच्या गुणांची व प्रव्रतीची नेमकी जाण नसते, योग्य मार्गदर्शन करु शकणाऱ्या शक्षम व विश्र्वासू व्यक्ती तर अभावानेच आढळतात. त्यामुळे अनेक व्यक्ती इतरांचे अनुकरण घेतात. आपल्या देशात यशस्वी झालेल्या किंवा अयशस्वी झालेल्या अनेक उद्योजकांच्या जीवनात, त्यांनी उद्योजक होण्यासंबधी घेतलेल्या निर्णयामागे, असाच योगायोग असल्याचे आढळून येते, स्त्रियांच्या बाबतीत तर असे नेहमीच घडते.

योगायोगाने उद्योजक बनलेल्या स्त्री उद्योजकांना व्यावसायिक यश मिळण्याची शक्यता किती असते? योगायोगाने उद्योजक बनलेल्या स्त्री उद्योजकांची उद्योजक बनण्याची तशी महत्वकांक्षा नसते. जोखीम घेण्यासाठी त्यांची प्रवृत्ती व मानसिकता नसते. उत्पादनाचे तंत्र व उत्पादन प्रक्रियांबद्दल त्यांना माहिती नसते, आणि बाजारपेठेमधील परिस्थितबद्दल सुध्दा त्यांना अद्यावत माहिती नसते. हया सर्व बाबी लक्षात घेतल्यास योगायोगाने उद्योजक बनलेल्या स्त्री उद्योजकांना व्यावसायिक यश मिळण्याची शक्यता ही विव्वळ योगाथामावरच अवलंबून राहील. हया स्त्री उद्योजकांना ज्या व्यक्तींनी सल्ला दिला व मदत करण्याचे आश्र्वासन दिले, त्या व्यक्तींनी वास्तविकपणे साहाय्य केले.

हया स्त्री उद्योजकांजवळ पूरेशी साधने व विश्र्वासू कर्मचारी असले, त्यांना स्वतंत्रपणे निर्णय घेणे, विविध प्रकारच्या व्यक्तींशी सुसंवाद साधने, आपल्या अडचणीचें निराकरण करण्यासाठी इतरांचे सहकार्य मिळविणे आणि कर्मचाऱ्याकडूंन काम करुन घेणे. इ. कार्ये करता आली. तरच त्या विशिष्ट प्रकारच्या स्त्री उद्योजक व्यवसायामध्ये टिकून राहतात एरवी,

भरतीच्या वेळेस समुद्रातील एखादी मोठी लाट केल्यांना त्यांच्या नावेबरोबर नष्ट करुन निघून जाते. तसे व्यवसायातील एखादे संकटसुध्दा हया स्त्री उद्योजकांचे व्यवसायामधील अस्तित्व संपविण्याकरीता पर्याप्त ठरते.

**४) उद्योजक म्हणून नाममात्र अस्तित्व असलेल्या स्त्री उद्योजक :**

उद्योजकांजवळ पुरेसा पैसा गोळा झाल्यानंतर हया पैश्याची गुंतवणूक करत. व्यवसायाचा विस्तार कसा घडवून आणावयाचा, असा त्यांच्यापुढे प्रश्न असतो. एक तर हा पैसा त्याच उद्योगात गुंतवून उत्पादनाच्या परिणातात हवी तेवढी वाढ करता येते. पण अशा रीतीने उत्पादनात वाढ करण्यालाही शेवटी ठराविक मर्यादा असते, दुसऱ्या पर्याय नवीन उद्योग सुरु करण्याचा असतो आणि हा पर्याय पहिल्या पर्यायापेक्षा श्रेष्ठ असतो. अनेकदा पुरुष उद्योजक आपली पत्नी किंवा प्रसंगी मूलीच्या नावाने नवीन उद्योगाची स्थापना केल्यामुळे सरकारने स्त्री उद्योजकांना उपलब्ध करुन दिलेल्या सर्व विशेष सवलतीच्या अगदी सहजपणे फयदा घेतो. तसेच हया व्यक्तींना आपला बिनहिशेबी पैसा उत्पादन कार्यात ? व नवीन उद्योगाची स्थापना करुन आर्थिक समृध्दीचा मार्ग प्रशस्त करता येतो. बहुतेक उद्योजक आपल्या पत्नीच्या नावाने नियमितपणे पैसा हस्तांतरीत करीत असतात. हया पैशाचा उपयोग सुध्दा स्त्रियांच्या नावाने नवीन उद्योंगाची स्थापना करण्यासाठी करता येते. थोडक्यात, पुरुष उद्योजक विविध प्रकारचे फायदे मिळविण्यासाठी आपला पैसा गुंतवून पत्नीचा नावाने नवीन उद्योगांची स्थापना करतात. तांत्रिक दृस्टीकोणातून विचार केल्यास हया प्रकारे स्थापन होणारे उद्योग हे स्त्री उद्योजकांचे उद्योग मानले जातात. कामदोपत्री स्त्री उद्योजक हया अशा उद्योगांच्या मालक असतात. त्यांच्या नावानेच सर्व व्यवहार केले जातात त्यांच्या सहीनेच पैशाचे व्यवहार केले जातात. पण प्रत्यक्षात स्त्री उद्योजकांचे स्थान नाममात्र असते आणि हया स्त्री उद्योजकांची भूमिका एखादया कळसूत्री बाहुलीसारखीच असते. आपल्या देशातील स्त्री उद्योजकांच्या उद्योगांपैकी उनेक उद्योग हे हयाच प्रकारचे आहेत, ही वस्तुस्थिती आहे, अनेकदा यशस्वी व्यावसायिक (उदा. डॉक्टरर्स, कुत्राटदार इ.) वरिष्ट सरकारी अधिकारी , जमीनदार व बागायतदार आणि राजकीय पुढारा आपला इतर मार्गानी मिळवलेल्या पैशाची गुंतवणूक करण्यासाठी स्त्रियांच्या नावाने उद्योगाची स्थापना करतात आणि नंतर ते स्वतः अनुभवी व्यक्तीची मदत घेवून हया उद्योगांचा कारभार सांभाळतात.

पुरुषांनी स्त्रियांच्या नावाने उद्योगाची स्थापना केल्यास अशा उद्योगांना व्यावसायिक यश मिळण्याची चांगली शक्यता असते. यशस्वी उद्योजकांनीच हया उद्योगांची स्थापना केलेले असते. हया प्रकारला उद्योगकांजवळ भरपूर वित्तीय साधने असतात, त्यामुळे खेळत्या भांडवली कधीही उणीव भासत नाही. हया उद्योजकांना उत्पादनतंत्र बाजारपेठेमधील परिस्थिती, ग्राहकांच्या आवडती, विक्रेत्यांना अपेक्षा, सरकारची धोरणे, बाजारपेठेला प्रभावित करण्याबाबी, बाजारपेठेमधील परिस्थिती इ. गोष्टीची पुर्ण माहीती असते. शिवाय त्यांना सरकारने स्त्री उद्योजकांना जाहीर केलेल्या सर्व सवलतींच्या पुरेपूर उपयोग करुन घेता येतो. अशा विभिन्न कारणामुंळे स्त्रियाना पुढे करुन, त्यांच्या नावाने, स्थापन करण्यात आलेल्या उद्योगांना व्यावसायिक यश मिळवण्याची चांगली शक्यता असते.

यशस्वी पुरुष उद्योजकांनी तसेच भरपूर कमाई केलेल्या व्यावसायिकांनी स्त्रियाना पुढे करत, त्यांच्या नावावर, नवीन उद्योगाची स्थापना व उद्योगांमध्ये संचालन केल्यास, हया व्यक्तीची अल्पमुदतीची वैयक्तिक उदिष्टे साध्य होतात. हया प्रकारे स्थापन झालेल्या उद्योगांमुळे

कांही प्रमाणात रोजगारसंधीची निर्मिती होते व औद्येगीकरणाची गती वाढते. पण अशा प्रकारे स्थापन करण्यात आलेल्या उद्योगामुळे समाजात स्त्रियाच्या उद्योजकतेची निकोप वाढ घडून येते काय, हा हया संदर्भात उद्भवणारा एक महत्वाचा प्रश्न आहे . हया प्रश्नाचे निश्रित उत्तर नकारार्थी आहे. प्रत्येक विकसनशील समाजात स्त्रियांच्या उद्योजकतेची निकोप वाढ व्हायला हवी व त्यासाठी उद्योजक बनण्यासाठी तीव्र आकांशा असलेल्या, अभिप्रेरित, महत्वाकांक्षी, सूशिक्षित आणि प्रशिक्षित स्त्रियानीच पुढे येऊन विभिन्न सरकारी यंत्रणाच्या योजनांचा व्यवस्थित उपयोग करुन घेऊन समाजपयोगी प्रकल्प कार्यान्वित करायला हवेत.

## १५.७ स्त्री उद्दोजकांचे मानचित्र (Profile of Women Entrepreneurs)

भारतामधील स्त्री उद्दोजकांबाबत फारसे संशोधन करण्यात आलेले बसल्यामुळे, आपल्या देशात अलिकडे निर्माण झालेला हा स्त्री उद्योजकांचा वर्ग नेमका कसा आहे हयाबाबत विस्तृत माहिती उपलब्ध नाही. स्त्री उद्योजकाबाबत जी माहिती उपलब्ध आहे, त्याच माहीतीचा उपयोग करुन स्त्री उद्योजकांची काही सामान्य परिचयावर वैशिष्टये पुढे नमूद केलेली आहेत.

१) भारतातील स्त्री उद्योजक हया सामान्यपणे मध्यवर्गीय व उच्च मध्यवर्गीय कुटुंबात जन्म घेतलेल्या आहेत.

२) बहुतेक स्त्री उद्योजकांच्या आई वडिलांपैकी किमान एकाच्या तरी स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय आहे. विवाहापूर्वी हया स्त्रियांचे त्यांच्या वडिलांशी अत्यंत चांगले संबंध असल्याचे आढळून येते. हया स्त्रियांना वडिलांकडून संरक्षाणासोबत मार्गदर्शन व साहाय्य  मिळाले आहे.

३) बहुतेक स्त्री उद्योजक पदवीधर आहेत. त्याचे भाषेवर चांगले प्रभुत्व आहे.

४) बहुसंख्याक स्त्री उद्योजक विवाहीत आहेत. मुले मोठी झाल्यानंतर त्यांनी स्वतःला गुंतवून घेतल्याचे आढळते.

५) बहुतेक स्त्री उद्योजकांचे वय उद्योगाची स्थापना केली त्या वेळेस २५ ते ३५ वर्षे हया मर्यादेमध्ये आढळून येते.

६) स्त्री उद्योजकांनी स्थापन केलेले उद्योग हे लघु उद्योग क्षेत्रामध्ये  अंतर्भुत होणारे आहेत.

७) बहुतेक स्त्री उद्योजकांचे उद्योग हे व्यक्तिगत मालकीच्या  पध्दतीने संघटित  झालेले आहेत. त्यानंतर त्यांनी भागीदारी पध्दतीला प्राधान्य दिल्याने आढळून येते.

८) स्त्रियांची उद्योजकता ही स्वयं उपयोगात आणल्या जाणाऱ्या वस्तूंच्या उदा. लोणची, मसाले व पापड इ., उत्पादनापुरती मर्यादित आहे, की स्थिती फार जुनी झाली. आपल्या देशातील स्त्री उद्योगांमध्ये  स्वयंपाकघरात गृहिणीच्या उपयोगी पडणाऱ्या विविध प्रकारच्या वस्तू, कुकर्स, फर्निचर, शोभेच्या वस्तू, गालिचे, स्टेनलेस स्टीलच्या भांडी, विविध प्रकारची औषधे, विजेची उपकरणे, लहान मुलांची खेळणी, इलेक्ट्रॉनिक वस्तु, प्लॅटिक रबरच्या वस्तू तयार कपडे अशा अनेक प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन केले जात आहे.

९) स्त्रियांना उद्योजक बनण्याकरिता प्रवृत्त करणाऱ्या प्ररणांमध्ये स्वतःच्या अर्थपूर्ण रीतीने गुंतवून ठेवण्याची इच्छा, स्वतंत्रपणे कार्य करण्याची इच्छा, आर्थिक स्वातत्र्यं व कार्य समाधान मिळवण्याची इच्छा, महत्त्वाच्या प्रेरणा आहेत.

१०) व्यवसायामध्ये जोखीम निहित आहे. उद्योजकांना हया जोखीमीची जबाबदारी स्वीकारावी लागते. स्त्री उद्योजकांची प्रवृत्ती अनिवार्य असेल तेवढीच जोखीम स्वीकारण्याची असते.

११) स्त्री उद्योजकांमध्ये अनेक गुण आढळतात. हया गुंणामध्ये महत्त्वाकांक्षी स्वभाव, उत्साहीत, परिश्रमी, उद्योगी, व्यवहारिपणा, अभ्यासू वृत्ती व शिकण्याची तयारी, असे प्रमुख गुण आहेत.

१२) मी उद्योजकांच्या विविध मर्यादा आहेत. काही प्रमुख मर्यादा अशा आहेत.

   १) एंकदरीने स्त्री उद्योगकांना प्ररुषांवर अवलंबून राहायला आवडते परिणामतः अने स्त्री उद्योजकांचे अज्ञाना कायम राहते. द्यी उद्योजकांना महत्त्वाच्या गोष्टींबद्दलही आवश्यक ती अघयावत माहिती मिळत नाही. स्त्री उद्योजकांना स्वतंत्रपणे निर्णय घेणे जमत नाही आणि प्रसंगी स्त्री उद्योजक फसविल्या जातात.

   २) स्त्री उद्योजकांना उद्योगांच्या गरजेनुसार हवे तेवढे भांडवल तप्तरतेने उभारता येत नाही.

   ३) स्त्री उद्योजकांना व्यवसायामधील आर्थिक व्यवहारांची गुंतागुंत उमगत नाही. त्यामुळे त्याना आर्थिक व्यवहांरावर परिणामकारपणे नियंत्रण ठेवने शक्य होत नाही.

   ४) व्यवसायात काही प्रसंगी कट्र निर्णय घ्यावे लागतात. स्त्री उद्योजकांची प्रवृत्ती हया प्रकारचे नियम टाळण्याची असते.

   ५) स्त्री उद्योजकांना अनेक गोष्टींची सतत भीती वाटते. लोक आपल्याला फसवतील तसेच बाजारबटैत स्पर्धा व्रीव झाल्यास हया स्पर्धेत आपण टिकाव धरु शकणार नाही, अशी स्त्री उद्योजकांच्या मनात आशंका असते.

१३) स्त्री उद्योजक आपल्या वस्तूंचा दर्जा चांगला रहावा आणि मध्यस्थांना व विक्रेत्यांना हया वस्तू त्यांच्या आदेशावरुन व अगदी वेळेवर उपलब्ध व्हावात, हयाकरीता कसोटीने प्रयत्न करतात, पण वस्तुंच्या जाहिरातीवर पैसे खर्च करणे ही मात्र चैन आहे. अशी अनेक स्त्री उद्योजकांनी भावना आहे.

१४) भारतामधील स्त्री उद्योजकांना भेडसावणारी सर्वात मोठी समस्या त्यांचे स्त्री असणे हीच आहे. स्त्री उद्योजकांना व्यावसायिक जीवना व कौटुंबिक जीवनात सांगड घालण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा करावी हया प्रछिपेत त्यांना नेहमीच मिळणे असते.

## १५.८ स्त्री उद्योजकांचे अभिप्रेरण (Matiuation of women Entrepreneurs)

उद्योजक त्यांचे कार्य किती कार्यक्षमतेने करताना. त्यांची भूमिका किती प्रभावीपणे पार पाडतात. हयावर देशाच्या आर्थिक विकासाच्या वेग अवलंबून असतो आणि उद्योजकांची कार्यप्रवगता व परिणामकारकता उद्योजक किती व कसे अभिप्रेरित होतात यावर अंवलबून

असते. हया कारणामुळेच देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टिने उद्योजकतेचा आणि उद्योजकतेच्या संदर्भात उद्योजकीय अभिप्रेरणचा, प्राधान्याने विचार करणे आवश्यक ठरते, आपल्या देशातील उद्योजकांचे अभिप्रेरण उद्योजकांना आवाहने स्वीकारण्यासाठी उद्‌यक्त करणाऱ्या विभिन्न प्रेरणा आणि हया प्रेरणांशी निगडीत बाबींची चर्चा एका स्वतंत्र प्रकरणात विस्ताराने केली आहे. ही चर्चा प्रामुख्याने पुरुष उद्योजकांच्या अभिप्रेरणारी संबधित आहे.

**स्त्री उद्योजक – उस्त्रोजकांचा एक स्वतंत्र वर्ग:**

पुरुष उद्योजक आणि स्त्री उद्योजक यांमध्ये तसे मूलभूत अंतर नाही. पण असे असूनही स्त्री उद्योजकांची सामाजिक –आर्थिक पार्श्र्वभूमी, त्याच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या, स्त्रियांची वैशिष्टये व स्त्री उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्या,हया बाबींचा विचार केल्यास, स्त्री उद्योजकांना एक वेगळा वर्ग प्रातून स्त्री उद्योजकांशी संबधित भरवलेल्या सर्व बाबींचा स्वतंत्रपणे विचार करायला हवा.

**स्त्री उद्योजक आणि सिट्टी प्रेरणा :**

इतर देशांमध्ये व आपल्या देशात उद्योजकांच्या अभिप्रेरणाबाबत जेवढे संशोधन करण्यात आले. त्या सर्व संशोधनाची विल्पती सिध्दी प्रेरणा (Achievement) ही उद्योजकांची सर्वात महत्वाची प्रेरणा आहे, ही आहे. स्त्री उद्योजकांबाबत जे संशोधन वैशिष्टयांपेक्षा बरीच भिन्न असलेल्या स्पष्ट झाले आहे. स्त्री उद्योजकांच्या मानसिकतेमध्ये सिध्दी प्रेरणा कमी प्रमाणात अस्तित्वात असते. त्यांना अभिप्रेरित करणारी ती सर्वांत महत्वाची प्रेरणा तर मुळीच नसते. आपल्या देशांतही स्त्री उद्योकांच्या संदर्भात जे संशोधन करण्यात आले आहे त्यामंधून निघालेल्या निष्कर्षानुसार पुरुष अद्योजकांच्या तुलनेत स्त्री उद्योजकांच्या प्रेरणा फार भिन्न आहेत, हे स्पष्ट झाले आहे.

**स्त्रियांच्या अभिप्रेरणाला प्रभावित करणारे घटक:**

आपल्या देशातील स्त्री उद्योजकतेच्या संदर्भात ही उद्योजकता म्हणजे दोन प्रकारच्या घटकांची आहे, असे मानले जाते, हया घटकांना असे म्हणतात. आपल्या बुध्दीचा क्षमतेचा, कौशल्याचा, वेळेचा व संबधाचा योग्य उपयोग करुन घ्यावा व आपली महत्वाकांक्षा पूर्ण करावी, नवनवीन आवाहने स्वीकारावीत समाजात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करावे आणि आपल्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा करावी, अशा विचारांची प्रेरित होऊन अनेक स्त्रिया उद्योजक बनवतात. स्त्रियांना उद्योजकीय भुमिका स्वीकारण्याची उघुक्त करणाऱ्या हया विशिष्ट घटकांना असे म्हणतात. स्वतःची व कुटुबांची उपजीविका चालविण्यासाठी आवश्यक असलेले पैसे मिळविण्याकरीता, आपल्या मुलांना रोजगार उपलब्ध करुन देवून त्यांची सोय लावण्याकरिता, कुटुंबाची विस्कटलेली, आर्थिक घडी नव्याने नीट बसविण्याकरिता, आर्थिक दुर्दशा व कौटुबिंक आपत्तीमधून मार्ग काढण्याकरीता स्वतःचे सैरभैर झालेले व्यक्तिगत जीवन सावरण्याकरिता स्त्रियांनी उद्योगाची स्थापना केल्यास, स्त्रियांना उद्योजक बनण्यासाठी भाग पाडणाऱ्या, त्यांना हया वळणावर ढकलणाऱ्या घटकांना असे म्हणतात. हे दोन्ही प्रकारचे घटक आपल्या मुलांना रोजगार उपलब्ध करुन देवून त्यांची सोय लावण्याकरिता. कुटुबांची विस्कटलेली आर्थिक घडी नव्याने नीट बनविण्याकरिता, आर्थिक दुर्दशा व कौटुबिक आपत्तीमधून मार्ग काढण्याकरीता स्वतःचे सैरभैर झालेले व्यक्तिगत जीवन सावरण्याकरिता

स्त्रियांनी उद्योगाची स्थापना केल्यास, स्त्रियांना उद्योजक बनण्यासाठी भाग पाडणाऱ्या, त्यांना हया वळणावर ढकलणाऱ्या घटकांना असे म्हणतात. हे दोन्ही प्रकारचे घटक सर्वस्वी भिन्न नाहीत. पहिल्या प्रकारच्या घटकांचे स्वरुप धनात्मक आहे तर दुसऱ्या प्रकारच्या घटकाचे स्वरुप काहीसे नकारात्मक आहे.

**विधायक कार्यामध्ये स्वतःला व्यस्त ठेवणे:**

आपल्या बुध्दीचा, क्षमतेचा कौशल्यांचा साधनांचा आणि वेळेचा चांगला उपयोग करण्यासाठी स्वतःला गुंतवून घेणे. जबाबदाऱ्या स्वीकारुन स्वतःला व्यक्स ठेवणे. ही भारतामधील स्त्री उद्योगकांची महत्त्वाची प्रेरणा होय. बहुसंख्याक स्त्री उद्योजक हया उच्च मध्यमवर्गीय व श्रीमंत कुंटुबातून आलेल्या आहेत. हया स्त्रियांच्या माहेरी व सासरी, दोन्ही ठिकाणी, सर्व प्रकारची मुबलकता आणि संपन्नता असते विवाहानंतर हया स्त्रियांचा कौटुंबिक जीवनात स्थैर्य निर्माण झालेले असते. मुले मोठी झाल्यामुळे ती आखिर अवलंबून नसतात. अशा वेळेस सुशिक्षित कुंटुबाचा व्यवसाय चालविण्याची जबाबदारी स्वीकारतात किंवा नव्याने उद्योगाची स्थापना करुन त्यांचे संचयन करतात.

आपला स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय असावा व आपल्या परिश्रामने व्यवसायाची भरभराट साधावी अशी आजच्या पिडीतील अनेक सुक्षिशित स्त्रियांची महत्तवाकांक्षा असते. हया स्त्रियांचा नोकरी करण्याची वृत्ती नसते. माहेरी संपन्नता असली वडिलांचे प्रोत्साहन असते आणि व्यवसायामधील काही अनुभवी व साधनसंपन्न व्यक्तींचे सहाकार्य प्राप्त झाले तर हया स्त्रिया एखादा व्यवसाय सुरु करतात किंवा उद्योगाची स्थापना करतात. विवाहानंतर पतीची अनुमती मिळाल्यास महत्तवाकांक्षी स्त्रिया नवीन उद्योगांची स्थापना करण्यात पुढाकार घेतात. या स्त्रियांच्या सासरी व्यवसाय किंवा औद्योगीक क्षेत्राशी संबधित मंडळी नसल्यास हया अभिप्रेरीत स्त्रियांची महत्तवाकांक्षा साकार होण्यामागे भासत नाही.

कारखानदारीच्या क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करणे, यश मिळवणे आणि आर्थिक समृध्दी निर्माण करणे, ही पुरुषांची महत्वाकांक्षा असते. या पुरुषाचे अकाली निधन झाल्यामुळे किंवा त्याला एखादा आजार अथवा अपघात झाल्यामुळे, हे उद्दिष्टे साध्य होत नाही. अशा वेळेस हया पुरुषाची मुलगी किंवा पत्नी नविन उद्योगाची स्थापना करण्यामध्ये पुढाकार घेऊन वडिलांची किंवा पतीचा महत्वाकांक्षा साकार करण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करते. व्यवसायामध्ये गुंतलेल्या कुटुंबामध्ये कर्त्या पुरुषाची महत्वाकांक्षा ही कुटुबांतील सर्व व्यक्तींची महत्वाकांक्षा बनते व कुटुंबातील सर्व व्यक्ती या कार्यात हातभार लावतात.

**२) स्वतःची आवड जोपासणे :**

उच्च मध्यमवर्गीय व श्रीमंत कुटुंबातील अनेक उच्च विद्याविभूषित आणि सुसंस्कृत स्त्रिया अभिरुचीसंपन्न असतात. त्यांच्या काही जपलेल्या आवडी असतात. काही स्त्रियांनी विशेष प्रकारची कौशल्ये आत्मसात केलेली असतात. त्यामुळे योग्य संधी मिळाल्यास अशा स्त्रिया त्यांच्या आवडींशी जुळणारे व्यवसायामधील एखादे क्षेत्र निवडतात व उद्योगांची स्थापना करतात. स्त्रियांची उद्योजकता स्वयंपाकघराच्या अवती भोवती फिरते असे जे म्हणतात, त्याचे कारण हेच आहे. मुलांनकरिता खेळणी तयार करणे, कशिदाकारी करणे, विविध प्रकारचे कपडे शिवून घेणे, पर्यटनसंस्था व जाहिरात संस्था चालविणे असे अनेक उपक्रम स्वतःची आवड जोपासणाऱ्या स्त्रियांकडून सुरु केले जातात. स्वतःची आवड जोपासणे या प्ररणेमुळे अभिप्रेरित

आलेल्या स्त्री उद्योजकांनी त्यासाठी उपक्रमांची स्थापना केल्यामुळे या स्त्रियांचे मुळ उदि्ष्ट तर साध्य होतेच, पण शिवाय या स्त्री उद्योजकांना एक आगळे समाधान प्राप्त होते, त्यांच्या कौशल्यांचा व क्षमतांचा विकास होतो शिवाय पुरेसे अर्थाजनही होते.




**३) पैसे मिळवणे:**

जास्तीत जास्त आर्थिक फायदा मिळविणे किंवा आर्थिक समृध्दी निर्माण करणे ही उद्योजकांची महत्वपूर्ण प्रेरणा असते.काळ, परिस्थिती व संदर्भ कोणताही असो, पैसे मिळविणे ही उद्योजकांची सनातन प्रेरणा होय, समाजात, व्यवसायात व पर्यावरणामध्ये कोणत्याही प्रकारचे बदल घडून आले, तरी त्यामुळे पैसे मिळविणे या प्रेरणेचे महत्व व महात्म्य मुळीच कमी होत नाही. भारतामधील स्त्री उद्योजग या सर्व साधारण नियमाला मुळीच अपवाद नाहीत.

अलिकडे बहुतेक सुशिक्षित स्त्रियांना नियमित व पर्याय उत्पन्नाचा एक चांगला स्त्रोत स्वतः करिता उपलब्ध व्हावा असे तीव्रतेने वाटते. ही इच्छा पूर्ण करण्यासाठी सामान्यपणे अनेक स्त्रिया चांगली नोकरी मिळवितात. कामाची ठराविक वेळ, सुरक्षित जीवन, नियमांनुसार काम व बऱ्यापैकी उत्पन्न, हे स्त्रियांनी नोकरी केल्यामुळे त्यांना प्राप्त होणारे फायदे आहेत. परंतू नोकरी करत स्त्रियांना ठराविक उत्पन्न मिळते. त्यामुळेच आर्थिक स्वातंत्र्य किंवा आर्थिक समृध्दीची आकांक्षा बाळगणाऱ्या स्त्रियांना नोकरीचा पर्याय न स्वीकारता, उद्योजकतेच्या क्षेत्राकडे वळणे, भाग पडते. स्त्री उद्योजकांची मानसिकता परिकल्पतेची नसते. स्त्री उद्योजकांना एंकदरीने कधी भरपूर फायदा होतो तर कधी जबरदस्त तोटा अशी स्थिती भावत नाही. त्यामुळेच स्त्री उद्योजक आपल्या व्यवसायाचे संचालन करीत असतांना, तोटा सहन करावा लागणार नाही, मर्यादित का होईना,पण निश्रित स्वरुपात फायदा नेहमी मिळवत राहावा ही दक्षता घेऊनच सर्व निर्णय घेत असतात. पैसे मिळविण्याच्या प्रेरणेने उद्योजक बनण्यासाठी प्रवृत्त झालेल्या स्त्री उद्योजक आपल्या महत्वाकांक्षेला वस्तुनिष्ठता विवेक व साधन राहण्याचा व्रतीचे कुपण घालतात आणि सर्व प्रकारची दक्षता बाळगुन आपल्या उद्योगांचे संचालन करतात.

### ४) सन्मान व प्रतिष्ठा मिळवणे

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये जास्तीतजास्त फायदा मिळविणे, जास्तीतजास्त पैसे मिळविणे आणि आर्थिक समुध्दी निर्माण करणे ही उद्योजकांची मुलभूत प्रेरणा होय हया प्रेरणेने प्रभावित होणारे उद्योजक योग्य किंवा अयोग्य इष्ट किंवा अनिष्ट, न्याय किंवा अन्याय, अशा सर्वच प्रकारच्या मार्माचा अवलबूंन करुन भरपूर धन मिळवितात. हा पैसा भांडवलाच्या स्वरुपात, गुंतवत नवीन उद्योगाची स्थापना करता येते, सर्व प्रकारच्या सुखसोयी व विलासाची साधने मिळविता येतात आणि राजकीय सत्तेवरही ताबा मिळवून सरकारला हवे तसे निर्णय घेण्याकरिता भाग पाडता येते. पण उद्योजकांना हया सर्व गोष्टी मिळाल्यानंतरही समाधान प्रतिष्ठा व सन्मान न मिळाल्यास अत्यंत श्रींमत उद्योगपती व व्यावसायिकांच्या हातची मुठ रिकामीच राहते. भारतीय उद्योजकांना कार्यप्रवण करणाऱ्या प्रेरणाबध्दल करण्यात आलेल्या सर्व संशोधनामधून समाजात सन्मान व प्रतिष्ठा मिळविणे, ही उद्योजकांची महत्त्वाची प्रेरणा आहे, ही बाब स्पष्ट झाली आहे, भारतातील स्त्री उद्योजकपण हयाला अपवाद नाहीत.

कारखानदारीच्या क्षेत्रात व्यावसायिक यशाच्या माध्यमातून, उद्योजकांना भरपूर पैसा संपत्ती, विकासाची साधने व सत्ता मिळूनही हया उद्योजकांना अपेक्षित असलेली सानमान्यता व प्रतिष्ठा न मिळाल्यास हे उद्योजक असंतुष्ट बनतात. नंतर पैसा खर्च करुन प्रतिष्ठा मिळवण्यासाठी हे उद्योजक सर्व शक्य ते प्रयत्न करताना. हया बाबतीत भारतामधील स्त्री उद्योगक पुरुष उद्योजकांपेक्षा जास्त संवेदनाशील आहेत असे मानले जाते. स्त्री उद्योजकांना मानमान्यता व प्रतिष्ठा फार तीव्रतेने परिणाम होतो. स्त्रियांनी उद्योजकता म्हणजे एक प्रकार अडथळयांची शर्यंत आहे . स्त्रियांना अनेक ठिकाणहुन विविध प्रकारे विरोध होतो. भारतात आजही अनेक ठिकाणाहून विविध प्रकारे विरोध होतो. भारतात आजही अनेक ठिकाणी पुरुषांचा उद्योजकतेला प्रवृत्ती मानलात तर स्त्रियांना उद्योजकतेला विकृती मानतात. आपल्या देशामध्ये स्त्रिया अभिप्रेरित होऊन भागत नाही स्त्रियांना निरनिराळया स्त्रोतामधून उद्य कुटुंबातील सभासद सरकारी यंत्रणा, व्यावसायिक विक्रेते, कर्मचारी इ. अपेक्षित साहाय्य मिळाले. तरच स्त्रिंयाचा स्वतंत्रपणे व्यवसाय करण्याचा किंवा स्वंतत्रपणे उद्योग स्थापन करण्याचा विचार अंमलात येऊ शकतो. एरवी नाही.

### स्त्री उद्योजक प्रथन व शेवटी स्त्रियाच :-

मॅकव्होरी यांच्या मते "अलिकडचे उद्योजक श्रींमत होण्याचे स्वप्न पाहण्याऐवजी मोठे होण्याचे स्वप्न पाहतांना आढळून घेतात." हया संदर्भात भारतामधील स्त्री उद्योजकांची मानसिकता कशी आहे ?

स्त्री उद्योजकांना अनेक ठिकाणाहून करण्यात येणाऱ्या विरोधाला तोंड द्यावे लागते स्त्री उद्योजकांना त्यांच्या व्यावसायिक जीवनात अनेक अडथळे ओलाडांवे लागतात. भारतात स्त्री उद्योजक, प्रथम, शेवटी स्त्रिया आहेत. स्त्री उद्योजकांच्या दृष्टीने उद्योजगाच्या यशस्वी कारभारापेक्षा व त्यामधून मिळणाऱ्या नफापेक्षा त्याचे कुटूंब पतीचे आरोग्य, मुलांचे शिक्षण, मुलीचे संसार, कुटुंबातील एकोपा, शांतता व समाधान हया गोष्टी निश्रितच जास्त महत्वाचा आहेत.

**स्त्री उद्योजकांच्या समस्या (Problems of Women Entrenpreneurs) :**

प्रत्येक वेळेस व प्रत्येक समाजात उद्योगकांपुढे निरनिराळया समस्या असतात हया समस्यांचा संबंध उद्योकांच्या व्यवसायाच्या सर्व पैलूंशी असतो. हया समस्या स्थिर भांडवल व खेळत्या भांडवलाची उभारणी, कच्चा माल व इतर आवश्यक वस्तुंची उपलब्धता, कच्चा माल व निर्मित वस्तूंची वाहतूक, यंत्रसामुग्रीचा उपयोग,विजेचा प्रवाह, दळणवळणाची साधने वस्तुची मागणी, बाजारामधील परिस्थिती, स्पर्धा कामगारांचे संप, कर्मचाऱ्यांची, संप, कर्मचाऱ्याची बेशिस्त कर आकारणी, सरकारणे लावलेले निर्बध, पर्यवेक्षा करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याची मनमानी व हस्तक्षेप, सरकारच्या धोरणामध्ये घडून येणारे बदल, राज्यकर्त्यांचा अवाजही हस्तपेक्षा, अशा अनेक बाबीशी संबधित असतात. प्रत्येक उद्योजकाला अनेक समस्या भेडसावतात. हया समस्यांची सोडवणुक करण्यासाठी प्रत्येक उद्योगक प्रयत्नशील असतो. प्रत्येक उद्योजकापुढे कांही संमस्या असणे.स्वाभाविक आहे. पण व्यवसायाचे अस्तित्व थोक्यात येईल, येवढी या समस्याची तीव्रता कधीही असू नये प्रत्येक उद्योजकाचे व्यावसायिक यश हे तो हया समस्यांचे कशा रीतीने, किती कार्यक्षमतेने निराकरण करतो हयावर अवलंबून असतो. हया दृष्टीने उद्योजकांनी केलेल्या प्रयत्नांना समस्यांचे व्यवस्थापन असे म्हणायला हरकत नाही.

भारतामधील उद्योजकांपुढे ज्या सर्वसाधारण समस्या आहेत. त्या सर्व समस्या स्त्री उद्योजकांपुढे निश्रित आहेत. पुरुष उद्योजकांच्या तुलनेत बहुसंख्याक स्त्री उद्योजकांची वित्तीय साधने, अनुभव आणि प्रतिकुल परिस्थिती टिकून राहण्यासाठी क्षमता मुळातच कमी असते.




**आकृती १२.३ : स्त्री उद्योजकांच्या समस्या**

हया कारणांमुळे आपल्या उद्योगांचा स्वत्रंतपणे कारभार पाहणाऱ्या व स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी धडपड करणाऱ्या सर्व स्त्री उद्योजकांची फरफड असते. स्त्री उद्योजक हा उद्योजकांनचा एक वेगळा वर्ग आहे. पुरुष उद्योजकांच्या तुलनेत स्त्री उद्योजकांची काही वेगळी वैशिष्ट आहेत. त्यामुळे स्त्री उद्योजकांच्या काही वेगळया समस्या पण आहेत, भारतामधील स्त्री उद्योगांच्या वेगळया समस्याची पुढे थोडक्यात चर्चा केली आहे.

**१)सिध्दी प्रेरणेचा अभाव:**

प्रत्येक व्यक्तीचा, मग ती पुरुष असो किंवा स्त्री, उद्योजग बनण्याचा निर्णय हा या व्यक्तिची महत्वाकांक्षा किंवा प्रेरणा या व्यक्तिला मदत करणारे सहाय्यक घटक (Faclitating Compelling Reasons) आणि या व्यक्तीला मदत करणारे मानशस्त्रज्ञांना मते व्यक्तीला उद्योजक बनण्यासाठी अभिप्रेरित करणारी सर्वात महत्वाची प्रेरणा म्हणजे सिध्दी प्रेरणा होय.

स्पर्धात्मक परिस्थितीमध्ये, सर्व अढळयाना दूर सारुन, विशिष्ठ उद्दिष्ट मांडण्याचा दृष्टिने यश मिळवण्यासाठी व्यक्तीची जबर इच्छा म्हणजे सिध्दी प्रेरणा होय. सिध्दी प्रेरणा म्हणजे अशी मानसिकता ज्यामुळे नियोजीत कार्यामध्ये यश मिळून उदिष्ट साध्द करणे ही त्या व्यक्तीची एक गरज बनते. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षितता, या जशा प्रत्येक मनुष्याच्या प्राथमिक गरजा आहेत. सिध्दी प्रेरणा किंवा यशसिध्दीची गरज आहेत. सिध्दी प्रेरणा किंवा यशसिध्दीची गरज  ही पण त्या व्यक्तीला महत्वाची गरज बनते.

व्यक्तीच्या मनात असलेली सिध्दी प्रेरणेची उच्च पातळी व उद्योजकांची निर्मिती, उद्योजकतेचा विकास, समाजात उद्योजकीय संस्कृतीची प्रगती आणि आर्थिक विकास, यांमध्ये फार जवळचा सहसंबध आहे, सिध्दी प्रेरणेशिवाय कोणत्याही उद्योजकाची कल्पनासुध्दा करता येत नाही. उद्योजकांच्या मनात सिध्दी प्रेरणेची उच्च पातळी असल्यास उद्योजक नवनविन व्यवसायिक संधीचा शोध घेण्याची, विविध मार्गाती नवनिर्मिती करण्यासाठी, जोखीम घेण्यासाठी, मोठया  प्रमाणावर भांडवल गुंतवणुक करण्यासाठी, कठोर परिश्रम करण्यासाठी आणि आवाहने स्वीकारण्यासाठी तयार होतात.

भारतामधील स्त्री उद्योजकांच्या मनात सिध्दी प्रेरणा असते, पण हया प्रेरणेची पातळी कमालीची कमी असते आणि दुसरे असे की स्त्री उद्योजकांची ती तेवढी महत्वाची प्रेरणा नसते. यशस्वी होण्यासाठी उद्योजकांच्या मानसिकतेमध्ये तीव्र स्वरुपाची सिध्दी प्रेरणा अस्तित्वात असणे आवश्यक असते पण भारतामधील स्त्री उद्योजकांजवळ नेमकी हयाच गोष्टीची करतरता असते. ही बाब संशोधना मधुन सिध्द झाली आहे. सिध्दी प्रेरणेची निम्न पातळी ही भारतामधील स्त्री उद्योजकांची एक महत्वाची समस्या आहे हे मान्यच करायला हवे.

भारतातील स्त्रियांचा मानसिकतेमध्ये सिध्दी प्रेरणेची पातळी निम्न असण्याची काही ठळक कारणे, पुढीलप्रमाणे आहेत.

१. उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये प्रवेश करणाचा व्यक्तीमध्ये स्वतंत्रपणे  विचार करण्याची क्षमता असल्याशिवाय, सिध्दी प्रेरणेची पातळी कधीही उच्च दर्जाची राहु शकत नाही. आपल्या देशातील स्त्रियांनी स्वतंत्रपणे विचार करावा असे कधीच त्यांना सांगितले जात नाही. उलट स्त्रियांना स्वतंत्रपणे विचार करण्याची गरज नाही, असेच त्यांना शिकवले जाते. आपली कुटुंबव्यवस्था अशी आहे स्त्रियांना लहानपणी वडिलांचे, विवाहानंतर पतीचे व शेवटच्या अवस्थेमध्ये मुलांचे ऐकावे लागते. स्त्रियांनी स्वतंत्रपणे विचार करावा हे जणु अनैसर्गिक आहे, अर्थात आपली सामाजिक मान्यता आहे.

२. स्त्रियांचे अर्थक्षेत्र हे घराच्या उंबरठयापुरतेच मर्यादित असते. स्त्रियांनी नेहमी व प्रत्येक गोष्टीसाठी पुरुषावर अवलबूंन असावे, अशी आपली समाजव्यवस्या आहे.

३. स्त्रिंयाना कोणतेही स्वातंत्र्य नसते पडदा न घेणाऱ्या स्त्रिया सुध्दा कान असून ऐकू शकत नाहीत डोळे असून पाहू शकत नाहीत व बुध्दी असून ती वापरु शकत नाहीत, सूर्यप्रकाशाला वावरणाऱ्या हया स्त्रियांना जीवनात तसा कायमचा अंधारच असतो.

४. स्त्रियांनी स्वतः करिता स्वीकारलेली व प्रयत्नपूर्वक जोपासलेली आदर्शत्वाची प्रतिमा त्याच्या उद्योजक बनण्याच्या प्रक्रियेमध्ये अडसर उत्पन्न करते.

५. भारतीय स्त्रियांना पुरुषाची सावली बनून राहण्यातच आयुष्याचे सार्थक वाटते. वेंवाहापूर्वी वडिलांच्या विवाहानंतर पतीच्या व शेवटची मुलाच्या कर्तत्वामध्ये आपल्या जीवनाचे सार समजणाऱ्या स्त्रिया नवीन पायवाटाचा कशाला शोध घेतील ?

स्त्रियांचे सिध्दी प्रेरणेची पातळी मुलातच कमी असल्यामुळे अशा स्त्रियांच्या मनात उद्योजक बनुन स्वंतत्रपणे काही आर्थिक स्वरुपाचे कार्य करण्याच्या विचारही येत नाही. जेथे स्त्रियांच्या मनात स्वतंत्र्य कार्य करण्याचा विचारही येत नाही. तेथे त्यांना अभिप्रेरित कसे करणार ? ज्या स्त्रियांना अभिप्रेरित केले जावू शकत नाही अशा स्त्रियांना उद्योजकीचा प्रशिक्षण कसे देणार ? स्त्रियांमध्ये सिध्दी प्रेरणेची पातळी मुळातच कमी असल्यामुळे भारतामधील स्त्रियांच्या उद्योजकांच्या एखादया साचलेला डबक्याचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

**२) जोखनीची जबाबदारी स्वीकारण्याचा क्षमतेचा अभाव:**

जोखीम स्वीकारणे हे उद्योजकांचे महत्त्वाचे कार्य होय. जोखीम स्वीकारतो तो उद्योजक, अशीच उद्योजकांची व्याख्या केली जाते. उद्योजकांनी जोखीमीची जबाबदारी स्वीकारल्यामुळे व्यवसायाशी संबंध असलेले सर्व व्यवहार संबधितांना सुरळीतपणे करता येतात.

३) यशस्वी होण्याकरीता उद्योजकांचे अनेक गुण व क्षमता असावी लागते, यशस्वी होण्याकरीता प्रत्येक उद्योजकाचे जोखीम स्वीकारण्याची क्षमता असावी लागते. यशस्वी होण्याकरिता प्रत्येक उद्योजकामध्ये जोखीम स्वीकारण्याची क्षमता असणे आणि हया क्षमतेची नीट वापर करुन उद्योजकांचे जोखीम स्वीकारण्याचे कार्य कौशल्याने पार पाडणे आवश्यक असते. क्षमता मुळातच नसते. आपल्या देशातील स्त्री तिच्या लहानपणी वडिलावर अवलंबून असे . विवाहानंतर स्त्री तिच्या अवलबूंन असते तर वार्धक्यात स्त्री तिच्या मुलावर अवलंबून असतात, स्त्रियांनी पुरुषांवर अवलंबुन रहावे असे त्यांना शिकविले जाते आणि त्या नेहमी पुरुषांवर अवलंबून राहीलच अशीच व्यवस्थाही केली जाते.

आयुष्यभर पुरुषांवरच अवलंबून राहणाऱ्या स्त्रियांच्या मनात आत्मविश्र्वास कसा उत्पन्न होणार ? आपण दुर्बळ आहोत. पण आपण काहीच करु शकत नाही, हया भावनेने स्त्रियांच्या मनात मुळ धरलेले असते. त्यामुळे स्त्रिया कोणत्याही बाबतीत पुढाकार घेऊ शकत नाहीत लहानसहान अडचणीनी त्या खचतात आणि एखादे संकट कोसले तर त्यामधून त्या क्वचितच सावरतात.

भारतीय स्त्रियांमध्ये जोखीम घेण्याची क्षमता नसल्यामुळे, त्या उद्योकतेच्या आवाहान स्वीकारण्याकरिता उपात्र ठरतात, पुरुषांचा आधार घेऊन ज्या स्त्रिंया उद्योजक बनतात, त्यांनाही पुरुष नातलगांवर आणि पुरुष सहकार्यावर कायमचे अवलंबून राहणे भाग पडते. परिस्थितीच स्त्री उद्योजकाना महत्वाचे निर्णय स्वतंत्रपणे घेणे शक्य होत नाही. स्त्रियामध्ये

जोखीमची जबाबदारी स्वीकारण्याची क्षमताच नसते तशी त्यांची प्रवृत्तीही नसते अशा परिस्थितीमध्ये आपल्या देशामध्ये स्त्रियांच्या उद्योजकतेच्या विकास कसा घडुन येणार ?

**३) निरुपयोगी शिक्षण :**

आपल्या देशात स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण बरेच कमी आहे, स्त्रियांची शिक्षण घेण्याचे प्रमाणही कमी आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची प्रवृत्ती प्रामुख्याने कला शाखेदर पदवी मिळविण्याची असते फार थोडया स्त्रिया विज्ञान यंत्रविद्या व तंत्रविद्या हया विद्याशामध्ये उच्च शिक्षण घेण्याची प्रवृत्त होतात.

उच्च शिक्षण हे व्यक्तींच्या क्षमतांच्या विकास करण्यासाठी उपयुक्त ठरणारे सर्वात महत्वाचे साधन होय. उच्च शिक्षणामुळे व्यक्तीच्या विकास करण्यासाठी उपयुक्त ठरते. अशा व्यक्तींना विभिन्न कौशल्ये सहजतेने अर्जित करता येतात. त्यांचे नैपुण्य वाढते. उच्च शिक्षणामुळे व्यक्तीचे व्यक्तिमत्व साकारते. पण आपल्या देशातील स्त्रियांनी उच्च शिक्षण घेतले तरी मुळातच हे उच्च शिक्षण अत्यंत पुस्तकी असल्यामुळे ते कुजाकामी असते. व्यवसायामध्ये वेळोवेळी निर्माण होणाऱ्या समस्यांचे नीट आकलन होण्याच्या दृष्टीने तसेच हया समस्यांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने उच्च शिक्षणाचा संबंधित स्त्रियांना म्हणावा तसा उपयोग होत नाही. त्यामुळे उच्च विधाविभुषित स्त्रिया पण त्या बाबतीने अपंगा सारख्याच असतात.

**४) कौटुंबिक जबाबदारी**

---

## १५.९ स्वअध्ययनासाठी प्रश्न

---

१) स्त्री उद्योजकांची कार्ये विषद करा.

२) स्त्री उद्योजकांची वैशिष्टे लिहा.

३) स्त्री उद्योजकांचे प्रकार स्पष्ट करा.

४) स्त्री उद्योजकांचे माणचित्र व अभिप्ररण थोडक्यात स्पष्ट करा.

❖❖❖❖

## REVISED SYLLABUS FOR M.COM (PART-II)

## BUSINESS MANAGEMENT – PAPER V

## ENTREPRENEURSHIP MANAGEMENT

***A Entrepreneurship Development perspective***

***(20 Lectures)***

1. Introduction, importance & significance, Entrepreneurial Development-world perspective.

2. Concept of entrepreneurship development, Evolution and growth-stages. Theories of entrepreneurships.

3. Concept of Entrepreneur, Entrepreneur, Entrepreneurship and Manger. Difference between Entrepreneur and Entrepreneur, Entrepreneur and Entrepreneurship, Entrepreneur and Manager.

4. Attributes and Characteristics of successful entrepreneur. Developing entrepreneurial culture. Qualities of a successful entrepreneur.

5. Roleof Entrepreneur in Indian Economy (developing economy with reference to self employment) development.

6. Successful Entrepreneurs case studies: Dhirubhai Ambani, Aditya Biral, - background, growth as an entrepreneur. Case study on entreprepreneurial development in India.

***B Creating Entrepreneurial Venture (20 Lectures)***

7. Business Planning Process, understanding business life cycle and product life cycle

8. Environmental Analysis: Search and scanning-strength and weaknesses

9. Identifying problems and opportunities – Opportunities and Threats

10. Defining Business Idea, Product, location and ownership.

11. Stages in starting the new venture

12. Entrepreneurial Models – Franchises, BPO, KPO, venture capital funding

***C Project Management (20 Lectures)***

13. Meaning of project, objectives and how to choose a project.

14. Preparing a business plan, marketing plan, financial plan and organization plan

15. Estimating and Financing funds requirement.

16. Schemes offered by various commercial Banks and Financial Institutions.

17. Working capital : Meaning, need & significance. Determinants of working capital.

***D Role of Central and State Government in promoting Entrepreneurship (20 Lectures)***

18. Introduction to various incentives, subsidies & grants; Promotion of export oriented units; Fiscal and tax concessions

19. Role of DIC (District industries Centre) in the Entrepreneurship Development & ED programmes; DIC- its functioning and objectives.

20. Entrepreneurship Training and Development. Objectives-contents-methods-execution

21. Problems and difficulties of Entrepreneurs-Marketing Finance, Human Resource-Production; Research-external problems Future of entrepreneurship in India.

22. Women Entrepreneurs in India

***Books recommended***


1. Entrepreneurship by Hisrich Robert D/Peters Micheal
2. Entrepreneurial Management by P.N. Singh/J.C. Saboo.
   Dr. P.N. Singh Centre for HRD


***Reference reading***


3. Entrepreneurial Development Role of Financial!
   Institutions by Laxmisha A.S. Jaipur / Mangal Deep/2004.
4. Entrepreneurial Development by Colombo Plan New Delhi/Tata McGraw Hill/1998

5. Cases in International Entrepreneurship by Hisrich R.D. Chicago/Liven/1997
6. Entrepreneurial Development by Gupta C.B. New Delhi / Somaiya Publication/1995
7. Entrepreneurship small scale Industries by G.S. Batra and R.C. Dangal Deep & Deep Publications Pvt. Ltd.
8. Entrepreneurship Development in India by Bishwanath Ghosh
9. Development Banks and Entrepreneurship Promotion in India by P.K. Sharma Mittal Publications.
10. WTO and Entrepreneurship Development by Manas Pandey Shree Publishers and Distributors.
11. Entrepreneurship Development in Indai by Sami Uddin Mittal Publications
12. Entrepreneurial Development by Vasant Desai (3 Volumes) Himalaya Publishing House
13. VC-Problem solving – An entrepreneurial skill
14. VC-Assessing Entrepreneurial competence
15. VC-Five success stories of first generation entrepreneur


❖❖❖❖